# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

एम. ए. भाग–२ : राज्यशास्त्र

# समकालीन आंतरराष्ट्रीय राजकारण

**(Contemporary International Politics)**

**सत्र ४ : पेपर C-10 (आवश्यक)**

(शैक्षणिक वर्ष २०१९–२० पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रथमावृत्ती :** २०२१

एम. ए. (राज्यशास्त्र) भाग-२ पेपर C-10 (आवश्यक)

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-91-5

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र ■


अध्यक्ष - **प्रा. (डॉ.) भारती तुकाराम पाटील**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **प्रा. डॉ. प्रकाश पवार**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. राजेंद्र कुरळपकर**
  के.आर.पी. कन्या महाविद्यालय, उरुण-इस्लामपूर,
  जि. सांगली
- **डॉ. एस. जी. कुंभार**
  राजा श्रीपतराव भगवंतराव कॉलेज, औंध,
  जि. सातारा
- **डॉ. आर. आर. कांबळे**
  कर्मवीर हिरे आर्टस, सायन्स, कॉमर्स अॅण्ड
  एज्युकेशन कॉलेज, गारगोटी, जि. कोल्हापूर
- **डॉ. अमिता संजिव कणेगांवकर**
  डी.डी. शिंदे सरकार कॉलेज, महालक्ष्मी मंदीर जवळ,
  कोल्हापूर
- **डॉ. शिवाजी सुबराव पाटील**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **प्राचार्य डॉ. शिरिषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, जि. सातारा
- **प्रा. डॉ. श्रीमती उत्तरा सहस्त्रबुद्धे**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  मुंबई विद्यापीठ, मुंबई
- **डॉ. मृदुल निळे**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  मुंबई विद्यापीठ, मुंबई
- **प्रा. डॉ. ए. एस. चौसाळकर**
  आर. के. नगर हौसिंग सोसायटी,
  एमएसईबी ऑफीस समोर, कोल्हापूर
- **श्री. वैभव नायकवडी**
  हुतात्मा किसन अहिर शुगर मिल, वाळवा,
  जि. सांगली
- **श्री. दशरथ विठोबा पारेकर**
  फ्लॅट नं. ५०८, एव्हरग्रीन होम्स, फेज-४,
  टॉवर डी, प्रभू हॉस्पिटल रोड, नागाळा पार्क, कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूर शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूर शिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक एम. ए. भाग दोन च्या राज्यशास्त्र विषयाच्या आवश्यक पेपर क्रमांक १० सत्र चार साठी 'समकालीन आंतरराष्ट्रीय राजकारण' हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

समकालीन आंतरराष्ट्रीय राजकारण यामध्ये शीतयुद्ध आणि त्याचे परिणाम, आर्थिक क्षेत्रीयता विरुद्ध जागतिकीकरण, जागतिक अर्थकारण, मुख्य समस्या या घटकांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. त्याचप्रमाणे राज्यशास्त्र विभागप्रमुख, डॉ. रविंद्र भणगे, डॉ. भारती पाटील, गांधी अभ्यास केंद्र समन्वयक व अध्यक्ष अभ्यास मंडळ, राज्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ मधील प्राध्यापक डॉ. प्रकाश पवार, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे मी आभार मानतो.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. (डॉ.) डी. के. मोरे दूरशिक्षण केंद्रातील सर्व सहकारी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**प्रा. डॉ. अजितानंद यशवंत जाधव**
४६५/३७ स्वरूप कॉलनी,
कदम बागेसमोर, सातारा

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. सूर्यकांत लक्कप्पा गायकवाड**<br>सहा. प्राध्यापक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १, ३ |
| **डॉ. अमिता कणेगांवकर**<br>डी. डी. शिंदे सरकार महाविद्यालय, कोल्हापूर | २ |
| **डॉ. विजय देठे**<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | ४ |

**■ संपादक ■**

**प्रा. डॉ. अजितानंद यशवंत जाधव**
४६५/३७ स्वरूप कॉलनी,
कदम बागेसमोर, सातारा

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | शितयुद्ध आणि त्याचे परिणाम | १ |
| २. | आर्थिक क्षेत्रीयता विरुद्ध जागतिकीकरण | २८ |
| ३. | जागतिक अर्थकारण | ६२ |
| ४. | मुख्य समस्या | ८० |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## प्रकरण – १

# शीतयुद्ध व शितयुद्धोत्तर परिणाम

## (Cold War and its Aftermath)

*************************************************************

## अनुक्रमणिका


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

 १.२.१ शीतयुद्ध

 १.२.२ शीतयुद्धोत्तर आंतरराष्ट्रीय व्यवस्था

 १.२.३ बहुध्रुवीय व एकध्रुवीय विश्वरचना

 १.२.४ युनोची बदलती भूमिका

१.३ सारांश

१.४ परिभाषिक शब्द

१.५ सरावासाठी स्वाध्याय

१.६ अधिक वाचनासाठी पुस्तक


### १.० उद्दिष्ट्ये :

आजपर्यंत आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये अनेक स्थित्यंतरे झाली आहेत. त्यातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे शीतयुद्ध होय. कारण विसाव्या शतकामध्ये दोन महायुद्धे झाली त्यामध्ये सर्वच देशाचे मोठे नुकसान झाले होते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर दोन महासत्तेमध्ये शितयुद्धाची सुरूवात झाली. त्याचे परिणाम अनेक राष्ट्रावर झाले याचा सविस्तर अभ्यास करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर शीतयुद्ध समाप्त झाल्यानंतर जगामध्ये एकध्रुवीय विश्वरचना निर्माण झाली आणि नंतरच्या काळामध्ये बहुध्रुवीय विश्वरचना निर्माण झाली आहे तसेच सर्व घडामोडीमध्ये युनोची भूमिका बदलली आहे. या सर्व गोष्टीचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

### १.१ प्रस्तावना :

आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये राष्ट्रामधील परस्पर संबंधाचा क्रिया-प्रतिक्रियांचा अभ्यास केला जातो. राष्ट्रामधील

सबंध हे कायमस्वरूपी नसतात ते परिस्थितीनुरूप बदलत असतो. कधी सहकार्याकडून संघर्षाकडे जाते कधी संषर्घाकडून सहकार्याकडे जात असते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात मित्रराष्ट्र आणि शत्रूराष्ट्र बदलत असतात. राष्ट्राची संख्यादेखील दिवसेदिवस वाढत आहेत. याची सुरूवात वेस्टफेलियाच्या (१६४८) करारानुसार झाली. वेस्टफेलिया (१६४८) च्या करारानुसार अनेक देशाचे सार्वभौमत्व मान्य केले गेले. त्यानुसार राष्ट्राचे राजकीय, लष्करी, आर्थिक क्षमता समान नसल्या तरी सर्व राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय राजकारणात समान वागणूक व समान दर्जा असावा. अशी भूमिका स्पष्ट करण्यात आली परंतु पुढील काळामध्ये अनेक घडामोडी आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये घडलेले आहेत त्यामध्ये युट्रेक्टबा तह, व्हिएन्ना तह, व्हर्सायचा तह इत्यादी अनेक कराराद्वारे जगातील देशामध्ये संघर्षातून सहकार्य निर्माण होण्यासाठी प्रयत्न झाले तसेच वर्चस्व निर्माण करणे, त्याला प्रतियश करणे, लढाई करणे, विजय मिळविणे, पराभव स्वीकारणे अशा प्रकारे सत्तासंतुलन (शह कटशह) करण्याचा प्रयत्न झाला. त्यामध्ये हॅप्नबर्ग, बर्बन्स व जर्मनीतील राज्ये यांच्यात झालेला युद्ध, पोलंडचा विजय (१७३३), अमेरिकन राज्यक्रांती (१७७२), फ्रान्स राज्यक्रांती (१७८९) पहिले महायुद्ध इ. अनेक घटना घडल्या आहेत. एकूणच पहिले महायुद्ध हे व्हर्सायच्या तहाने समाप्त झाले.

आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेच्या निर्मितीसाठी राष्ट्रसंघाची स्थापना झाली. आतंरराष्ट्रीय संघर्ष, समस्या या युद्धाच्या मार्गाने नाही. तर परस्पर चर्चा, सहकार्याच्या मार्गाने सोडविण्यासाठी म्हणून राष्ट्रसंघाने एक सामूहिक व्यासपीठ उपलब्ध करून दिले. मुसोलीनी इटलीमध्ये पंतप्रधान बनले. हिटलर जर्मनी चान्सलर बनला. त्यानंतर जर्मनी राष्ट्रसंघातून १९३३ साली बाहेर पडला. सामूहिक सुरक्षितता केवळ आदर्शवादी राहिले कारण पुन्हा अनेक राज्ये हे युद्धजन्य परिस्थिती निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. त्यामध्ये जर्मनी आणि इटली ऑस्ट्रिया इत्यादी देशातील नेत्यानी. राष्ट्रसंघातून बाहेर पडले. आणि आक्रमक राष्ट्राच्या विस्तारवादाला आळा बसेल ही आशा होती ती यशस्वी झाली नाही कारण १९३९ साली दुसऱ्या महायुद्धाला सुरूवात झाली. त्यामध्ये फ्रान्स, इंग्लंड हे एका गटामध्ये तर जर्मनी, इटली, जपान हे एका गटामध्ये सामील झाले होते. डिसेंबर १९४१ मध्ये अमेरिका युद्धात उतरली. नाझी फौजांनी सोविएत युनियनवर आक्रमण केल्यामुळे १९४२ मध्ये सोव्हिएत युनियन ही जर्मनीच्या विरोधात दोस्त राष्ट्राच्या बाजूने युद्धात सामील झाला. सुरूवातीला युरोप व उत्तर आफ्रिकेत असलेले युद्धक्षेत्र विस्तारून पूर्व व आग्नेय आशियापर्यंत पसरले. युरोपच्या क्षेत्रातील लढाई संपुष्टात आल्यानंतरही जपानने युद्ध चालूच ठेवले पुढे ६ ऑगस्ट व ९ ऑगस्ट १९४५ अशा दोन दिवशी अमेरिकेने जपानच्या अनुक्रमे हिरोशिमा व नागासाकी या शहरावर अणुबॉम्ब टाकेल त्या भयानक हल्यानंतर जपानी सम्राटाने शरणागती पत्करली. अशाप्रकारे जगामध्ये संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. पुढील काळामध्ये राजकारण तंत्रज्ञान व विचार प्रणाली यामध्ये मूलगामी बदल घडून आले व त्याचा आंतरराष्ट्रीय संबंधावर प्रचंड परिणाम झाल्याचे दिसून येते. यांचा सविस्तर विवेचन या प्रकरणामध्ये करणार आहोत.

## १.२ विषय – विवेचन

पहिले महायुद्ध चालू असतानाच रशियामध्ये साम्यवादी क्रांती (नोव्हेंबर १९१७) झाली. या क्रांतीने झारशाही उलथवून टाकली. क्रांतीनंतर लेनिन सत्तेवर आले. १९२४ मध्ये लेनिनच्या मृत्यूनंतर जोसेफ स्टॅलिन सत्तेवर आला. सोविएत युनियनने पहिल्या महायुद्धात सहभाग झाला नव्हता. दुसऱ्या महायुद्धाच्या सुरूवातीच्या काळात सोविएत युनियन युद्धापासून दूर राहिला. नंतर मात्र जर्मनीच्या विरोधात दोस्त राष्ट्राच्या बाजून युद्धात सामील झाला. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर जगामध्ये दोन महासत्ता उदयास आली. त्याचकाळामध्ये अनेक राष्ट्रे साम्राज्यवाद व वसाहतवाद यांच्या गुलामगिरीतून मुक्त झाली त्यामध्ये भारत, पाकिस्तान, इंडोनेशिया, केनिया, सुदान, दक्षिण आफ्रिका इत्यादी अनेक राज्ये स्वतंत्र झाली. ही स्वतंत्र झालेली राज्ये दुसऱ्या राजकारणामध्ये बदल घडून येत होते. कारण जगामध्ये अनेक देशांनी लोकशाही व्यवस्था स्वीकारले होते. लोकशाहीचा पुरस्कार करणाऱ्या अमेरिकेच्या नेतृत्त्वाखालील पाश्चात्य राष्ट्रांनी सीटो नाटोसारखे करार केले. अण्वस्त्राच्या संघर्षामध्ये सत्ता स्पर्धेमध्ये जग हे दोन विचारसरणीमध्ये विभागले गेले. एक लोकशाही व दुसरे साम्यवादी विचारसरणी होय. यातून जागतिक राजकारणात शीतयुद्धाचा उदय झाला.

### १.२.१ शीतयुद्ध

दुसऱ्या महायुद्धानंतरचा सन १९४५ ते १९९० हा सर्वसाधारणपणे शीतयुद्धाचा काळ म्हणून ओळखला जातो. दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक नेतृत्त्वासाठी अमेरिका आणि सोव्हिएट रशियामध्ये तीव्र स्पर्धा सुरू झाली. त्यातून जगामध्ये दोन गट निर्माण झाले. एक अमेरिकेचा गट व सोव्हिएट रशिया असा गट तयार झाले रशिया हा सामयवादी व अमेरीका ही लोकशाही विचारप्रणालीचे नेतृत्त्व करीत होते. या परस्परविरोधी विचारप्रणाली असणाऱ्या दोन महासत्ता निर्माण झाली आहे. शीतयुद्धाच्या दरम्यान राष्ट्रांच्या या दोन गटामधील संबंध हे अत्यंत तणावाचे होते. प्रत्येक गट स्वतःला मजबूत करून दुसऱ्याला कमकुवत करण्यासाठी डावपेच आखत होता. प्रत्यक्ष युद्ध मात्र होत नव्हते. लष्करी स्पर्धा, शस्त्रास्त्रांची स्पर्धा, हेरगिरी हे मात्र सर्व चालू होते. अशाप्रकारे शीतयुद्धाच्या काळात अमेरीकन आणि सोव्हिएट रशिया ही दोन महासत्ता अस्तीत्त्वात होती.

#### ◆ शीतयुद्धाचा अर्थ

शीतयुद्ध म्हणजे प्रत्यक्ष युद्ध टाळून धमक्या, जहालप्रचार, छुप्या विध्वंसक कारवाया इत्यादीचा अवलंब करणारा मूलतः अमेरिका व सोव्हिएट रशिया या दोन महासत्तामधील राजकीय संघर्ष किंवा शत्रुत्त्व होय. शीतयुद्ध (Cold War) या संकल्पनेचा जनक प्रसिद्ध स्तंभलेखक वॉल्टर लिपमन होय. या संकल्पनेत पुढील घटकांचा समावेश होतो. (१) प्रतिस्पर्धी राष्ट्रगटामध्ये प्रत्यक्ष युद्धाचा अभाव (२) दोघामध्ये तीव्र शस्त्रास्त्रस्पर्धा (३) आक्रमक राजनीती (४) संशययुक्त आणि तणावग्रस्त आंतरराष्ट्रीय वातावरण (५) आपापला राष्ट्रगट अधिक विस्तृत व बलवान करण्याच्या उद्देशाने राजकीय आणि आर्थिक दबाव टाकून शीतयुद्धात सामील होण्यासाठी अलिप्त राष्ट्रांना दबाव टाकणे. (६) दोन्ही प्रतिस्पर्धी राष्ट्रगटांमध्ये भांडवलशाही अर्थव्यवस्था विरूद्ध साम्यवादी

अर्थव्यवस्था असा तत्त्वप्रणालीचा संघर्ष. इत्यादींचा समावेश होतो. शीतयुद्धाच्या खालीलप्रमाणे अनेक व्याख्या विचारवंतांनी केल्या आहेत.

प्लेमिंगच्या मते, 'युद्ध स्थलावर लढले जात नाही तर मानवाच्या मस्तिष्कात लढले जाते. एक व्यक्ती इतर व्यक्तींच्या मस्तिष्कांना नियंत्रित करण्याचा प्रयत्न करतो.'

जॉन प्लॉस्टर डलेस, 'शीतयुद्ध नैतिक मूल्यांसाठी नैतिक धर्मयुद्ध होते. वाईटपणा विरूद्ध चांगुलपणाचे, चुकीविरूद्ध बरोबर तसेच नास्तिकतेच्या विरूद्ध धर्माचे.'

के.पी. एस. मेननच्या मते, 'शीतयुद्ध म्हणजे दोन विचारप्रणाली, दोन जीवनपद्धती दोन गट, दोन राज्ये किंवा दोन व्यक्तिमधील दृढ संघर्ष होय.'

जोसेफ फ्रान्केल शीतयुद्ध हे दोन मोठ्या राज्यामधील चाल, सामना आणि परस्पर हालचालींचा उत्कर्ष म्हणून ओळखले जाते.

सारांशामध्ये शीतयुद्ध हे प्रत्यक्षात युद्ध खेळले न जाता ती परिस्थती निर्माण करणे होय. महायुद्धोत्तर काळात अमेरिका आणि रशिया या दोन महासत्तांनी अण्वस्त्रधारी असल्याने विनाशकारी प्रत्यक्ष युद्धाचा मार्ग त्यांनी टाळला पण त्याच्यामध्ये आणि त्या अनुषंगाने त्याच्या प्रभावाखाली राष्ट्रगटामध्ये डावपेचांचे व वैचारिक युद्ध धुमसत राहिले तेच शीतयुद्ध म्हणून ओळखले जाते लुई हॉलने आपल्या, The cold war as History मध्ये असे म्हंटले आहे की, शीतयुद्ध दोन गटातील तीव्र संघर्षाची स्थिती होती. हे युद्ध सशस्त्र युद्धापेक्षाही भयंकर होते. शीतयुद्धाचे विविध घटक समस्थाना अधिक जटील नवीन्याचा प्रयत्न करत होते. सर्व विद्वानांना या युद्धात वापरण्याचा प्रयत्न झाला. शस्त्रास्त्र संपन्न असलेल्या दोन महत्त्वाच्या देशांनी त्याचा कधीच वापर केला नाही. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या सत्तासंतुलनामध्ये अमेरिका आणि सोव्हिएट रशिया या महासत्ता प्रभाव निर्माण केले आणि एकमेकांच्या विरोधात उभे राहिले. लष्करी, राजकीय व विचारप्रणाली या सर्व क्षेत्रांमध्ये त्यांच्या हितसंबंधात तीव्र विरोध व चुरस निर्माण झाली व प्रत्यक्ष युद्ध न होताही या संघर्षाचे परिणामाने ठिकठिकाणी संघर्ष झाले. आंतरराष्ट्रीय राजकारण समजावून घेण्यासाठी ते संघर्ष समजावून घेणे उपयुक्त ठरेल. हे संघर्ष म्हणजेच शीतयुद्ध होय.

### ◆ शीतयुद्धाची उत्पत्ती / शीतयुद्धाचा उदय

आंतरराष्ट्रीय विचारवंतामध्ये शीतयुद्धाचा उदयासंबंधी एकवाक्यता दिसून येत नाही. परंतु अनेक विचारवंतांनी रशियातील बोल्शेविक क्रांती (१९१७) पासून प्रारंभ झाला आहे अशी मानली आहे. डेस्मंड डोमेली यांनी लिहिलेल्या 'स्ट्रगल फॉर दि वर्ल्ड' या पुस्तकामध्ये शीतयुद्धाचा उदय हा १९ व्या शतकामध्ये मध्ये आशियातील ब्रिटन व रशिया यांच्यातील साम्राज्यवादी वर्चस्वासाठी झालेला संघर्ष होय अशी भूमिका मांडली आहे. फेड्रिक शुमन यांनी दि कोल्ड वॉर : रेस्ट्रोस्पेक्ट ॲड प्रास्पेक्ट या पुस्तकामध्ये १९४५ साली किंवा द्वितीय महायुद्धानंतरचा काळ हा शीतयुद्धाच्या उदयाचा काळ नसून १९१७ मध्ये झालेल्या रशियन क्रांतीपासून

शीतयुद्धाचा उदय झाला आहे अशी भूमिका मांडली आहे. कारण क्रांतीनंतर लगेचच सोव्हिएट संघ व पश्चिमी देशांमध्ये संघर्ष निर्माण झाला. त्याला १९४० ते १९५० च्या दशकामध्ये शीतयुद्धाला खतपाणी घातले गेले त्यांचा उदय हा १९१८-१९२१ च्या पूर्व-पश्चिम संघर्षातून झाला आहे असे म्हणता येईल.

शीतयुद्धाची सुरूवात पूर्व बर्लिनच्या रशियाने केलेल्या (१९४८) नाकेबंदीने झाली. परंतु १९१७ च्या बोल्शेव्हिक क्रांतीपासून रशिया जागतिक राजकारणामध्ये एक सशक्त सत्ता म्हणून उदयास आला. सुरवातीच्या काळात पाश्चिमात्य देशांनी रशियाला मान्यता देण्याचा नकार दिला. दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वीच्या काळामध्ये जर्मनी संदर्भात अमेरिका, ब्रिटन व फ्रान्स ने आखलेल्या धोरणाला रशियाने पाठिंबा दिला नाही. दुसऱ्या महायुद्धात मात्र रशियाने पाश्चात्य राष्ट्रांना मदत केली. पुढे दुसऱ्या महायुद्धानंतर पोलंड, हंगेरी, बल्गेरिया, रूमानिया आणि चेकोस्लोव्होकिया हे पूर्व युरोपियन देश सोव्हिएट अधिपत्याखाली गेले. त्यामुळे युरोपच्या पूर्व युरोपियन देश सोव्हिएट अधिपत्याखाली गेले. त्यामुळे युरोपच्या पूर्व युरोप हे साम्यवादी व पश्चिम युरोप लोकशाहीवादी असे दोन विभागामध्ये विभाजन झाले त्याला युरोप लोकशाहीवादी असे दोन विभागामध्ये विभाजन झाले त्याला विन्स्टन चर्चिलने पोलादी पडदा असा शब्दप्रयोग केला आहे. शीतयुद्धाची सुरूवात जरी युरोपमध्ये झालेली असली तरी थोड्याच कालावधीत त्याची व्याप्ती जगाच्या बऱ्याच भागामध्ये पोहोचली. युद्धोत्तर जगातील राजनयावर शीतयुद्धाची छाया पडली. शीतयुद्धाची कारणे खालीलप्रमाणे सांगता येतील.

### ◆ शीतयुद्धाची कारणे

१) पश्चिम युरोपातील देशांना आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये सोव्हिएट रशियाची वाढती सत्ता पाहून भिती वाटत होती.

२) रशिया हा साम्यवादी विचारप्रणालीचा राष्ट्र होता व अमेरिका हा विरूद्ध भांडवलवाद असा संघर्ष साम्यवाद विरूद्ध भांडवलवाद असा संघर्ष होता.

३) समाजवादी चळवळीचा वाढता प्रभाव पाहून पश्चिम युरोपातील देशांना असे वाटत होते की, सोव्हिएट रशिया आपली विचारसरणी साम्यवादी सत्ता ही कामगार चळवळीने निर्माण केली. अशा कामगार चळवळी युरोपमधील अनेक देशामध्ये घेण्यास सुरूवात झाली त्यामुळे अशा चळवळी सत्ता प्रस्थापित करतील अशी भिती वाटत होती.

४) १९४५ साली रूझवेल्ट चर्चिल व स्टॅलिन यांच्यामध्ये याल्टा येथे संमेलन झाले त्यामध्ये डाक करार झाला. त्यानुसार पोलंड येथे प्रतिनिधी शासनाला मान्यता देण्यास सहमत झाली. परंतु द्वितीय महायुद्धानंतर स्टॅलिन यांनी सहमती विरूद्ध जाऊन पोलंडमधील आपल्या विचारास समर्थन करणाऱ्या शासनाला सहकार्य केले व हस्तक्षेप करीत राहिले. आणि पूर्व युरोप हे साम्यवादी गटामध्ये बदलवण्यात आले. अशाप्रकारे हे सोव्हिएट रशियानी याल्टा कराराचा उल्लघन केला. त्यामुळे अमेरिका व इंग्लंडमध्ये रशियाबद्‌ल अविश्वास व वैमनस्याची भावना निर्माण झाली.

५) द्वितीय महायुद्धामध्ये रशियाने इच्छा नसताना ही जपानच्या विरूद्ध युद्धात सामील झाले.

६) चीनमधील माओच्या कम्युनिष्ट झालेला रशियानी पाठिंबा दिला होता.

७) दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जर्मनीच्या आत्मसमर्पणानंतर सहा महिन्याच्या आत इराणमधून आपले सैन्य माघारी घ्यावे असा करार पश्चिमी राष्ट्र व सोव्हिएट रशिया यांच्यामध्ये झाला. युद्ध समाप्तीनंतर पश्चिम राष्ट्रांनी दक्षिण इराणमधून आपले सैन्य हटविले परंतु सोव्हिएट संघाने इराणवर दबाव टाकून दीर्घकालीन संयुक्त राष्ट्रसंघाच्या हस्तक्षेपामुळे सोव्हिएट रशियाने उत्तर इराणमधील सैन्य माघारी घेतले.

८) सोव्हिएट रशियाने ग्रीस व टर्की या देशावर दबाब टाकून तेथे साम्यवादी पक्षाची स्थापना करण्यात आली आणि त्याचबरोबर जर्मनीवर ही त्याचा प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

९) द्वितीय महायुद्धादरम्यान सोव्हिएट संघाचे पूर्व बर्लिन व अमेरिका व ब्रिटनचा पश्चिम बर्लिनवर वर्चस्व प्रस्थापित झालेला होता. युद्धानंतर पश्चिम राष्ट्रांनी आपल्या अधिकार क्षेत्रात नवी चलनव्यवस्था प्रारंभ करण्याचा निर्णय घेतला जून १९४८ मध्ये सोव्हिएट रशियाने या गोष्टीला विरोध केला आणि बर्लिनची नाकेबंदी केली. परिणामी अमेरिका व सोव्हिएटसंघामध्ये झालेल्या प्रोटोकॉलच्या भंगासाठी सोव्हिएट संघाला दोषी मान्यण्यात आले. सोव्हिएट संघाला मात्र हे मान्य नव्हते हे प्रकरण युनोच्या सुरक्षा परिषदेमध्ये गेले.

१०) संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना झाल्यानंतर सुरक्षा परिषदेतील पाच स्थायी सदस्यांना नकाराधिकार प्राप्त झाला. त्यापैकी सोव्हिएट संघ रशिया हा सदस्य राष्ट्र होता. सुरक्षा परिषदेमध्ये अमेरिका व पश्चिमी राष्ट्रांनी मांडलेल्या प्रत्येक प्रस्तावाच्या विरोधात सोव्हिएट संघाने नकाराधिकारचा वापर केला त्यामुळे अमेरिका व पश्चिमी राष्ट्रांना सोव्हिएट संघावरचा विश्वास उडाला.

११) दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळामध्ये दोन्ही महासत्तांनी एकमेकाच्या विरोधात मोठ्या प्रमाणात प्रचार करत होते. अमेरिकेने अधिकृतपणे साम्यवादाच्या विरूद्ध लढण्यासाठी ट्रेमन सिद्धांत अंमलात आणला. तर सोव्हिएट संघाने साम्यवादी शक्तीना पश्चिमी खंडात आपल्या प्रभावाचे विस्तारीकरण करण्यास सांगितले. दोन्ही बाजूनी एकमेकाविरूद्ध प्रचार अभियान चालविल्यामुळे परस्पर शत्रुत्त्व निर्माण झाले व याचे रूपांतर शीतयुद्धामध्ये झाले.

१२) अमेरिका व सोव्हिएट संघाने आपला सर्व स्वार्थ साधण्याची एकही संधी सोडली नाही. संपूर्ण आंतरराष्ट्रीय स्तरावर संशयाचे व भितीचे वातावरण निर्माण करण्याचे काम या दोन्ही महासत्ता करीत होत्या. दोघांनीही आपले क्षेत्राधिकार प्रभाव वाढविण्याचा प्रयत्न करीत होते.

अशाप्रकारे शितयुद्धाच्या निर्मिती कारणीभूत असलेल्या घटकांची चर्चा केली आहे.

## ◆ शीतयुद्धाचा विकास

१९४५ ते १९९० हा काळ शीतयुद्धाचा काळ म्हणून ओळखला जातो. राजकारणामध्ये शीतयुद्ध हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. १९४९ मध्ये चीनमध्ये साम्यवादी क्रांती झाल्यावर तिथे सत्तेवर आलेल्या सरकारची साम्यवादी चळवळीशी असणारी बांधिलकी यामुळे साम्यवादी राष्ट्रांची फळी निर्माण होऊन शीतयुद्धाला धार आली. नव्याने अस्तित्त्वात आलेल्या देशामध्ये साम्यवादी चळवळीला मिळणाऱ्या प्रतिसादामुळे अमेरीका व सोव्हिएट युनियनमधील स्पर्धा अधिक तीव्र होऊन तिची भौगोलिक व्याप्ती वाढली. हे शीतयुद्ध १९९१ साली समाप्त झाले. या शीतयुद्ध काळामध्ये अनेक घटना घडल्या आहेत कारण जगाची नव्याने पुनर्रचना झाली अनेक सार्वभौम राष्ट्रे अस्तित्त्वात आली. शीतयुद्धाच्या काळामध्ये जागतिक व्यवस्था द्विध्रुवीय बनली. अमेरीका प्रणित गट व राशियाचा एक गट यामध्ये विभागणी झाली. या शीतयुद्धाच्या काळामध्ये नवनवीन स्थित्यंतरे घडून आली. या शीतयुद्धाचा विकासाचा अभ्यास करताना खालील टप्प्यांचा विचार करणे आवश्यक आहे.

### ❖ पहिला टप्पा १९४६ ते १९४९

१९४६ साली ब्रिटनच्या विस्टन चर्चिल यांनी औपचारिकरित्या शीतयुद्धाची घोषणा केली. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरीकेची लष्करी व अणुशक्ती दोन्ही मध्ये सोव्हिएट संघापेक्षा अधिक मजबूत होती. आंतरराष्ट्रीय राजकारणाला प्रभावित करण्याची अमेरीकेची इच्छा व क्षमता या गोष्टी रशियाच्या विस्तारीत धोरणाला मारक ठरत होती. कारण इतर कोणत्याही देशाची लष्करी व्यवस्था शक्तीशाली नव्हती आणि युद्ध करणे शक्य नव्हते त्यामुळे अमेरीकेने सोव्हिएट रशियाबरोबर युद्ध करण्याऐवजी शीतयुद्धास प्रारंभ केला. पॅरिस शांतता परिषद (१९४६) मध्ये घेण्यात आलेल्या काही निर्णयामुळे अमेरिका व रशियामध्ये दरी वाढण्यास सुरूवात झाली. मार्च १९४७ साली अमेरिकेने आर्थिक संकटात असलेल्या युरोपातील राष्ट्रामध्ये राजकीय अस्थिरता निर्माण झालेल्या राष्ट्रांना आर्थिक मदत देऊन त्या राष्ट्रामधील लोकशाही व्यवस्थेला स्थिरता प्राप्त करून देण्यासाठी आर्थिक तरतूद करण्याची योजना तयार केली होती याच योजनेला ट्रुमन योजना असे म्हणून ओळखले जाते. कारण रशिया साम्यवादाचा प्रचार करेल अशी भिती होती. १९४८ साली पश्चिमेकडील राज्यांनी नवीन चलनव्यवस्था स्वीकारल्यामुळे सोव्हिएट संघानी बर्लिनची नाकेबंदी केली. याचकाळात अमेरीकेचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री जॉर्ज मार्शल यांनी ट्रुमन यांच्या योजनेप्रमाणेच युरोपियन राष्ट्रांना आर्थिक मदत करण्याचा निर्णय घेतला होता. अमेरीकेने चीनमधील साम्यवादी शासनाला संयुक्त राष्ट्रसंघामध्ये केलेला विरोध केल्यामुळे अमेरीका व साम्यवादी रशिया या दोन्ही महासत्तामध्ये संघर्ष वळण लागले.

### ❖ दुसरा टप्पा १९४९ ते १९५३

१९४९ साली अमेरिकेने आपल्या पुढाकाराने उत्तर अटलांटिक करार संघटना (NATO) स्थापना केली. या कराराद्वारे कोणत्याही एका सभासद राष्ट्रावरील आक्रमण हे सर्वच राष्ट्रावरील आक्रमण समजले जाईल हे सामूहिक सुरक्षेचे तत्त्व स्वीकारण्यात आले. याच बरोबर साम्यवादाच्या वाढीला प्रतिबंध घालण्याचा प्रयत्न

केला आणि पश्चिम युरोपच्या संरक्षणाची हमी ही देण्यात आली.

नाटोमुळे अमेरीकेच्या अण्वस्त्राचा प्रत्यक्ष धोका सोव्हिएट युनियनसमोर उभा राहिला. कारण जपानवर अणुबॉम्बचा वापर करणारी अमेरिका आपल्या विरूद्ध वापर करण्यास घाबरणार नाही अशी भिती सोव्हिएट युनियनला वाटत होती. त्यामुळे १९४९ साली सोव्हिएत युनियनने अण्वस्त्र तंत्रज्ञान विकसित करून त्याची चाचणी केली. हे तंत्रज्ञान हेरगिरीच्या माध्यमातून मिळविले होते. या चाचणीमुळे अमेरीकेचे अण्वस्त्रातील मक्तेदारी संपुष्टात आली व दोन्ही महासत्तामधील अण्वस्त्र स्पर्धा सुरू झाली. यामुळे शीतयुद्ध हे अधिकच तीव्र बनले. १९५० साली उत्तर कोरीयात सत्तेवर असलेल्या कम्युनिस्ट सरकारने दक्षिण कोरियावर हल्ला केला. या यादवी युद्धामध्ये दक्षिण कोरीयाच्या बाजून अमेरीका व अमेरीकेच्या प्रयत्नांनी संयुक्त राष्ट्र संघटना सामील झाले. तर दुसऱ्या बाजूने उत्तर कोरीयाला चीन व सोव्हिएट युनियने पठिंबा दिला. चीन या युद्धामध्ये प्रत्यक्षरित्या सामील झाला. १९५१ मध्ये अमेरिकेने जपानशी शांतीचा करार केला. अशा अनेक घटनाद्वारे शीतयुद्धाची तीव्रता वाढतच राहिली.

### ❖ तिसरा टप्पा १९५३ ते १९७१

१९५३ साली स्टॅलिनचा मृत्यू झाला व निकिता ख्रश्चेव सत्तेवर आला. १९५४ साली अमेरिकेने साऊथ ईस्ट आशिया ट्रिटी (सिटो) व मिडल ईस्ट डिफेन्स ऑर्गनायझेशन इत्यादी करार केले. पुढे रशियाने १९५५ साली वार्सा करार केला. कारण १९५४ साली फ्रान्सने व्हिएतनाममधून लष्कर काढून घेतल्यानंतर व्हिएतनामची विभागणी सोव्हिएत रशिया आणि साम्यवादाच्या प्रभावाखालील उत्तर व्हिएतनाम आणि अमेरीकेच्या प्रभावाखाली दक्षिण व्हिएतनाम अशी व्हिएतनामची विभागणी झाली. १९५६ साली हंगेरीतील राजकीय अस्थिरतेचा फायदा घेऊन रशियाने आपले सैन्य हंगेरीमध्ये घुसविले. या दरम्यान सुवेझ कालवा संदर्भात दोन्ही महासत्तामधील संघर्षाने गंभीर रूप धारण केले. १९६१ मध्ये सोव्हिएट रशियाने पूर्व बर्लिनमधून पश्चिम बर्लिनमध्ये होणाऱ्या स्थलांतराला रोखण्यासाठी बर्लिन भिंत बांधली. १९६२ मध्ये रशियाने क्युबाजवळच्या समुद्रात अण्वस्त्र क्षेपणास्त्रे असलेली जहाजे नेऊन उभी केली. हे अमेरिकेच्या संरक्षणासाठी उघड आव्हान होते. त्याविरूद्ध अमेरीकेने केवळ विरोध केला नाही तर त्याविरूद्ध लष्करी कारवाई करण्याची धमकी दिली. त्यामुळे दोन्ही महासत्तामधील तीव्रता कमी झालेली नाही. ते तणाव जास्त होत गेले. ५ सप्टेंबर, १९६३ रोजी अमेरिका, सोव्हिएत संघ व ब्रिटन यांच्यामध्ये मास्का आंशिक परिक्षण बंदी करार झाला. यामुळे शीतयुद्ध समाप्तीच्या दिशेने पडलेले सकारात्मक पाऊल होते. १९६३ साली जिनेश हॉट लाईन कराराने अमेरीका व सोव्हिएट संघाला एकत्रित आणले कारण १९५९ मध्ये सोव्हिएट संघाच्या अध्यक्षांनी वॉशिंगटनला भेट दिली व अध्यक्ष ऑयसेनहोर याच्यासोबत भेट घेतली. याभेटी खुश्चेव यांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेला संबोधित केले व चार वर्षाच्या कालावधीमध्ये सर्व राष्ट्रांनी निःशस्त्र व्हावे असे आवाहन केले होते. १९६७ साली झालेल्या आंशिक प्रसारबंदी कराराने शीतयुद्धाची तीव्रता कमी करण्यास महत्वाची भूमिका बजावली. या सर्व वातावरणाचा परिपाक म्हणून १९६८ साली झालेला अण्वस्त्र प्रसारबंदी कार्यक्रम करार होय. अशाप्रकारे दोन्ही महासत्तामध्ये

तणाव असूनही संवाद होता. चीन व अमेरीका यांच्यातील तणावग्रस्त संबधातही याच काळात सुधारणा व्हायला सुरवात झाली व त्याची परिणीती म्हणून १९७१ साली अमेरीकेच्या अध्यक्षांनी चीनला भेट देण्यात आली. अण्वस्त्राचा प्रकार व संख्येची वाढ टाळण्यासाठी त्यावर मर्यादा घालणे हा ही दोन्ही महासत्ताचा एक हेतू होता.

### ❖ चौथा टप्पा १९७१ ते १९७९

१९७१ साली शीतयुद्धातील राजकारणाला चीन व अमेरीकेतील सुसंवादी संबंध प्रस्थापित झाल्यामुळे एक वेगळे वळण मिळाले. सोव्हिएत युनियन व चीन यांच्यातील संबंध दुरावल्यामुळे या बदलत्या संबंधाना अधिकच महत्त्व प्राप्त झाले. रशिया व अमेरीकेच्या दरम्यान सन १९७३ साली आर्थिक सहकार्य आणि व्यापारवृद्धीसाठी काही महत्त्वपूर्ण करार झाले. तणाव शिथिलनाच्या काळामध्ये निःशस्त्रीकरणाच्या प्रक्रियेला गती मिळाली. १९७१ साली पाकीस्तानचे दोन तुकडे झाले आणि बाग्लादेशाची निर्मिती झाली. यावेळी भारत व पाकीस्तानमध्ये युद्ध झाले त्यामध्ये भारताचा विजय झाला. बांग्लादेशाच्या निर्मितीला अमेरीकेने विरोध केला तर सोव्हिएत रशिया मात्र भारताच्या कारवाईला व बांग्लादेशाच्या निर्मितीला पाठींबा दिला. १९७३ साली अरब-इस्माईल युद्धामध्ये रशिया आणि अमेरिका या दोन्ही महासत्तांची परस्पर विरोधी देशाच्या बाजूने भूमिका घेतली होती. या युद्धामध्ये अमेरिकेच्या व इतर युरोपीय देशांच्या विरोधामध्ये अरब राष्ट्रांनी तेलाचे अस्त्र वापरले तर सोव्हिएत युनियन या काळात अफ्रिकेतील अनेक देशाच्या स्वातंत्र्यासाठी मदत करत होता. इराणमधील अमेरीकेच्या मदतीने चालणाऱ्या कारभाराविरूद्ध होत असलेल्या चळवळीमध्ये कम्युनिष्ठाचा सहभाग होता. १९७९ साली अफगाणिस्तानात क्रांती घडून आली आणि साम्यवादी राजवट प्रस्थापित झाली होती. पुढे सोव्हिएत युनियनच्या लष्करी हस्तक्षेपामुळे रशियन सैन्याचे अफगाण सैन्य व पाकिस्तान, अमेरीकेचे पाठबळ असणारे अफगाण मुजाहिद्दीन बंडखोर यांच्यात मोठे युद्ध झाले. अशाप्रकारे अप्रत्यक्षपणे अमेरीका आणि रशिया पुन्हा एकमेकांसमोर उभे राहिले. या कालखंडात सोव्हिएत नेतृत्त्व ब्रेझनेव्ह यांच्याकडे होते तर अमेरीकेत निक्सन कार्टर याची राजवट जाऊन १९८० मध्ये रोनाल्ड रेगन राष्ट्राध्यक्ष झाले त्यांनी तणाव शिथिलन (देतात) धोरण संपूवन संषर्घाचे धोरण स्वीकारले यालाच नवे शीतयुद्ध सुरू झाले.

### ❖ शेवटचा टप्पा १९७९ ते १९९०

या कालखंडात दुसऱ्या शीतयुद्धाचा कालखंड म्हणून ओळखले जाते. रेगन यांच्या युद्धखोरीच्या धोरणांचा व भाषणाच्या परिणामी पश्चिम युरोप व सोव्हिएत युनियनमध्ये लोकांना खरोखरच अणुयुद्धाची भिती वाटू लागली. कारण अमेरीकेने सॉल्ट २ करारावर शिक्कामोर्तब करण्यास नकार दिला. इ. स. १९८० च्या मॉस्को ऑलिंपिक स्पर्धावर बहिष्कार घातला आणि सोव्हिएत रशियाचा अन्नधान्याचा पुरवठा थांबविला १९८२ साली सोव्हिएत युनियनच्या लिओनिद ब्रेझनेव्ह यांचे निधन झाले. आंद्रोपोव व चेर्नेन्को हे नेते अल्पकाळ सत्तेवर होते. १९८४ मधील लॉस अँजेलिस ऑलिंपिक स्पर्धावरती रशियाने बहिष्कार घातला. रेगन यांनी स्टार वॉर्स प्रकल्प पुन्हा हाती घेतला. अमेरिकेने नाटो देशामध्ये क्षेपणास्त्रे बसविण्याचा निर्णय घेतला आणि गल्फ प्रदेशात आपले

सैन्य तैनात केले. हेरगिरी करीत असलेल्या संशयावरून रशियाने दक्षिण कोरीयाचे बोर्डिंग किमान पाडले त्यात २६९ लोकांना प्राण गमवावे लागले. पुढे १९८५ साली मिखाईल गोर्बाश्चेव सोव्हिएत युनियनचे अध्यक्ष झाले. त्यांनी सोव्हिएत परराष्ट्र धोरणात नवीन विचार आणले व अंतर्गत धोरणात क्रांतीकारक बदल केले. कारण जागतिक शांतता टिकविण्यासाठी परस्परामध्ये काही ना काही सांमजस्य निर्माण करण्याची गरज आहे. त्यासाठी चर्चा चालू ठेवणे आवश्यक याची जाणीव रेग व गोर्बाचेव्ह यांना झाली होती. इ. स. १९८५ ते १९९१ या काळामध्ये रशिया, अमेरिका यांच्यातील संबंध शीतयुद्ध संपविण्याच्या दृष्टिने महत्त्वाचे राहिले. जानेवारी १९८५ मध्ये अमेरिकन परराष्ट्र सचिव जॉर्ज शुल्झ व रशियन परराष्ट्रमंत्री आंद्रे ग्रोमिको यांची भेट झाली. त्या आधारावर नोव्हेंबर १९८५ मध्ये रेगन-गोर्बाचेव्ह यांची बैठक झाली (जिनिव्हा) यामध्ये अण्वस्त्राचे साठे ५० टक्क्यांनी कमी केले जावेत दोन्ही देशानी इ. स. १९६८ च्या अण्वस्त्र प्रसाराविरोधी काराराला मान्यता द्यावी. अण्वस्त्र युद्ध मुळीच करू नये. एकमेकांनी देशाला भेट देण्याचे ठरले. रेगन गोर्बाचेव्ह यांच्यामध्ये दोन वेळा शिखर परिषद झाली. अनेक बैठका करण्यात आले. आरएनआय करार (१९८७). १९८७ मधील चर्चा, बुश गोर्बाचेव्ह शिखर परिषद (१९८९ व १९९०) सोव्हिएत रशिया व युरोपीयन आर्थिक समुदाय यांचा करार (१९८९) जर्मनीचे एकीकरण (१९९०) जर्मनी सोव्हिएत रशिया मैत्री करार (१९९०) नाटो व वार्सा गटातील ऐतिहासिक करार (१९९०) वार्सा करार संघटनेची बरखास्ती (१९९१) अशा अनेक घटनेमुळे शीतयुद्धाची तीव्रता कमी होत गेली. शेवटी ३१ जुलै १९९१ रोजी मास्को येथे संपन्न झालेल्या शिखर परिषदेत बुश व गोर्बाचेव्ह यांनी स्टार्ट करारावर स्वाक्षऱ्या केल्या आणि स्वेच्छेने आपापल्या अण्वस्त्राच्या साठ्यामध्ये ३० टक्के कपात करीत असल्याची घोषणा केली.

## ◆ शीयुद्धाची समाप्ती

शीतयुद्धाच्या समाप्तीमध्ये गोर्बाचेव्ह यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. गोर्बाचेव्ह यानी रेगनबरोबर अनेक वेळा बैठका करून अण्वस्त्र साठा कमी करण्यासाठी चर्चा करून त्याबाबत करार केले. पश्चिम जर्मनीचे चॅन्सेलर हेल्मट कोल यांनी मॉस्कोला भेट देऊन सोव्हिएत रशियाबरोबर सहा करार केले यानुसार पुढे १९८९ नोव्हेंबर ९ रोजी बर्लिनची भिंत पाडण्यात आली. पूर्व आणि पश्चिम जर्मनीचे एकीकरण संदर्भात कोल व गोर्बाचेव्ह यांची भेट घेतली आणि गोर्बाचेव्ह यांनी जर्मनीच्या डाळी करणावर शिक्कामोर्तब केले. १९८८ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण सभेत पूर्व युरोपातील देशामधून पाच लाख सैनिक माघार घेण्याची आणि शस्त्रास्त्रामध्ये मोठी कपात करण्याची घोषणा गोर्वाचेव्ह यांनी केली. अशाप्रकारे अनेक निर्णय गोर्बाचेव्ह यांनी घेतले होते. तसेच गोर्बाचेव्ह यानी रशियाच्या अतंर्गत धोरणामध्ये बदल करून पेरेस्तोइका (पुनर्रचना) व ग्लारूनोस्त (खुलेपणा) या धोरणाचा स्वीकार केला. या अंतर्गत धोरणाचे परिणाम पूर्व युरोपातील देशांवर झाले व त्या देशामध्ये १९९० च्या आसपास सोव्हिएत प्रभावापासून मुक्त होण्याच्या चळवळी सुरू झाल्या प्रथमतः लाटव्हिया, लिथुआनिया व इस्टोनिया या बास्टिक देशामध्ये स्वतंत्र होण्याच्या चळवळी सुरू झाल्या कारण हे देश सोव्हिएत युनियनच्या संघराज्याचे भाग होते. १९९० मध्येच अफगाणिस्तानातील रशियन सैन्य माघारी बोलवण्याचा निर्णयही घेण्यात आले. गोर्बाचेव्ह

यांच्या या सर्व धोरणांचा परिपाक म्हणजे सोव्हिएत युनियनचे संघराज्य कोसळले. मध्य आशियातील जवळजवळ सर्व गणराज्ये फूटून स्वतंत्र झाली. पूर्व युरोपातील युक्रेन, बेलारूस, जॉर्जिया इ. गणराज्ये स्वतंत्र झाली. शेवटी रशिया हा एकमेव देश या साम्राज्याचा वारसदार म्हणून राहिला. या सोव्हिएत युनियनच्या पतनामुळे शीतयुद्ध संपल्याचे मानले जाते. शीतयुद्ध संपले अण्वस्त्रामध्ये कपात करण्यात आली किंवा त्याच्या वापरावर निर्बंध घालण्यात अण्वस्त्राचा धोका आजही कायम राहिला आहे.

शीतयुद्ध समाप्ती केवळ गोर्बाचेव्ह हे एकतर्फी नव्हते तर अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचाही त्याला हातभार लागला आहे. शीतयुद्धाच्या काळामध्ये ज्या समस्या किंवा प्रश्न निर्माण झाले होते त्या आजही सुटलेल्या नाहीत उलट त्याचे नकारात्मक परिणाम झालेला दिसून येतो. परंतु शीतयुद्धामुळे तिसरे महायुद्ध टळले ही गोष्ट सुद्धा स्वीकारावी लागेल अशाप्रकारे १९४५ पासून सुरू झालेली शीतयुद्धाची भिती अखेर १९९० साली संपुष्टात आले. आणि जागतिक राजकारणामध्ये अनेक बदल घडले. शीतयुद्धोत्तर जगाचा अभ्यास करणे ही आवश्यक आहे.

## १.२.२ शीतयुद्धोत्तर आंतरराष्ट्रीय व्यवस्था

सन १९९०-९१ यासाली सोव्हिएत युनियनच्या पतनानंतर ४५ वर्षे चाललेल्या शितयुद्धाच्या राजकारणाचा अंत झाला आणि रशिया हे एक गणराज्य म्हणून प्रतिनिधीत्त्व करत आहे. शीतयुद्धाच्या समाप्तीबरोबरच द्विध्रुवीय विश्वरचना संपुष्टात आली. शीतयुद्धामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये जे संघर्षाचे वातावरण होते ते दूर झाले. परंतु आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुव्यवस्थेला आव्हान देणारे अनेक प्रश्न निर्माण झाले. कारण रशिया व अमेरिकेने अण्वस्त्र कपातीचे धोरण १९९० च्या दशकात राबवले असले तरी पाश्चात्य राष्ट्राच्या मनात रशियाच्या राष्ट्रवादाबद्दल व आक्रमतेबद्दल काही प्रमाणात भीती होती. त्याचबरोबर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतर्गत निर्माण झालेल्या अनेक बिगर लष्करी प्रश्नामुळे देखील अनेक प्रश्न निर्माण झाले. परंतु १९९० च्या शीतयुद्धोत्तर काळाला, अमेरीकेचे तत्कालीन अध्यक्ष बुश (सिनीयर) यांनी नवी जागतिक व्यवस्था असे नाव दिले. त्यामध्ये देशाचे सार्वभौमत्त्व आणि प्रादेशिक एकसंघता यावर भर देणे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा समितीला महत्त्व देणे आणि अमेरिकेकडे जगाचे नेतृत्त्व येणे इत्यादी गोष्टी बुश यांना अभिप्रेत होत्या. पण अशा नव्या जागतिक व्यवस्थेचे स्वप्न सहजपणे साकारणे कठीण झाले. कारण शीतयुद्धोत्तर काळात अनेक समस्यानां सामोरे जावे लागले. या समस्यामध्ये प्रामुख्याने 'बॉलिया-हर्झगोविना' आणि नंतर कोसोवो या दोन्ही वांशिक संघर्षाशी संबंधित समस्या होत्या. युगोस्लावियाचे विघटन होऊन हे वांशिक वाद निर्माण झाले या संघर्षामध्ये हस्तक्षेप करण्याचा आणि तो कशाप्रकारे मिटवायचा हा प्रश्न अमेरीका व नाटो राष्ट्रापुढे होता. आफ्रिकेतील खंडामध्येही १९९४ मध्ये भीषण वांशिक कत्तली झाल्या. १९९९ साली भारत पाकिस्तान युद्ध झाले. त्यामध्ये पाकिस्तानच्या बाजूने अमेरिका कार्यरत होती. १९९९ च्या अखेरीस येल्तासिन यांनी रशियाच्या अध्यक्षपदाचा

राजीनामा दिला व ब्लादिमीर पुतीन हे नवे अध्यक्ष झाले. त्यांनी चेचन्याविरूद्धची लढाई चालूच ठेवली. नाटोमध्ये पूर्वयुरोपीय देशांना सामील करून घेऊन पश्चिम युरोपीय देश व अमेरिका यांनी नाटोच्या सीमा रशियाच्या सीमांना नेऊन भिडवल्या. एवढेच नव्हे तर पूर्वी सोव्हिएत युनियनचा भाग असलेल्या मध्य आशिया देशामधून युरोपसाठी तेलाच्या नव्या पाइपलाईन्स टाकताना रशियाच्या भूभागाला वगळण्याचे प्रस्ताव जोरात मांडले जात होते.

२००१ नंतर अमेरिकेचे चीन व युरोपमधील संबंधही तणावपूर्व बनले कारण क्षेपणास्त्र सुरक्षा व्यवस्था, जागतिक तापमानवाढीच्या संदर्भातील क्योटो करार, जैविक शास्त्रास्त्र बंदी करार अंमलात आणणे, आंतरराष्ट्रीय पातळीवरील छोट्या शस्त्राच्या विक्रीवर निर्बंध आणण्याचा प्रस्ताव, आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालय स्थापन करण्याचा प्रस्ताव आणि गरीब देशामध्ये तंबाखू विक्रीवर मर्यादा आणण्याचा प्रस्ताव इत्यादी प्रश्नामधील बऱ्याच गोष्टींना युरोपीय देशांचा पाठींबा आहे. तर अमेरीकेचा विरोध आहे. २००१ साली रशिया व चीन यांच्यात झालेल्या मैत्री कराराने आंतरराष्ट्रीय राजकारणातील बदलत्या समीकरणाचे स्वरूप दर्शविले. परंतु ११ सप्टेंबर २००१ या दिवशी अमेरीकेच्या जागतिक व्यापार केंद्राच्या इमारतीवर दहशतवादी हल्ला झाला. आणि इतरस्त्र झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे अमेरीका व युरोप यांच्यात दरी कमी झाली व अमेरीकेच्या पाठीमागे युरोपीय राष्ट्रे उभी राहिली. अमेरीकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश (ज्युनिअर) यांनी 'दहशतवाद विरोधात युद्ध' घोषित केले. अफगाणिस्तान व इराकमध्ये युद्ध करून तेथील सत्ता बदलले व ओबामा बिन लादेन, सद्दाम हुसेन यांच्यावर कारवाई करून ठार मारण्यात आले. अमेरीकेने जगाला आपल्या लष्करी बळाच्या जोरावर आपण कोणालाही धडा शिकवू शकतो हा पाठ शिकवला. परंतु इराकमध्ये निर्माण झालेली अराजकता, वाढत्या संख्येने मरणारे अमेरीकी सैनिक व युद्धातनू अंग काढू घेणे अवघड होणे ह्या स्थितीवरून अमेरीकेसारख्या सत्ताधाऱ्याच्या मर्यादाही जगाच्या लक्षात आल्या. फ्रान्स जर्मनी सारख्या देशानी अमेरीकेने युद्ध करू नये यासाठी प्रयत्न केलो व युद्धाला विरोध केला. तिसऱ्या जगातील देशातीही अमेरीकेचा खरा चेहरा जगासमोर आला. लोकशाही, मानवी हक्क, उदारमतवाद या गोष्टीचा आवरण पांघरणाऱ्या अमेरीकेने युद्ध कैद्याचा केलेला छळ स्वतःच्या देशातील माध्यमाची केलेली मुस्कटदाबी व तेलाच्या लोभासाठी एका सार्वभौम देशाचा केलेला नाश या गोष्टी स्पष्ट झाल्या. जागतिकीकरणामुळे आर्थिक विकास झाला खरा परंतु गरीब व श्रीमंत देशातील दरी वाढतच चालली आहे. कोरोना आलेल्या महामारीमुळे संपूर्ण जग बंद झाली आहेत. त्यामुळे आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात झाले आहे. एकूणच शीतयुद्धोत्तर आंतरराष्ट्रीय व्यवस्था ही मोठ्या संकटात सापडली आहे त्याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) विचारसरणी/ शीतयुद्धाचा अंत :**

शीतयुद्ध हे दोन विचारप्रणालीवर आधारित असणारी द्विध्रुवीयता होती. परंतु शीतयुद्ध संपुष्टात आल्यामुळे विचारसरणीचा अंत झाला आहे. अशी भूमिका डॅनियल बेल यांनी मांडले आहे. याच्यामते, भांडवलशाही २० व्या शतकात जे सामाजिक व राजकीय बदल घडवून आणले त्यामुळे विचार प्रणालीचे सर्व आधारच नष्ट झाले

आहेत. कारण रशिया हे साम्यवादी विचारसरणी व अमेरीका भांडवलशाही/ लोकशाही चे प्रतिनिधित्त्व करत होते. सोविएत युनियनचे पतन झाल्यामुळे व पूर्व युरोपातील साम्यवाद कोसळल्यामुळे या द्विध्रुवीय जगातील एक ध्रुव संपला व अमेरीकेचा म्हणजेच भांडवलशाही विचारसरणी हा एकमेव पर्याय शिल्लक असल्याचा दावा करण्यात येऊ लागला. कारण सोव्हिएत युनियनच्या विघटनानंतर रशियन गणराज्य व इतर अनेक पूर्व युरोपीय देशांनी भांडवलशाही बाजारपेठीय अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला व त्यानंतरच भांडवलाच्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा वेग वाढला आहे आणि भांडवलशाहीच्या विरोधात वैचारिक भूमिका मांडणे हे मागासलेपणाचे वाटू लागले आहे.

**२) राष्ट्रराज्याच्या अस्तित्वाला आव्हान :**

शीतयुद्धोत्तर काळामध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणातील राज्याच्या भूमिकेवर मर्यादा आल्या आहेत. राज्याचे जे वर्चस्व होते. शीतयुद्धोत्तर काळात ते कमी होताना दिसतो. ज्या अनेक गोष्टी पूर्वी राज्याच्या अधिकार क्षेत्रात होत्या किंवा ज्यावर राज्यांची मक्तेदारी होती त्या आता राज्याच्या हातातून निसटताना दिसत आहेत. माहितीची देवाण-घेवाण, आर्थिक आणि व्यापारी क्षेत्रातील निर्णय यावर आता पूर्वीप्रमाणे राज्याचे नियंत्रण राहिलेले नाही राज्याच्या आणि पारंपरिक जबाबदाऱ्या या इतर घटकाकडून पार पाडल्या जात आहेत. शीतयुद्धोत्तर काळामध्ये दहशतवाद सारखे प्रश्ननिर्माण झाले आहेत. त्याचा सामना एकट्या राज्याला करणे शक्य नाही. त्यासाठी सामूहिकरित्या प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. शीतयुद्धोत्तर काळात अनेक राज्यामधून स्वतंत्र राज्याची मागणी, स्वयंनिर्णयासाठी वाढलेला संघर्ष, युद्ध आणि वांशिक संघर्ष यासर्व कारणामुळे राज्यावरचा ताण वाढला आहे. अनेक वांशिक संघर्ष राज्याच्या नियंत्रणाबाहेर जाऊन ते सोडवण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेला मानवतावादी हस्तक्षेप करावे लागत आहे. या सर्व कारणामुळे राष्ट्र राज्याचा अस्त्विावाला आव्हान मिळालेले आहे.

**३) जागतिकीकरण :**

१९९० शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर जागतिकीकरण हा मुद्दा मोठ्या प्रमाणात चर्चेला आला जागतिकीकरण, उदारीकरण धोरणामुळे आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचे स्वरूप बदलत गेले आहे. भांडवलशाहीमुळे राष्ट्राच्या सीमा मर्यादीत राहिले नाही. मुक्त अर्थव्यवस्थेचे धोरण अवलंबल्यामुळे राष्ट्राचे भांडवल परकीय गुंतवणूक यामुळे जागतिकीकरण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. भांडवलशाहीला विरोध करणाऱ्या डाव्यांना विशेषतः साम्यवादाच्या पाडावानंतर नव्या आर्थिक व्यवस्थेसंदर्भात पूर्वविचार करावा लागत आहे. कारण आर्थिक व व्यापारी क्षेत्रात विश्व व्यापार संघटना, विश्व बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यासरख्या बहुराष्ट्रीय संघटनानी लादलेल्या निर्बंधामुळे अनेक गरीब आणि अविकसित राज्ये आर्थिक संकटात सापडले आहेत. १९९० च्या दशकात अनेक दक्षिण पूर्व आशियातील राष्ट्रामधून परकीय गुंतवणूकदारानी आपल्या गुंतवणूकी तात्काळ काढून घेतल्यामुळे या राष्ट्रांना मोठ्या आर्थिक टंचाईचा सामना करावा लागला. अशा प्रकारे जागतिकीकरण हे शीतयुद्धानंतरचा एक मोठी आंतरराष्ट्रीय व्यवस्था निर्माण केली आहे.

### ४) अमेरीकेचे प्रभूत्त्व :

शीतयुद्धाच्या काळात आंतरराष्ट्रीय व्यवस्था द्विध्रुवीयकरणामध्ये विभागला होता. १९९१ साली सोव्हिएत युनियनच्या विघटनानंतर अमेरीकेचे प्रभुत्त्व प्रस्थापित झाल्याची घोषणा करण्यात आली. कारण १९८९ साली पनामा या मध्य अमेरिकेतील देशावर आक्रमण करून अमेरीकेने पनामाचा अध्यक्ष मॅन्युएल नोरिएगा याला अटक केली. १९९० मध्ये इराक कुवेतच्या युद्धामध्ये अमेरीकेने कुवेतच्या बाजूने युद्धा भाग घेऊन इराकचे आक्रमण परतवले. १९९१ च्या नंतरच्या काळात अमेरीकेची अर्थव्यवस्था अधिक भरभराटीस आले. आर्थिक संपत्ती जवळजवळ चौपटीने वाढले या सर्व गोष्टीवरून अमेरीका हा जगातील आर्थिकदृष्ट्या सर्वात महत्त्वाचा देश बनला होता. तसेच अमेरीकेने लष्करी धोका नसतानाही संरक्षण व्यवस्थेवरील खर्च कमी केला नाही. आपल्या लष्कर ताकदीच्या जोरावर अमेरीकेची जगातील भूमिका वाढत्या हस्तक्षेपाची आणि वर्चस्ववादी होत गेली. कारण अमेरीकेने पूर्व युरोप, उत्तर आयर्लंड, भारत, पाकिस्तान, मध्यपूर्व जगातील पॅलेस्टीन, इस्त्राइल, इराक-इराण, अफगाणिस्तान या सर्व क्षेत्रामध्ये अमेरीकेने आपले अस्तित्त्व दाखवून दिले. अशाप्रकारे अमेरीकेचे प्रभुत्त्व निर्माण झाले.

### ५) सुरक्षिततेचे बदलते स्वरूप :

शीतयुद्धोत्तर काळामध्ये सुरक्षिततेचे स्वरूप बदललेले दिसते. पारंपरिक दृष्टिकोनाप्रमाणे एखाद्या राष्ट्राची सुरक्षितता ही दुसऱ्या राष्ट्राच्या आक्रमणामुळे किंवा लष्करी हस्तक्षेपामुळे धोक्यात येतो. त्याचबरोबर लष्करी कारणामुळेच शांतता आणि सुरक्षितता धोक्यात येते हे सर्व गोष्टी शीतयुद्धोत्तर काळामध्ये मागे पडल्या. कारण अनेक राष्ट्रे ही बाह्य आक्रमणापेक्षा देशाअंतर्गत निर्माण झालेल्या दहशतवादी कारवाया, नक्षलवादी कारवाया, जातीयवाद, वांशिक संघर्ष, फुटीरवाद इत्यादी कारणामुळे राष्ट्राच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच अनेक देशाची सुरक्षितता ही आर्थिक, अस्थिरता, पर्यावरणाचे प्रदूषण, पृथ्वीचे वाढते तापमान, वातावरणातील बदल, मानवी अधिकारांचे उल्लंघन इत्यादी कारणामुळे धोक्यात आली आहेत. अशा प्रकारच्या समस्याना अनेक राष्ट्राच्या सहकार्याने सोडवणे आवश्यक बनले आहे. त्यामुळे राष्ट्राचे सुरक्षितता टिकून राहील अशी स्थिती शितयुद्धोत्तर काळात झाली आहे.

### ६) रशियापुढील पेचप्रसंग :

१९९१ नंतर साम्यवाचे पतन सोव्हिएत युनियनचे विघटन ही झाले आणि रशियन गणराज्य अस्तित्त्वात आले. या रशियन गणराज्यामुळे अर्थव्यवस्थेत सुधारणा करणे व ती मजबूत बनवण्याचे आव्हान होते. कारण साम्यवादी अर्थव्यवस्था विसर्जित करून भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये सामील होणे, आपली अर्थव्यवस्थेमध्ये बदल करणे, साम्यवादी सर्वकषवादी राज्यव्यवस्था सोडून लोकशाही स्विकारणे हे मोठे परिवर्तन होते. या परिवर्तनासाठी इतर भांडवलशाही देशाची आणि जागतिक बँक, नाणेनिधी अशा संस्थाची मदत मिळणे आवश्यक होते. या मदतीमुळेच हे परीवर्तन सुरळीत होणे शक्य होते. औद्योगिक उत्पादनात झालेल्या

नुकसानीमुळे लोकांचे मनोधैर्य खचले होते. ब्लादीमीर पुतीन अध्यक्ष झाल्यानंतर चेचन्या या गणराज्यातील लोकांना सक्तीने रशियाचा भाग म्हणून राहण्यास भाग पाडल्यामुळे चेचन बंडखोरांचा दहतशवादी रशियाला मित्र राष्ट्र हे नाटो करारात सामील झाले आणि काही युरोपीयन संघाचे सदस्य बनले आहेत आणि काही प्रतीक्षा करीत आहेत. रशिया यामधून बाहेर आहे. रशियाची आर्थिक व राजकीय परिस्थिती अमेरीकेची स्पर्धा करण्याएवढी चांगली नव्हती आणि रशियाची ताकद वाढू नये म्हणून अमेरीका प्रयत्न करताना दिसते अशाप्रकारे रशियासमोर जे पेचप्रसंग निर्माण झाले होते.

**७) नवीन महासत्तांचा उदय :**

शीतयुद्धोत्तर काळात अनेक राष्ट्रे महासत्ता म्हणून उदयास येत आहेत. शीतयुद्धाच्या काळामध्ये अमेरीका आणि सोव्हिएत रशिया ही दोनच महासत्ता होती. परंतु याच्या मदतीने अनेक राष्ट्रांनी आपला विकास करून घेतला. शीतयुद्ध संपल्यानंतर ही राष्ट्रे आपल्या आर्थिक आणि व्यापारी क्षेत्रामध्ये केलेल्या प्रगतीच्या जोरावर महासत्त म्हणून उदयास येऊ लागली आहेत. त्यामध्ये चीन भारत, जपान, जर्मनी, कॅनडा यासारख्या काही राष्ट्रांचा समावेश होतो. या राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय राजकारण पुढाकार घेऊन महत्त्वाची भूमिका पार पाडण्याचा प्रयत्न करीत आहोत. अमेरीका जरी संरक्षण क्षेत्रात आघाडीवर असला तरी व्यापारी व आर्थिक क्षेत्रामध्ये वेगवेगळ्या राष्ट्रांशी सामना करावा लागत आहे. त्यामुळे या उगवत्या महासत्तांची दखल अमेरीकेसारख्या महासत्ता तसेच श्रीमंत पश्चिम युरोपीय राष्ट्रांना घ्यावी लागत आहेत.

**८) चीनची वाढती सत्ता :**

सोव्हिएत युनियन आणि पूर्व युरोपमधील साम्यवादाचे पतन झाले तरीही त्याच काळात चीनमधील साम्यवादी पक्षाची सत्ता मात्र अधिक भक्कम झाली. जून १९८९ मध्ये बिजिंगच्या तिदान आनमेय चौकातील विद्यार्थ्यांना लोकशाहीची मागणी करण्याच्या करणावरून चिरडण्यात आले यातून चीनच्या राजकीय व्यवस्थेत पाश्चिमात्य राष्ट्रांनी हस्तक्षेप करू नये. असा संदेश दिला गेला. परंतु चीनने आपली अर्थव्यवस्था बाजारपेठेच्या अर्थव्यवस्थेची जुळवून घेऊन अर्थव्यवस्था झपाट्याने स्पर्धात्मक बनवली. या आर्थिक परिवर्तनामुळे चीन जागतिक अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचा देश बनला आहे. कारण उत्पादन व्यवस्थेसाठी मोठ्या प्रमाणात परकीय भांडवल आकर्षित करून प्रचंड प्रमाणात आणि स्वस्त किंमतीमध्ये ग्रहकोपयोगी वस्तू निर्माण केले आणि जगभरातील बाजारपेठा काबीज केले आहे. या आर्थिक जोरावर चीन हा एक महत्त्वाचा देश बनला त्यामुळे पाश्चात्त्य युरोपीय राष्ट्रे व अमेरीका चीनमध्ये आर्थिक गुंतवणूक करण्याबरोबरच सावध पवित्रा घेताना दिसतात. त्याचबरोबर आज चीनला अमेरीकेची व अमेरीकेलाही चीनची ही गरज आहे. त्यामुळे अमेरीकेच्या कोणत्याही धोरणात चीनने स्पष्टपणे विरोध दर्शवत नाही. चीनने विचारप्रणाली ही परराष्ट्र धोरणात आड आणत नाही. परंतू चीनच्या या ताकदीमुळे अमेरीका किंवा जपानसारख्या देशामध्ये मात्र अस्वस्थता दिसते.

**९) आशियाई वाघ :**

शीतयुद्धाच्या काळामध्ये आशियाई पॅसिफिक भागातील दक्षिण कोरीया, मलेशिया, सिंगापूर, थायलंड आणि तैवान या देशांनी भांडवली अर्थव्यवस्थेचा स्वीकार करून आणि संरनालक बदल करून प्रचंड आर्थिक विकास साधला. त्यामुळे त्यांना आशियाई वाघ असे म्हंटले जाते. तंत्रज्ञानाचा विकास, मोठी उत्पादन क्षमता, बाजारपेठा भांडवलवृद्धी यांच्याआधारे शीतयुद्धोत्तर काळात या देशांनी जपानसारख्या देशापुढे आर्थिक आव्हान उभे केले. परंतु १९९० च्या काळामध्ये हा आर्थिक विकासाचा फुगा फुटला चलनाचे दर स्थिर राखण्याच्या प्रयत्नात या देशातील अर्थव्यवस्था एकामागून एक कोसळल्या खुद्द जपानच्याही अर्थव्यवस्थेवर याचा परिणाम झाला. या आशियाई देशातील अर्थव्यवस्था उद्धस्त झाल्याअसल्या तरी त्याच्या गतीला खीळ मात्र बसली ते आशियाई वाघ असलेले देश आज पुन्हा अर्थव्यवस्था सावस लागल्या आहेत.

**१०) युरोपचे एकत्रीकरण आणि त्याचा विस्तार :**

शीतयुद्धोत्तर आंतरराष्ट्रीय व्यवस्थेमध्ये सर्वात मोठा परिणाम युरोपवर झाला. कारण दुसऱ्या महायुद्धातनंतर जर्मनी आणि फ्रान्समधील परपरागत वैमनस्य संपून त्याच्यातील संबंध सुरळीत झाले. १९९० मध्ये जर्मनीचे एकीकरण झाले तर पूर्व युरोपमधील युगोस्लावियाचे विघटन होऊन त्यातून क्रोएशिया, बॉस्निया, हेर्झेगोविना, सबिया असे देश अस्तित्त्वात आले. नाटोची व्याप्ती वाढवून नव्याने स्वतंत्र झालेल्या पूर्व युरोपीय देशांना सभासदत्त्व देण्यात आले. सध्या नाटो संघटनेचे ३० सदस्य असून ते युरोपीयन देशासाठी खुले आहे. त्याचबरोबर युरोपीयन संसदेबरोबरच युरो या सामाजिक चलनाचाही स्वीकार करून एकत्र येण्याच्या प्रकियेतील पुढची पावले टाकले. समान आर्थि धोरणाबरोबरच समान परराष्ट्र धोरण स्वीकारण्याचा युरोपीय संघ प्रयत्न करीत आहे. यासर्व गोष्टीमुळे युरोपीय संघ हे आंतरराष्ट्रीय व्यवस्थेमध्ये महत्त्वाचे संघटन म्हणून पुढे येत आहे.

**११) उत्तर-दक्षिण विभाजन :**

शीतयुद्धोत्तर जागतिक व्यवस्थेत अनेक परिवर्तने झाली असली तरी तिसऱ्या जगाची स्थिती मात्र फारशी बदलली नाही. आंतरराष्ट्रीय स्तरावर पाश्चात्य भांडवलशाही राष्ट्राचे पहिले जग अधिक समृद्ध व बलशाली बनले. साम्यवादी प्रगत राष्ट्रामध्ये आर्थिक राजकीय बदल घडून आले. परंतु विकसनशील व अविकसित देशाच्या तिसऱ्या जगाची स्थितीत काही बदल झाला नाही. विकसित 'उत्तर' राष्ट्राच्या स्थितीपर्यंत पोहचल्याच्या उद्देश असलेल्या देशामध्ये जागतिकीकरणामुळे फारसे यश मिळाले नाही. नव्या प्रक्रीयेमध्ये नवे अनेक आव्हाने निर्माण झाले. गॅट कराराच्या अटी या विसनशील देशाच्या हिताच्या नसूनही त्या त्यांच्यावर लादल्या जात आहेत. त्यामुळे श्रीमंत गरीब यातील म्हणजेच उत्तर-दक्षिण यांच्यातील अंतर वाढतच चालला आहे. शीयुद्धोत्तर काळामध्ये अलिप्ततावादी राष्ट्रामधील एकजुटी संपुष्टात आले आहे. त्याच्या एकजुटीच्या अभावामुळे दुबळेपणा वाढला असून ते श्रीमंत देशावर अवलंबून राहण्याचे प्रमाण वाढले आहे. अशाप्रकारे उत्तर दक्षिण विभाजन पडले आहे.

अशाप्रकारे १९९१ साली सोव्हिएत युनियनचे विघटन होऊन १९४५ पासून सुरू झालेल्या शीतयुद्धाची

समाप्ती झाली आणि त्यानंतर आंतरराष्ट्रीय जागतिक व्यवस्था ही वरील वैशिष्ट्यात समाविष्ट झाली आहे.

### १.२.३ बहुध्रुवीय व एकध्रुवी

सोव्हिएत रशियाच्या विघटनामुळे द्विध्रुवीय आधारीत शीतयुद्धकालीन विश्वरचना कोलमडली. शीतयुद्धाच्या काळामध्ये आंतरराष्ट्रीय व्यवस्था ही विचारप्रणालीच्या आधारावर विभागली होती. अमेरीका हे भांडवलशाही विचारप्रणालीचा पुरस्कार करीत होता. तर सोव्हिएत रशिया साम्यवादी विचारप्रणालीचे प्रतिनिधीत्त्व करत होते. त्यामुळे शीतयुद्धाला दोन भिन्न विचारसरणीमधला संघर्ष म्हणूनही ओळखले जाते. परंतु शीतयुद्धाचा जो काळा आहे (१९४५ ते १९९०) यामध्ये अमेरीका व रशिया यातील तीव्र संघर्ष, लष्करी गट, प्रतिगट, करार, शस्त्रास्त्र स्पर्धा, शह प्रतिशहाचे राजकारण, आंतरराष्ट्रीय व्यवस्थेमध्ये घडत होते. परंतु सर्व गोष्टी रशियाच्या विघटनाने संपुष्टात आले आणि एक नवीन विश्वरचना आकाराला आली. ही विश्वरचना एकध्रुवी आहेत परंतु प्रत्यक्षात पाहिले तर आज आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये एकध्रुवी आणि बहुध्रुवी व्यवस्थाचे सहअस्तित्त्व मान्य करावे लागेल. एकाच वेळी या दोन्ही व्यवस्थाचे वैशिष्ट्ये दिसून येतात. त्यामुळे त्या दोन्ही व्यवस्थाचे वैशिष्ट्ये करणे गरजेचे आहे. त्यातून बहुध्रुवी व एकध्रुवी जगाची व्यवस्था स्पष्ट करता येईल.

**एकध्रुवीय विश्वरचना :**

शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये एका नव्या विश्वरचनेची व्यवस्था अस्तित्वात आली. त्याचे एक वैशिष्ट्य म्हणजे एकध्रुवीय विश्वरचना होय. आंतरराष्ट्रीय व्यवस्थेमध्ये केवळ एकाच राष्ट्राच्या हाती बहुतांश सांस्कृतिक, आर्थिक आणि लष्करी ताकद एकवटलेली असते त्या व्यवस्थेला एकध्रुवीय व्यवस्था असे म्हणतात. एकध्रुवीय विश्वरचनेमध्ये एकाच राष्ट्राकडे सत्ता केंद्रीय झालेली असते. आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रमुख निर्णय त्या राष्ट्राच्या सहमतीने किंवा मर्जीने घेतले जातात. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविण्याची जबाबदारी त्याच राष्ट्रावर असते. या राष्ट्राला स्पर्धा करणारी किंवा आव्हान देणारी अशी दुसरी सत्ता अस्तित्त्वात नसते. एकूण एकध्रुवीय विश्वरचना म्हणजे एकाच राष्ट्राचे वर्चस्व असते आणि त्याच्या हातामध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणाची सूत्रे असणे होय.

**एकध्रुवीय विश्वरचनेची वैशिष्ट्ये :**

१) एकध्रुवीय विश्वरचना ही सत्तेच्या केंद्रीकरणावर आधारित असून सत्ता ही एखाद्या विशिष्ट राष्ट्राच्या किंवा राष्ट्रसंघाच्या हातामध्ये एकवटलेली असते.

२) एखाद्या विशिष्ट राष्ट्राचे किंवा राष्ट्र गटाचे आर्थिक व भौतिक ताकद हे इतर राष्ट्रापेक्षा अधिक असते.

३) आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नेतृत्त्व सामूहिक स्वरूपाचे न राहता ते एकीकृती स्वरूपाचे बनलेले असते.

४) आंतरराष्ट्रीय राजकारणाची धुरा एक शक्तीशाली राष्ट्राकडे असते आणि सर्व आंतरराष्ट्रीय घडामोडीच्या केंद्रस्थानी हे राष्ट्र असते.

५) एकध्रुवीय विश्वरचनेमध्ये एका राष्ट्राची एकाधिकारशाही किंवा हुकूमशाही निर्माण होण्याची शक्यता असते.

६) एकध्रुवीय व्यवस्थमध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नेतृत्त्व करणारे राष्ट्र आंतरराष्ट्रीय तसेच विभाजीत सत्तासमतोलामध्ये समतोलाकाची (Balancer) ची भूमिका पार पडते.

शीतयुद्धोत्तर काळामध्ये एकध्रुवीय आंतरराष्ट्रीय व्यवस्थेमध्ये अमेरीका जागतिक सत्तेच्या केंद्रस्थानी असल्याचा दावा केला जातो. परंतु ते किती योग्य आहे याचा अभ्यास करणे आवश्यक आहे कारण काही अभ्यासक ही नवीन विश्वरचनेमध्ये अमेरीकेची पकड निर्विवाद आहे असे म्हंटले. एकध्रुवीय विश्वरचनेमध्ये अमेरीकेची भूमिका स्वयंघोषित विश्वरक्षकर्त्याची होती. अमेरिकेला असे वाटत होते की, सोव्हिएत रशियाच्या पाडावानंतर केवळ अमेरीका महासत्ता राहिली आहे आणि एकध्रुवीय व्यवस्थेमध्ये अमेरिका हे राष्ट्र नेतृत्त्व करत आहे ही भूमिका खालील घटनाचा किंवा विधानाच्या आधारे सांगता येईल.

**१) स्वयंघोषित अमेरीकेची भूमिका :**

सन १९९१ साली सोव्हिएत युनियनच्या विघटनानंतर अमेरीकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश (सिनिअर) यांनी नवीन विश्वरचनेची घोषणा केली. ही विश्वरचना अमेरिका केंद्रीत असेल नवीन विश्वरचनेत अमेरिकेची भूमिका विश्वरक्षणकर्त्याची असेल आणि त्यासाठी आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये अमेरीकेचा सक्रिय सहभाग असेल अशी भूमिका जॉर्ज बुश यांनी मांडली. त्यांची विश्वरचना ही आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नेतृत्त्व अमेरिकेकडे असेल, जागतिक पातळीवर शांतता आणि सुरक्षितता निर्माण करण्याची जबाबदारी अमेरीकेवर असेल आंतरराष्ट्रीय सहकार्यातून शांतता आणि सुरक्षिततेचे उद्दिष्ट साधले जाईल. संयुक्त राष्ट्र संघटनेची भूमिका महत्त्वपूर्ण असेल आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन केलेल्या देशाच्याविरूद्ध सामूहिक सुरक्षिततेच्या तत्त्वाच्या अनुषंगाने कारवाई केली जाईल. अणुचाचणी बंदी, अण्वस्त्र प्रसार बंदीसाठी युद्धपातळीवर प्रयत्न केले जाईल इत्यादी गोष्टींचा समावेश असलेली विश्वरचना जॉर्ज बुश यांनी मांडली होती.

**२) अमेरिकेचे प्रथम स्थान :**

सॅम्युअल हंटीग्टन यांच्यामते ज्या देशाला इतर देशाच्या धोरणावर इतरानपेक्षा अधिक प्रभाव टाकता येतो त्या देशाला प्रथम स्थान मिळते. शीतयुद्धानंतर अमेरीकेने आपले प्रथम स्थान अबाधित राहिले कारण रशियाच्या पतनानंतर अमेरिकाल स्पर्धा करण्यासाठी दुसरी महासत्ता अस्तित्त्वात नाही. त्याचबरोबर अमेरिकेकडे असलेल्या विविध साधनाच्या आधारे त्याना मोठे बळ प्राप्त झाले आहे. लोकसंख्या, भूप्रदेश, नैसर्गिक संसाधने, आर्थिक क्षमता, लष्करी ताकद, राजकीय स्थिरता आणि सर्वार्थाने सक्षम व्यवस्था इत्यादी गोष्टी अमरिकेच्या बळाचे आधार आहेत. त्यामुळेच जागतिक राजकारणात अमेरिकेने स्थान भक्कम झाले आहे. अमेरीका हे जगातील इतर महासत्तापेक्षा सरस ठरली आहे. त्यामुळे अमेरीकेला जगामध्ये प्रथम स्थान मिळाले आहे.

### ३) अमेरिकेचे लष्करी सामर्थ्य :

अमेरिकेचे लष्करी सामर्थ्य जगातील इतर सर्व देशापेक्षा कितीतरी पटीनी अधिक आहे. अमेरीकेच्या नौदलाचा आकार अनेक नौदलापेक्षा मोठ्या आकराचा आहे. तंत्रज्ञान आणि अण्वस्त्र या दोन्ही क्षेत्रामध्ये अमेरीका जगापेक्षा कितीतरी पुढे आहे. चीन, फ्रान्स, भारत, जर्मनी, जपान, रशिया आणि ब्रिटन इत्यादी देशांनी जेवढा संरक्षणावर खर्च करतात त्यापेक्षा जास्त खर्च एकटया अमेरीकेचा आहे. १९९४ साली जर्मनीचे चॅन्सलर हेलमेट कोहोल यांनी असे विधान केले आहे की, 'स्थिर युरोप राहण्यासाठी अमेरीकेचे अस्तित्त्व आवश्यक आहे. त्याची जागा दुसरे कोणी घेऊ शकणार नाही?' त्याचबरोबर जपानने आपले स्वतःची लष्करी ताकद करण्याचे ठरवले आहे. तसेच पूर्व आशियामध्ये अमेरीकेने आपले लष्करी अस्तित्त्व कायम ठेवावे असे जपानचे मत होते. त्यामुळे जर्मनी आणि जपान एकध्रुवीय जगाला विरोध करण्यापेक्षा त्याचे समर्थन करतात. त्याच बरोबर रशिया, चीन, युरोपीयन युनियन, अलिप्तवादी राष्ट्रांची चळवळ किंवा संयुक्त राष्ट्रे यापैकी कोणीही अमेरिकेला नियंत्रणात ठेवू शकत नाहीत. इत्यादी सर्व गोष्टी केवळ अमेरीकेच्या लष्करी सामर्थ्यावर अमेरीकेचा वर्चस्व जगावर सिद्ध झाले आहे.

### ४) अमेरिकेची वाढती एकाधिकारशाही :

शीतयुद्धानंतरच्या काळामध्ये अमेरीका हे एकच महासत्ता राहिल्यामुळे अमेरिकेने आंतरराष्ट्रीय राजकारणात दादागिरी करण्याचे प्रयत्न केले त्यामुळे त्यांची एकाधिकारशाही वाढल्याचे दिसते त्याची काही उदाहरणे सांगता येतील.

१) सन १९९१ च्या खाडी युद्धा दरम्यान इराकने कुवैतवर आक्रमण केले त्यावेळी इराकविरूद्धचे कारवाईचे नेतृत्त्व अमेरिकेने केले.

२) बोन्सिया आणि सर्बिया रांष्ट्रामधील वांशिक हिंसाचार थांबविण्यासाठी अमेरीकेच्या नेतृत्त्वाखालील नाटो या संघटनेने सन १९९५ आणि सन १९९९ साली या राष्ट्रावर हवाई हल्ले केले.

३) आफ्रिकेतील सोमालिया या राष्ट्रामधील वांशिक दंगली थांबविण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेने शांतीसेना पाठविली होती. त्या शांतीसेनेतूनच अमेरिकेने सहभाग काढून घेतला. हा त्याचा निर्णय पूर्णतः एकतर्फी आणि संयुक्त राष्ट्र संघटनेच्या नियमाचा भंग करणारा होता.

४) ११ सप्टेंबर, २००१ रोजी न्यूयार्क येथील जगप्रसिद्ध वर्ल्ड ट्रेड सेंटर या इमारतीवर दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यात इमारत उध्वस्त झाली आणि हजारो अमेरिकन नागरिक मृत्यूमुखी पडले. या दहशतवादी हल्ल्याचा मुख्य सूत्रधार ओसाबा बीन लादेन याला अफगाणिस्तानमधील तत्कालीन तालीबान शासनाने आश्रय दिला असा अमेरिकेला संशय होता. या संशयापोटी अमेरीकेने तालिबान शासनाविरूद्ध कारवाई केली. अमेरिकेच्या लष्करी कारवाईमुळे अफगाणिस्तानातील तालीबानी शासन संपुष्टात आले पण या हल्ल्यात शेकडो निष्पाप अफगाण नागरीकांना आपला जीव गमवावा लागला. या लष्करी कारवाई

दरम्यान अमेरिकेकडून युद्ध नियमाचे उल्लंघन करण्यात आले.

५) ११ सप्टेंबर, २००१ रोजी अमेरिकेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर अमेरीकेने आंतरराष्ट्रीय दहतशवादविरूद्ध युद्ध पुकारले. या युद्धामध्ये अमेरिका वापरत असलेल्या विविध तंत्रावरून अमेरीकेची एकाधिकारशाही स्पष्ट होते. दहशतवादाच्या नावाखाली एखाद्या राष्ट्राच्या कारभारात हस्तक्षेप करणे, दहशतवादाला समर्थन दिल्याच्या कारणावरून काही राष्ट्राविरूद्ध एकतर्फी आर्थिक बहिष्कार टाकते, व्यापारी नाकेबंदीची घोषणा करणे त्या राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय राजकारणात वेगळे पाडण्याचा प्रयत्न करणे इत्यादी तंत्राचा समावेश होता. आंतरराष्ट्रीय दहशतवाद संपुष्टात आणण्यासाठी अमेरिकेने काही राष्ट्राबरोबर करार केले आहेत. अशा पद्धतीने अमेरिकेने एकाधिकारशाही निर्माण केली.

६) २००४ मध्ये अमेरिकेने इराकवर लष्करी कारवाई केली. या युद्धात सद्दाम हुसेनच्या राजवटीचा पूर्ण पाडाव झाला. इराकमधील हुकूमशाही नष्ट करण्याची आणि तेल क्षेत्रे अमेरीकन वर्चस्वाखाली आणण्याची इच्छा पूर्ण झाली सद्दाम हुसेन यांना फाशी देण्यात आले. अमेरिकेने अशा प्रकरे इराकवर लष्करी कारवाई केली. अशाप्रकारे अमेरीकेने अशाप्रकारे इराकवर लष्करी कारवाई केली. अशाप्रकारे अमेरीकेने आपले एकाधिकारशाही निर्माण केले.

वरील सर्व घटनांचा आढावा घेतल्यानंतर अमेरीकेचे एकाधिकारशाही निर्माण झाल्याचे दिसते.

एकूणच एकध्रुवीय व्यवस्थेमध्ये अमेरीकेचे वर्चस्व निर्माण झाल्याचे दिसते.

### ❑ बहुध्रुवीय विश्वरचना

बहुध्रुवीय विश्वरचना म्हणजे अशी विश्वरचना की, ज्यामध्ये सत्तेची अनेक केंद्रे असतात. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नेतृत्त्व कोणत्याही एका राष्ट्राकडे नसून अनेक राष्ट्रामध्ये यासाठी स्पर्धा असते शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर नवीन विश्वरचनेमध्ये अमेरीका ही एकच महासत्ता शिल्लक राहीली. काही काळ सर्वसत्ता अमेरीकेच्या हाती एकवटली होती. त्यामुळे एकध्रुवीय व्यवस्था निर्माण आहे असे अनेकांचे मत आहे. कारण अमेरीकेला आव्हान देणाऱ्या अनेक शक्ती पुढे येत आहेत. या बहुध्रुवीय व्यवस्थेमध्ये कोणतेही एकराष्ट्र शक्तीशाली नसते तर अनेक राष्ट्राचे सत्तासामर्थ्य कमी अधिक प्रमाणात एकसारखे असते. यामुळे कोणत्याही एका राष्ट्राची दादागिरी निर्माण होण्याची शक्यता असते. फ्रान्स, रशिया, चीन, भारत, ब्राझिल आणि इतर अनेक देशांनी बहुध्रुवीयतेची संकल्पनेला पाठिंबा दिला आहे.

**बहुध्रुवीय विश्वरचेनची वैशिष्ट्ये :**

१) शीतयुद्धानंतरच्या जगामध्ये बहुध्रुवीय व्यवस्था असून त्यामध्ये सत्तेची अनेक केंद्रे असतात.

२) या सर्व सत्ताकेंद्राची ताकद कमी अधिक प्रमाणात सारखेच असते.

३) बहुध्रुवीय विश्वरचना ही सामूहिक नेतृत्त्वाच्या तत्त्वावर साधारलेली असून आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नेतृत्त्व एका राष्ट्राकडे नसून अनेक राष्ट्रे सामूहिकपणे हे कार्य पार पाडतात.

४) बहुध्रुवीय विश्वरचना ही सत्ता समतोलाच्या तत्त्वावर आधारित असतो. शक्तीशाली राष्ट्रे विशिष्ट उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सत्ता समतोल प्रस्थापित करतात.

५) बहुध्रुवीय विश्वरचनेमध्ये राष्ट्राबरोबरच राष्ट्राचे व्यापारी संघदेखील सत्तेची केंद्रे बनली आहेत. उदा. आशियान, युरोपीय संघ इ.

६) बहुध्रुवीय विश्वरचनेमध्ये राष्ट्राराष्ट्रातील स्पर्धा ही प्रामुख्याने आर्थिक स्वरूपाची आहे. त्याचबरोबर आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी व्यापार सवलती मिळवण्यासाठीही राष्ट्राराष्ट्रामध्ये स्पर्धा असते. त्यासाठी आर्थिक साधन यांचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे.

अशाप्रकारे बहुध्रुवीय विश्वरचनेची वैशिष्ट्ये सांगता येतील कारण शीतयुद्धानंतरच्या काळामध्ये अमेरिका ही एकमेव महासत्ता नाही तर अनेक सत्ताकेंद्रे स्थापन झाले आहे. अमेरीकेचे लष्करी सामर्थ्य हे प्रबळ असले तरी शस्त्रास्त्रे आणि लष्करी सामर्थ्यावर आधारलेली सत्ता २१ व्या शतकामध्ये टिकेल असे वाटत नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये बहुध्रुवीय विश्वरचना आहे असे म्हणता येईल. त्यासाठी खालील घटनांचा आधार सांगता येईल.

**१) अमेरीकेच्या वर्चस्वाला आव्हान**

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये अमेरीकेच्या वर्चस्वाला आव्हान देण्या आले आहे. उत्तर कोरीयामधील अण्वस्त्र विकासाचा कार्यक्रम चीनच्या पाठींब्याने बिनधास्तपणे सुरू आहे. अमेरिका त्याबाबत फार काही करू शकले नाही. युरोपीय राष्ट्राचा पाठींबा असतानाही चीन आणि रशियाच्या विरोधामुळे अमेरीका इराणवरही दबाव आणू शकले नाही. इराणचा अण्वस्त्र विकासाचा कार्यक्रम चालूच आहे. इराकप्रमाणे आमच्यावर अमेरीकेने हला केला तर आम्ही योग्य प्रतिकार करू अशी धमकी इराणने अमेरीकेला दिली आहे. २००८ साली कोसोवाने सर्बियापासून स्वातंत्र्य घोषित केले त्याला अमेरीकेने पाठींबा दिला. रशिया मात्र विरोध केला. त्याचबरोबर जॉर्जियामधील दक्षिण ओसेटीया आणि अबखाजिया या दोन प्रांताना स्वतंत्र देश म्हणून मान्यता देऊन रशियाने अमेरीकेच्या वर्चस्वाला खुले आव्हान दिले आहे.

**२) आशियाई राष्ट्रांची वाढती अर्थव्यवस्था**

अमेरीकेची अर्थव्यवस्था ही जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. अमेरीकेचे राष्ट्रीय उत्पन्न हे जगाच्या एकूण उत्पन्नातील वाटा २० टक्के इतका आहे. परंतु अमेरीकेचे हे स्थान अबाधित राहील असे सांगता येत नाही. काही आशियाई राष्ट्राची अर्थव्यवस्था अमेरीकेपेक्षा दुप्पट तिप्पट वेगाने वाढत आहे. शिवाय अमेरीकेच्या अर्थव्यवस्थेला महामंदीला तोंड देत आहे. चीन, कुवेत, रशिया, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती या देशांनी करकाठी सार्वभौम निधी केले आहेत. त्यातील पैसा मुख्यतः तेल आणि वायुच्या निर्यातीमधून मिळाला आहे. २००९ साली लंडनमध्ये जी–२० राष्ट्राची शिखर परिषद घेण्यात आली. त्यामध्ये जागतिक महामंदीवर चर्चा करण्यात आली. या परिषदेच्या निमित्ताने जगाची बहुध्रुवीय व्यवस्थेकडे चाललेली

वाटचाल स्पष्ट झाली. कारण जी २० हा आशियाई आर्थिक संकटावर स्थापन झालेला आहे आणि हा संघ १९ राष्ट्राचा आणि युरोपीयनचा मिळून तयार झालेला गट आहे. आर्थिक विकास झपाट्याने करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

### ३) लष्करी ताकदीपेक्षा राजनैतिक कौशल्य आवश्यक

अमेरीकेने लष्करी बळाच्या आधारावर काही देशांमध्ये घुसखोरी केली आहे. काही देश उध्वस्त केले आहेत. परंतु ते टिकविता आले नाही कारण अमेरीकेकडे लष्करी ताकद आहे पण त्यापलीकडे वाटाघाटी करण्यासाठीचे राजनैतिक कौशल्य अमेरीकेकडे फारसे नाही. अमेरीकेने इराकमध्ये सद्दाम हुसेनची सत्ता उध्वस्त केली असली तरी कायदा आणि सुव्यवस्था राखणे जमलेले नाही. अफगाणिस्तानमधील दहशतवादी गटानी पुन्हा डोकेवर काढले आहे. तिथे अंतर्गत सुरक्षा विस्कळीत झाले आहे. तालीबानी अतिरेक्यांची ताकद वाढली आहे. त्याच्या दहशतवादी कारवाया पूर्वी इतक्याच जोमाने चालू आहेत पाकिस्तानमध्येही त्याच्या कारवाया होत आहेत या सर्व गोष्टीवर अमेरीकेचे कौशल्य नसल्यामुळे त्यावर वर्चस्व प्रस्थापित करता आले आहे. त्यामुळे लष्करी ताकदीपेक्षा राजनैतिक कौशल्य आवश्यक आहे ते अमेरीकेकडे नसल्यामुळे एकध्रुवीय व्यवस्था टिकली नाही.

### ४) नवीन सत्ताकेंद्रांचा उदय

शीतयुद्धोत्तर आंतरराष्ट्रीय व्यवस्था ही बहुध्रुवीय असल्याचे मत अनेक अभ्यासक मानतात. भारत, चीन, रशिया, जर्मनी, फ्रान्स यासारख्या राष्ट्राचे देखील बहुध्रुवीय विश्वरचनेच्या निर्मितीला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे अमेरीकेचे एकध्रुवीय रचना नसून बहुध्रुवीय विश्वरचना निर्माण झाली आहे. जागतिक राजकारणाचे नेतृत्त्व केवळ अमेरीका करत नाही तर अमेरिका चीन, जपान, जर्मनी, भारत इ. महासत्ताचे सामूहिक नेतृत्त्व शीतयुद्धोत्तर काळात निर्माण झाली आहे. या महासत्ताच्या पलीकडे ब्राझील, मेक्सिको, दक्षिण आफ्रिका, इस्त्राईल, सौदी अरेबिया इत्यादी अनेक प्रादेशिक सत्ता आहेत. काही जागतिक संघटना त्यामध्ये आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, संयुक्त राष्ट्रे, जागतिक बँक इ. संघटना सत्तेचे केंद्र बनू पाहत आहेत. त्याचबरोबरच आफ्रिकन युनियन, आसियान, युरोपियन युनियन यासारख्या काही प्रादेशिक संघटनांचा समावेश आहे. यासर्व सत्ताकेंद्रे निर्माण झाली आहेत. त्यामुळे अमेरीका हे एकच महासत्ता नसून अनेक सत्तांचा उदय झालेला आहे.

अशाप्रकारे अनेक राजकीय, विश्लेषक आणि विचारवंताच्या मते शीतयुद्धोत्तर काळामध्ये आंतरराष्ट्रीय व्यवस्था ही एकध्रुवीय की बहुध्रुवी आहे. यासंबंधी विचार मांडले आहेत. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर एकध्रुवीय व्यवस्था निर्माण झाली होती. नंतरच्या काळामध्ये संक्रमण होऊन बहुध्रुवीय व्यवस्था अस्तित्वात आले आहे. सॅम्युएल हंटिंग्टन याच्यामते शीतयुद्धोत्तर आंतरराष्ट्रीय राजकारणात एक-बहुध्रुवीय व्यवस्था शीतयुद्धोत्तर आंतरराष्ट्रीय राजकारणात एक-बहुध्रुवीय व्यवस्था निर्माण झाली आहे. यामध्ये एक महासत्ता आणि इतर अनेक महत्त्वाच्या सत्ता आहेत. याउलट रिचर्ड एन हास यांनी २००८ साली दी एज ऑफ नॉन पोलॅरिटी या लेखामध्ये असे म्हंटले आहे की, 'अमेरीकेचे एकध्रुवीय साम्राज्य संपुष्टात आले आहे. २१ व्या शतकामध्ये कोणतेही ध्रुव नाहीत. अनेक

सत्तांमध्ये आंतरराष्ट्रीय व्यवस्था विखुरलेली आहे. राष्ट्रराज्याच्या प्रभाव कमी होऊन राज्येत्तर घटकांचा प्रभाव वाढेल अशी भूमिका मांडली आहे.'

सत्तेचे विकेंद्रीकरण आणि बहुध्रुवीय व्यवस्था निर्माण होण्यासाठी राज्याची सत्ता वाढले आहे किंवा अमेरीकेचे प्रभाव कमी झाले आहे किंवा अमेरीकेचे प्रभाव कमी झाले आहे यामुळे झालेले नसून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा परिणाम आहे. जग हे बहुध्रुवीय आहे की ध्रुवीयताच नाही याबद्दल अभ्यासकाचे एकमत नाही किंवा ते असणार नाही परंतु एकध्रुवीय व्यवस्था संपली आहे. हे मान्य करावे लागेल. एकूणच शीतयुद्धोत्तर काळामध्ये आंतरराष्ट्रीय व्यवस्था ही एकध्रुवीयकडे बहुध्रुवीय बनली आहे असे असले तरी आंतरराष्ट्रीय व्यवस्थेकडे सुधारणा करण्याची क्षमता अमेरीकेकडे आहे हे नाकारता येणार नाही.

## १.२.४ युनोची बदलती भूमिका

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये युनो (UNO) ही संघटना महत्त्वाची आहे. जगामध्ये दोन महायुद्धे झाली. पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर अनेक राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय शांतता व सहजीवन निर्माण करण्यासाठी राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. परंतु दुसऱ्या महायुद्धामुळे आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करण्याचे प्रयत्नाला अपयश आले. मात्र आंतरराष्ट्रीय संघटना असावी हे तत्त्व मान्य होते. त्यामुळे दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. याची सुरवात १४ ऑगस्ट, १९४१ रोजी इंग्लंडचे पंतप्रधान चर्चिल आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रूझवेल्ट यांनी अंटलांटिक करार केला. त्यातील आठव्या मुद्याद्वारे युद्ध समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय सुरक्षीततेसाठी एक कायमस्वरूपी व्यवस्था विकसित करण्याचे दोन्ही राष्ट्रांनी मान्य केले. अनेक परिषदा, करार होऊन शेवटी २४ ऑक्टोंबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना झाली.

**संयुक्त राष्ट्रसंघाची उद्दिष्टये/ तत्त्वे**

१) सभासद राष्ट्रांची सार्वभौम समानता असेल.

२) सभासद देशांचे स्वातंत्र्य आणि भौगोलिक एकात्मता यांचा आदर करणे.

३) दुसऱ्या देशावर आक्रमण न करणे, एकमेकांशी केलेल्या करारांच्या अटी पाळणे.

४) आंतरराष्ट्रीय विषादांची शांततामय मार्गाने सोडवणूक करणे.

५) आंतरराष्ट्रीय सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाल्यास सशस्त्र हस्तक्षेप करणार नाही.

६) संयुक्त राष्ट्र संघटना कोणत्याही राष्ट्राच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करणार नाही.

७) आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता याचे रक्षण करणे हे संयुक्त राष्ट्रसंघाचे उद्दिष्टय आहे.

८) शांतता सुरक्षा याबरोबरच आंतरराष्ट्रीय स्तरावर आर्थिक आणि सामाजिक सहकार्य वाढीस लागावे यासाठी संयुक्त राष्ट्रसंघ प्रयत्न करेल.

अशा प्रकारे संयुक्त राष्ट्र संघटनेचे उद्दिष्टये / तत्त्वे आहेत.

## संयुक्त राष्ट्रसंघाची शीतयुद्धातील कामगिरी

आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेसाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेची स्थापना सन १९४५ साली झाली. स्थापनेपासून या संघटनेला शीतयुद्धाच्या राजकारणाचे ग्रहण लागले. संयुक्त राष्ट्रसंघटनेला अमेरीका आणि सोव्हिएत रशियामधील संघर्षाच्या रणभूमीचे रूप प्राप्त झाले. महासत्ताचे राजकारण, लष्करी संघटनाची निर्मिती यामुळे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या भूमिकेवर मर्यादा पडल्या. संपूर्ण शीतयुद्धाच्या काळात केवळ एकदा सामूहिक सुरक्षिततेच्या तत्त्वाचा वापर केला गेला. १९५० मध्ये कोरीयन युद्धाच्या वेळेस संयुक्त राष्ट्राच्या शांतिसेनेची निर्मिती करून तिला कोरियात पाठवण्यात आले. सुरक्षा समितीने सोव्हिएत संघाचा प्रतिनीधीच्या गैरहजेरीत उत्तर कोरीयास आक्रमक ठरविले होते. या शांतीसेनेमध्ये अमेरिका वगळता इतर देशांच्या सैनिकाचा सहभाग कमी होता. शांतिसेना केवळ उत्तर कोरीयाचे दक्षिण कोरीयावरील आक्रमण परतवून थांबल्या नाहीत. तर उत्तर कोरीयात घुसून त्यांनी थेट कोरिया-चीन सीमेपर्यंत मुसंडी मारली. हा सरळ सरळ त्याना दिलेल्या अधिकाराचा भंग होता. कोरीयाच्या अनुभवानंतर पुढील चाळीस वर्षामध्ये अशा तऱ्हेची मोहीम संयुक्त राष्ट्रांनी हाती घेतली नाही.

शीतयुद्धाच्या काळात अमेरीका आणि सोव्हिएत संघ यांच्यातील तीव्र सत्तास्पर्धेमुळे सुरक्षा समितीत या दोन देशांचे मतैक्य होऊन शांतता प्रस्थापित करण्यासाठी उपाय योजणे जवळजवळ अशक्य होऊन बसले. त्यामुळे शांतता प्रस्थापनाला पर्याय म्हणून शांतता रक्षण ही संकल्पना पुढे आली आणि कोरियन युद्धानंतरच्या अनेक संघर्षामध्ये संयुक्त राष्ट्रांनी शांतता प्रस्थापनाऐवज शांतता रक्षणाचा पर्याय निवडला. १९५६ साली सुएझ कालव्याचा पेचप्रसंगावर सुरक्षा समितीमध्े ठोस निर्णय होईना त्यासाठी संयुक्त राष्ट्रासाठी आमसभेने शांततेसाठी एकत्र येण्याविषयीचा ठराव पास केला. त्याद्वारे संयुक्त राष्ट्राच्या आपत्कालीन सेनेची निर्मिती करण्यात आली दोन युद्धासाठी सिद्ध झालेल्या सैन्याच्यामध्ये उभे राहून त्यांच्या दरम्यान एक तटस्थ क्षेत्र निर्माण करणे, आणि संघर्षात गुंतलेल्या देशांना वाटाघाटच्या माध्यमातून प्रश्न सोडवण्यास अवधी देणे हे या आपत्कालीन सेनेचे काम होते. आपत्कालीन सेनेचा हेतू साध्य झाल्याने १९५८ साली लेबॅनॅनमधील संघर्ष, १९६० मधील अफ्रिकेतील कॉंगोमधील अभियान, १९६४ मधील सायप्रसमधील शांततारक्षक होता. इत्यादी मोहिमा हाती घेतल्या गेल्या. शीतयुद्धाच्या राजकारणामुळे निशस्त्रीकरण, पर्यावरणाचे सरंक्षण मानव अधिकाराचे संरक्षण यासरख्या आंतरराष्ट्रीय क्षेत्रामध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेनी भरीव कामगिरी करू शकली नाही.

## युनोची बदलती भूमिका

शीतयुद्धोत्तर कळात संयुक्त राष्ट्रसंघाची भूमिका बदलली असून ती व्यापक स्वरूपाचे बनले आहे. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय शांतता सुरक्षितता आणि विकासाची जाणीव वैश्विक बनली असून या उद्दिष्टपूर्तीसाठी संयुक्त राष्ट्र संघटनेकडून सक्रिय आणि सकाात्मक भूमिकेची अपेक्षा केली जात आहे. सन १९९१ साली युनोचे तत्कालीन सरचिटणीस जेव्हिएर पेरेझदी कुलर यांनी युनो अजेंडा फॉर २१ सेच्युरी हा अहवाल प्रसिद्ध केला. त्या अहवालामध्ये भविष्यात युनोला पार पाडवयाच्या भूमिकेची कल्पना स्पष्ट केली

आहे. या अहवालातील काही प्रमुख तत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत.

१) आर्थिक आणि साामाजिक स्वरूपाच्या प्रश्नावर अधिक भर देणे.

२) मूलभूत मानव अधिकार, अल्पसंख्याक आणि महिलांच्या अधिकारांचे सरंक्षण करण्यावर विशेष लक्ष ठेवणे.

३) गरीबी, बेकारी, सामाजिक विषमेतच्या निर्मुलनासाठी प्रयत्न करणे.

४) लोकशाहीचा प्रसार तसेच राजकीय स्थैर्य निर्माण करण्यासाठी प्रयत्न करेण.

५) निःशस्त्रीकरण आणि पर्यावरण संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय जनमत गतिमान करण्यासाइी प्रयत्न करणे.

६) एड्स सारख्या रोगांच्या वाढत्या प्रसाराला आळा घालणे.

७) शस्त्रास्त्र,अंमली पदार्थाच्या व्यापाराला आळा घालणे.

या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी गेल्या तीन दशकापासून युनो सक्रीय झाली आहे. शीतयुद्धोत्तर काळात युनोच्या शांतिसेनेचे कार्यक्षेत्रदेखील व्यापक बनले आहे. ते खालील उदाहरणावरून स्पष्ट होते.

१) शांतीसेनेने केवळ बफरची भूमिका निभावली नाही तर शांतता निर्मितीचे काम केले आहे. अशा गुंतागुंतीच्या कामासाठी संयुक्त राष्ट्राची सैन्यदलाप्रमाणेच नागरी गटांचीही नेमणूक केली आहे. अशा प्रकारची एक यशस्वी मोहीम १९८९-९० मध्ये नामिबियामध्ये संयुक्त राष्ट्रांनी राबविली.

२) १९९२-९५ या कालावधीमध्ये कंबोडियातही शांतीसेनेची मोहिम हाती घेण्यात आली होती. शस्त्रसंधी व युद्धमग्न क्षेत्रांचे निशस्त्रीकरण केल्यानंतर शांतीसेनेनी कंबोडियाच्या परराष्ट्र धोरण, संरक्षणधोरण आणि वित्तीय धोरणांचा ताबा घेतला. थायलंडमधून निर्वासितांना परत येण्यास मदत केली. पोलिसांना प्रशिक्षण देऊन मानवी हक्काच्या रक्षणासाठी अनुकूल वातावरण तयार केले. मूलभूत सुविधांची पुनर्प्रस्थापना केली. १९९३ मध्ये संयुक्त राष्ट्राच्या शांतीसेनेच्या नियंत्रणाखाली निवडणूका पार पाडल्या परंतु १९९५ साली संयुक्त राष्ट्राचे शांतीसेना माघारी घेतल्यानंतर कंबोडिया पुन्हा अस्थिरतेकडे जाऊ लागला.

३) १९९२-१९९५ मधील युगोस्लावियातील मोहीम एक उदाहरण आहे. या बहुवांशिक देशातील कम्युनिस्ट सत्ता कोसळल्यानंतर अत्यंत हिंसक पद्धतीने त्याचे विघटन झाले. अनेक वर्षे चाललेल्या या संघर्षाच्या नियंत्रणासाठी १९९२ साली संयुक्त राष्ट्राच्या शांतीसेना क्रोएशियाच्या सर्वियन प्रभुत्त्व असलेल्या भागात दाखल झाल्या नंतर त्या बोस्निया हर्झगोविता येथेही पाठवण्यात आल्या. दुदैवाने युगोस्लावियातील वांशिक हत्या थांबविण्यात या सेनेला अपयश आले. १९९५ मध्ये संयुक्त राष्ट्राच्या सेनाची जागा नाटो सेनाही घेतली.

अशा प्रकारे १९९१ ते १९९५ या काळामध्ये शांतीसेनेच्या मोहिमा आखण्यात आल्या. तेवढ्या सन १९४५ ते १९९० या काळातही आखल्या गेल्या नाहीत. संयुक्त राष्ट्राची बदलती भूमिका लक्षात घेतल्यानंतर

असे म्हणता येईल की, भविष्यात आंतरराष्ट्रीय व्यवस्थेच्या सुरक्षेसाठी संयुक्त राष्ट्रांना खालील प्रकारच्या भूमिका पार पाडाव्या लागतील.

१) आक्रमक राष्ट्रांना आणि प्रवृत्तीना पायबंद घालण्यासाठी कार्य करावे लागेल.

२) अंतर्गत वांशिक संघर्ष आणि मानवी हक्काची पायमल्ली थांबवण्याची कार्ये करावे लागेल.

३) अपयशी राज्यामध्ये राजवट पुनर्स्थापनेसाठी मदत करण्यात यावे.

४) जिथे राजवटीच्या अधिमान्यतेलाच आव्हान मिळाले आहे. अशा राज्याच्या संदर्भातील अडचणी दूर करावे लागेल. ती गमावलेली अधिमान्यता पुनःप्रस्थापित करणे किंवा समस्येवर तोडगा म्हणून त्या राज्याचीच पुर्नरचना करणे अपेक्षित आहे.

आंतरराष्ट्रीय समाज आणि त्याचे नागरिक यांच्या सुरक्षेला केंद्रस्थानी ठेवून, वंशवाद, आंतरराष्ट्रीय दहशतवाद आणि मूलतत्त्वाविरूद्ध सामूहिक प्रयत्न युनोमार्फत होत आहेत. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या लोकशाही करणाची मागणी देखील जोर पकडत आहे. अमेरीकेच्या वाढत्या एकाधिकारशाहीला आळा घालण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेचे सबलीकरण आणि लोकशाहीकरण होणे आवश्यक आहे.

## १.३ सारांश

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये शीतयुद्ध हे एक महत्त्वाची घटना आहे. शीतयुद्धाच्या काळामध्ये आंतरराष्ट्रीय व्यवस्था ही द्विध्रुवीय विश्वरचनेत विभागला होता. नंतरच्या काळात एकध्रुवीय व बहुध्रुवीय व्यवस्था अस्तित्त्वात आली. शीतयुद्धामध्ये अमेरीका व रशिया या दोन महासत्ता असून जग या दोन गटात विभागले होते. एक भांडवलशाही लोकशाहीचे प्रतिनिधीत्त्व करत होते. एक भांडवलशाही लोकशाहीचे प्रतिनिधीत्त्व करत होते तर दुसरे साम्यवादी व्यवस्थेचा पुरस्कार करत होता. दोन्ही गट मध्ये प्रत्यक्ष युद्ध झाले नसून केवळ संघर्षमय परिस्थिती निर्माण झाले होते. १९९१ नंतर साम्यवादी व्यवस्थेचा पाडाव झाला आणि त्यातून पंधरा गणराज्ये निर्माण झाले. त्यामुळे अमेरीका हे एकच महासत्ता अस्तित्त्वात राहिली. परंतु २१ व्या शतकामध्ये अमेरीकेला आव्हान देणारी अनेक सत्ताकेंद्रे निर्माण झाली आणि आंतरराष्ट्रीय व्यवस्था ही बहुध्रुवीय सत्ताकेंद्राची बनली. शीतयुद्धाच्या काळामध्ये संयुक्त राष्ट्रसंघटनेला कोणतेही काम करता आले नाही. नंतरच्या काळामध्ये मात्र संयुक्त राष्ट्र संघटना शांतीसेनेच्या माध्यमातून अनेक देशामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. एकूणच आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये युनोची भूमिका ही जागतिक शांतता प्रस्थापित करण्यामध्ये महत्त्वाची आहे.

## १.४ पारिभाषिक शब्द व अर्थ

शीतयुद्ध : प्रत्यक्ष युद्ध न करता अप्रत्यक्ष एकमेकाविरूद्ध कुरघोडी करणे.

एकध्रुवीय विश्वरचना : एका राष्ट्राचे वर्चस्व करणे.

बहुध्रुवीय विश्वरचना : एकपेक्षा जास्त सत्ताकेंद्रे निर्माण होते.

नाटो : शस्त्रास्त्र संबधीचा अमेरीकेनी केलेला करार

## १.५ सरावासाठी स्वाध्याय

१. शीतयुद्धाचा अर्थ व विकास स्पष्ट करा.

२. एकध्रुवीय विश्वरचनेची चर्चा करा.

३. शीतयुद्धानंतरची आंतरराष्ट्रीय व्यवस्था स्पष्ट करा.

४. बहुध्रुवीय विश्वरचनेची चर्चा करा.

५. युनोची बदललेली भूमिका स्पष्ट करा.

## १.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. Ghai U R (2004) International Politics - Theory and Practice, New Academic Publication Co. Jalandar

२. देवळाणकर शैलेंद्र (२००५) आंतरराष्ट्रीय संबंध, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपूरा, औरंगाबाद

३. देवळाणकर शैलें द्र (२००५) समकालीन जागतिक राजकारण प्रमुख प्रश्न, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपूरा, औरंगाबाद

४. पेंडसे अरूणा व सहस्त्रबुद्धे उत्तरा (२००८), आंतरराष्ट्रीय संबंध शीतयुद्धोत्तर व जागतिकीकरणाचे राजकारण, ओरिएंट लॉगमन, मुंबई

❑❑❑

प्रकरण – २

# आर्थिक क्षेत्रीयता विरूद्ध जागतिकीकरण

**(Economic Regionalism VS Globilization)**

************************************************************

अनुक्रमणिका

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ प्रादेशिक संघटना – युरोपियन संघ आणि असियान

२.२.२ जागतिकीकरण आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांची भूमिका

२.२.३ जागतिकीकरणाविरोधी चळवळ

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

२.५ स्वंय-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला;

- आर्थिक क्षेत्रीयता किंवा प्रदेशवाद विरुद्ध जागतिकीकरण समजून घेता येईल.
- प्रादेशिक संघटना आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचा अभ्यास करता येईल.
- जागतिकीकरणाविरोधी चळवळ समजून घेता येईल.

## २.१ प्रास्ताविक

विसाव्या शतकात जागतिक राजकारणात आणि अर्थकारणात आमूलाग्र परिवर्तनाची चळवळ सुरू झाली. ह्या परिवर्तनाच्या मागे शीतयुद्धाची झालेली समाप्ती, सोव्हिएत संघाचे विघटन, पूर्व युरोपात साम्यवादाचे पतन आणि अमेरिकेची एकध्रुवी अर्थव्यवस्था अशा विविध कारणामुळे नवीन आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेबरोबरच नवीन आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचाही उदय झाला.

दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय व्यापार, ब्रेटन वुड्स पद्धतीने संचलीत होऊ लागला. युद्धोत्तर काळात अमेरिका एकमेव आर्थिक व राजकीयदृष्ट्या प्रबळ राज्य असल्यामुळे एकध्रुवीय सत्ताराज्य म्हणून पुढे आले. त्यातून जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली.

दुसरीकडे जगात दुसऱ्या महायुद्धानंतर बहुध्रुवीय असलेली अर्थव्यवस्था पुढे आली आहे. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर लष्करी सामर्थ्याचे महत्त्व कमी होऊन आर्थिक सामर्थ्याचे महत्त्व वाढल्याचे दिसून येते. त्यातून जागतिक राजकारणात विविध आर्थिक संघटना निर्माण झाल्याचे दिसून येते. जागतिक राजकारणाचे व्यवस्थापन सामुहिकपणे या राष्ट्रांकडून केले जात आहे.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ प्रादेशिक संघटना

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात वेगवेगळ्या राष्ट्रांनी आपापसांत आर्थिक आणि लष्करी स्वरूपाचे क्षेत्रीय किंवा स्थानिक संघटन केलेले आढळून येते.

क्षेत्रीय किंवा प्रादेशिक संघटना म्हणजे समान उद्देशाच्या किंवा गरजांच्या प्राप्तीसाठी राष्ट्रांच्या समुदायानी एकत्र येऊन केलेले संघटन होय. क्षेत्रीय किंवा प्रादेशिक संघटना हा आंतरराष्ट्रीय राजकारणातील एक नवीन प्रयोग आहे. आजचे जग हे जागतिकीकरणामुळे परस्परावलंबी बनले आहे. म्हणजेच प्रत्येक राष्ट्राला आपल्या कोणत्या ना कोणत्या गरजेच्या पूर्ततेसाठी दुसऱ्या राष्ट्राची मदत घ्यावी लागते. त्यामुळे सार्वभौम राष्ट्रांना एकत्र येऊन आपले हेतू पूर्ण करण्यासाठी क्षेत्रीय किंवा प्रादेशिक संघटना स्थापन करणे आवश्यक वाटू लागले आणि त्यातूनच क्षेत्रीय किंवा प्रादेशिक संघटनांचा उदय झाला आहे. शास्त्रास्त्र स्पर्धेच्या आजच्या युगात स्वतःच्या हिताचे संरक्षण एकट्याने करणे अशक्य आहे. म्हणून सामुहिकरित्या राष्ट्रीय हिताची जपवणूक करण्याच्या दृष्टीने प्रादेशिक संघटनांचा विकास झाला. आज जगात सार्क, आसियान, अरब लिग, युरोपियन युनियन, या सारख्या संघटना स्थापन झाल्या आहेत.

**प्रादेशिक संघटनेची व्याख्या :**

प्रादेशिक संघटनेची व्याख्या करणे अवघड आहे. कारण काही राष्ट्रे आपल्या भौगोलिक क्षेत्रापासून दूर असलेल्या प्रादेशिक संघटनामध्ये सहभागी झाल्याचे दिसतात. उदा. अमेरिका जगातील पाच संरक्षणात्मक संधीमध्ये सहभागी झालेली आहे. तर दक्षिणपूर्व आशियाई राष्ट्रांच्या संघटनेमध्ये (सिटो) पूर्व आशियातील थायलंड व फिलीपाईन्स या दोन राष्ट्रांच्या व्यतिरिक्त इतर चार राष्ट्रे व अन्य खंडातील आहेत. यावरून असे स्पष्ट होते की, प्रादेशिक संघटनाबाबत निश्चित असे नियम किंवा निकष नाहीत. नॉर्मन हिल यांनी क्षेत्रीय संघटनाऐवजी 'सिमित आंतरराष्ट्रीय संघटना' असे नाव सुचविले आहे.

श्लीचरच्या मते – 'प्रदेशवाद म्हणजे राज्य तसेच निर्भर क्षेत्रासाठी प्रादेशिक आधारावर संघटीत करणारे तत्त्व आहे.'' क्षेत्रीय संघटना म्हणजेच समान उद्देशाच्या प्राप्तीसाठी राज्याच्या समुदायांनी एकत्र येऊन केलेले संघटन होय.

प्रादेशिक संघटनांना संयुक्त राष्ट्र संघाने चार्टर नुसार मान्यता दिलेली आहे. असे असले तरी अशा संघटनाचे स्वरूप व उद्देशाबाबत विवेचन केले नाही. प्रादेशिक संघटनांचे समर्थक अशा संघटना संयुक्त राष्ट्र

संघाच्या उद्देशपूर्तीसाठी आवश्यक आहेत असे मानतात. पुढील काही महत्त्वपूर्ण संघटना आपणास त्यांच्या अभ्यासाद्वारे समजून घेता येतील.

**युरोपीय संघ :**

युरोपियन देशांची ही एक महत्त्वाची संघटना आहे. जागतिक शक्तीशाली व्यापारसंघ किंवा युरोपातील एकूण २७ राष्ट्रांचे राजकीय व आर्थिक स्वरूपाचे संघटन म्हणून युरोपियन महासंघाचा उल्लेख केला जातो. या संघाची सुरुवात १९५७ मध्ये झालेल्या रोमच्या संधीमधून युरोपीयन आर्थिक परिषदेच्या माध्यमातून सहा युरोपियन देशानी आर्थिक दृष्टीकोनातून झाल्याचे दिसते. त्यात बेल्जीयम, जर्मनी, फ्रान्स, इटली, लक्झेंबर्ग, नेदरलँड हे सहा देश या संघाचे मूळ सभासद होते. १९७३ ला संघाला आधुनिक स्वरूप दिले गेले. या संघात डेन्मार्क, आयरिश प्रजासत्ताक आणि ग्रेट ब्रिटन या संघात सहभागी झाले. १९८१ साली ग्रीस आणि १९८६ साली पोर्तूगाल व स्पेन हे देश सहभागी झाले. १९९५ साली ऑस्ट्रीया, फिनलंड आणि स्वीडनचा समावेश करण्यात आला. या संघाचे एकूण १५ सभासद बराच वेळ होते. सध्या त्यांची संख्या २७ झाली आहे.

**युरोपियन संघाचा विकास :**

युरोपियन महासंघाचा उदय किंवा स्थापना १९९१ च्या ऐतिहासिक मॉट्रिश करारातून झालेला असला, तरी गेल्या चाळीस वर्षात युरोपियन राष्ट्रामध्ये झालेल्या विविध करारांनी या महासंघाची पार्श्वभूमी तयार केली. यापैकी काही प्रमुख करार पुढीलप्रमाणे आहेत.

**१) पॅरिस करार :** १९५१ साली फ्रान्स, पूर्व जर्मनी, बेल्जीयम, लक्झेंबर्ग, इटली, हॉलंड इत्यादी राष्ट्रांनी 'युरोपयन कोळसा आणि पोलाद समुदाय' या संस्थेची स्थापना केली.

**२) रोम करार :** १९५७ साली उपरोक्त राष्ट्रांनी 'युरोपियन आर्थिक समुदाय' व 'युरोपियन अणुशक्ती समुदाय' असे दोन संघ स्थापन झाले.

**३) एकीकृत युरोपियन कायद्यासंबंधीचा करार :** १९८६ साली युरोपीयन राष्ट्रांनी युरोपियन कायद्यासंबंधीचा करार करून युरोपीय कौन्सिल स्थापन केले.

**४) मॅट्रिश करार (१९९१) :** मॅस्ट्रिश करारानुसार १९९३ साली युरोपियन संघाची स्थापना झाली. युरोपियन महासंघाचे कार्यालय बेल्जीयममधील ब्रुसेल्स येथे आहे. तसेच युरोपियन समुदायाचे कामकाज स्पॅनिश, फ्रेंच, इंग्लिश, जर्मन, ग्रीक इ. भाषामध्ये चालते.

**युरोपियन महासंघाची उद्दिष्टे :**

युरोपियन महासंघाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१) आर्थिक, व्यापारी, सामाजिक राजकीय पातळीवरील विकास धोरण व सहकार्य वाढवणे.

२) आर्थिक, वित्तीय संघ स्थापण्याच्या दिशेने प्रयत्न करणे.

३) एका चलनव्यवस्थेच्या निर्मितीसाठी प्रयत्न करणे.

४) संपूर्ण युरोपसाठी एका नागरिकत्वाच्या निर्मितीसाठी प्रयत्न करणे.

५) युरोपच्या सामुहिक संरक्षण आणि परराष्ट्र धोरण निर्मितीसाठी प्रयत्न.

६) युरोपीय देशामध्ये राजकीय व शासकीय संयुक्तता आणणे.

७) समान अर्थव्यवस्था व समान व्यापार नियम लागू करणे.

८) समान चलन – युरो अस्तित्वात आणणे.

युरोपियन महासंघाची रचना किंवा आराखडा :

युरोपीयन महासंघाचे सात प्रमुख घटक असून ते पुढीलप्रमाणे –

१) **युरोपियन परिषद :** यामध्ये सदस्य राष्ट्रांच्या शासकीय प्रमुखाचा समावेश होता.

२) **युरोपियन संसद :** यामध्ये युरोपियन महासंघाच्या सदस्य राष्ट्रामधून निवडून आलेले सदस्यांचा समावेश होतो. या सदस्यांची निवड पाच वर्षासाठी केली जाते.

३) **मंत्रीपरिषद :** यामध्ये सदस्य राष्ट्रांच्या परराष्ट्रमंत्र्यांचा समावेश होतो. सर्व महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याचे कार्य ही परिषद करते.

४) **युरोपियन आयोग :** युरोपियन आयोगाचे कार्य हे कार्यकारी प्रमुखाचे असून युरोपियन महासंघाच्या दैनंदिन प्रशासनाचे कार्य युरोपियन आयोगाकडून होते.

५) **युरोपियन न्यायालय :** न्यायालयाचे मुख्यालय लक्झेंबर्ग येथे असून त्यात १५ न्यायाधिशांचा समावेश होतो. युरोपियन महासंघाच्या करारातील तरतुदींचा अर्थ लावण्याचे कार्य न्यायालयाकडूत होते.

६) **लेखपालांचे न्यायालय :** युरोपियन महासंघाचा खर्च आणि उत्पन्नाच्या हिशोबाचे कार्य लेखपालांच्या न्यायालयाकडून होते.

७) **सल्लागार समित्या :** विविध विषयावर चर्चा करण्यासाठी आणि सल्ला देण्यासाठी अशा समित्यांची निर्मिती करण्यात आली आहे. उदा. आर्थिक आणि सामाजिक समिती, क्षेत्रीय समिती इत्यादी.

## युरोपियन महासंघाची कार्ये :

युरोपियन महासंघाकडून सन १९९९ साली एक चलनव्यवस्था सुरू करण्यात आली. ती युरो नावाने ओळखली जाते. इ.स. २००० पर्यंत महासंघाच्या राष्ट्रांपैकी ११ राष्ट्रांनी या चलनव्यवस्थेचा स्वीकार केला होता. सभासद देशांतर्गत वस्तू, व्यक्ती, सेवा आणि भांडवल यांच्या मुक्त वहनाचे तत्त्व या कराराने प्रस्थापित केले. रोम करारातील अटीची अंमलबजावणी करणे सभासद राष्ट्रांवर बंधनकारक असल्यामुळे रोम करार हे एक प्रकारे युरोपीय समुहाचे संविधान आहे असे म्हणता येते. बाजाराच्या एकात्मीकरणाची प्रक्रिया पूर्णत्वास नेणे हे १९८७ च्या 'एक युरोप' कायद्याचे उद्दिष्ट होते. हे याद्वारे यशस्वी करण्यात आले आहे. याशिवाय आर्थिक सेवा, विमा, दळणवळण या क्षेत्रांचे विविध सभासद देशातील नियमन तसेच सुरक्षाविषयक आणि तंत्रज्ञानविषयक मानके यांच्यात सुसूत्रता आणण्याचा निधार करण्यात आला. १९९२ मधील मॅट्रिश करारामुळे पश्चिम युरोपच्या एकात्मिकरणाच्या प्रक्रियेने आणखी एक पाऊल पुढे टाकले. त्यातूनच पश्चिम युरोपचा आर्थिक संघ निर्माण होण्याच्या प्रक्रियेने वेग घेतला. त्याचबरोबर युरोपीय देशाच्या सामाजिक धोरणांत सुसूत्रता आणण्याचाही प्रयत्न

झाला. डेन्मार्क आणि फ्रान्समध्ये मोठ्या संख्येने लोकांनी या कराराविरुद्ध मतदान केले. तर ब्रिटनने या करारातून बाहेर पडण्याचा हक्क राखून ठेवला. परंतु शेवटची युरोपीय संघाच्या सर्वच सभासद राष्ट्रांनी मॅट्रिश करारास अखेर मंजूरी दिली.

**आसियान : दक्षिणपूर्व आशियायी राष्ट्रसंघ** (Association of South East Asian States)

आंतरराष्ट्रीय राजकारणात हे क्षेत्र सागरीय व भौगोलिक दृष्ट्या अत्यंत महत्वाचे आहे. या क्षेत्रातील राष्ट्रे प्रशांत महासागराला हिमसागराशी जोडणारी आहेत. तसेच ही राष्ट्रे आर्थिक व नैसर्गिक दृष्ट्या समृद्ध आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटनने या क्षेत्रातून माघार घेतली. त्यानंतर चीन, सोविएत संघ (पूर्वीचा) व अमेरिका ह्या राष्ट्रांनी या क्षेत्रावर आपला प्रभाव वाढविण्याचे सातत्याने प्रयत्न केलेला दिसतो. परंतु या प्रयत्नांना शह देण्याचा या राष्ट्रांचा निर्धार आहे.

**स्थापना :**

इंडोनेशिया, मलेशिया, फिलिपिन्स, सिंगापूर आणि थायलंड या पाच राष्ट्रांच्या आसियान जाहीरनाम्यावरील स्वाक्षरीने आसियान या क्षेत्रीय संघटनेची स्थापना ८ ऑगस्ट १९६७ रोजी बँगकॉक येथे झाली. १९८४ मध्ये ब्रुनाय, १९९५ मध्ये व्हिएतनाम, १९९७ मध्ये लाओस व म्यानमान आणि १९९९ मध्ये कंबोडिया हे देश आसियान मध्ये सामील झाले.

मागील काही वर्षात असियान मध्ये अनेक 'संवाद भागीदारांचा' (Dialogue Part ners) समावेश झालेला आहे. सध्या आसियान सोबत दहा 'संवाद भागीदारांचा' आहेत. ते म्हणजे ऑस्ट्रेलिया, कॅनडा, चीन, जपान, युरोपीय संघ, भारत, कोरिया, न्यूझीलंड, रशिया आणि अमेरिका १९७० पासून आसियानच्या औपचारिक प्रतीबद्धतेला सुरवात झाली. आसियान आणि 'संवाद भागीदारांमध्ये' सातत्याने उच्च स्तरीय देवाण घेवाण व संवाद होत असतो. तसेच मंत्रिमंडळाच्या व शिखर बैठका देखील होत असतात. सुरवातीला असियानच्या विकसनशील अर्थव्यवस्थेला तांत्रिक व आर्थिक सहाय्य करण्यावर या 'संवाद भागीदारांचा' विशेष भर दिलेला दिसतो.

**उद्देश :**

या संघटनेचे उद्देश खालील प्रमाणे आहेत.

१. क्षेत्रातील आर्थिक वाढ, सामाजिक प्रगती, आणि सांस्कृतिक विकास गतिमान करणे;

२. आर्थिक, सामजिक, सांस्कृतिक, तांत्रिक, वैज्ञानिक व प्रशासकीय क्षेत्रात सर्वांच्या हितासाठी सक्रीय व परस्पर सहयोगाला प्रोत्साहन देणे;

३. सभासद राष्ट्रांच्या कृषी व उद्योग यांचा अधिक प्रभावी उपयोग करून घेण्यासाठी सहयोग करणे;

४. व्यापार वाढविणे तसेच आंतरराष्ट्रीय वस्तूंच्या व्यापार संदर्भातील समस्यांचा अभ्यास करणे;

५. दळणवळण सुविधांमध्ये सुधारणा करणे; आणि

६. क्षेत्रातील नागरिकांच्या / जनतेच्या राहणीमानात सुधारणा करणे.

**तत्त्वे :**

असियान सभासद राष्ट्रांनी आपल्या अंतर्गत संबंधा संदर्भात १९७६ च्या 'मैत्री व सहकार्य करारातील' (Treaty of Amity and Co-operation) मूलभूत तत्त्वे स्वीकारली आहेत; ती खालीलप्रमाणे :

१. सर्व राष्ट्रांचे स्वातंत्र्या, सार्वभौमत्व, समता, प्रादेशिक अखंडता आणि राष्ट्रीय अस्मिता यांचा परस्पर आदर करणे;

२. प्रत्येक राष्ट्रांचा अस्तित्व जोपासण्याचा अधिकार बाह्य हस्तक्षेप, विध्वंस किंवा जबरदस्ती पासून मुक्त करणे/ठेवणे;

३. परस्परांच्या अंतर्गत बाबीमध्ये हस्तक्षेप न करणे.

४. मतभेद किंवा तक्रारी/तंटे शांततेच्या मार्गाने सोडविणे;

५. भयाचा/ धमकीचा किंवा बळाचा वापर त्यागने; आणि

६. परस्परांमध्ये प्रभावी सहकार्य करणे.

**रचना :**

आसियान जाहिरनाम्यानुसार (ASEAN Charter) असियानची रचना खालीलप्रमाणे आहे.

**१. आसियान शिखर परिषद** (ASEAN Summit) :

आसियान निर्णय प्रक्रियेतील सर्वोच्च घटक म्हणजे आसियान शिखर परिषद. सभासद राष्ट्रांचे राष्ट्रप्रमुख या शिखर परिषदेचे सभासद आहेत. आसियानच्या बैठका वर्षातून दोन वेळा होतात. आसियानचे अध्यक्षपद ज्या सभासद राष्ट्राकडे असते ते राष्ट्र शिखर परिषद भरवते/ घेते. गरज असेल तर विशेष व तातडीच्या बैठका देखील होतात.

**२. आसियान समन्वय परिषद** (ASEAN Co-ordinating Council) :

आसियान निर्णय प्रक्रियेतील दुसरा घटक म्हणजे आसियान समन्वय परिषद. सभासद राष्ट्रांचे परराष्ट्रमंत्री या समन्वय परिषदे सदस्य असतात. त्यांच्या बैठका वर्षातून दोन वेळा होतात. या समन्वय परिषदेला संबंधीत वरिष्ठ अधिकऱ्यांचा पाठिंबा असावा लागतो. ही परिषद असियान शिखर परिषदेच्या बैठकांची तयारी करते; करार, निर्णय, ठराव यांच्या अंमलबजावणी मध्ये समन्वय ठेवते; महासचिवांचा अहवाल मान्य करते; इत्यादी कार्ये पार पाडते.

**३. आसियान समुदाय परिषद** (ASEAN Community Council) :

आसियान निर्णय प्रक्रियेतील तिसरा घटक म्हणजे आसियान समुदाय परिषद. आसियान राजकीय-सुरक्षा समुदाय परिषद (), आसियान आर्थिक समुदाय परिषद (), आणि आसियान सामाजिक-सांस्कृतिक समुदाय परिषद (), याचे सभासद या परिषदेचे सदस्य असतात. वर्षातून दोन वेळा या परिषदेची बैठक होते. असियानचे अध्यक्षपद भूषविणाऱ्या सभासद राष्ट्रांचा संबंधित मंत्री समुदाय परिषदेचा अध्यक्ष असतो. प्रत्येक आसियान समुदाय परिषदेला संबंधीत वरिष्ठ अधिकाऱ्यांचा पाठिंबा असावा लागतो.

**४. आसियान क्षेत्रीय मंत्रिमंडळ** (ASEAN Sectoral Ministerial Bodies) :

आसियान निर्णय प्रक्रियेतील चौथा घटक म्हणजे आसियान क्षेत्रीय मंत्रिमंडळ. या मंत्रिमंडळाचे सदस्य आसियान राजकीय-सुरक्षा समुदाय परिषद (ASEAN Political -Security Community), आसियान आर्थिक समुदाय परिषद (ASEAN Economic Community), आणि आसियान सामाजिक-सांस्कृतिक समुदाय परिषद (ASEAN Sociol -Cultural Community), यांच्या अंतर्गत येणारी सर्व केंद्रे व संस्था आहेत. ही मंत्रिमंडळ आपापल्या स्थापना आदेशानुसार कार्यरत असतात. त्यांच्या अखत्यारीत येणाऱ्या आसियान शिखर संमेलनातील निर्णय व करारांची अंमलबजावणी करतात. आसियानच्या एकात्मीकरणास व समुदाय दृढतेस सहायता व्हावी व पाठिंबा मिळावा म्हणून आपापल्या समुदाय परिषदेकडे अहवाल आणि शिफारशी पाठवत असतात. प्रत्येक आसियान क्षेत्रीय मंत्रिमंडळाच्या अखत्यारीत संबंधित वरिष्ठ अधिकारी आणि त्यांची सहायक मंडळ कार्यरत असतात.

**५. आसियानचे महासचिव आणि आसियानचे सचिवालय** (ASEAN Sectoral Ministerial Bodies):

आसियानच्या महासचिवाची नेमणूक पाच वर्षासाठी होते. पुनश्च त्याच व्यक्तीची नेमणूक या पदावर होत नाही. महासचिव आसियानचे मुख्य प्रशासकीय अधिकारी म्हणून देखील कार्यरत असतात. महासचिवांना सहाय्य करण्यासाठी चार सहयोगी सचिवांची नेमणूक करतात. हे चार सचिव वेगवेगळ्या आसियान सदस्य राष्ट्रांमधून निवडतात. सहयोगी सचिवांचा कार्यकाल तीन वर्षाचा असतो. यातील दोन सहयोगी सचिवांची नेमणूक पुनश्च तीन वर्षासाठी करतात. कारण या दोन सहयोगी सचिवांची नेमणूक खुली व गुणवत्तेवर आधारित असते. बाकी दोन सहयोगी सचिवाची नेमणूक फक्त तीन वर्षासाठी करतात. आसियान सचिवालयामध्ये महासचिव, सहयोगी सचिव आणि इतर आवश्यक कर्मचाऱ्यांचा समावेश असतो. आसियान संदर्भातील सर्व जबाबदारी आसियानचे सचिवालय पार पाडत असते. आसियानचे सध्याचे महासचिव, १ जानेवारी २०१८ पासून दातो लिम जोक होईल, ब्रुनाय, दारूसालेम या सभासद राष्ट्राचे आहेत.

**६. आसियान कायम/ स्थायी प्रतिनिधी समिती** (Committee of Permanent Representatives to ASEAN):

आसियानचे प्रत्येक सभासद राष्ट्र राजदूत दर्जाच्या एका कायम/ स्थायी प्रतिनिधीची नेमणूक करत असते. ही समिती आसियान समुदाय परिषदेना व आसियान क्षेत्रीय मंत्रिमंडळांना त्यांच्या कामात सहकार्य करते; आसियान राष्ट्रीय सचिवालय आणि इतर आसियान क्षेत्रीय मंत्रीमंडळामध्ये समन्वय साधते; आसियानचे महासचिव आणि आसियान सचिवालय यांच्या सर्व संबंधीत कामकाजाच्या विषयामध्ये दुवा बनण्याचे कार्य करते; बाह्य भागीदार आणि आसियान समन्वय परिषदेने निश्चित केलेली इतर कार्ये पार पाडते.

**आसियान राष्ट्रीय सचिवालय** (ASEAN National Secretariat) :

आसियानच्या रचनेतील आसियान राष्ट्रीय सचिवालय हा सातवा घटक आहे. आसियान राष्ट्रीय प्रत्येक आसियान सभासद राष्ट्राने आपल्या राष्ट्रात स्थापन केलेले असेल. हे सचिवालय त्या त्या राष्ट्रांच्या राष्ट्रीय पातळीवर केंद्रस्थ बिंदू म्हणून सेवा देईल. राष्ट्रीय पातळीवर आसियानच्या निर्णयाच्या अंमलबजावणीचे समन्वय करेल. आसियानच्या बैठकांसाठी राष्ट्रीय तयारीमध्ये सहाय्य व समन्वय करते. राष्ट्रीय पातळीवर आसियानची ओळख व जाणिव निर्माण करते, आणि आसियान समुदाय दृढतेसाठी प्रयत्नशील असते.

**आसियान मानवी हक्क संस्था/ केंद्र/मंडळ** (ASEAN Human Rights Body) :

आसियानच्या रचनेतील आढावा घटक म्हणजे आसियान मानवी हक्क संस्था/मंडळ मानवी हक्काच्या आणि मूलभूत स्वातंत्र्याच्या सुरक्षेसाठी आसियानने आसियान मानवी हक्क संस्था/मंडळ स्थापन केलेले आहे.

**आसियान फाऊंडेशन** (ASEAN Foundation) :

आसियान रचनेतील नववा व शेवटचा घटक म्हणजे आसियान फाऊंडेशन हे फाऊंडेशन आसियानच्या महासचिववांना सहाय्य करते. आसियानच्या संबंधीत संस्थाना/ मंडळांना आसियान समुदाय/निर्मितीसाठी सहयोग करते. हा सहयोग आसियानची ओळख व जाणीव निर्माण करण्यासाठी, लोका-लोकांत सुसवांद, आणि उद्योग क्षेत्र, नागरी समाज, शैक्षणिक क्षेत्र आणि इतर आसियान भागधारकांत निकट सहकार्य निर्माण करण्यासाठी केला जातो. आसियान फाऊंडेशन आसियान महासचिवांना जबाबदार राहून आपली कार्य पार पाडत असते.

**उपक्रम व कार्ये :**

आसियानच्या प्रमुख प्रकल्पांमध्ये :

- आर्थिक सहकार्य
- आसियान राष्ट्रांमध्ये आणि आसियान व इतर राष्ट्रां दरम्यान व्यापाराला प्रोत्साहन
- आसियान सभासद राष्ट्रांदरम्यान संयुक्त संशोधन आणि तांत्रिक सहकार्य कार्यक्रम.
- दक्षिण-पूर्व (आग्नेय) आशियाचा अभ्यास आणि पर्यटनाचा विकास
- आसियान सभासद राष्ट्रांमध्ये सांस्कृतिक, वैज्ञानिक, शैक्षणिक आणि प्रशासकीय देवाण-घेवाण, अंतर्भूत आहे.

१९७० च्या मध्य दशकात विशेषता व्हिएतनाम युद्धानंतर बदललेल्या दक्षिण पूर्व आसियाची सत्ता संतुलनामुळे आसियानला नवे राजकीय सामंजस्य प्राप्त झालेले दिसते. १९७० मध्ये सभासद राष्ट्रांनी गतिमान आर्थिक विकास देखील अनुभवला ज्यामुळे या राष्ट्रामध्ये दृढ ऐक्य निर्माण झाले तसेच सर्व प्रशांत खोरे आणि त्या बाहेरील घटक जसे की युरोपीय संघ आणि अमेरिका यांना क्षेत्रिय राजनयात समाविष्ट करून चीन व जपानचे वर्चस्व असलेल्या दक्षिण-पूर्व आणि पूर्व आशिया उपक्षेत्रात आसियाने सत्ता संतुलनाचा प्रयत्न केलेला दिसतो. १ ते ४ नोव्हेंबर २०१९ पर्यंत आसियानच्या एकूण ३५ शिखर परिषद संम्मेलने झालेली आहेत.

**आसियानची पहिली शिखर परिषद** बाली, इंडोनेशिया येथे १९७६ साली झाली. या परिषदेत अनेक औद्योगिक प्रकल्पा संदर्भात सहमती झाली, दोन महत्वाच्या दस्तऐवजावर एक मैत्री आणि सहकार्य करार (Treaty of Amit and Co operation) दोन, एक वाक्यांचा जाहिरनामा (Declaration of Conored) स्वाक्षऱ्या झाल्या.

**१. मैत्री आणि सहकार्य करार.**

या कराराने काही मूलभूत तत्वे आसियाने स्वीकारली. ती म्हणजे सर्व राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचा व सार्वभौमत्वाचा परस्परांशी आदर करणे, सभासद राज्यांच्या अंतर्गत बाबीत हस्तक्षेप न करणे, तक्रारीत तंटे शांततेने सोडविणे, आणि प्रभावी सहकार्य करणे. १९८७ साली या करारात दुरूस्ती करून इतर देशांना दक्षिण-पूर्व आशियात ये-जा/ प्रवेश करण्याची परवानगी देण्यात आली.

२. **एकवाक्यतेचा जाहिरनामा :**

या जाहिरनाम्याने आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक संबंधाचा पाया घातला तसेच स्वाक्षरी केलेल्या राष्ट्रांना, दक्षिण-पूर्व, आशियात शांतता, स्वातंत्र्य व तटस्थता क्षेत्र (Zone For Peace, Freedom and Neutratity-ZOPAN) निर्माण करण्यास वचनबद्ध केले. ZOPAN जाहिरनाम्यावर १९७१ साली क्वालालंपूर येथे स्वाक्षऱ्या झाल्या होत्या.

**आसियाची दुसरी शिखर परिषद** ४ व ५ ऑगस्ट, १९७७ रोजी क्वालालंपूर येथे झाली. या परिषदेत 'प्राधान्य व्यापार व्यवस्था' (Preferential Trade Arrangements- PTA) स्थापन करण्याच्या प्राथमिक निर्णयावर सहगती झाली. विस्तृत वस्तुंवर जकात दरांची पातळी क्रमाक्रमाने कमी करावयाचे ठरले. परंतु प्राधान्य व्यापार वस्तू आसियान अंतर्गत व्यापाराचा छोटासा भाग होता.

**आसियानची तिसरी शिखर परिषद** १४ व १५ डिसेंबर, १९८७ रोजी मनीला येथे झाली. प्राधान्य व्यापार वस्तू आसियान अंतर्गत व्यापाराचा छोटासा भाग असल्यामुळे या परिषदेत राष्ट्रीय आणि क्षेत्रीय विकासासाठी आसियानने नवीन प्राधान्यक्रम स्वीकारला. त्याचबरोबर शीत युद्धाच्या समाप्तीनंतर आपल्या प्रदेशातील राजकीय, घडामोडीवर आसियान राष्ट्रांना अधिक समर्थपणे नियंत्रण करता येऊ लागले. आसियान राष्ट्रे जशी नव्या धोरणांची अंमलबजावणी करू लागली. तसे त्यांचा प्रभाव आणि अर्थव्यवस्था वाढीस लागलेली त्यांना अनुभवायला आले. १९९० पासून क्षेत्रीय व्यापार आणि सुरक्षाविषयक मुद्दयांबाबत आसियान आघाडीची संघटना म्हणून उदयास येऊ लागली.

**आसियानची चौथी शिखर परिषद** २७ ते २९ जानेवारी १९९२ रोजी सिंगापूर येथे झाली. या परिषदेत पुढील पंधरा वर्षात सामाईक बाजारपेठ निर्माण करण्याच्या उदेद्शाने मुक्त व्यापार क्षेत्राची (ASEAN Free Trade Area-AFTA) स्थापन करावयाचे ठरले. जानेवारी १९९३ मध्ये मुक्त व्यापार क्षेत्राच्या दिशेने पडलेले पहिले पाऊल म्हणजे सामाईक प्रभावी प्राधान्य जकात दर योजना (Common Effective Preferencial Tariff Scheme- LEPT) या योजनेतर्गत उत्पादन व प्रक्रिया केलेल्या कृषी मालासाठी सामाईक जकात दर लागू करण्यात आले. वेळोवेळी झालेल्या अर्थ व व्यापार मंत्र्यांच्या बैठकांच्या परिणामी अनेक उत्पादने जकात दर कमी करण्याच्या प्रक्रियेमुळे प्रभावीत झाली. त्यामुळे मुक्त व्यापार क्षेत्राच्या अंमलबजावणीस गती मिळाली. याच परिषदेत आसियानच्या परराष्ट्र मंत्र्यांना भविष्यातील बैठकीमध्ये सुरक्षा मुद्यावर चर्चा करण्याची परवानगी देण्याचा निर्णय झाला. त्यामुळे १९९३ मध्ये क्षेत्रातील सुरक्षा मुद्यावर चर्चा करण्यासाठी आसियान क्षेत्रीय व्यासपीठ (ASEAB Regional Forum) स्थापन करण्याचा निर्णय घेवून आसियान सभासद राष्ट्रांच्या परराष्ट्र मंत्र्यांनी सुरक्षा बाबींच्या दिशेने टाकलेले आणखी एक महत्वाचे पाऊल होय.

**आसियानची पाचवी शिखर परिषद** १४ व १५ डिसेंबर १९९५ रोजी बँकॉक येथे झाली. या परिषदेत दक्षिण-पूर्व आशिया आण्विक मुक्त क्षेत्र (South East Asia Nuclear Free Zone-SEANFZ) स्थापना करण्याच्या करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. हे करार मार्च १९९७ मध्ये अमलात आला. या करारानुसार, स्वाक्षऱ्या केलेल्या राष्ट्रांनी स्वतःहून काही गोष्टी न करण्याची बंधने अंगीकारायची आहेत ती खालीलप्रमाणे :

१. आण्विक शस्त्रासत्राचा विकास, उत्पादन किंवा इतर कोणत्याही मार्गाने संपादन, ताबा किंवा नियंत्रण करावयाचे नाही.

२. दक्षिण-पूर्व आशिया ओलांडून इतर कोणत्याही मार्गाने आण्विक शस्त्रास्त्रांचा साठा किंवा वाहतूक करावयाची नाही.

३. आण्विक शस्त्रास्त्रांची चाचणी किंवा वापर करावयाचा नाही.

त्याचबरोबर संपूर्ण दक्षिण-पूर्व, भू राजनितिक, प्रदेशाबाहेर किंवा प्रदेशांतर्गत आण्विक शस्त्रास्त्रांसबंधी कृतीपासून दूर राहण्याची सहमती देखील स्वाक्षरी केलेल्या प्रमुख राष्ट्रांमध्ये झाली. १९९५ मध्ये आसियान सभासदांनी सहमत केलेला मसुदा तत्कालीन आण्विक शस्त्रास्त्रे बाळगणाऱ्या देशांना देखील स्वाक्षरीसाठी खुला आहे. या कराराचा उद्देशांचा आदर करण्याचे आवाहन करतो. त्याचबरोबर ह्या करारावर स्वाक्षरी केलेल्या राष्ट्रांच्या विरोधात आण्विक शस्त्रास्त्रे वापरण्यापासून किंवा त्यांचा धाक दाखवण्यापासून आण्विक शक्तींना व इतर राष्ट्रांना प्रतिबंध करतो.

**आसियानची सहावी शिखर परिषद** हॅनॉय येथे १५ व १६ डिसेंबर १९९८ साली झाली. या परिषदेत 'हॅनॉय योजना' (Hanoi Plan) १९९९-२००४ या कालावधीसाठी स्वीकारण्यात आली. 'व्हिजन २०२०' सत्यात आणण्याच्या दृष्टिने उचलेले पहिले व्यवहार्य पाऊल म्हणून या योजनेकडे बघितले जाते. या योजनेचा उद्देश संघटनेला नवीन रुप देऊन राजकीय स्थिरता, आर्थिक समृद्धता शांतता आणि गतिमान विकासासाठी दृढ भागीदारी निर्माण करणे हा आहे.

जुलै २००० मध्ये थायलंड येथे झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत ट्रायका (Trika) यंत्रणा स्थापन करण्याबाबत सहमती झाली. भविष्यात उद्भवणाऱ्या क्षेत्रीय संकटसमयी आसियानला स्वयंप्रेरित भूमिका घेता यावी हा या यंत्रणेचा उद्देश आहे.

१ ऑगस्ट, २००२ रोजी, बंदार सेरी बेगावन, ब्रुनाय येथे झालेल्या आसियान क्षेत्रीय व्यासपीठाच्या सभेत/बैठकीत आसियान आणि अमेरिका यांच्यामध्ये दहशतवाद विरोधी लढ्यास सहकार्याच्या संयुक्त जाहिरनाम्यावरती स्वाक्षऱ्या झाल्या. या नवीन जाहीरनाम्यावरती स्वाक्षऱ्या झाल्या. या नवीन जाहीर नाम्याचा मुख्य उद्देश, अमेरिका आणि दक्षिण-पूर्व आशियाची राष्ट्रांमध्ये दहशतवाद विरोधी लढ्यासाठी दृढ संर्पकाचे जाळे तयार करणे हा आहे. तसेच दहशतवाद विरोधी क्षमता निर्माण करण्याचे आणि बुद्धिमत्ता सामायीकरण (intelligence-Sharing) विकसीत करण्याची आशा दोन्ही बाजूंना आहे.

**आसियानची नववी शिखर परिषद** ७ व ८ ऑक्टोंबर २००३ रोजी बाली येथे झाली. या परिषदेत दोन करार-एक, चीन बरोबर आणि दुसरा, भारताबरोबर करण्यात आला. चीनने 'शांती आणि समृद्धतेसाठी धोरणात्मक भागीदारी' म्हणजेच आसियानच्या मैत्री आणि सहकार्य करारावर स्वाक्षरी केली. आंतरराष्ट्रीय दहशतवाद विरोधी लढ्याच्या संयुक्त, जाहीरनाम्यातील सहकार्यासंदर्भातील काही मुख्य मुद्यावर सहगती झाली ते खालीलप्रमाणे :

१. माहितीची देवाण घेवाण

२. कायदेशीर बाबीत सहकार्य

३. ओळखपत्र, दस्तएवज घोटाळा इत्यादींच्या अंमलबजावणीबाबत मुक्त सहकार्य.

हा दहशतवाद विरोधी लढ्याचा जाहीरनामा आसियान व अमेरिका यांच्यात झालेल्या कराराच्या प्रारूपावर आधारीत बनवला गेला.

भारत आणि आसियान यांच्यात बाली येथे सहकार्याच्या तीन करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. २०११ पर्यंत मुक्त व्यापार क्षेत्र, दहशतवाद विरोधी संयुक्त जाहिरनामा आणि आसियान मैत्री व सहकार्य करारता भारताचा समावेश या दिशेने झालेली रचनात्मक सहमती म्हणजेच भारत आणि आसियान यांच्यातील तीन सहकार्य करार होय.

**आसियानची अकरावी परिषद** १२ ते १४ डिसेंबर २०१५ रोजी क्वालालंपूर येथे झाली. या परिषदेचा विषय होता, ''आसियान एक ध्येय, एक अस्मिता, एक समुदाय'' (One Vision, One Identity, One Community) या परिषदेत आसियान विकास निधीच्या (ASEAN Development Fund) स्थापनेचे स्वागत करण्यात आले. तसेच आसियान सभासद राष्ट्रांना आणि संवाद भागीदारांना आसियान विकास निधी मध्ये योगदान देवून आसियानच्या एकात्मीकरणास सहकार्य करण्याचा आग्रह धरला.

**आसियानची तेरावी परिषद** १८ ते २२ नोव्हेंबर, २००७ रोजी सिंगापूर येथे झाली. या परिषदेचा विषय होता. ''गतिशील आशियाच्या केंद्रस्थानी आसियान'' (One ASEAN at the Heart of Asia) 'ऊर्जा, पर्यावरण, हवामान बदल आणि शाश्वत विकास' हे या परिषदेच्या चर्चेचे प्रमुख मुद्दे होते. या परिषदेत आसियान नेत्यांनी पर्यावरण शाश्वती जाहिरनाम्यावर स्वाक्षरी केली. दहा राष्ट्रांच्या क्षेत्रीय एकत्रीकरणाचे अधिक प्रभावी व सलग्न संघटनेत परिवर्तन करण्याच्या उद्देशाने कलाटणी देणाऱ्या महत्वपूर्ण सनदेवर/ करारावर या परिषदेच्या नेत्यांनी स्वाक्षऱ्या केल्या. आसियान आर्थिक रूपरेषेला देखील नेत्यांनी मान्यता दिली. या रूपरेषेची मदत, आसियान क्षेत्राला मूळ २०२० ऐवजी २०१५ पर्यंत एकल बाजारपेठ व उत्पादन तळ स्थापन करण्याच्या दिशेने ठोस ध्येयाचा आलेख बनवण्यासाठी होणार होती. २२ नोव्हेंबरला आसियान युरोपीय संघ यांच्यातील संबंधाचा तिसावा वर्धापन दिन या परिषदेत साजरा करण्यात आला.

डिसेंबर २००८ पासून आसियान जाहिरनामा/करार अंमलात आला. तेव्हापासून आसियानची शिखर परिषद वर्षातून दोन वेळा होते.

**आसियानची पंधरावी परिषद** २३ ते २५ ऑक्टोंबर २००९ रोजी चाम हुवा हीन, थायलंड येथे झाली. या परिषदेत पहिल्या आसियान आंतरशासकीय मानवी हक्क आयोगाचे पूर्व आशियायी नेत्यांनी उद्घाटन केले. तसेच आसियान देशांच्या आपत्ती व्यवस्थापनाचे निवेदन मंजूर केले. या क्षेत्रात वारंवार येणाऱ्या संकटामुळे संघटनेच्या अंतर्गत सामंजस्यावर तीव्र ताण येतो. असे असले तरी मागील काही वर्षात आशिया प्रशांत क्षेत्रात आसियान एक व्यवहार्य संघटना म्हणून उदयाला आलेली आहे. आसियान सभासदांमध्ये एकमत न होण्याचे कारणे म्हणजे त्यांच्यात असलेली भिन्न अंतर्गत राजकीय गतिशीलता आणि काही वेळेला परस्परांच्या एकमेकांच्या अंतर्गत बाबींना सामोरे जात असताना असलेले तीक्ष्ण विरोधाभास ही आहेत. तसे पाहता निर्णय निर्धारणातील सल्ला मसलतीची व एकमताची प्रक्रिया ही लोकशाही दृष्टिकोनातून हाताळली पाहिजे. परंतु आसियानमध्ये ही प्रक्रिया वरिष्ठ नेत्यांच्या परस्पर संपर्कातून हाताळली जाते. अनेकदा हे नेते संस्थात्मक आणि कायदेशीर

सहकार्याला इच्छुक नसतात कारण त्यामुळे त्यांचे शासकीय नियंत्रण कमी होण्याची किंवा ढासळण्याची भीती त्यांना वाटते.

१५ डिसेंबर, २००८ रोजी आसियान जाहिरनामा/ करार अमलात आला आणि त्याचबरोबर 'आसियान मार्ग/ पद्धत' (ASEAN Way) ची वाटचाल सुरू झाली. अनौपचारिकता, हस्तक्षेप न करणे, सल्ला-मसलत व एकमत यावर भर, बळाचा वापर न करणे आणि शत्रूत्वाची स्थिती निर्माण न करणे-ही सर्व वैशिष्टये मिळून 'आसियान मार्ग' बनलेला आहे. क्षेत्रातील म्यानमारची समस्या, मानवी हक्कांचा दुरूपयोग आणि संदिग्धता हाताळण्यात आसियानचे प्रयत्न, हस्तक्षेप व करण्याचा तत्त्वामुळे बोथट झालेले आहेत असा युक्तीवाद १९९० च्या उत्तरार्धात दक्षिण-पूर्व आशियायी आर्थिक संकटामुळे आसियानची पिछेहाट झाली तथापि पुनरूत्थान करण्यात संघटना यशस्वी झाली. आसियानचे व्यक्तीगत संवाद भागीदाराबरोबरचे संबंध व युरोपीय संघ आणि आसियान यांच्यातील सहकार्य विशेषता उल्लेखनीय आहे.

आसियानने आर्थिक एकात्मीकरणात विशेष प्रगती केली आहे. आसियान मुक्त व्यापार क्षेत्र आणि आसियान मध्ये मुक्त वस्तूंच्या प्रवाहाला प्रोत्साहन देणारी सामाईक बाह्य प्राधान्य जकात योजना, ही आसियान आर्थिक समुदायाचा पाया मानले जातात. आसियान राष्ट्रांच्या स्थानिक उत्पादनाविषयी आसियान सभासद राष्ट्रांमध्ये झालेली सहमती म्हणजे आसियान मुक्त व्यापार क्षेत्र होय. २८ जानेवारी १९९२ रोजी आसियान मुक्त व्यापार क्षेत्र सहमतीवर/ करारावर सिंगापूर येथे आसियान सभासद राष्ट्रांच्या स्वाक्षऱ्या झाल्या. त्यावेळी ब्रुनाय, इंडोनेशिया, मलेशिया, फिलिपिन्स, सिंगापूर आणि थायलंड ही सहा राष्ट्र आसियानची सभासद होती. व्हिएतनाम, लाओस, म्यानमार आणि कंबोडिया ही चार राष्ट्रे नंतर आसियानमध्ये सामील झालेली सभासद राष्ट्रे आहेत. नंतर सामील झालेल्या राष्ट्रांनी आसियान मुक्त व्यापार क्षेत्राशी संबंधीत सर्व बंधने अजून अंमलात आणलेली नव्हती, असे असले तरी ही राष्ट्रे आसियान मुक्त व्यापार क्षेत्राची अधिकृत भाग मानण्यात आलेले आहेत. याचे कारण म्हणजे ही राष्ट्रे आसियानची सभासद म्हणून सामील झाल्यानंतर त्यांना मुक्त व्यापार क्षेत्र सहमती पत्रकार स्वाक्षरी करणे गरजेचे होते. तसेच या सभासद राष्ट्रांना आसियान मुक्त व्यापार क्षेत्राची कर्तव्य अवलंबता यावीत यासाठी कालावधी वाढवून दिलेला आहे.

आशियान मधील मुक्त गुंतवणूक प्रवाहाला आसियान सर्व समावेशक/ व्यापक गुंतवणूक क्षेत्र (ASEAN Comprehensive Investment Area ACIA) म्हणून प्रोत्साहन देते. आसियान व्यापक गुंतवणूक क्षेत्राशी प्रमुख तत्वे खालीलप्रमाणे :

१. गुंतवणूकीसाठी सर्व उद्योग खुले करणे, याला काही अपवाद असतील तर ते वेळापत्रकानुसार टप्प्या-टप्प्याने खुले करणे.

२. काही अपवाद वगळता आसियान गुंतवणूकदारांना ताबडतोब राष्ट्रीय वागणूक देणे

३. गुंतवणूकीला होणारे अडथळे काढून टाकणे.

४. गुंतवणूक प्रक्रिया आणि पद्धती सुव्यवस्थीत करणे,

५. पारदर्शकता वाढवणे, आणि

६. सुलभ गुंतवणूकीचे उपाय अंगीकृत करणे.

आसियान व्यापक गुंतवणूक क्षेत्राच्या परिपूर्तीसाठी उत्पादन, मासेमारी, वनीकरण आणि खाणकाम या संदर्भातील तात्पुरत्या अपवर्जन याद्या आसियानच्या पहिल्या सहा सभासदांकरिता २०१० साली काढून टाकण्यात आल्या. तसेच नंतर सामील झालेल्या चार सभासद राष्ट्रांकरिता या अपवर्जन याद्या २०१५ साली काढून टाकण्यात आल्या.

२००९-२०१० पर्यंत आसियानने चीन, कोरिया, जपान, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि भारत यांच्या बरोबर मुक्त व्यापार करार केले आहेत.

**आसियानची सोळावी शिखर परिषद** ८ व ९ एप्रिल, २०१० साली हनॉय येथे संपन्न झाली. या परिषदेचा विषय होता, 'आसियान समुदायाच्या दिशेने ध्येयापासून कृतीकडे' (Towards the ASEAN Community from Vision to Action) या परिषदेमध्ये आशियानच्या केंद्रीयत्वाच्या/केंद्रियेतेच्या मुद्यावर स्पष्टपणे चर्चा झाली. प्रादेशिक व आंतरराष्ट्रीय परिस्थितीत होत असलेले वेगवान बदल व घडामोडी लक्षात घेवून उदयोन्मुख प्रादेशिक रचनेतील आसियानच्या केंद्रीय भूमिकेचे महत्व प्रतिपादन करण्यात आले. तसेच ते राखण्यासाठी दृढनिश्चय ही करण्यात आला. हे ध्येय साध्य करण्याकरिता दुहेरी दृष्टिकोन स्वीकारण्यावर सहमती झाली. एकीकडे आसियानच्या एकात्मीकरणाचा व समुदाय निर्मितीचा वेग वाढविण्याला प्राधान्य देण्यात आले. तर दुसरीकडे आसियानचे परराष्ट्र संबंध तीव्र करून त्यासाठी प्रादेशिक सहकार्य रचनेला चालना देणारी आसियानची भूमिका सुनिश्चित करण्यात आली. महत्वाच्या प्रादेशिक व जागतिक मुद्यावर आसियानच्या सामाईक भूमिकेचे व दृष्टिकोनाचे संगोपन करण्यावर आणि महत्वाच्या भागीदारी संदर्भात रणनीती विकसित करण्यावर भर देण्यात आला. कोणतीही प्रादेशिक रचना किंवा प्रक्रिया आसियानच्या केंद्रियतेच्या तत्वावर व विद्यमान प्रादेशिक रचनेवर भर देणारी व त्याला पूरक असावी यावर परिषदेत सहमती झाली. आसियानची सतरावी परिषद देखील हनॉय, व्हिएतनाम येथे २७ ते ३० ऑक्टोंबर २०१० रोजी संपन्न झाली.

**आसियानची आठरावी शिखर परिषद** जर्काता, इंडोनेशिया येथे ७ ते ८ मार्च २०११ रोजी संपन्न झाली. या परिषदेचा विषय होता, ''जागतिक राष्ट्रांच्या समुदायात आसियान समुदाय'' (ASEAN Community in a Global Community of Nation) या परिषदेत तीन संयुक्त निवेदने (statement) स्वीकृत व सहमत करण्यात आली. ती खालीलप्रमाणे.

१. जागतिक राष्ट्रांच्या समुदायात आसियान समुदायांवर आसियान नेत्यांचे संयुक्त निवेदन.

२. आसियान शांती व सलोखा संस्था स्थापन करण्यावर आसियान नेत्यांचे संयुक्त निवेदन आणि

३. दक्षिण-पूर्व आशियातील मानवी तस्करी विरूद्ध सहकार्य वाढवण्यावर आसियान नेत्यांचे संयुक्त निवेदन.

त्याचबरोबर आसियान समुदायातील सुशासन व पारदर्शकता वाढवण्यावर भर देण्यात आला. ही तत्वे पुढे नेण्याकरिता संबंधीत मंत्र्याना अन्वेषण व विचार करून योग्य ती कार्य पर पाडण्यास सांगण्यात आले. या परिषदेत अन्न, ऊर्जा व पाणी सुरक्षे संबंधीत आव्हानांची चर्चा देखील करण्यात आली. तसेच आसियानची केंद्रीयतेच्या दिशेने विकसित होत असलेल्या प्रादेशिक आर्थिक रचनेची दखल घेण्यात आली.

'जागतिक राष्ट्रांच्या समुदायात आसियान समुदाय' या संदर्भात आसियानने उचललेली काही पावले पुढीलप्रमाणे :

१. जागतिक समस्या हाताळण्यासाठी / सोडविण्यासाठी आसियान सामाईक व्यासपीठ विकसित करण्यावर सहमती झाली.

२. महत्वाच्या जागतिक समस्यांबाबत आसियानच्या प्रतिसाद क्षमता वाढवण्यावर सहमती झाली आणि

३. मध्यम ते दीर्घकालीन जागतिक प्रवाह आणि जागतिक रचनेतील अपेक्षित बदलांबाबत सविस्तर व व्यापक अभ्यास आणि मूल्यमापन करण्याच्या आवश्यकतेवर सहमती.

**आसियानची एकोणीसावी शिखर परिषद** १४ ते १९ नोव्हेंबर, २०११ रोजी बाली, इंडोनेशिया येथे संपन्न झाली. या परिषदेत आसियान समुदायाच्या तीन स्तंभातर्गत येणारे महत्वपूर्ण व कलाटणी देणारे. दस्तऐवज स्वीकृत, सहमत व नोंद करण्यात आले ते खालीलप्रमाणे.

१. आसियानची न्याय्य आर्थिक, विकास रचना :सर्वसमावेशक व शाश्वत विकासाची मार्गदर्शक तत्वे.

२. महत्वाच्या जागतिक समस्याबाबत आसियानच्या प्रतिसाद क्षमता वाढवण्यावर सहमती झाली आणि

३. मध्यम ते दीर्घकालीन जागतिक प्रवाह आणि जागतिक रचनेतील अपेक्षित बदलांबाबत सविस्तर व व्यापक अभ्यास आणि मूल्यमापन करण्याच्या आवश्यकतेवर सहमती.

**आसियानची एकोणीसावी शिखर परिषद** १४ ते १९ नोव्हेंबर, २०११ रोजी बाली, इंडोनेशिया येथे संपन्न झाली. या परिषदेत आसियान समुदायाच्या तीन स्तंभांतर्गत येणारे महत्वपूर्ण व कलाटणी देणारे दस्तऐवज स्वीकृत, सहमत व नोंद करण्यात आले ते खालीलप्रमाणे :

१. आसियानची न्याय्य आर्थिक, विकास रचना, सर्वसमावेशक व शाश्वत विकासाची मार्गदर्शक तत्वे.

२. आसियानची प्रादेशिक व्यापक आर्थिक भागिदारी रचना

३. आसियान बांधिलकी जाहीरनामा : शून्य एच.आय.व्ही. फैलाव, शून्य भेदभाव, शून्य एडस् संदर्भातील मृत्यू साध्य करणे.

४. दिव्यांग व्यक्तींची भूमिका व सहभाग वाढविण्यासंदर्भात तीन बाबी जाहिरनामा :

५. हवामान बदला संदर्भात आसियान नेत्यांचे संयुक्त राष्ट्राला निवेदन.

६. वार्षिक, ध्येय सूची २०११ चा प्रगती अहवाल आणि

७. महिलांवरील आसियान मंत्रीमंडळीय बैठकीतील संदर्भित अटी.

**आसियानचे विसावे शिखर संम्मेलन** ३ व एप्रिल, २०१२ रोजी फ्नॉम पेन्ह, कंबोडिया येथे संपन्न झाले. या संमेलनाचा विषय 'आसियान : एक समुदाय एक भवितव्य' (ASEAN : One Community One Destiny) हा होता. या संम्मेलनात खालील दस्तऐवज स्वीकृत व सहमत करण्यात आले.

१. 'आसियान : एक समुदाय एक भवितव्य' '' संदर्भातील फ्नॉम पेन्ह जाहिरनामा.

२. आसियान समुदाय निर्मिती (Community Building) चा फ्नॉम पेन्ह मसुदा.

३. मादक/अंमली पदार्थ मुक्त आसियान २०१५ : आसियान नेत्यांचा जाहिरनामा; आणि

४. मवाळांच्या जागतिक चळवळी (Global Movement of Moderates - GMM) संदर्भातील आसियान संकल्पना पत्रिका / संकल्प पत्रिका (ASEAN Concept Paper)

**आसियानची एकविसावी शिखर परिषद** १८ नोव्हेबर, २०१२ रोजी फ्नॉम पेन्ह, कंबोडिया येथेच संपन्न झाली. २० नोव्हेंबर, २०१२ रोजी फ्नॉम पेन्ह संयोजित केलेल्या आसियान जागतिक संवाद (ASEAN Global Dialogue) या उच्च स्तरीय व्यासपीठाच्या तयारीची व या संवादाच्या उद्देशाची कळकळीने नोंद घेण्यात आली. या व्यासपीठाचा उद्देश क्षेत्रातील राष्ट्रांच्या नेत्यांना आणि जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणे निधी, आशिया विकास बँक व जागतिक व्यापार संघटना आणि संयुक्त राष्ट्र व्यापार व विकास परिषद या आंतरराष्ट्रीय संघटनांच्या प्रमुखांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये जागतिक आव्हानानंतर विशेषता वित्तिय व आर्थिक समस्यांबाबत सुसंवाद घडवून आणणे हा आहे.

**आसियानची बावीसावी शिखर परिषद** २४ व २५ एप्रिल, २०१३ रोजी बंदार सेरी बेगावन, ब्रुनाय, दारूसालेम येथे संपन्न झाली. या परिषदेचा विषय, 'आमचे लोक, एकत्र आपले भविष्य' (Our People, Over Future Together) हा होता या परिषदेत क्षेत्रीय व्यापक आर्थिक भागीदारी आरसेप (Regional Comprehensive) च्या दिशेने केलेल्या प्रगतीचे स्वागत केले. विद्यमान असियान + १ मुक्त व्यापार क्षेत्र विस्तृत करण्याची अपेक्षा करण्यात आली. तसेच आशिया आणि इतर जग यांच्यामधील भविष्यातील व्यापार व गुंतवणूक एकात्मीकरण व्यासपीठ म्हणून आरसेप कडून या परिषदेत अपेक्षा करण्यात आली. त्याचबरोबर या परिषदेत दक्षिण-चीन सागरी परिस्थितीची चर्चा करण्यात आली या क्षेत्रातील शांतता, स्थिरता आणि सागरी सुरक्षेच्या महत्वाच्या पुष्टी देण्यात आली.

**आसियानची तेविसावी शिखर परिषद** ९ व १० ऑक्टोंबर २०१३ रोजी बंदार सेरी बेगावन, ब्रुनाय, दारूसालेम येथे संपन्न झाली. या परिषदेत आमचे लोक एकत्र आपले भविष्य या विषयावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

**आसियानची चोविसावी शिखर परिषद** १० व ११ मे २०१४ रोजी ने पी. टॉ. म्यानमार येथे संपन्न झाली. या परिषदेचा विषय, ''शांतताप्रिय व समृद्ध समाजाच्या दिशेने एकत्र वाटचाल करूगा'' (Morning Forward in Unity to a peaceful and prosperous Community) हा होता. या परिषदेत, उदयन्मुख क्षेत्रीय रचनेला व क्षेत्रीय सहकार्यातील आसियानच्या नेतृत्वाचा व केंद्रियतेला मान्यता आणि पाठिंबा दिल्याबद्दल 'संवाद भागीदाराचे' कौतूक करण्यात आले.

**आशियानची पंचवीसावी शिखर परिषद** ११ ते १३ नोव्हेंबर २०१४ रोजी ने पी. टॉ. म्यानमार येथेच संपन्न झाली. या शिखर परिषदेत क्षेत्रीय व्यापार उदारीकरण व सुलभीकरण उपक्रमांच्या प्रगतीची नोंद घेण्यात आली. नोंद घेण्यात आलेले उपक्रम खालीलप्रमाणे :

१. जकात निर्मूलनाचे सुरू असलेले काम.

२. स्वप्रमाणीत मार्गदर्शी प्रकल्प

३. आसियान व्यापार भांडाराची स्थापना (ASEAN Trade Repository)

४. आसियान एकल खिडकी व्यवस्था (ASEAN Single Window System) आणि

५. आसियान सीमाशुल्क परिवहन व्यवस्था (ASEAN Transit System)

त्याचबरोबर आसियान एकल खिडकी व्यवस्था अंमलबजावणी संदर्भातील कायेदशीर रचनेच्या कच्च्या मसुद्यावर २०१५ च्या पूर्वार्धात आसियान अर्थमंत्र्यांच्या स्वाक्षऱ्या होतील अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. तसेच अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. तसेच आसियान, वैद्यकीय उपक्रम निर्देश, स्वाक्षरी होऊन पूर्ण झाले असतील. अशी देखील अपेक्षा व्यक्त करण्यात आली. तसेच आसियान, वैद्यकीय उपक्रम निर्देश, स्वाक्षरी होऊन पूर्ण झाले असतील अशी देखील अपेक्षा व्यक्त करण्यात आली. क्षेत्रीय वैद्यकीय मानके आणि तांत्रिक आवश्यकता आसियान एकात्मीकरणाच्या दृष्टिकोनातून विशेष महत्वाची मानली जातात.

या शिखर संमेलनास सार्वजनिक खाजगी भागीदारीच्या (Public-Private Paratnership) महत्वावर विशेष भर देण्यात आला. आसियान पायाभूत सुविधांना सहाय्य करण्यासाठी सार्वजनिक खाजगी भागीदारी रचने संदर्भातील आसियानचे तत्व ऐच्छिक आधाराव स्वीकारल्याबद्दल स्वागत करण्यात आले. तसेच सीमापार समस्या सोडविण्यास कार्यक्षम व निर्धारणक्षम वातावरण निर्माण केल्याबद्दल आर्थिक सहकार्य व विकास संघटनेचे (Organization for Economic Co-operation and Development OECD) आभार मानण्यात आले.

२०१५ नंतर आसियान समुदायासाठी उत्तम आरोग्य (Better Health for ASEAN Commnity Beyound 2015) या विषयावर १५ ते १९ सप्टेंबर, २०१४ रोजी हनाय व्हिएतनाम येथे संपन्न झालेल्या बाराव्या आशियान आरोग्य मंत्र्यांची बैठक व इतर संबंधीत बैठकातील सकारात्मक निर्णय मान्य करण्यात आले. मध्यपूर्व श्वसन सिंड्रोम कोरोना विषाणू रोग (Middle-cast Respiratory Syndrome Corona Virus Disease MERS -Cov) व इबोला विषाणू रोग आणि त्याचा आरोग्य व सामाजिक -आर्थिक विकासावर झालेला नकारात्मक परिणामांचा अनुभव लक्षात घेता संभाव्य संसर्गजन्य रोग व त्यासंबंधीत वाढत्या परिणामांची चिंता व्यक्त करण्यात आली या संदर्भात सार्वत्रीक आरोग्य संरक्षणाचे (Universal Health Coverage) महत्व अधोरेखित करण्यात आले. तसेच संभाव्य संसर्गजन्य रोग व इतर आजार रोखण्यासाठी उत्तम सुविधा देता याव्यात म्हणून आसियान सदस्य राष्ट्रांनी आपल्या आरोग्य सेवा विकसित करण्याची व वाढविण्याची आणि आपल्या नागरिकांसाठी परवडणाऱ्या व दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याची गरज देखील अधोरेखित करण्यात आली. क्षेत्रीय रोग प्रतिबंध व नियंत्रण क्षमता आणि बहू-क्षेत्रीय सहकार्य (Multi-Sectoral Collaboration) वाढविण्यासाठी संयुक्त प्रयत्नांना पाठिंबा दर्शविण्यात आला.

याच संमेलनात आसियान शांती व सलोखा संस्था (ASEAN Institution for Peace and Reconcilation- AIPR) कार्यान्वित झाल्याचे स्वागत करण्यात आले. ही संस्था शांती, संघर्ष-व्यवस्थापन आणि संघर्ष निरसन या बाबत संशोधन उपक्रम राबवते.

आसियानची सव्वीसावी शिखर परिषद २६ ते २८ एप्रिल २०१५ रोजी क्वालांमपूर आणि लंगकावी मलेशिया येथे संपन्न झाली. या शिखर संमेलनाचा विषय होता. 'आमचे लोक, आमचा समुदाय, आमचे ध्येय' (Our People, Our Community, Our Vision) या परिषदेत स्वीकृत केलेले दस्तऐवज खालीलप्रमाणे

१. लोकाभिमुख, लोककेंद्रित आसियान बाबत क्लालांलपूर जाहिरनामा.

२. मवाळ, जागतिक चळवळी (Global Moderates Movemety) संदर्भात जाहिरनामा आणि

३. आसियान आणि तेथील समुदायांचा व लोकांचा आपत्ती व हवामान बदल या संदर्भातील लवचिकता/ स्थितिस्थापकत्व संस्थागत करण्याबाबत जाहिरनामा.

**आसियानची सत्तावीसावी शिखर परिषद** १८ ते २२ नोव्हेंबर, २०१५ रोजी क्वालांलपूर मलेशिया येथे संपन्न झाली. या परिषदेने स्वीकृत व स्वाक्षरी केलेले दस्तऐवज खालीलप्रमाणे

१. आसियान समुदाय उभारणी संदर्भातील २०१५ क्वालालंपूर जाहिरनामा;

२. आसियान २०१५ : एकत्र वाटचाल करुया (Forging Ahead Together) बाबत क्वालांलपूर जाहिरनामा,

३. मानवी तस्करी विरूद्ध विशेषता महिला व मुले यांच्या संदर्भात आसियान परिषद/ अधिवेशन.

४. आसियान मधील वृद्ध व्यक्तींचे सक्षमीकरण; वृद्धत्वासंबंधित क्वालांलपूर जाहिरनामा.

५. हवामान बदल २०१५ बाबत आसियानचे संयुक्त निवेदन

६. सामाजिक संरक्षण दृढते संदर्भातील आसियान जाहिरनामा अंमलबजावणीची प्रादेशिक रचना व कृती कार्यक्रम :

७. उच्च शिक्षणाबाबत क्वालालंपूर जाहिरनामा

८. महिलाविरूद्ध हिंसा निर्मूलनाचा क्षेत्रीयकृती कार्यक्रम :

९. मुलांविरूद्ध हिंसा निर्मूलनाचा क्षेत्रीय कृती कार्यक्रम आणि

१०. आसियान उत्तर-२०१५ (Post 2015) पर्यावरण शाश्वती आणि हवामान बदलाबाबत जाहिरनामा

**आसियानचे अठ्ठाविसावे व एकोणिसावे शिखर संमेलन** ६ ते ८ सप्टेंबर, २०१६ रोजी व्हिएतनाम, लाओस येथे संपन्न झाले. या संमेलनाचा विषय होता. 'सर्जनशील आसियान समुदायासाठी स्वप्न कृतीत आणू या.' (Turning Vision into Reality for a Dynamic ASEAN Community) या परिषदेत खालील दस्तऐवज स्वीकृत केले.

१. प्रदेशांतर्गत आणि प्रदेशबाह्य आपत्तींनाएक आसियान म्हणून प्रतिसाद देत आहे. एक आशियान, एक प्रतिसाद संदर्भातील आसियान जाहिरनामा

२. आसियान एकात्मीकरण कृती कार्यक्रम III - उपक्रम स्वीकृती संबंधित व्हिएतनाम जाहिरनामा.

३. आसियान २०१५ संधानता (Connectivity) कृती आराखडा स्वीकृती संदर्भातील व्हिएतनाम जाहिरनामा.

४. आसियानमधील अनौपचारिक नोकरी ते औपचारिक नोकरी अवस्थांतर मर्यादशील कामाच्या दिशेने वाढीच्या संबंधीत व्हिएतनाम जाहिरनामा.

५. आसियानमधील सांस्कृतिक वारसा सहकार्य मजबूतीकरणाबाबत व्हिएतनाम जाहिरनामा.

६. शालाबाह्य मुले व युवक यांच्या शैक्षणिक बळकटीकरणासंदर्भातील आसियान जाहिरनामा

७. जैविक विविधता अधिवेशन तेराव्या पक्ष परिषद बैठकीला आसियानचे संयुक्त निवेदन आणि

८. संयुक्त राष्ट्र हवामान बदल अधिवेशन रुपरेषा बावीसाव्या पक्ष परिषदेला आसियानचे संयुक्त निवेदन आणि

९. एच.आय.व्ही व एडस संबंधित आसियान बांधिलकीचा जाहिरनामा २०३० पर्यंत एडस लागन संपुष्टात आणण्यासाठी जलदगती व शाश्वत आसियान प्रतिसाद.

तसेच या शिखर परिषदेत गुंतवणूक, सेवा व व्यापाराबाबत आसियान उपाय (ASEAN Solutions Investments, Services and Trade-ASSISI) कार्यान्वयनाचे स्वागत केले. या आसियान उपायांचा उद्देश क्षेत्रातील उद्योग-धंदा करताना येणाऱ्या अडचणी व समस्या सोडविण्यासाठी व्यवहार्य उपाय सूचविणे हा आहे.

**आसियानाची तिसावी शिखर परिषद** २६ ते २९ एप्रिल २०१७ रोजी मनिला, फिलिपिन्स येथे संपन्न झाली. या शिखर संमेलनाचा विषय होता. ‘बदलासाठी भागीदारी जगाला खिळवून ठेवू’ (Partnering for Change, Engaging the World) आसियान स्थापनेच्या पन्नासाव्या वर्धापन वर्षानिमित्त मनिला, फिलिपिन्स येथे होत असलेल्या या शिखर परिषदेत आसियान कराराची पूर्तता करण्यासाठी फिलिपिन्सने सहा विषयांची प्राधान्यक्रमाने निवड केली होती. ते विषय खालीलप्रमाणे.

१. लोकाभिमुख व लोककेंद्रित आसियान

२. क्षेत्रीय शांती आणि स्थिरता

३. सागरी सुरक्षा आणि सहकार्य

४. सर्वसमावेशक नाविन्यपूर्ण विकास/ कल्पक विकास

५. आसियानचे स्थितीस्थापकत्व/लवचिकता आणि

६. आसियान एक क्षेत्रीय प्रारूप

आसियान राजकीय-सुरक्षा समुदाय, आसियान आर्थिक समुदास आणि आसियान सामाजिक-सांस्कृतिक समुदाय आराखडा २०१५ ची संपूर्ण व प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल सर्व आसियान क्षेत्रीय संस्थाचे व घटकांचे कौतुक करण्यात आले. आसियान समुदाय ध्येय २०१५ चा अंतर्गत भाग असणाऱ्या आसियान एकात्मीकरण उपक्रम कृती आराखडा III (२०१६-२०२०) व आसियान संधानता बृहत आराखडा २०१५ च्या अंमलबजावणीबद्दल आसियान एकात्मीकरण उपक्रम कृती दल आणि आसियान संधानता समन्वय समितीच्या प्रयत्नांची व कामाची दखल घेण्यात आली. तसेच आपल्या नागरिकांच्या फायद्यासाठी खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक आणि लोकाभिमुख व लोककेंद्रित आसियान समुदाय निर्मितीसाठी आसियान समुदाय ध्येय २०१५ आणि संयुक्त राष्ट्र शाश्वत विकास मसुदा २०३० ची अंमलबजावणी परस्पर मजबूतीकरण पद्धतीने करण्याच्या बांधिलकीची/वचनबद्धतेची पुष्टी देण्यात आली.

क्षेत्रीय व्यापक आर्थिक भागीदारी (Regional Comperhensive Economic Partnership-RCEP) वाटाघाटीतील प्रगतीची देखील स्वागत करण्यात आले.

**आसियानची एकतीसावी शिखर परिषद** १३ व १४ नोव्हेबर, २०१७ रोजी मनिला, फिलिपिन्स येथेच संपन्न झाली. या शिखर संमेलनात स्थलांतरीत कामगाराच्या हक्काचे संरक्षण व पदोन्नती संदर्भातील आसियान सहमती पत्रावर स्वाक्षरी करण्यात आली. तसेच या परिषदेने खालील दस्ताऐवज स्वीकृत केले.

१. सायबर गुन्हे प्रतिबंध व सामना या संदर्भातील आसियान जाहिरनामा;

२. नवीन उपक्रमासंबंधीत आसियान जाहिरनामा.

३. आसियान क्षेत्रातील महिलांचे सक्षमीकण करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आसियान मसुदा;

४. प्रतिजैविक प्रतिकार लढा एक आरोग्य दृष्टिकोन : प्रतिजैविक प्रतिकारासबंधीत आसियान जाहिरनामा;

५. आपत्ती आरोग्य व्यवस्थापन (Disaster Health Management) या संदर्भातील आसियान नेत्यांचा जाहिरनामा;

६. सर्व प्रकारचे कुपोषण संपुष्टात आणण्यासंदर्भातील आसियान नेत्यांचा जाहीरनामा.

७. आसियान युवा विकास निर्देशकांबाबत आसियान जाहीरनामा;

८. शांतताप्रिय, सर्वसमावेशक, संवेदनक्षण, आरोग्यदायी, सुसंवादी समाजासाठी 'प्रतिबंध संस्कृती' (Culture of Prevention) संबंधीत आसियान जाहीरनामा

९. शाश्वत विकास ध्येये आणि आसियान समुदाय ध्येय २०१५ ची लिंग प्रतिसादक्षम (Gender Responsive) अंमलबजावणी संदर्भातील आसियान जाहीरनामा;

१०. हवामान बदल या विषयीचे संयुक्त राष्ट्र रुपरेषा अधिवेशन तेवीसाव्या पक्ष परिषद सत्राला आसियानचे हवामान बदलाबाबत संयुक्त निवेदन आणि

११. आसियान क्षेत्रातील महिलांना, शांततेला आणि सुरक्षेला प्रोत्साहन देण्याबाबत संयुक्त निवेदन.

**आसियानची बत्तीसावी शिखर परिषद** २७ व २८ एप्रिल २०१८ रोजी सिंगापूर येथे संपन्न झाली. या शिखर परिषदेचा विषय होता. 'लवचिक व कल्पक आसियानसाठी ध्येय.' (Vision for Resilient and innovative ASEAR) या शिखर संमेलनात आसियान अद्यावत शहरांचे जाळे (ASEAN Smart Cities Network) आसियान नेत्यांन २८ एप्रिल २०१८ रोजी स्थापन केले. (ASEAN Smart Cities Network ASCN - ए. एस.सी.एन.) हे सहयोगी व्यासपीठ आहे. या व्यासपीठाच्या माध्यमातून दहा आसियान सभासद राष्ट्रे अद्यावत व शाश्वत शहरी विकासाच्या सामाईक ध्येयाच्या दिशेने कार्यरत आहेत. या उपक्रमासाठी सुरवातीला २६ शहरांची प्रायोगिक तत्त्वांवर निवड करण्यात आली. निवडलेली २६ शहरे खालीलप्रमाणे

१. बंदार, सेरी बेगावन, ब्रुनाय

२. बॅटमबँग, कंबोडिया

३. फ्लॉम पेन्ह, कंबोडिया

४. सियम रियप, कंबोडिया

५. मॅकसर, इंडोनेशिया

६. बेन्यू वानजी, इंडोनेशिया

७. जर्काता, इंडोनेशिया

८. लयांग प्रबँग, लाओस

९. व्हिएनटिथान, लाओस

१०. जोहर ब्रहरू, मलेशिया

११. क्लालांलपूर, मलेशिया

१२. कोटा, केनाबल, मलेशिया

१३. कुचींग, मलेशिया

१४. ने. पी. टॉ. म्यानमार

१५. मंडाले, म्यानमार

१६. यांगॉन, म्यानमार

१७. सेबू, फिलिपिन्स

१८. दाबॉब, फिलिपिन्स

१९. मनिला, फिलिपिन्स

२०. सिंगापूर

२१. बँगकॉक, थायलंड

२२. चॉन ब्युरी, थायलंड

२३. फुकेत, थायलंड

२४. डॉ. नांग, व्हिएतनाम

२५. हनॉय, व्हिएतनाम आणि

२६. हो चि निव्ह, व्हिएतनाम

ए. एस. सी. एन. चे उद्देश खालीलप्रमाणे

१. अद्ययावत शहर विकासाबाबत सहकार्य सुलभीकरण

२. खाजगी क्षेत्राबरोबर विश्वसनीय प्रकल्पाबाबत मध्यस्ती आणि

३. आसियान बाह्य भागीदाराकडून निधी व सहाय्य मिळविणे.

ए. एस. सी. एन. चे महत्वाचे घटक खालीलप्रमाणे

१. अद्ययावत शहर विकास (२०१८-२०२५) साठी शहर विशिष्ट कृती आराखडा (City Specific Action Plane)

२. आसियान अद्ययावत शहर रचना

३. आसियान अद्ययावत शहर जाळे (नेटवर्क) बाबत वार्षिक बैठका, आणि

४. दुहेरी कार्यक्रम

ए. एस.सी.एन.ची रचना खालीलप्रमाणे :

प्रत्येक सभासद राष्ट्रातील अद्ययावत शहरासाठी एक मुख्य अद्यावत शहर अधिकारी आणि एक राष्ट्रीय प्रतिनिधी असेल. मुख्य अद्ययावत शहर अधिकारी हा मुख्य शहर नियोजक किंवा मुख्य लचक अधिकारी किंवा तत्सम दर्जाचा अधिकारी असावा. तर राष्ट्रीय प्रतिनिधी हा राष्ट्रीय शासनात वरिष्ठ कार्यान्वयन व्यवस्थापक (Senior Operations Manager) असावा

या योजनेचा औपचारिक आरंभ नोव्हेंबर २०१८ मध्ये आसियान नेत्यांच्या हस्ते करण्यात आला.

आसियानची तेहतीसावी शिखर परिषद १३ ते १५ नोव्हेंबर २०१८ रोजी सिंगापूर येथे संपन्न झाली. या परिषदेत खालील दस्तऐवज स्वीकृत करण्यात आले.

१. आसियान अद्यावत शहर रचना

२. आसियान समुदायासाठी निःपक्षपाती आणि सर्वसमावेशक हरित नोकऱ्यात (Green Jobs) वाढ करण्याबाबत आसियान जाहिरनामा :

३. आसियान सक्षमीकरण बृहत आराखडा २०१५. दिव्यांगाच्या हक्कांना मुख्य विचार प्रवाहात आणणे.

४. संयुक्त राष्ट्र हवामान बदल रूपरेषा २४०२११ पक्ष परिषदेला आसियानचे हवामान बदलाबाबत संयुक्त निवेदन.

५. जैविक विविधता अधिवेशन चौदाव्या पक्ष परिषद सभेला आसियानचे संयुक्त निवेदन.

६. हवामान आणि आपत्ती लचीला (Resilient) दिन, युवा कृती कार्यक्रम स्वीकृतीबाबत मार्गदर्शक तत्वांचा जाहीरनामा.

७. इतर आसियान सभासद राष्ट्रातील नागरिकांना तिसऱ्या देशातील (Third Countries) आसियान दूतावासाकडून सहाय्य करण्याबाबत मार्गदर्शक तत्वांचा जाहिरनामा

त्याचबरोबर या परिषदेत आसियान केंद्रीयतेचे आणि एकतेचे महत्व अधोरेखित करण्यात आले.

**आसियानचे चौतिसावे शिखर संमेलन** २० ते २३ जून २०१९ रोजी बँगकॉक, थायलंड येथे संपन्न झाले. या परिषदेचा विषय होता. 'शाश्वतीसाठी/टिकावासाठी भागीदारीतून आगेकूच' (Advancing Partnership for Suitainability) या परिषदेत, व्यवहार्य समन्वय यंत्रणेच्या माध्यमातून आसियान क्षेत्रातील डिजिटल अर्थव्यवस्थेला साहाय्यभूत असे खुले सुरक्षित, स्थिर, सुलभ व लवचिक सायबर अवकाश निर्माण करण्यावर आणि सायबर सुरक्षा सहकार्य वाढविण्यावर सहमती झाली. सायबर सुरक्षा सहकार्यासंदर्भातील आसियात नेत्यांच्या निवेदनानुसार सायबर अवकाशातील जबाबदार राज्य वर्तनासाठी सामाईक व ऐच्छिक मानदंड स्वीकारण्यात आले. तसेच आत्मविश्वास वाढविण्याचा व्यावहारिक उपायांची अंमलबजावणी करण्यात आली. डिजिटल बृहत आराखडा २०१५ विकसित करण्या संदर्भातील मंत्र्यांचे मार्गदर्शन तसेच बॅगकॉक-आसियान-जपान, सायबर सुरक्षा क्षमता निर्माण केंद्र, बँगकॉक आणि आसियान सिंगापूर उत्कृष्टता केंद्र, सिंगापूर (Centre of Excellence, Singapur) यांच्या सायबर सुरक्षितता उप्रकमांना आणि प्रशिक्षण कार्यक्रमांना सहाय्य करण्याबाबत देखील सहमती झाली. या सर्व गोष्टी सायबर सुरक्षा क्षमता, निर्मितीच्या विद्यमान आसियान प्रयत्नांना पूरक आहेत.

अनिश्चितता आणि आव्हानांच्या वाढत्या संख्येसह जागतिक अर्थव्यवस्था सध्या महत्वाच्या वळणावर आहे. हे आसियान सभासद राष्ट्रांना उमगले आहे. आसियानची विश्वसनीयता व केंद्रियता टिकवण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय व्यापार पुनर्जिवीत करण्यासाठी २०१९ मध्ये क्षेत्रीय व्यापक आर्थिक भागीदारीच्या (आरसेप) वाटाघाटींचा समारोप करण्याचा पुनरूच्चार आसियान सभासद राष्ट्रांनी या परिषदेत केला. मार्च २०१९ मध्ये सियम रियम, कंबोडिया, येथे झालेल्या मंत्र्यांच्या आंतरसत्रीय बैठकीत मान्यता दिलेल्या आरसेप कृती आराखडा २०१९ च्या मार्गदर्शनाखाली मंत्र्यांना व अधिकाऱ्यांना ध्येय गाठण्यासाठी दुप्पट प्रयत्न करण्याचा आग्रह करण्यात आला. तसेच आरसेप वाटाघाटीचा या वर्षात समारोप करण्यासाठी संबंधीत भागीदारांदेखील आरसेप वाटाघाटींना प्राधान्य देण्याचा आग्रह धरला व आसियान सोबत काम करण्यास बोलावण्यात आमंत्रण देण्यात आले.

**आसियानची पस्तीसावी शिखर परिषद** १ ते ४ नोव्हेंबर, २०१९ रोजी बँकॉक, थायलंड येथेच संपन्न झाले. या परिषदेत आसियान एकात्मिकरणाची ध्येय व आकांक्षा साध्य करण्यासाठी संवाद, भागीदार व इतर बाह्य भागीदार यांच्याबरोबर दृढ भागीदारीची आवश्यकता मान्य करण्यात आली. आसियानच्या नेतृत्वाखालील विविध यंत्रणासह आसियान + १; आसियान + ३; पूर्व आशियाची परिषद, आसियान क्षेत्रीय व्यासपीठ व आसियान संरक्षण मंत्र्यांची बैठक प्लस (ASEAN Defence Ministers Meeting Plus- ADMM-Plus) या सर्वांमधील समन्वयासाठी सातत्याने त्यांना प्रोत्साहन देण्याची गरज अधोरेखित करण्यात आली.

क्षेत्रीय व्यापक आर्थिक भागीदारी (आरसेप) वाटाघाटींच्या समारोपाचे स्वागत करण्यात आले. तसेच आरसेप करारावर २०२० मध्ये स्वाक्षरी करण्याच्या आसियान सभासद राष्ट्रांच्या बांधीलकीचे/ वचनबद्धतेचे देखील स्वागत करण्यात आले. आरसेपमुळे मूल्य-साखळीचा (Value-Chains) विस्तार होईल आणि खुल्या, सर्वसमावेशक, नियम आधारित आंतरराष्ट्रीय व्यापार व्यवस्थेला लक्षणीय हातभार लागेल.

म्यानमार मधील रखाईन राज्यातील विस्थापित व्यक्तींची प्रत्यावर्तन प्रक्रिया सुलभ होण्यासाठी म्यानमान आणि बांगलादेश यांच्यातील सतत सुरू असलेल्या व प्रभावी संवादाला प्रोत्साहन देण्यात आले.

## २.२.२ जागतिकीकरण आणि बहुराष्ट्रीय कंपन्याची भूमिका

**जागतिकीकरण :**

जागतिकीकरण म्हणजे देशाच्या राजकीय सीमेबाहेर आर्थिक व्यवहाराचा विस्तार करणे होय. जागतिक राजकारणात राष्ट्राराष्ट्रामध्ये चालणाऱ्या राजकीय व्यवहारात, आर्थिक हितसंबंधात व व्यवहारात एक महत्त्वपूर्ण सहभाग असतो. जागतिकीकरणाच्या या युगात जे देश आंतरराष्ट्रीय राजकारणात अधिक प्रबळ असतात व ते इतर देशाच्या धोरणावर व राजकारणावर आपल्या सामर्थ्याच्या सहाय्याने प्रभाव पाडू शकतात. याउलट गरीब देशांची परिस्थिती असते. अशा प्रकारची राष्ट्रे जागतिक राजकारणातही दुर्बल ठरतात व प्रबळ देशांच्या राजकारणात त्यांचे फारसे चालत नाही.

**व्याख्या :**

१) **जागतिक बँक :** ‘जागतिकीकरण म्हणजे उपभोग्य वस्तूंच्या समावेशासह सर्व वस्तूवरील आयात नियंत्रणे हळूहळू रद्द करणे, आयात जकातीचे दर कमी करणे, सार्वजनिक क्षेत्रातील उपक‘माचे खाजगीकरण करणे होय.'' जागतिकीकरण याचा अर्थ अर्थव्यवस्थेवरील सरकारने लादलेली नियंत्रणे कमी करणे. विदेशी गुंतवणूकीला मुक्त परवाने, आयात-निर्यातीवरील बंधने कमी करणे, जागतिकीकरण हा आंतरराष्ट्रीय व्यापार वाढविण्यासाठी केलेला प्रयत्न आहे.

२) **माल्कॉम एस. ॲडीसेशियह :** ''अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण याचा अर्थ जागतिक अर्थव्यवस्था उत्क्रांतीचे जागतिक मापन होय.''

आंतरराष्ट्रीय व्यापार, व्यापारासाठी असणारे किंवा महत्त्वाचे ठरणारे आंतरराष्ट्रीय नियम, ते अंमलात आणणाऱ्या संघटना, बाजारपेठा, बहुराष्ट्रीय कंपन्या, आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्य व स्पर्धा यांचा मुख्यत्वे आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्थेच्या अभ्यासात समावेश केला जातो. जागतिकीकरणाची मुख्य शक्ती ही आर्थिक शक्ती आहे. जगभर पसरलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या वाढत्या विस्तारामुळे वित्तपुरवठ्याचे जागतिकीकरण झाले आहे. त्याशिवाय जगातील लोक व व्यापार हे माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे जोडले गेले आहेत. अर्थकारणात होणारे बदल हे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेवरही प्रभाव पाडतात, शिवाय राजकारणावरही प्रभाव टाकत असतात. जागतिक आर्थिक संबंधाचे स्वरूप व रचना यांचा उत्पादनाचे नवे प्रकार व पद्धती, गुंतवणूक, वित्तपुरवठा आणि व्यापार, या जागतिकीकरणाच्या महत्त्वाच्या बाबीवर प्रभाव पडत असतो.

**बहुराष्ट्रीय कंपन्यांची भूमिका :**

बहुराष्ट्रीय कंपन्या (Transnational Corporation) अशा व्यावसायिक कंपन्या आहेत. अशा कंपन्यांकडे एक किंवा त्यापेक्षा अधिक देशांच्या उत्पादनाची साखळी त्यांच्या हातामध्ये एकत्रित झालेली असते. अशा कंपन्यांच्या हाती वस्तुंचे मूल्य ठरविण्याची शक्ती एकवटलेली दिसून येते. जागतिकीकरणाच्या युगात अशा बहुराष्ट्रीय कंपन्यांना विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांची व्याख्या वेगवेगळ्या आहेत. संयुक्त राष्ट्र संघटनेच्यानुसार बहुराष्ट्रीय कंपन्यासाठीची व्याख्या करताना ‘बहुराष्ट्रीय कंपनी म्हणजे एका किंवा त्यापेक्षा

अधिक देशामध्ये कार्यरत असणारी कंपनी होय.'' अशा कंपन्यांचे व्यवस्थापन आणि सामाईक धोरण असते. या बहुराष्ट्रीय कंपन्यामध्ये एका कंपनीच्या नियंत्रणाखाली इतर कंपन्यांचे कार्य संचलन करता येते.

बहुराष्ट्रीय कंपन्या या सार्वभौम स्वरूपात आपले निर्णय घेतात. धोरणात्मक आणि गुंतवणूक विषयक धोरणाचा समावेश त्यात होत असतो.

जगात बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या स्थापनेची सुरावात मोठ्या प्रमाणात १९५० च्या दशकात झाली. १९६९ साली जगात सात हजार बहुराष्ट्रीय कंपन्या होत्या. १९९२ साली ३७ हजार बहुराष्ट्रीय कंपन्या आणि त्यांच्या २,००,००० परदेशी संलग्नीत कंपन्या होत्या. १९९६ सालातील बहुराष्ट्रीय कंपन्यांचा आकडा ४४५०० तसेच त्यांच्या २७० हजार संलग्नीत कंपन्या कार्यरत होत्या. २००८ सालातील बहुराष्ट्रीय कंपन्यांची संख्या ८२ हजार होत्या. आणि त्यांच्याशी संबंधीत परदेशातील उपकंपन्या ८१० हजार होत्या. जगाच्या आर्थिक व्यवस्थेत जगातील मोठ्या शंभर कंपन्या महत्त्वाची भूमिका निभावतात. UNCTAD च्या रिपोर्टनुसार २००८ सालात जनरल इलेक्ट्रीकल, वोडाफोन आणि रॉयल ड्युच यांचे स्थान जागतिक श्रेणीत पहिल्या दहामध्ये असल्याचे दिसून येते.

जगातील पहिल्या क्रमांक २५ बहुराष्ट्रीय कंपन्या पुढीलप्रमाणे -

| **अ.क्र.** | **कंपनीचे नाव** | **देश** | **उद्योग** |
|---|---|---|---|
| १ | जनरल इलेक्ट्रिक | अमेरिका | इलेक्ट्रीकल आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे |
| २ | वोडाफोन ग्रुप | अमेरिका | दूरसंचार |
| ३ | रॉयल ड्युच/शेल ग्रुप | नेदरलँड | पेट्रोलियम पदार्थ पायाभूत क्षेत्र |
| ४ | ब्रिटिश पेट्रोलियम कंपनी | इंग्लंड | पेट्रोलिय पदार्थ पायाभूत क्षेत्र |
| ५ | एक्सॉन मोबाईल | अमेरिका | पेट्रोलियम पदार्थ पायाभूत क्षेत्र |
| ६ | टोयोटा मोटा कंपनी | जपान | मोटर वाहने |
| ७ | टोटल | फ्रान्स | पेट्रोलियम पदार्थ पायाभूत क्षेत्र |
| ८ | इलेक्ट्रीसिट डे फ्रान्स | फ्रान्स | इलेक्ट्रिसिटी, गॅस, पाणी |
| ९ | फोर्ड मोटारस | अमेरिका | मोटार वाहने |
| १० | ई.ओ.एन.एजी | जर्मनी | इलेक्ट्रीसिटी, गॅस आणि पाणी |
| ११ | अर्सेलर मित्तल | लक्झेमबर्ग | धातू आणि धातू उत्पादन |
| १२ | टेलफोनीका एसए | स्पेन | दूरसंचार क्षेत्र |
| १३ | व्होल्सवॅगन एजी | जर्मनी | मोटार वाहने |
| १४ | कॉनोको फिलीप्स | अमेरिका | पेट्रोलियम आणि पायाभूत क्षेत्र |
| १५ | सायमन्स ए जी | जर्मनी | इलेक्ट्रीकल आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे |

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | डायमेलर क'सलर | अमेरिका | मोटार वाहने |
| १७ | चेवरोन कंपनी | अमेरिका | पेट्रोलियम पदार्थ आणि पायाभूत सुविधा |
| १८ | फ्रान्स टेलीकॉम | फ्रान्स | दूरसंचार |
| १९ | ड्युटेच टेलीकॉम | जर्मनी | दूरसंचार |
| २० | एजी | फ्रान्स | इलेक्ट्रीसिटी, गॅस आणि पाणी |
| २१ | सुएज | - | - |
| २२ | बिएमडब्ल्यु एजी | अमेरिका | मोटार वाहने |
| २३ | हचीसन व्हाम्पोया | हाँग काँग, चीन | अनेक वस्तू |
| २४ | होंडा मोटर को.लि. | जपान | मोटार वाहने |
| २५ | इनी ग्रुप | इटली | पेट्रोलियम पदार्थ |

स्त्रोत - World Investment Report. Transnational Corporations. Agricultural Production and Development UNCTAD. Newyork and Genewa 2009.

या शंभर बहुराष्ट्रीय कंपन्यांची प्रमुख कार्यालये ही अधिकत्तर अमेरिका, युरोपियन देश आणि जपानमध्ये आहेत. या शंभर कंपन्यांपैकी केवळ विकसनशील देशातील म्हणजेच कोरियातील ०३ कंपन्या, चीन-०१, हाँगकाँग, मलेशिया आणि मेक्सीको या देशातील प्रत्येकी एक अशा ७ कंपन्या २००७ साली होत्या.

बहुराष्ट्रीय कंपन्यांचा जास्तीत जास्त उद्योग व्यापार विकसित देशातून होतो. त्यामध्ये इंग्लंड, जर्मनी, नेदरलँड, अमेरिका, जपान इत्यादी. अलिकडे भारत आणि चीन या देशाचे वाढते आर्थिक महत्त्व यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या या देशांकडे वळल्या आहेत.

| **क्षेत्र किंवा आर्थिक प्रदेश** | **संबंधित देशातील बहुराष्ट्रीय कंपन्या** | **परराष्ट्रातील संलग्नीत बहुराष्ट्रीय कंपन्या** | **वर्ष** |
|---|---|---|---|
| विकसित देश | ५८७८३ | ३६६८८१ | |
| युरोप | ४७७६५ | ३४७७७१ | |
| फ्रान्स | १२६७ | १०७१३ | २००२ |
| नेदरलँडस | ४७८८ | १७५२१ | २००८ |
| जर्मनी | ६११५ | ११७५० | २००७ |
| पोलंड | ५८ | १४४६९ | २००१ |
| स्विडन | १२६८ | १९४४ | २००७ |

| | | | |
|---|---|---|---|
| इंग्लंड | २३६० | ११३६६७ | २००५ |
| उत्तर अमेरिका | ३८५७ | ९३८९ | |
| कॅनडा | १४३९ | ३७२५ | १९९९ |
| अमेरिका | २४१८ | ५६६४ | २००२ |
| इतर विकसित देश | – | – | – |
| जपान | ४६६३ | ४५०० | २००६ |
| विकसनशील देश | २१४२५ | ४२५२५८ | – |
| आफ्रिका | ७४६ | ६०८४ | – |
| कॅरिबीयन अमेरिका | ३५३३ | ३९७३७ | – |
| आशिया | १७१४६ | २७९४३७ | – |
| भारत | ८१५ | २२४२ | २००७ |
| चीन | ११६७ | ९७१२ | २००८ |

**बहुराष्ट्रीय कंपन्यांची भूमिका :**

१) नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार : बहुराष्ट्रीय कंपन्यांनी आपल्या उद्योगधंद्यात आणि उत्पादन क्षेत्रात नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार मोठ्या प्रमाणात केलेला आहे. त्यामुळे उत्पादन क्षमता वाढलेली आहे. माहिती तंत्रज्ञानाबरोबरच आर्थिक व्यवस्थेला मोठ्या प्रमाणात फायदा झालेला आहे. त्यामुळे एकीकडे नवीन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे रोजगारसंधीत भरपूर वाव मिळाला आहे.

त्याचबरोबर नवीन तंत्रज्ञानाच्या वापराचा परिणाम विकसनशील देशामध्ये नकारात्मक असा राहिलेला उदा. भोपाळ दुर्घटना हे त्याचे उत्तम उदा. आहे.

**रोजगार संधी :**

बहुराष्ट्रीय कंपन्यामुळे कुशल मनुष्यबळाला मोठा रोजगार प्राप्त झाला आहे. विकसित देशात या कंपन्यांच्या माध्यमातून विविध उद्योगात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली जाते. या उद्योगधंद्याच्या व्यवस्थापनात उत्पादनात मोठ्या मनुष्यबळाची गरज आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण झाला आहे. उदा. (२०१०) कोकाकोला या कंपनीने मलेशिया या देशामध्ये नवीन कंपनी थाटल्याचे नियोजन केले आहे. त्यामुळे तेथे ३०१ यु.एस. मिलियन डॉलरची गुंतवणूक केली आहे. त्यामुळे ६०० ते ८०० नव्या रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. तसेच त्यांच्याशी संबंधीत ८००० नवीन रोजगार स्थानिकांना प्राप्त होताना दिसतात.

रोजगार क्षेत्रामध्ये कुशल मनुष्यबळ असणारे मजूर आणि कुशल मनुष्यबळ नसणारे असे दोन गट समाजात निर्माण होताना दिसत आहेत.

### 'जागतिक राजकीय अर्थव्यवस्था' संकल्पना :

ही संकल्पना दोन अर्थाने वापरली जाते या विषयातील मुद्यांचा व समस्यांचा अभ्यास करणारा विषय आणि दुसरा म्हणजे, जागतिक राजकारण व अर्थकारण यासंबंधी विचार करण्याची एक पद्धती. राजकीय अर्थव्यवस्था ही मुख्यतः राजकारण व अर्थकारण यांच्यातील परस्परसंबंधावर जोर देते. कारण अर्थकारणाशिवाय राजकारण समजू शकत नाही अशी भूमिका यामागे आहे. त्याचप्रमाणे अर्थकारण व राजकारण एकमेकांवर प्रभाव टाकतात. असेही त्यामध्ये अभिप्रेत आहे. जागतिकीकरण घडवणाऱ्या ज्या शक्ती आहेत. त्यांनीच आंतरराष्ट्रीय राजकीयकरण केले आहे जे अगोदर नव्हते. ही कल्पना राजकीय अर्थव्यवस्था या दृष्टीकोनाला मान्य नाही. यात राजकारण व अर्थकारणाचा परस्परावलंबी, परस्परावर प्रभाव टाकणारा व परस्परात गुंतलेला संबंध अंतर्भूत होतो.

राजकीय अर्थव्यवस्थेच्या अंतर्गत व्यापार, वित्तीय संबंध, बहुराष्ट्रीय कंपन्या, युरोपचे आर्थिक एकीकरण, जागतिक पर्यावरणाचे राजकारण, उत्तर व दक्षिण यांच्यातील आर्थिक दरी विकासाचे वेगवेगळे प्रश्न इत्यादी गोष्टींचा अभ्यास यामध्ये येतो.

### राजकीय अर्थव्यवस्थेची उद्दिष्ट्ये :

जागतिक आर्थिक व्यवहारात स्वतःचा आर्थिक लाभ व्हावा असा हेतू असतोच. त्याचबरोबर राज्यानीही आपल्यावर आर्थिकदृष्ट्या आपल्यावर विसंबून राहावे अशा राजकीय उद्देशाने व्यवहार केले जातात. या उद्देशामध्ये सर्वसाधारणपणे पुढील गोष्टींचा समावेश होतो.

१) **परराष्ट्र धोरणाची उद्दिष्ट्ये साध्य करणे :** साम, दाम, दंड या मार्गाने दुसऱ्या राज्यास आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न केला जातो. दुसऱ्या राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणास प्रभावित करण्याचे प्रयत्न आर्थिक साधनाद्वारे केले जातात. एखाद्या राज्यास आर्थिक मदत न करण्याची धमकी देऊन त्या राज्याचे मन वळवण्याचा प्रयत्न केला जातो.

२) **स्वतःची क्षमता वाढवणे व शत्रूपक्षाची क्षमता कमी करणे :** काही राज्ये आपली क्षमता वाढवून प्रतिपक्षाची क्षमता कमी करण्याचा आर्थिक साधनाद्वारे प्रयत्न करीत असतात. उदा. कच्चा मालाचा सर्व उपलब्ध साठा ताब्यात घेतात. त्यामुळे शत्रू पक्षास अशा वस्तूची कमतरता भासते व त्यांच्या औद्योगिक क्षमतेवर त्याचा विपरित परिणाम होतो.

३) **आर्थिकदृष्ट्या संरक्षित राज्य निर्माण करणे :** काही राज्ये दुर्बल राज्यांना आर्थिक मदत करून त्यांना पूर्णपणे आपली आर्थिकदृष्ट्या संरक्षीत राज्य बनवितात. अशी आर्थिकदृष्टीने पराधिन राज्ये नंतर त्यांच्यापासून पृथक होण्याची कल्पनाच करू शकत नाही.

### राजकीय अर्थव्यवस्थेच्या अभ्यासातील विविध दृष्टीकोन :

#### अ) उदारमतवाद :

१९६० व १९७० च्या दशकात विशेषतः पाश्चात्य जगातील जागतिक राजकारणातील घडामोडीमुळे पुन्हा एकता उदारमतवादी विश्लेषणास चालना मिळाली. जागतिक व्यवस्थेत राष्ट्र-राज्यांना महत्त्व आहेच. त्यांच्यात संघर्षाबरोबरच सहकार्य शक्य आहे. हे उदारमतवादाचे प्रमुख गृहीतक आहे. ज्याप्रमाणे व्यक्ति विवेकाने विचार

करून व्यवस्था आणि सुरक्षा प्रस्थापित करू शकतात. त्याचप्रमाणे राष्ट्रराज्येही व्यवस्था आणि सुरक्षा प्रस्थापित करू शकतात असे उदारमतवाद मानतो. अभिजात उदारमतवादामध्ये 'सामूहिक सुरक्षेची संकल्पना' हे सुरक्षेचे प्रमुख साधन मानले गेले आहे. नवउदारमतवादी परस्परावलंबित्वाचा सिद्धांत आर्थिक तसेच इतर पातळ्यावरील परस्परावलंबित्व जसे वाढते तशी परस्पर सहकार्याची प्रवृत्ती वाढते असे मानतो. नवउदारमतवादी संस्थावादामध्ये विविध आंतरराष्ट्रीय संस्थांच्या माध्यमातून राष्ट्रा-राष्ट्रातील सहकार्य वाढते असे मानले आहे. तर लोकशाहीजन्य शांततेच्या सिद्धांतामध्ये लोकशाहीचा प्रसार हेच सुरक्षेचे आणि सहकार्याचे साधन मानले गेले आहे.

**ब) वाणिज्यवाद किंवा व्यापारवाद :**

जागतिक अर्थव्यवस्थेच्या अभ्यासात व्यापारवाद हा एक महत्त्वाचा दृष्टीकोन आहे. वाणिज्यवादी दृष्टीकोन हा वास्तववादी दृष्टीकोनाप्रमाणेच 'प्रत्येक राज्य स्वतःच्या हितसंबंधाचे संरक्षण करीत असते. व तसे करीत असताना इतर राज्यांच्या हितसंबंधांचा बळी देण्यास कचरत नाही.'' या गृहीतत्त्वावर आधारलेला आहे. या दृष्टीकोनानुसार राज्यांचे हितसंबंध परस्पर विरोधी असतात व त्यामुळे कोणत्याही राज्याचे उद्दिष्ट हे संपत्तीचे स्वतःस हितकर असे घडवून आणणे हे असते. वाणिज्यवाद्यांच्या मते जगातील संपत्ती मर्यादित आहे. त्यामुळे तिच्या वाटपात जेव्हा एका देशाचा फायदा होतो. तेव्हा दुसऱ्या देशाचा तोटा होत असतो. अर्थातच अशावेळी प्रत्येक देश स्वतःचा फायदा पाहतो व त्याने तो पहावा असे व्यापारवाद सुचवतो.

अनेक देश वाणिज्यवादी किंवा व्यापारवादी धोरणानुसार आपले आर्थिक व्यवहार करीत असल्यामुळे वाणिज्यवादी बचावात्मक उपाययोजनांचा अवलंब करीत होते. या उपायामध्ये संरक्षणात्मक जकाती, कोटा पद्धती, आयात पर्यायी वस्तुंचे उत्पादन इत्यादी गोष्टी येतात.

**वाणिज्यवादाचे डावपेच :**

१) **स्वयंपूर्णता :** या डावपेचामध्ये परावलंबन कमी करण्यासाठी गरजेच्या वस्तू आपल्याच देशात निर्माण करण्याचे धोरण उदा. चीनने काही काळ याचा वापर केला होता.

२) **बचाववाद :** बचाववादी धोरण हे अशाप्रकारचे दुसरे धोरण होय. जागतिक व्यापार आपल्या स्वतःच्या फायद्याचा ठरविण्यासाठी काही राष्ट्रे देशांतर्गत उद्योगांना जागतिक बाजारपेठेपासून वाचताना दिसतात. आयात, निर्यात मालावर विशिष्ट जकात बसून संरक्षण दिले जाते.

३) **अनुदाने :** देशांतर्गत उद्योगांना संरक्षण देण्यासाठी त्यांना अनुदान देणे हा आणखी एक उपाय आहे. अनुदान मिळणारे उद्योग अनुदानामुळे आपल्या मालाची किंमत उत्पादन किंमतीपेक्षा कमी देऊ शकतात व जागतिक स्पर्धेला तोंड देऊ शकतात.

४) **आयात-निर्यात निर्बंध :** बऱ्याच वेळा अनेक देश असे नियम किंवा बंधने, कायदे करतात की, जे वस्तुंची आयात जरी सहजपणे झाली तरी त्याचे वितरण किंवा विक्री अवघड किंवा अशक्य करतात. अमेरिकन उत्पादक जपानमधील अशाप्रकारच्या निर्बंधाबाबत तक्रार करतात. तर तिसऱ्या जगातून आयात होणाऱ्या मालाबाबत असेच निर्बंध घालून त्यांची आयात व नंतर विक्री अवघड करते. अशी तक्रार भारत, पाकिस्तानसारखी राष्ट्रे करतात.

### क) परावलंबीत्ववाद :

परावलंबीत्व ही संकल्पना अर्जेंटिनाचे अर्थशास्त्रज्ञ रॉडर ब्रिच यांनी मांडली आहे. ही संकल्पना अतिशय अस्पष्ट आहे. हा सिद्धांत म्हणजे जागतिक व्यवस्थेत क्रांतिकारक परिवतनाची मागणी होय. या सिद्धांताच्या समर्थकांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या परंपरागत सिद्धांतावर कठोर अशी टीका केली आहे. परंपरागत सिद्धांताचा अर्थ असा होतो की, व्यापारी संबंधात विकसित राष्ट्रांना व कच्चा मालाची निर्मिती करणाऱ्या अविकसित राष्ट्रांना समान कायदा होतो. प्रचलित व्यापार व्यवस्थेत दोन गट निर्माण केले आहेत.

प्रचलित व्यापार व्यवस्था ही मध्यधार्जिनी होती. युरोप, जपान, अमेरिका यांचा अंतर्भाव यात होतो. आशिया आफ्रिका आणि लॅटीन अमेरिकेतील परावलंबी राष्ट्रांचा अंतर्भाव परस्परागत सिद्धांतात होता. या देशाच्या मागासपणाचे किंवा अविकसितपणाचे मुख्य कारण म्हणजे ग्रामीण अविकसित जनतेचे शहरी व विकसित राष्ट्रांनी केलेले शोषण होय.

## २.२.३ जागतिकीकरणाविरोधी चळवळ :

नव्या आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेमुळे जगात विविध प्रतिकारक चळवळींचा जन्म झाला. आर्थिक दृष्टीकोनातून जगाची विभागणी तीन भागात झाली आहे. पहिल्या वर्गात विकसित देशांचा समावेश होतो. जे सगळ्याच बाबतीत संपन्न आहेत. दुसऱ्या विभागात किंवा गटात अशी राष्ट्रे आहेत की, ज्यांच्याजवळ शक्ती, संपत्ती आहे. पण त्यांचे कायम शोषण झाल्यामुळे त्यांची उन्नती ते करू शकले नाहीत. ते अविकसित राहिले त्यामुळे त्यांना अविकसित राष्ट्रे म्हटले गेले आहे. तसेच याा राष्ट्रांना विकासाच्या मार्गावर असल्यामुळे त्यांना विकसनशील राष्ट्रे म्हटले गेले आहे. तिसऱ्या गटातील राष्ट्रे साम्राज्यवादाचे बळी ठरलेले आहेत. त्यांच्याकडे नैसर्गिक संसाधनांची कमतरता आहे. त्याचबरोबर गरीबी दारिद्र्य याने ग्रासले आहे. यांना गरीब राष्ट्रे किंवा अल्पविकसित देश म्हटले गेले. भौगोलिक आधारावर हे दोन ध्रुवावर असल्यामुळे उत्तर हा शब्द विकसित देशांच्यासाठी वापरला जातो. तर दक्षिण हा शब्द प्रयोग जे देश विकसनशील आणि अल्पविकसित आहेत त्यांच्यासाठी वापरला जातो आहे. तंत्रज्ञानाच्या अत्याधिक वापरामुळे रोजगार संधीत कमतरता आली आहे.

जागतिक इतिहासाचा कालखंड पाहता उत्तरचे देश दक्षिण देशांचे कायम शोषण करत आले आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर जगात साम्राज्यवादाच्या विरोधात मोठी स्वातंत्र्याची चळवळ पुढे आली. आणि लोकशाहीच्या माध्यमातून जगातील बऱ्याच देशांनी साम्राज्यवादाच्या जोखडातून मुक्ती मिळवली. राजकीयदृष्ट्या स्वातंत्र्य मिळवूनही हे देश आर्थिकदृष्ट्या त्याच देशावर निर्भर होते. या कर्जाच्या बोझ्यातून बाहेर पडण्यासाठी दक्षिण देशांनी उत्तर देशांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. त्यातून १९६४ चा करार करण्यात आला. पुढे याच कराराचे रुपांतरण १९९४ मध्ये जागतिक व्यापार संघटनेत झाले.

**उत्तर-दक्षिण संवादाची प्रगती :** विभिन्न सम्मेंलने व संघटनाद्वारे उत्तर-दक्षिण संवाद प्रगती झाली आहे. तसेच जागतिक प्रतिकाराच्या चळवळीला गती प्राप्त झाली आहे. ते सम्मेंलने खालीलप्रमाणे-

### १) पॅरिस सम्मेलन (१९७५-७७) :

पॅरिस संमेलनाला आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्य संमेलनसुद्धा म्हटले जाते. विकसित व अविकसित दोन्ही देशातील आर्थिक सहकार्य वाढवणे यावर भर देण्यात आला. संयुक्त राष्ट्र संघाच्या महासभेच्या घोषणेनुसार उत्तर-दक्षिण देशांच्यामध्ये परस्पर संवाद प्रक्रिया चालू राहिली त्यामुळे उत्तरेकडील समृद्ध देशांनी दक्षिणेकडील गरीब देशांच्या सहकार्यासाठी विविध कार्यक्रमाची घोषणा केली. १९७३ साली तेलसंकटाच्या वेळी दक्षिणेच्या उत्तरेकडील देशानी तेलाच्या मूल्यामध्ये वृद्धी न करण्याची खात्री मागीतली. पण तशी कोणतीही खात्री उत्तरेच्या देशांनी दिली नाही.

### २) ब्रांट आयोग १९७७ :

पॅरिस सम्मेलनाच्या अपयशानंतर उत्तर-दक्षिण संवादामध्ये आलेला अडथळा दूर करण्यासाठी तत्कालीन जागतिक बँकेचे अध्यक्ष रॉबर्ट मॅकनमाराने जर्मनीचे माजी चॅसलर बिली ब्राँटच्या अध्यक्षतेखाली एका आयोगाची स्थापना १९७७ साली केली. या आयोगाचे वैशिष्ट्ये म्हणजे आयोगाच्या सदस्यामध्ये जगातील सर्व राष्ट्रांचे उत्तर-दक्षिण, पूर्व-पश्चिमच्या सर्व सदस्यांना सहभागी करून घेतले. १९८० मध्ये या आयोगाने आपला रिपोर्ट सादर करून अशा शिफारशी केल्या की विकसित राष्ट्रांनी आपली साहाय्यता करताना अविकसित राष्ट्रांवर आपली मनमानी चालवू नये. तर त्यांचे शोषण न करता त्यांच्या विकासाला गती देण्यासाठी सहकार्य करावे. अशाप्रकारच्या दोन शिफारशी अत्यंत महत्त्वपूर्ण होत्या. त्यात एक म्हणजे विकसित तसेच विकसनशील देशात परस्पर परावलंबित्व सिद्धांताचे पालन करणे तसेच दुसरी आंतरराष्ट्रीय व्यापारात विकासशील देशांना त्यांचा यथोचित हिस्सा प्रदान करणे.

### ३) कानकून संमेलन १९८१ :

या संमेलनाचे आयोजन कानकून शहरात मेक्सिकोचे राष्ट्रपतींच्या अध्यक्षतेखाली १९८१ मध्ये केले गेले. या संमेलनात एकूण २२ देशांनी सहभाग घेतला. ज्यामध्ये भारतसुद्धा सहभागी झाला होता. कानकून सम्मेलनाच्या संदर्भात प्रमुख समस्या अशी होती की, उत्तरेतील देश हे आयोजन संयुक्त राष्ट्र संघाच्या नियंत्रणाच्या बाहेर करू पाहत होते. परंतु दक्षिणेकडील देश या संम्मेलनातील कोणताही निर्णय संयुक्तराष्ट्र संघाच्या तत्त्वानुसार करू पाहत होते. तथापि या मतभेदाशिवाय या संम्मेलनात काही विषयावर सहमती झाली की, येणाऱ्या बैठकांचे आयोजन परस्पर सहमतीच्या आधारावर उत्तर-दक्षिणच्या देशामध्ये होईल. विकसित देशांना अविकसित देशांना खाद्यान्न उत्पादनात वाढ करण्यासाठी प्राथमिक स्वरूपातील प्रयत्न करणे आहे. विकसित देशांना जागतिक व्यापार व्यवस्थेत विकासशील देशांसाठी खुल्या व्यापार धोरणात सूट मिळावी.

### ४) उरुग्वे वार्ता, १९८६-९३ तसेच जागतिक व्यापार संघटना :

उरुग्वे बैठकीनुसार आर्थर डंकेलने एक विस्तृत अहवाल सादर केला. या प्रस्तावाला डंकेल प्रस्ताव असे म्हटले गेले. या प्रस्तावातील निष्कर्ष १५ डिसेंबर १९९३ ला निश्चित केले आणि त्याच दिवशी जिनेव्हामध्ये त्याचा स्वीकार केला. या प्रस्तावात १५ देशांना सहभागी करून घेतले. ज्याला दोन भागात विभाजित केले. पहिल्या भागात १४ कलमे होती जी व्यापारीक वस्तुशी संबंधीत होती. दुसऱ्या भागात सात कलमे होती जी सेवासंबंधी होती.

या कलमांना लागू करण्याच्या सहमतीवर विरोध झाला. अमेरिका तसेच भारतासहित अनेक विकासशील देशांनी याला विरोध केला. या विषयासंबंधाने विकासशील देशांचा दृष्टीकोन असा होता की सेवा, गुंतवणूक तसेच व्यवस्थापन या क्षेत्रात विकसित देशांना मुक्त व्यापाराची सूट दिली तर विकासशील देशामध्ये या क्षेत्रातील विकास मंदावले. परंतु विकसित देश विकसनशील देशामध्ये प्रत्येक क्षेत्रात मुक्त व्यापार सुविधा मिळाव्यात यासाठी आग''ही होते. १ जानेवारी १९९५ रोजी जागतिक व्यापार संघटनेची स्थापना करण्यात आली.

### ५) पृथ्वी संमेलन १९९२, १९९७, २००२ :

१८० च्या वर देशाच्या शासकीय संघटनांनी तसेच २० हजार प्रतिनिधीनी आणि ४० हजार गैरशासकीय सदस्यांनी या संमेलनात सहभाग घेतला. जगातील पर्यावरण संबंधी समस्यांवर विचार करण्यासाठी पहिले संमेलन १९७२ साली स्विडनमधील स्टॉकहोममध्ये आयोजित केले होते. पहिले पृथ्वी सम्मेंलन १९९२ मध्ये ब्राझीलची राजधानी रियो दे जेनेरो मध्ये आयोजित करण्यात आले. रीओ-९२ नुसार हरीत विश्वासाठी वैश्विक योगदान यावर केंद्रीत होते. यामध्ये जगातील विविध देशामध्ये विविध मुद्यावर सहमती दर्शविण्यात आली. त्यामध्ये जलवायू परिवर्तनाला नियंत्रित करण्यासाठी निश्चित रूपरेषा बनवणे, पशू तसेच वन्य संसाधनांच्या जैविक उपयोगाला निश्चित करणे तसेच त्यांना सुरक्षा प्रदान करणे इ. अमेरिकेने फ्लोटो प्रोटोकॉलमध्ये सहभागी होण्यास विरोध दर्शविला. जोहान्सबर्गमध्ये पृथ्वी संमेलनात दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्रपती श्री थाबो मबेलीने म्हटले की, जैविक विकासासाठी करण्यात येणारा संघर्ष, वंशवादाविरुद्ध पुकारलेल्या संघर्षासारखा जटील आहे.

जोहांन्सबर्गच्या सैंडटन कन्वेशन केंद्रात संपन्न झालेल्या २००२ मधील पृथ्वी संमेलनात उत्तर-दक्षिण संवादांच्या संदर्भात खालील विविध बाबींवर सहमती झाली.

१) **जागतिकीकरण :** जागतिकीकरणाच्या चांगल्या-वाईट तत्त्वांचा स्वीकार.

२) **पर्यावरण मित्र योजना :** उर्जा वाढवण्यासाठी सौर व पवन उर्जा प्रभावी बनवण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले.

३) **पाणी व स्वच्छता :** जगातील सर्व लोकांना पिण्याच्या पाण्याची उपलब्धी करून देण्याचे श्रेय २०१५ पर्यंत ठेवण्यात आले.

४) **आर्थिक सहाय्यता :** उत्तरेतील बड्या श्रीमंत राष्ट्रांनी ०.७ टक्के इतका आपल्या संपत्तीतील हिस्सा गरीब राष्ट्रांच्या प्रगतीसाठी वापरण्याचे वचन दिले.

५) **रसायन :** विघातक असा औद्योगिक कचऱ्याचे व्यवस्थित व्यवस्थापन करण्यासाठी सहमती. तसेच २०२० पर्यंत रासायनिक पदार्थांच्या उत्पादन तसेच प्रयोगाला मनुष्य आणि पर्यावरणाला सुरक्षितता प्रदान करण्यासाठी प्रयत्न.

६) **आरोग्य :** पेटंटसंबंधी जागतिक व्यापार करार गरीब देशांसाठी औषधी उपलब्ध करण्यासाठी सहमती.

७) **मत्स्य संसाधन :** समुद्रातील परिस्थिती कायम संतुलन राखून ठेवण्यासाठी तसेच गरीब राष्ट्रांचे मुख्य अन्न असलेली मत्स्य संसाधने याची जपणूक करणे.

## २.३ सारांश :

जगात दुसऱ्या महायुद्धानंतर आर्थिक प्रदेशवाद किंवा क्षेत्रीयता निर्माण झाली. प्रादेशिक आर्थिक संघ निर्माण झाले. त्यामुळे जागतिक राजकारणात प्रादेशिक आर्थिक संघ विरुद्ध जागतिकीकरण अशी व्यवस्था निर्माण होऊ लागली. जगातील अनेक राष्ट्रे आपल्या विकासासाठी प्रादेशिक आर्थिक एकिकरणाच्या झेंड्याखाली एकत्र येताना दिसतात.

प्रादेशिक संघटना या समान उद्देशाच्या प्राप्तीसाठी एकत्र येऊन स्थापन झाल्या आहेत. त्यामध्ये सार्क, युरोपियन संघ यांचा समावेश झाला आहे.

मॅस्ट्रिश करारातून १९९३ मध्ये युरोपियन संघाचा उदय झाला. बेल्जीयम, डेन्मार्क, फिनलंड, ऑक्टिया, फ्रान्स जर्मनी इ. २७ राष्ट्रे या संघटनेची सदस्य राष्ट्रे आहेत. युरोपियन संघाचे मुख्यालय ब्रुसेल्स (बेल्जीयम) येथे आहे. आर्थिक वित्तीय संघ स्थापन करणे, एक चलन व्यवस्था निर्माण करणे, युरोपसाठी एक नागरिकत्वाच्या निर्मितीसाठी प्रयत्न करणे हे या संघाचे मुख्य उद्देश आहेत. २०१६ साली इंग्लंड या देशानी युरोपियन संघातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे.

आसियन संघटना ही सार्कप्रमाणेच आसियन राष्ट्रा राष्ट्रात परस्पर सहकार्य मैत्री व्यापार करणारी संघटना आहे. आर्थिक विकासाबरोबर संस्कृती, लोकशाही, राजकारण, भाषा यांच्या वाढीसाठी ती परस्परात सहकार्य करते. तिच्या आतापर्यंत ३५ परिषदा झाल्या आहेत.

जागतिकीकरणाचा अर्थ असा की, पूर्ण विश्वास एककेंद्रीय आर्थिक व्यवस्था प्रस्थापित करणे. यात प्रामख्याने सर्वच राज्यातून आर्थिक क्षेत्राचे जागतिक स्वरूप निर्माण व्हावे असा प्रयत्न केला जातो. हे एकीकरण मुख्यत्वे व्यापार व आर्थिक प्रवाहांच्या माध्यमाने साध्य करायचे असते. एखाद्या राज्यात ज्या बाजार शक्ती कार्य करीत असतात. त्यांनी आपल्या राष्ट्रीय सीमांचे उल्लंघन करणे आणि मुक्तपणे जागतिक क्षेत्रात प्रवेश करण्याची प्रक्रिया अभिप्रेत असते.

जागतिकीकरणामध्ये संपूर्ण आर्थिक शक्ती बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हाती एकवटते. बहुराष्ट्रीय कंपन्या आपला बाजार वाढवण्यासाठी विविध तंत्राचा अवलंब करतात. त्यामुळे त्यांना नफा प्राप्त होतो. आणि गरीब, अविकसित देशात या बहुराष्ट्रीय कंपन्यामुळे आर्थिक विषमता निर्माण होण्यास मदत झाली आहे. एकीकडे विकसित देशांना बहुराष्ट्रीय कंपन्यांचा फायदा झाला आहे. तर अविकसित आणि गरीब राष्ट्रांना तोटा झालेला आहे. जागतिकीकरणाचा फायदा हा बहुराष्ट्रीय कंपन्यांना मोठ्या प्रमाणात होतो आहे.

दक्षिणचे राज्य मोठ्या प्रमाणात उत्तरेच्या राष्ट्रावर अवलंबून आहेत. कारण दक्षिणेतील राज्य ही गरीब, अविकसित राष्ट्रे आहेत. त्यामुळे उद्योग आणि व्यापार आणि गुंतवणूकीसाठी उत्तरेच्या राज्यावर अवलंबून आहेत. उत्तरेकडील प्रगत राज्य दक्षिणेच्या राज्यांवर दबाव टाकताना दिसतात. आंतरराष्ट्रीय संघटनावर ते दबावाचे राजकारण करत असतात. अशी दक्षिणेकडील राष्ट्रांचे मत आहे. त्यामुळे दक्षिणेकडील राष्ट्रांचे मत आहे. त्यामुळे दक्षिणेकडील राष्ट्रांनी ही सद्यकालीन अर्थव्यवस्था बदलून नव्या अर्थव्यवस्थेची मागणी केली आहे.

## २.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

१) बहुध्रुवीय - अनेक केंद्री

२) बहुराष्ट्रीय कंपन्या - एकापेक्षा जास्त देशातील कंपन्या

३) जागतिकीकरण - सर्वंकष व्यापार

४) वाणिज्यवाद - व्यापारवाद

५) परावलंबित्व - अवलंबून असणे

६) उत्तर-दक्षिण - श्रीमंत-गरीब

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१) प्रादेशिक संघटनांचा उदय स्पष्ट करून युरोपियन महासंघाचे यशापयश स्पष्ट करा.

२) आसियानची रचना स्पष्ट करून तिची उद्दिष्ट्ये स्पष्ट करा.

३) जागतिकीकरणाचा अर्थ स्पष्ट करून जागतिकीकरणातील बहुराष्ट्रीय कंपन्यांची भूमिका स्पष्ट करा.

४) जागतिक अर्थव्यवस्थेचा अर्थ स्पष्ट करून उद्दिष्ट्ये स्पष्ट करा.

५) उत्तर-दक्षिण संवादाची प्रगती स्पष्ट करा.

**ब) टिपा लिहा.**

१) आसियान संघटना

२) युरोपीय महासंघ

३) जागतिकीकरण

४) बहुराष्ट्रीय कंपन्या

५) उत्तर-दक्षिण संवाद

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके/ग्रंथ

१) डॉ. विनोद कुमार पाल - 'आंतरराष्ट्रीय राजनीतिक संबंध' डिस्कवरी पब्लिशिंग हाऊस प्राईवेट लि. २०१०.

२) डॉ. वसंत रायपूरकर - 'आंतरराष्ट्रीय संबंध' विद्या प्रकाशन, औरंगाबाद, विद्याप्रकाशन.

३) डॉ. पेंडसे अरुणा, सहस्त्रबुद्धे उत्तरा - 'आंतरराष्ट्रीय संबंध शितयुद्धोत्तर व जागतिकीकरणाचे राजकारण' - ओरिएंट लाँगमन, हैद्राबाद.

४) डॉ. विनोदकुमार पाल - वैशिक राजनिति एवं आंतरराष्ट्रीय संघटन, डिस्कवरी पब्लिशिंग हाऊस प्रा. लि., २०१०.

५) बी. सी. नरुला - आंतरराष्ट्रीय संघटन - अर्जुन पब्लीशिंग हाऊस, २०१२.

६) Stephen J. Kobrin - Globalization Transnational Corporations and the future of Global Governance. (Research Press) 2008.

❑❑❑

# प्रकरण – ३
# जागतिक अर्थकारण
## (Global Economy)

************************************************************

**अनुक्रमणिका**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ विश्‍व व्यापार संघटना व जागतिक व्यापार

  ३.२.२ आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँक

  ३.२.३ ब्रिक्स, साफ्टा आणि शांघाय

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ सरावासाठी स्वाध्याय

३.६ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

## ३.० उद्दिष्टे

१९७० च्या दशकापासून आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासात आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे महत्व वाढायला सुरूवात झाली. आंतरराष्ट्रीय राजकारणातील अनेक घटकांचा अभ्यास करताना आर्थिक बाबी परराष्ट्र धोरणात आणि आंतरराष्ट्रीय संबंधात कळीची भूमिका बजावत असल्याचे समजले. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्था, परस्परावलंबित्व विकासात अभाव व विषमता, आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांची भूमिका इ. अभ्यास करणे महत्वाचे उदिष्टय आहे. त्यामध्ये प्रामुख्याने जागतिक व्यापार संघटना, जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, ब्रिक्स, साफ्टा आणि शांघाय इत्यादी संघटनांचा समावेश होतो. या सर्व संघटनांचा अभ्यास जागतिक अर्थकारणाच्या दृष्टिकोनातून अभ्यासणे आवश्यक आहे.

## ३.१ प्रास्ताविक

राष्ट्राराष्ट्रामधील आर्थिक आणि व्यापारी संबंध प्रस्थापित करण्यासाठी आणि ते नियंत्रित करून आंतरराष्ट्रीय स्थैर्य निर्माण करण्यासाठी प्रयत्न हे सन १९३० च्या दशकातील वैश्‍विक आर्थिक मंदी आल्यानंतर सुरू झाले. या मंदीमुळे युरोपामधील अनेक देशाची अर्थव्यवस्था कोलमडले. आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेत मोठी अस्थिरता निर्माण झाली. ही परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी जागतिक अर्थकारण आणि व्यापार विषयक नियमावली

तयार करून त्याआधारे राष्ट्रातील आर्थिक आणि व्यापारी संबंध नियंत्रित करणे आवश्यक होते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, जागतिक व्यापार संघटना इत्यादी संघटनांची निर्मिती झाली. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर आणि जागतिकीकरणाची सुरूवात झाल्यानंतर आर्थिक बाबींना अधिकच महत्व प्राप्त झाले. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर १९४४ साली अमेरिकेतील ब्रेटनवुडस येथे जागतीक प्रमुख देशांचे प्रतिनिधी एकत्र येऊन १९३० च्या जागतिक मंदीसारखी परिस्थिती पुन्हा उदभवू नये आणि महायुद्धामुळे उद्ध्वस्त झालेली युरोपच्या अर्थव्यवस्थेला बळकटी आणणे या गोष्टीवर चर्चा करण्यात आली. ही दोन्ही उद्दिष्टये साध्य करण्यासाठी तीन संस्थांची निर्मिती करण्याचे ठरविण्यात आले. त्यामध्ये आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, पुनर्रचना आणि विकासासाठी आंतरराष्ट्रीय बँक त्याला पुढे वर्ल्ड बँक असे म्हंटले जाते आणि तिसरा म्हणजे गॅट होय. काही देशांना समस्या असल्यास त्याना तातडीची मदत करणे आणि एक स्थिर विनिमय दर राखणे हे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे कार्य निश्चित करण्यात आले. युरोपमधील आर्थिक पुनर्रचना करणे त्यासाठी खाजगी गुंतवणुकीला प्रोत्साहन करणे तसेच इतर देशांतील विकास प्रयत्नांना सहकार्य करणे या उद्दिष्ट्यपूर्ती व्हावी यासाठी आंतरराष्ट्रीय बँकेची स्थापना करण्यात आले तर आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधी नियम ठरविण्याकरीता वाटाघाटी घडवून आणणे हे १९८७ साली स्थापन झालेल्या गॅटचे उद्दिष्टय होते. ब्रिक्स, साफ्टा, शांघाय सहकार्य संघटना अशा अनेक संघटना स्थापन झाल्याचे दिसून येते. जागतिक लोकसंख्येची सर्वाधिक घनता असलेल्या देशांनी एकत्र येवून ब्रिक्स ही संघटना स्थापन करण्यात आली. तर सार्क देशांच्या अंतर्गत व्यापार सहकार्य वाढण्यासाठी साफ्टा करार तयार करण्यात आला. तसेच या सर्व संस्था व संघटना या जागतिकीकरणाच्या जगामध्ये महत्वाची भूमिका बजावताना दिसतात. जागतिकीकरणाचा स्वीकार करण्यासाठी या संस्थांनी मोठ्या प्रमाणात पुढाकार घेतलेला आहे. या व्यतिरिक्त अनेक व्यापारी संघटना निर्माण होताना दिसतात. परंतु प्रामुख्याने राजकारणामध्ये या संघटना जागतिक अर्थकारणाच्या दृष्टिकोनातून महत्वाचे आहेत म्हणून आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, विश्व बँक, विश्व व्यापार संघटना, ब्रिक्स, साप्टा, आणि शांघाय या संघटनांचा अभ्यास या घटकात केलेला आहे.

## ३.२ विषय विवेचन

### जागतिक व्यापार संघटना आणि जागतिक व्यापार

**पार्श्वभूमी :**

जागतिक व्यापार संघटना ही आंतरराष्ट्रीय संस्था जागतिक व्यापाराचे नियमन करते. दिनांक १५ एप्रिल १९९४ रोजी १२३ राष्ट्रांनी स्वाक्षऱ्या केलेल्या 'करारा अंतर्गत' दिनांक १ जानेवारी, १९९५ रोजी ही संघटना अस्तित्वात आली. १९४८ पासून कार्यरत असलेल्या प्रशुल्क आणि व्यापार यासंबंधी सर्वसाधारण कराराऐवजी (GATT) ही संघटना अस्तित्वात आली. ही संघटना जगातील सर्वांत मोठी संस्था मानली जाते. करारात समाविष्ट देशांमधील व्यापारी वस्तू, सेवा आणि बौद्धिक संपत्ती यांचे नियमन ही संघटना करते. व्यापार करारासंबंधी वाटाघाटी आणि आपापसातील विवादांची निराकरण प्रक्रिया ज्यामुळे संघटना कराराबद्दलची सभासद देशांची निष्ठा कायम राहील या संबंधी संघटनेद्वारा आखणी केली जाते. ज्याच्यावर सभासद देशांच्या प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या असतात आणि हा करार त्या त्या देशांच्या संसदेत मान्यता प्राप्त असतो. संघटनेद्वारा जागतिक व्यापार हा शक्यतो सुरळीत आणि अपेक्षेप्रमाणे चालावा याची खातरजमा केली जाते. पुढे (GATT) जनरल अॅग्रीमेंट ऑन टेरिफ अँड ट्रेडची जागा विश्व व्यापार संघटनेने घेतली. ही संघटना स्थापना होण्यापूर्वी सन १९८६ ते

१९९४ अशी आठ वर्षे बदलत्या परिस्थितीनुसार गॅटमधील तरतूदीचे पूनर्विलोकन करण्यासाठी आणि विश्व व्यापाराचे नियम ठरविण्यासाठी विकसित आणि विकसनशील राष्ट्रांमध्ये सविस्तर चर्चा चालू होती या चर्चेची आठवी फेरी उरूग्वे शहरात झाली, म्हणून ती उरूग्वे टाऊन म्हणून ओळखली जाते. या चर्चेमध्ये शेतीमालावर अधिक वाद निर्माण झाला. त्यावेळचे गॅटचे डायरेक्टर जनरल आर्थर डंकेल यांनी वाटाघाटीमध्ये समेट घडवून आणला. या चर्चेअंती एक विस्तृत मसुदा तयार केला गेला. त्यामध्ये बहुपक्षीय व्यापारसंबंधी साठ करारांचा समावेश आहे. यांच मसुदयाच्या आधारावर विश्व व्यापार संघटनेची निर्मिती झाली आहे. विश्व व्यापार संघटनेच्या स्थापनेमागचा मुख्य उद्देश आंतरराष्ट्रीय व्यापारामधील अडथळे दूर करून मुक्त आणि उदार व्यापार करण्यासाठी आवश्यक परिस्थिती निर्माण करण्याचा आहे. सध्या विश्व व्यापार संघटनेचे १४२ राष्ट्रे सदस्य असून एकूण जागतिक व्यापारापैकी नव्वद टक्के व्यापार विश्व व्यापार संघटनेअंतर्गत होतो.

**विश्व व्यापार संघटनेची उद्दिष्टे :**

१) परस्पर सहकार्य आणि समानतेच्या तत्त्वावर उदार आणि मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या वृद्धीसाठी प्रयत्न करणे. २) सदस्य राष्ट्रांचा आर्थिक, औदयोगिक विकासासाठी प्रयत्न करणे. ३) आंतरराष्ट्रीय व्यापारसंबंधीच्या नियमावलीचा नियमीत आढावा पूनर्विलोकन उभी करणे. ४) सदस्य राष्ट्रांमधील जनतेचे राहणीमान उंचविणे. ५) आर्थिक विकास आणि पर्यावरण संरक्षण यांची सांगड घालणे. ६) गरीब, विकसित राष्ट्रांच्या आर्थिक विकासासाठी विशेष प्रयत्न. ७) सदस्य, राष्ट्रामधील व्यापाराशी निगडीत तंटे, वाद सोडविणे.

**विश्व व्यापार संघटनेचे कार्यकारिणी**

विश्व व्यापार संघटनेचे कार्य व्यवस्थित चालविण्यासाठी मंत्री परिषद ही सर्वोच्च यंत्रणा आहे. दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी अनेक समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. त्यामधील सर्वसाधारण परिषद महत्त्वाची आहे.

**अ) मंत्री परिषद :**

मंत्री परिषदेमध्ये सदस्य राष्ट्रांच्या वाणिज्य मंत्र्यांचा समावेश होतो. मंत्री परिषद ही विश्व व्यापार संघटनेची सर्वोच्च निर्णय समिती असून दर दोन वर्षानी या परिषदेची बैठक होते. बहुपक्षीय व्यापाराविषयी महत्वाची निर्णय होण्याचे कार्य मंत्री परिषदेकडून होते. मंत्री परिषदेच्या बैठका सिऑल्ल, दोहा, कॅरकून या ठिकाणी पार पाडल्या. मंत्री परिषदेत निर्णय सर्वानुमते घेतले जातात. जेव्हा एखाद्या प्रस्तावाला विरोध होतो. त्यावर मतदान घेतले होते.

**ब) सर्वसाधारण परिषद :**

सर्वसाधारण परिषदेत सदस्य राष्ट्रांच्या व्यापार प्रतिनिधींचा समावेश होतो. सर्वसाधारण परिषद आपले कार्य दोन प्रमुख समित्यामार्फत पार पाडते.

१) व्यापार धोरण पुनर्विलोकन समिती (Trade Policy Review Body) आणि

२) व्यापारी तंटे निर्माण समिती (Dispute Settlement Body) व्यापार धोरण पुनर्विलोकन समिती तर सदस्य राष्ट्रामधील व्यापारविषयी वाद, तंत्रे सोडविण्याचे कार्य तंटा निवारण समितीमार्फत केले जाते. तंटा सोडविण्यासाठी ही समिती सल्लामसलत किंवा निवाडा मंडळाची नियुक्ती या मार्गाचा अवलंब करते. विश्व

व्यापार संघटना अस्तित्वात असल्यामुळे गॅटचे जे सदस्य होते. त्यांना विश्व व्यापार संघटनेत मूळ सभासद म्हणून संबोधले जाते. विश्व व्यापार संघटनेच्या दैनंदिन व्यावस्थापनाचे कार्य महानिर्देशकाकडून होते. या महानिर्देशकाची निवड मंत्री परिषदेकडून होते.

**विश्व व्यापार संघटनेची कार्ये :**

विश्व व्यापार संघटनेची मुख्य कार्ये आपणास पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील. १) बहुपक्षीय व्यापार संबंधीच्या कराराचे प्रशासन आणि अंमलबजावणी करणे. २) आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाटाघाटी घडवून आणण्यासाठी व्यासपीठ म्हणून कार्य करते. ३) सदस्य देशांतील व्यापारात निर्माण झालेले कलह व तंटे सोडविण्याचा प्रयत्न करणे. ४) जकाती आणि व्यापारातील इतर निर्बंध कमी करण्यासाठी आचारसंहिता व नियमावली तयार करणे. ५) विश्व व्यापार धोरण ठरविणाऱ्या आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँकेसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांना सहकार्य करणे. ६) जागतिक व्यापार धोरण ठरविणाऱ्या आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँकेसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांना सहकार्य करणे.

**विश्व व्यापार संघटनेचे मूल्यमापन :**

विश्व व्यापार संघटनेच्या कार्याचे मूल्यमापन करताना महत्वाची गोष्ट म्हणजे जागतिक व्यापार संघटनेमुळे जागतिक स्तरावर निर्माण होणाऱ्या समस्यांची चर्चा करण्यासाठी आणि त्यावर उपाय सुचविण्यासाठी व्यासपीठ स्थापन झाले आहे.

गॅट करारापेक्षा विश्व व्यापार संघटनेचे स्वरूप हे अधिक व्यापक आणि सर्वस्पर्शी आहे. गॅट करारामध्ये शेतमालाच्या व्यापाराला किंवा सेवा क्षेत्राचा (विमा, बॅक, वाहतूक, दळणवळण) समावेश नव्हता. विश्व व्यापार संघटनेमध्ये या क्षेत्रातील व्यापाराचे नियंत्रण करण्यासाठी विस्तृत नियमांचा समावेश करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे बौद्धिक संसदेच्या हक्काविषयी विशेष तरतूदी विश्व व्यापार संघटनेच्या नियमावलीत करण्यात आल्या आहेत.

विश्व व्यापार संघटनेचे नियम आणि रचना याविषयी विकसित आणि विकसनशील राष्ट्रामध्ये एकमत नाही. या नियमांमध्ये फेरबदल करण्याची मागणी विकसनशील राष्ट्रे करीत आहेत. यातून मार्ग काढण्यात मंत्री परिषदेच्या दोहा आणि कॅनहून येथे झालेल्या बैठकांना समावेश होतो.

**जागतिक बँक :**

दुसऱ्या महायुद्धानंतर आर्थिक आणि भांडवली देवाण घेवाण कशा रितीने करता येईल. यासंबंधी विचार वनियम करण्यासाठी जुलै १९४४ मध्ये जी बेटनवूडस परिषद झाली त्यामध्येच जागतिक बँकेची निर्मिती झाली. त्यामागील मुख्य उद्देश प्रामुख्याने युद्धग्रस्त युरोपातील पुनर्निर्माण आणि विकासासाठी आर्थिक सहाय्य करणे हे होते. मात्र गेल्या अर्धशतकाच्या काळात जागतिक बँकेच्या उद्दिष्टात आणि कार्यात मूलगामी बदल झाल्याचे दिसते. परंतु राष्ट्रांच्या आर्थिक विकासाकरिता भांडवल पुरवठ्याचे प्रश्न सोडविण्यासाठी जागतिक बँकेची निर्मिती करण्यात आली. त्याला सुरवातीच्या काळात आंतरराष्ट्रीय पुनर्निर्माण व विकास अधिकोष असेही म्हंटले जात होते.

**जागतिक बँकेची आवश्यकता :**

दुसऱ्या महायुद्धामध्ये युरोप व आशियातील अनेक देश होरपळून निघाले होते. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, रशिया, जपान इ. देशांतील उद्योगधंदे व दळवळणाची साधने प्रचंड प्रमाणात उध्वस्त झाली होती. तसेच इतर अनेक देशाचे नुकसान झाले होते. त्यामुळे युद्ध संपल्यानंतर यासर्व देशाच्या अर्थव्यवस्थेचे पुनर्निर्माण व पुनर्रचना करणे अत्यावश्यक होते. त्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवल उभे करणे आणि त्याची पुरवठ्याची व्यवस्था करणे आवश्यक होते. त्याचबरोबर आशिया, आफ्रिका खंडातील अनेक स्वतंत्र झालेल्या आणि अविकसित असलेल्या देशाची आर्थिक प्रगती घडवून आणणे हे जगाच्या दृष्टिने आवश्यक गोष्ट होती. अशा या सर्व गोष्टींचा विचार करून ब्रेटनहूड परिषदेमध्ये जागतिक बँक स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सध्या ज्या देशांना खुल्या बाजारपेठेतून सहजासहजी कर्ज मिळणार नाही अथवा ज्यांना अधिक व्याजदराने कर्ज घ्यावे लागेल. अशा देशांना वाजवी दरात कर्जपुरवठा करण्याचे काम जागतिक बँक करते. यावरून जागतिक बँकेने नंतरच्या काळात आपले लक्ष पुनर्निर्माणाकडून विकासाकडे वळवल्याचे दिसते.

अशाप्रकारे जागतिक बँकेची आवश्यकता भासली आणि आज जागतिक बँकेला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

**जागतिक बँकेची उद्दिष्टये :**

१) दुसऱ्या महायुद्धात आर्थिक हानी झालेल्या सदस्य राष्ट्रांना त्यांच्या अर्थव्यवस्थेच्या पुनर्उभारणीसाठी मदत करणे.

२) नव्याने स्वतंत्र झालेल्या आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिका या खंडातील विकसनशील व अत्यंत मागासलेल्या देशांना आर्थिक विकासासाठी मदत करणे.

३) आंतरराष्ट्रीय पातळीवर एकमेकामध्ये सहकार्य निर्माण करणे.

४) जागतिक बँकेच्या प्रत्येक राष्ट्राला आंतरराष्ट्रीय व्यापारात समतोल साधता यावा म्हणून प्रयत्न करणे.

५) विकसनशील राष्ट्रांना त्यांच्या विकासासाठी दीर्घकालीन कर्ज देणे, हा बँकेचा महत्वाचा उद्देश असतो.

६) आंतरराष्ट्रीय गुंतवणुकीला चालना दिल्यास आंतरराष्ट्रीय व्यापारात समतोल साधता यावा, व्यापारवृद्धी घडून यावी अशा इच्छुक राष्ट्रांना मदत करणे.

७) दुर्मिळ चलन उपलब्ध करून देऊन आंतरराष्ट्रीय व्यापारातील असमतोल दूर करणे. ८) देशादेशातील वैरभाव कमी करून आंतरराष्ट्रीय सहकार्य प्रस्थापित करून मानवजातीत बंधुभाव निर्माण व्हावा यासाठी प्रयत्न करणे.

**जागतिक बँकेचे सभासदत्व :**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे सभासद असणाऱ्या देशांनाच जागतिक बँकेचे सभासद होता येते. भारत हा यापैकी, एक संस्थापक सभासद आहे. स्थापनेवेळी ४० सभासद असणारी संख्या १८५ पर्यंत वाढली आहे. त्याचबरोबर सभासद होऊ इच्छिणाऱ्या देशाने विश्व बँकेच्या नियमाचे पालन करण्याचे अभिवचन दिले पाहिजे.

**भांडवल :**

जागतिक बँकेची स्थापना करीत असताना, जागतिक बँकेचे अधिकृत भांडवल १० मिलीयन डॉलर होते. त्यात वेळोवेळी गरजेप्रमाणे वाढ करण्यात आली. सध्या सभासद देशाकडून प्रत्यक्षात वसूल भाग भांडवल ९४०० दशलक्ष डॉलर्स इतके होते.

**व्यवस्थापन :**

प्रत्येक सभासद देश या मंडळावर डाक गर्व्हनर व त्याच्याऐवजी काम करण्याची बदली गर्व्हनर नियुक्त करतो. त्याला गर्व्हनर मंडळ म्हंटले जाते. जागतिक बँकेच्या दैनंदिन व्यवहारांवर प्रत्यक्ष देखरेख ठेवून त्याला मार्गदर्शक करण्यासाठी संचालक मंडळ असते त्याचे १८ सदस्य स्थायी ५ अस्थायी संचालक असून सर्वात जास्त भांडवल देणाऱ्या ५ प्राथमिक राष्ट्राद्वारे ते नियुक्त झालेले असतात. बाकीचे सदस्य इतर राष्ट्राद्वारे नियुक्त झालेले असतात.

**जागतिक बँकेची कार्ये :**

जागतिक बँकेने सुरवातीपासून सदस्य राष्ट्रांना मदत करण्याच्या दृष्टिने भरीव स्वरूपाची कामगिरी केली आहे. तेव्हा जागतिक बँकेने केलेली कार्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील–

१) **कर्ज देणे** : जागतिक बँक आपल्या सदस्य राष्ट्रांना गरजेनुसार कर्ज पुरवठा करते. अल्पविकसित देशांना विकास घडवून आणण्याच्या दृष्टिकोनातून ही बँक दीर्घकालीन कर्ज पुरवठा करते. ते देत असताना खालीलप्रमाणे कर्जे देते. स्वतःच्या कोषातून कर्ज, विकासात्मक योजनेसाठी कर्ज, उधार भांडवलातून, हमी घेवून.

२) **तांत्रिक सहाय्य किंवा मार्गदर्शन करणे** : जागतिक बँक आपल्या सदस्य राष्ट्रांना आर्थिक व तांत्रिक सहाय्य करते. तांत्रिक सहाय्य देण्यासाठी ही बँक त्या देशाची पाहणी करून विकासाची शक्यता तपासते. हे करण्यासाठी बँक तंज्ञ सल्लागारांच्या गटाला पाठविते.

३) **प्रशिक्षण व्यवस्था करते** : जागतिक बँक विकसनशील देशांचा विकास घडवून आणता यावा म्हणून त्या देशातील अधिकारी वर्गाला प्रशिक्षण देण्याची सोय करते.

४) **विदेशी विनिमयाच्या संकटातून मुक्तता करणे** : जागतिक बँकेच्या अनेक कार्यामध्ये विदेशी विनिमयाच्या संकटातून सोडविण्याचे अत्यंत महत्वाचे कार्य करते. तशा प्रकारची मदत भारताला १९५८ मध्ये केली आहे.

५) **आंतरराष्ट्रीय विवादात मध्यस्थी** : आंतरराष्ट्रीय पातळीवर वाद किंवा समस्या निर्माण झाल्यास त्या सोडविण्यासाठी मध्यस्थ म्हणून कार्य करते.

६) **आंतरराष्ट्रीय विकास संघाची स्थापना** : जागतिक बँक सदस्य देशांची वित्तीय सोय व्हावी म्हणून वित्तीय संस्था स्थापन करते. उदा. आंतरराष्ट्रीय वित्त निगम, आंतरराष्ट्रीय विकास संघ.

७) **उद्देशानुसार कर्ज पुरवठा** : जागतिक बँकेने कृषी व ग्रामीण विकास उर्जा वाहतूक आणि दळणवळण यांना कर्ज पुरवठा केला आहे.

**जागतिक बँकेच मूल्यमापन**

**१) अर्थ व्यवस्थांच्या पुनर्रचनेसाठी मदत :**

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अनेक राष्ट्रांची साधने नष्ट झाली होती. अशा राष्ट्रांची पुनर्रचना करण्यासाठी जागतिक बँकेने भरीव स्वरूपाची कामगिरी केली आहे.

**२) विकासासाठी आर्थिक मदत :**

जागतिक बँक स्थापनेमागचा हेतूच विकासासाठी मदत करण्याचा असल्याने सदस्य राष्ट्रांना मोठ्या प्रमाणात मदत करते. त्यामागील बरीच राष्ट्रे लॅटिन अमेरिका, आफ्रिका आणि आशिया खंडातील आहेत.

**३) प्रादेशिक समतोल निर्माण करण्यात यश :**

जागतिक बँक आर्थिक विकासासाठी कर्ज देते पण हे कर्ज देताना प्रादेशिक समतोल निर्माण करण्याचा प्रयत्न करते.

**४) जागतिक बँकेचे अपयश :**

कर्ज देताना भेदभाव केला जातो. जागतिक बँकेकडून केल्या जाणारा कर्जपुरवठा आहे. त्यामध्ये भेदभाव केला जातो अशी टीका केली जाते. कर्ज मिळण्याची प्रक्रिया किचकट असल्याची टीका केली जाते. विकसनशील व अविकसित देशांच्या दृष्टिने विचार केल्यास कर्जावरील व्याजदर जास्त आहे असे टीकाकारांचे मत आहे. टीकाकारांच्या मते कर्जाची प्रक्रिया किचकट असल्यामुळे ते मिळण्यास बराच कालावधी लागतो. बॅंकेकडून केली जाणारी मदत पुरेशा प्रमाणात नाही म्हणणे आहे.

अशा प्रकारे जागतिक बँक हे जगामध्ये कार्यरत असताना सल्ला देणे, कर्जपुरवठा करणे, महत्त्वाचे आहे.

## आंतरराष्ट्रीय नाणेनिधी :

**पार्श्वभूमी :**

दुसरे महायुद्ध होऊन अनेक राष्ट्रांची मोठी आर्थिक हानी झाली. जगातील अनेक राष्ट्रांनी सुवर्ण चलन परिणाम पद्धतीचा त्याग करून कागदी चलन पद्धतीचा स्वीकार केला होता. अनेक देशांनी चलनविषयक स्वतंत्र धोरणे आखली होती. यामुळे विनिमय दरात अस्थिरता निर्माण झाली. आंतरराष्ट्रीय सहकार्य संपुष्टात येवून संघर्ष वाढत गेला. जागतिक महामंदीमुळे अनेक देशाचे अर्थ व्यवस्था बिघडले. आंतरराष्ट्रीय सहकार्य, शांतता व व्यापार या सर्वावर अनिष्ठ परिणाम होऊ लागले. त्यावर उपाय शोधण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर एखादी आर्थिक संघटना असावी यादृष्टिने विचार सुरू झाले. इंग्लंड व अमेरिकेने यासाठी अनुक्रमे डेन्स योजना व व्हाईट योजना मांडल्या यावर विचार विनिमय करण्याच्या दृष्टिने जुलै, १९४४ मध्ये अमेरिकेतील ब्रेटनवुडस् येथै जागतिक आर्थिक परिषद भरविण्यात आली. या परिषदेला जगातील ४४ देश सहभागी झाले. या परिषदेची फलनिष्पत्ती म्हणून आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करणाऱ्या आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व आंतरराष्ट्रीय पुनर्रचना व विकास बँकेची स्थापना झाली. जगभर शांतता आणि जागतिक सहकार्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या संस्थेची २७ डिसेंबर, १९४८ मध्ये स्थापना झाली.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी ही संयुक्त राष्ट्र संघटनेशी निगडित संस्था असली तरी या संस्थेचे कार्य स्वतंत्रपणे चालते. आंतरराष्ट्रीय चलन आणि विनिमय दरात स्थिरता प्रस्थापित करणे हे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे प्रमुख उद्दिष्ट आहे. राष्ट्रांना आपल्या अधिक विकासासाठी निधी उपलब्ध करून देणे. आंतरराष्ट्रीय व्यापारवाढीसाठी प्रयत्न करणे हे देखील या संस्थेची उद्दिष्टये आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने आपल्या कार्यप्रणालीत बदल घडवून आणला असून राष्ट्रांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीसाठी कडक आर्थिक सुधारणा (Stringent Economic Reforms) ही पूर्ण अट ठेवण्यात आली. सध्या १८२ राष्ट्रे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे सदस्य आहेत.

**नाणेनिधीचे भांडवल**

नाणेनिधी ही एक वित्तीय संस्था असल्याने मोठ्या प्रमाणात भांडवलाची गरज असते. प्रत्येक सभासद देशातून वर्गणीच्या स्वरूपात भांडवलाची उभारणी केली जाते. हा हिस्सा देत असताना २५% सोने किंवा अमेरिकन डॉलर मध्ये तर उरलेल्या ७५% हिस्सा स्वदेशी चलनात द्यावा लागतो.

**नाणेनिधीचे व्यवस्थापन :**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे व्यवस्थापन 'बोर्ड ऑफ गव्हर्नस' कडून पाहिले जाते. प्रत्येक राष्ट्राला एक गव्हर्नर नेमण्याचा अधिकार आहे. या मंडळाची वर्षातून एकदा बैठक होते. बोर्ड ऑफ गव्हर्नस पाच वर्षासाठी नियुक्त केले जाते. या बोर्डाने नाणेनिधीचे सर्वसाधारण धोरण निश्चित करावयाचे असते. बोर्डाची बैठक वर्षातून एकदा होते. दैनंदिन व्यवहार पाहण्यासाठी सध्या २४ सभासद आहेत. यातील ५ गव्हर्नस् ज्या देशांचा भांडवलीत हिस्सा जादा आहे.

**आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची आवश्यकता :**

जागतिक स्तरावर अनेक देशांनी आपापल्या चलनाचे अवमूल्यन केले त्याला शह देण्यासाठी इतर देशानीही स्पर्धात्मक अवमूल्यनाला सुरूवात केली. त्यामुळे विनिमय दरातील बदल हे एकतर्फी न होता आंतरराष्ट्रीय विचार विनीमयातून व्हावा असे वाटू लागले. तसेच महायुद्धाच्या नंतरच्या काळामध्ये प्रत्येक देश इतर देशाची पर्वा न करता स्वहित साधण्याकरीता विनिमय नियंत्रण करीत होते त्यामुळे त्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक होते. महायुद्धाच्या काळात युरोपियन अशिया देशाची औदयोगिक व कृषी उत्पादकता बरीच घटली होती. त्याच्यातील कारखाने दळणवळणाची साधने इत्यादी गोष्टी उध्वस्त झाले होते. त्याचा पुनर्निर्माण करणे आवश्यक होते. त्याचबरोबर एकमेकामध्ये सहकार्य व विचारविनिमय करणे आवश्यक होते. या सर्व गोष्टींचा विचार करून आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँकेची निर्मिती झाली आहे.

**आंतरराष्ट्रीय नाणेनिधी किंवा मुद्रा कोषाची उद्दिष्टये :**

मुद्रा निधीच्या कराराच्या पहिल्या कलमानुसार निधीची पुढील उद्दिष्टये मान्य करण्यात आली आहेत.

१) एक स्थायी संस्था प्रस्थापित करून तिच्याद्वारे मौद्रिक समस्या सोडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य मिळविणे.

२) आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सतत विकास घडवून आणणे व हे करतात त्यात महत्तम संतुलन साधणे.

३) राष्ट्राचे विनिमय दर शक्य तितके स्थिर ठेवण्यास मदत करणे व त्याद्वारे स्पर्धात्मक विनिमय अवमूल्यनाला आळा घालणे.

४) आंतरराष्ट्रीय शोधनाचे प्रश्न सोडविण्यासाठी बहुमुखी शोधनाची व्यवस्था करून त्याद्वारे विनिमय नियंत्रण पद्धती बंद करणे.

५) सदस्य राष्ट्रांच्या शोधनशेषातील असाध्य किंवा असंतुलन दूर करण्यासाठी त्यांना कर्ज देऊन विदेशी चलनाचा (विनिमयाचा) पुरवठा करणे.

६) वरील विविध उपाययोजनांद्वारे आंतरराष्ट्रीय शोधनशोषातील असंतुलनाची मात्रा व कालावधी शक्य तेवढा कमी करणे.

**नाणेनिधीची कार्ये :**

**१) विनिमय दर ठरविणे :**

नाणेनिधीचे सभासदत्व स्वीकारणाऱ्या सर्वच देशांना आपल्या चलनाचे मूल्य सोन्याच्या संदर्भात किंवा अमेरिकेन डॉलरमध्ये किती राहिल हे जाहिर करावे लागते. एप्रिल १९७८ पासून ते एस.डी.आर मध्ये जाहिर करावे लागते. ते मूल्य स्थिर ठेवण्याची जबाबदारी संबंधित देशाची असते. या निधीत १०% पेक्षा जास्त बदल करण्यासाठी नाणेनिधीची परवानगी घ्यावी लागते. त्यामुळे विनिमय दर स्थिर ठेवता येतो.

**२) आल्पकालीन मदत देणे :**

एखाद्या सभासद देशाला आंतरराष्ट्रीय व्यवहारातून निर्माण झालेला असमतोल दूर करण्यासाठी अल्पकालीन मदत नाणेनिधी करते. हे तात्कालीन देणे देण्यासाठी सदस्य राष्ट्रांच्या चलनाच्या कोट्याच्या २५% एवढे विदेशी चलन उपलब्ध करून दिले जाते. एक-दोन वर्षात त्याची परतफेड व्हावी अशी अपेक्षा असते.

**३) दुर्मिळ चलनाचे वाटप :**

नाणेनिधीकडे अनेक देशांचे चलन असते जेव्हा एखाद्या देशाच्या चलनाला इतर देशांकडून मोठ्या प्रमाणात मागणी येते आणि सर्व सदस्याची मागणी पूर्ण करता येत नाही. त्यावेळी नाणेनिधी असे दुर्मिळ चलन मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून सर्व देशामध्ये योग्य प्रमाणात वाटप करते हे वाटप गरजेनुसार केले जाते.

**४) प्रतिपूरक वित्तीय सुविधा :**

अलिकडे नाणेनिधीने अनेक नवीन सुविधा निर्माण केल्या आहेत. विकसनशील राष्ट्रांना नेहमी प्राथमिक वस्तुंची निर्यात करताना किंमत अनिश्चिततेला सामोरे जावे लागते. म्हणून नाणेनिधीने १९९३ पासून प्रतिपूरक वित्तीय सुविधा निर्माण करून दिली. यामुळे सदस्य राष्ट्रांना निर्यातीतील तुट भरून काढता येते. सदस्य राष्ट्रांना त्याच्या कोट्याच्या २५ टक्के एवढे विदेशी चलन नाणेनिधी उपलब्ध करून देते.

**५) विस्तारित निधी सुविधा :**

विकसनशील सदस्य राष्ट्रांना अर्थव्यवस्थेत संरचनात्मक बदल घडवून आणण्यासाठी दीर्घकालीन धोरणे आखावी लागतात. त्यासाठी नाणेनिधीने १९७८ पासून विस्तारित निधी सुविधा सुरू केली आहे. सदस्य राष्ट्रांना विकासाचा कार्यक्रम आखण्यास नाणेनिधी साहाय्य करते. या योजनेअंतर्गत सभासद देशाला त्याच्या कोट्याच्या १४०% पर्यंत परकीय चलन खरेदी करता येते. सदरच राष्ट्रांनी याची परतफेड ४ ते ८ वर्षे या कालावधीत समान १६ हप्त्यात करावयाची असते.

**६) विनिमय नियंत्रण दूर करणे :**

संकुचित राष्ट्रवाद, स्वावलंबन इत्यादी हेतूने अनेक राष्ट्रांनी परकीय व्यापारावर विनिमय नियंत्रणे लादली होती. नाणेनिधीने ही नियंत्रणे दूर करण्यासाठी प्रयत्न केले. मुक्त व्यापार धोरणासाठी अनेक देशांनी हे निर्बंध शिथिल केले आहेत.

**७) तेलविषयक सुविधा :**

आंतरराष्ट्रीय पातळीवर सन १९७३ नंतर तेलाच्या किमती विशेषतः पेट्रोलियम पदार्थांच्या किंमती वाढल्याने तेल आयातीचा खर्च वाढला. त्यामुळे अनेक देशांच्या व्यापारातील तूट वाढली. या संकटातून मार्ग काढण्यासाठी नाणेनिधीने सदस्य राष्ट्रांना दोन वर्षासाठी तेल सुविधा निर्माण करून दिल्या. सन १९७५ मध्ये खरेदी अधिकारावरील मर्यादा (SDR) सभासदांच्या कोट्याच्या १२५% एवढी करण्यात आली. ७.७५% व्याजदराने दिलेल्या या मदतीची परतफेड ५ ते ७ वर्षात करावयाची होती.

**८) नैसर्गिक आपत्तीत मदत :**

नाणेनिधीचे सदस्य देशांना अनपेक्षित व नैसर्गिक आपत्ती उदा. भूकंप, दुष्काळ, महापूर, त्सुनामी इ. समस्यांना तोंड देण्यासाठी सन १९६० नंतर तातडीची मदत देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. या योजनेखाली दिलेल्या मदतीची परतफेड ३ ते ५ वर्षाच्या मुदतीत करावयाची असते. त्यानुसार भारत, इजिप्त, युगोस्लाव्हिया, येमेन इ. देशांना नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्यासाठी सहाय्य देण्यात आले.

**९) तांत्रिक मदत व सल्ला :**

सदस्य राष्ट्रांना आर्थिक मदतीबरोबरच तांत्रिक मदत, चलनविषयक व राजकोषीय सल्ला देण्याचे कार्य नाणेनिधी करते. असा सल्ला देण्यासाठी नाणेनिधीचे केंद्रीय अधिकोषीय विभाग व राजकोषीय विभाग निर्माण केली आहे.

**१०) भावस्थिरक साठा वित्तव्यवस्था सुविधा :**

प्राथमिक वस्तुंच्या किंमती स्थिर राहाव्यात म्हणून नाणेनिधीने भावस्थिरक साठा वित्त व्यवस्था सुविधा निर्माण केल्या आहेत. यासाठी मदत म्हणून सदस्य देशांना त्यांच्या कोट्याच्या ४५% पर्यंत परकीय चलन नाणेनिधीकडून खरेदी करता येते.

**११) परत चलन खरेदी सुविधा :**

जेव्हा एखादा सभासद देश नाणेनिधीकडून कर्ज उचलतो तेव्हा तो आपले चलन देवून आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून दुसऱ्या देशाचे चलन विकत घेत असतो. त्या देशाला आपले चलन ५ वर्षानंतर पुन्हा खरेदी करण्याची सुविधा असते.

**१२) विना चौकशी कर्ज सुविधा :**

नाणेनिधी सदस्य देशाला त्याची कसलीही चौकशी न करता एका निश्चित कालावधीसाठी ठराविक रक्कमेपर्यंत कर्ज देऊ शकते. सामान्यतः विनिमय नियंत्रणासाठी अशा कर्जाचा वापर केल्याचे आढळते.

**१३) चलन सांभाळणे :**

एखादा सदस्य देशाने दिलेले अधिकचे चलन सांभाळून त्यावर व्याज देणे याद्वारे आंतरराष्ट्रीय पातळीवर व्याजदरात समानता प्रस्थापित केली जाते.

**१४) न्यास निधी (Trust Fund)**

नाणेनिधीने सोन्याच्या स्वरूपातील वर्गणीतील विक्री करून त्यामधून न्यास निधीची स्थापना केलेली आहे. अत्यंत कमी दरडोई उत्पन्न असणाऱ्या राष्ट्रांना विकास कार्यक्रमासाठी या निधीतून कर्ज मिळते. यावर ०.५% एवढे अल्प व्याज असते. सन १९८१ पासून न्यास निधी कर्ज वाटप व्यवस्था स्थगित करण्यात आली असून ती रक्कम विशेष खात्यात शिल्लक ठेवण्यात आली आहे.

**१५) मार्गदर्शक :**

नाणेनिधी सदस्य राष्ट्रांसाठी मित्र, मार्गदर्शक व तत्त्ववेत्ता स्वरूपाची भूमिका पार पाडते. त्यासाठी चलन व्यवहार व धोरणे यासाठी विविध सदस्य राष्ट्रातील व्यक्तींना प्रशिक्षण देण्यासाठी एक स्वतंत्र प्रशिक्षण संस्था सन १९६४ मध्ये स्थापन केली.

अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची कार्ये आहेत. आजच्या जगामध्ये आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक यांची भूमिका महत्वाची ठरली आहे.

**आंतरराष्ट्रीय नाणेनिधी मूल्यमापन :**

जागतिकीकरणामुळे व शीतयुद्धाच्या राजकारणानंतर जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे महत्त्व वाढले आहे. अनेक नव्याने स्वतंत्र झालेल्या देशांना विकासासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी अर्थपुरवठा केले आहे. त्यामुळे अनेक देश हे विकसित होण्यास व अर्थव्यवस्था सुधारण्यास मदत झाली आहे असे असले तरी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी कर्ज देताना भेदभाव केला जातो अशी टीका केली जाते. तरीही अनेक राष्ट्रे ही आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या सहाय्याने आपल्या देशातील अर्थव्यवस्था व्यवस्थितरित्या टिकविण्याचे काम करीत आहेत.

**ब्रिक्स (BRICS)**

प्रथमतः ब्रिक्स हा लघुरूप ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या देशांच्या इंग्रजी नावाच्या आद्याक्षरावरून तयार झाले आहे. या सर्व देशांनी जागतिक सत्तेच्या दृष्टिकोनातून एका मंचावर येतात आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक ज्वलंत प्रश्नावर चर्चा करतात. त्यामुळे ही संघटना महत्वाची बनली आहे.

**ब्रिक्सचा उदय व विकास**

सन २००१ मध्ये गोल्डमान --व जीम ओनील यांनी बिल्डींग बेटर ग्लोबल इकॉनॉमिक ब्रिक्स या शीर्षकाखाली सादर केलेल्या निबंधात ब्रिक्स हे लघुरूप पहिल्यांदा उल्लेख केला. त्यानंतर २००६ साली प्रथमतः ब्राझील, रशिया, इंडिया, चायना या चारही देशांच्या परराष्ट्र मंत्री हे संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेची बैठक संपल्यानतर एक औपचारिक बैठक घेतली त्यामध्ये त्यांनी BRIC सारखी संघटना असावी त्याचे शिखर संमेलन व्हावेत असा निर्णय झाला त्यानंतर पहिला BRIC सम्मेलन हे २००९ साली रशियामधील येर्कतेरिनबर्ग मध्ये पार पडला त्यात प्रामुख्याने जागतिक वित्त सुधारणेच्या विषयी चर्चा करण्यात आले. सुरूवातीला दक्षिण आफ्रिका

हे देश सहभागी नव्हते. पुढे २०१० साली दक्षिण आफ्रिकेला सदस्यत्व देण्यात आले. ब्रिक्स देशामध्ये जगातील ४३ टक्के लोकसंख्या समाविष्ट झाली आहे. या संघटनेचा मुख्य उद्देश सहकार्य, सल्ला मसलत व संयोजन करणे हा आहे. दुसरी ब्रिक्स परिषद ब्राझिलया ब्राझील येथे भरविण्यात आले आहे. आता पर्यंत ११ ब्रिक्स परिषद झाले आहेत. या सर्व परिषदामध्ये एकूणच आर्थिक बाबीवर चर्चा करण्यात आले. तसेच स्थैर्य, सुरक्षा, प्रगती इत्यादी अनेक गोष्टीची चर्चा करण्यात आली आहे. या परिषदेत ब्रिक्स विकास बँकेची स्थापना करण्यात आली आहे. त्याचबरोबर ह्या ब्रिक्स परिषदेचे अनेक ठिकाणी शिखर परिषद झाले असून आज जागतिक स्तरावर अत्यंत महत्वाची संघटना म्हणून उदयास आली आहे, विकसित झाली आहे.

**ब्रिक्स संघटनेची उद्दिष्टये :**

१) अधिक स्थैर्य प्रस्थापित करणे, विकासाचे मार्ग सक्षम करणे आणि जागतिक राजकारण, अर्थकारण, वित्तीय शासन यामध्ये अधिकाधिक प्रतिनिधित्व व सहभाग मिळविण्यासाठी प्रयत्नशील राहते. २) या संघटनेतील प्रत्येक सदस्याची आर्थिक स्थिती आणि विकास याच्यावर विशेष लक्ष ठेवणे त्या आधारावर त्याच्याशी संबंध व सहकार्य प्रस्थापित करणे. ३) ब्रिक्सच्या सदस्य देशासाठी जागतिक व्यवहारामध्ये सार्वभौमत्व आणि आंतरराष्ट्रीय कायदा ही मूलभूत तत्त्वे आहेत त्याचे पालन करणे. ४) पर्यायी जागतिक वित्त व्यवस्था तयार करण्याच्या दृष्टिने प्रयत्न करणे.

**सहयोग क्षेत्र :**

ब्रिक्स ही संघटना परस्पर व सदस्यत्त्व देशामध्ये खालील क्षेत्रात सहयोग देण्याचा प्रयत्न करते ते पुढीलप्रमाणे

**१) आर्थिक क्षेत्रातील योगदान :**

ब्रिक्स देशामधील आर्थिक सहकार्य हे व्यापार आणि उद्योग क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात वाढताना दिसते. त्यामध्ये प्रामुख्याने सीमा शुल्क, ब्रिक्स व्यापार परिषद अचानकपणे आर्थिक परिस्थिती उदभवल्यानंतर आर्थिक परिस्थिती तसेच नवीन विकास बँक इत्यादीमध्ये सहकार्य निर्माण झाले आहे.

**२) लोकांच्यापासून लोकांकडे :**

ब्रिक्स सदस्य राष्ट्रांनी प्रत्येक देशातील संस्कृती, शिक्षण, क्रीडा, चित्रपट निर्मिती इत्यादी क्षेत्रामध्ये सहकार्य वाढवण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने खुलेपणा, समावेशकता, विविधता आणि जाणून घेण्याची भावना इत्यादी गोष्टी वाढविण्याचा प्रयत्न करीत आहेत. ब्रिक्स सदस्य राष्ट्रामध्ये राजकीय गट, ट्रेडयुनियन गट इत्यादीबरोबर माध्यमसमूह इत्यादी मध्ये सहयोग देण्याचे प्रयत्न होताना दिसून येते अशाप्रकारे प्रत्येक देशातील लोकांचे एकमेकांच्या संस्कृतीचे विचार देवाण घेवाण होताना दिसतात.

**३) राजकीय आणि सुरक्षा सहकार्य :**

ब्रिक्स देशातील सदस्य राजकीय आणि सुरक्षेच्या संदर्भात सहकार्य करणे उद्दिष्टय ठेवले आहे. त्यात प्रामुख्याने जागतिक शांतता, सुरक्षा विकास आणि आधिक न्यायीक आणि निपक्षपातीपणे सहयोग देणे अपेक्षीत आहे. ब्रिक्स सदस्य राष्ट्रांनी आपल्या देशातील सर्वोत्तम कार्याचे आदानप्रदान करण्यासाठी संधी उपलब्ध करून देतात.

## ४) सहयोग किंवा सहकार्याची तंत्रे :

यामध्ये प्रामुख्याने देशाच्या शासन व्यवस्थेच्या माध्यमातून व्यापार परिषद किंवा सामाजिक क्षेत्रामध्ये सहकार्य करणे ब्रिक्स देशाचे उद्दिष्टय मानले जाते. अशा प्रकारे ब्रिक्स देशामध्ये सहकार्य किंवा योगदान देताना दिसून येते.

**नवीन विकास बँक** (New Development Bank) :

सन २०१३ साली पाचवी ब्रिक्स परिषद दरबान येथे आयोजित करण्यात आले होते. त्याचे प्रमुख विषय होते. ब्रिक्स व विकास ऐक्य व औद्योगिकीकरण यांच्यासाठी भागीदारी यावर चर्चा करण्यात आली. त्यामधून नवीन विकास बँकेची कल्पना सुचली व ब्रिक्स विकास बँकेची कल्पना मांडण्यात आली. पुढे २०१४ साली अधिकृतरित्या नवीन विकास बँकेची घोषणा करण्यात आली. जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांना पर्यायी म्हणून बहुस्तरीय विकास बँक असावी म्हणून या बँकेची स्थापना करण्यात आली आणि नवीन विकास बँकेच्या करारावर सही करण्यात आली. पर्यायी जागतिक वित्तव्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टिने नावीन विकास बँक हे ब्रिक्सचे यश आहे. उदयोन्मुख व विकसनशील देशामधील रस्ते, बंदरे, वीज व रेल्वे सुविधांना आर्थिक मदत पुरवण्याचा प्रस्ताव ब्रिक्स विकास बँकेने ठेवला होता. परंतु देशाकडून निधी योगदान देण्याच्या मुद्यावरून हा प्रस्ताव वादात अडकला असे असले तरी नवीन विकास बँकही ब्रिक्स संघटनेची आर्थिक वृद्धी करणारी महत्वपूर्ण बँक आहे. या बँकेचे कार्यालय शांघाय येथे आहे.

**नविन विकास बँकेची उद्दिष्टये :**

१) ही बँक शंभर अब्ज डॉलरचे प्रारंभिक भांडवल सदस्य देशामधील व परदेशातील पायाभूत व शाश्वत विकास प्रकल्पांना निधी पुरविण्यासाठी वापरणार आहे. २) विकासाच्या संदर्भात आणि पायाभूत सुविधांना वित्तपुरवठा करण्याला प्राधान्य देण्याच्या दृष्टिने बँक कार्य करेल. ३) या बँकेचा भांडवली पाया शंभर अब्ज डॉलरचा असेल आणि प्रारंभिक वर्गणी भांडवल ५० अब्ज डॉलरचे असेल त्याचा भार पाचही सदस्यांनी समसमान प्रमाणात उचललेला असेल. ४) ब्रिक्स व इतर उदयोन्मुख आणि विकसनशील देशांमधील पायाभूत व शाश्वत प्रकल्पांना वित्तपुरवठा करण्याचे काम बँक करेल. ५) आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक या वर्चस्व असलेल्या संस्थांना पर्यायी म्हणून नविन विकास बँक काम करेल. अशा प्रकारे नविन विकास बँकेचे उद्दिष्टय ठरविण्यात आले आहे. परंतु विकास दर वाढीच्या बाबतीत सर्वोत्कृष्ट कामगिरी करण्या सोबतचा चालू खात्यात प्रचंड वाढीव साठा आणि परकीय चलनाचा अवाढव्य साठा चीनने केलेला आहे त्यामुळे यावर चीनचे वर्चस्व राहिल्याचे दिसून येते.

**ब्रिक्सचे मूल्यमापन :**

ब्रिक्स संघटना आर्थिक विकासासाठी स्थापन केली असली तरी आर्थिक संकटासोबतच देशांना वाढत्या अंतर्गत दबावालाही सामोरे जावे लागले आहे. ब्राझील आर्थिक मंदीला तोंड देत आहे. रशिया निर्बंधना सामोरे जात आहे. पायाभूत सुविधांच्या दृष्टिकोनातून दक्षिण आफ्रिका खूपच मागे आहे. चीन स्वतःची ग्राहकाभिमुख बाजारपेठीय अर्थव्यवस्था ही प्रतिमा तयार करण्यासाठी संघर्ष करतो आहे. चीनच्या अर्थव्यवस्थेच्या मंदीवरून ब्रिक्सच्या प्रगतीवर ही परिणाम होताना दिसतो कारण ब्रिक्सच्या मुख्य भागीदारी चीनचा जास्त आहे. यामध्ये

भारत मात्र प्रगतीमध्ये आशावादी आहे ब्रिक्सचे नवीन वित्तीय पर्याय उभे करण्यासाठी रशिया व चीन, चीन आणि भारत याच्यातील मतभेद मिटवणे गरजेचे आहे. अन्यथा ब्रिक्सचे यशस्वी होणे कठीण होऊन बसते.

**साफ्टा** (SAFTA) **दक्षिण आशिया मुक्त व्यापार देश :**

साफ्टा ही एक मुक्त व्यापार क्षेत्र निर्मितीचे उद्दिष्ट ठेवलेली करार आहे. साफ्टा हे सार्क देशाच्या संदर्भातील करार आहे. साफ्टाच्या माध्यमातून सार्क सदस्यांच्या राष्ट्रामध्ये मुक्त व्यापार करण्याची चर्चा झाली त्यानुसार सुरूवातीला साफ्टा करार करण्यात आला. साफ्टा करार म्हणजे दक्षिण आशिया उपखंडात विभागीय पातळीवर व्यापार उदारीकरणांचे साधन आहे. या कराराद्वारे सार्कच्या सदस्य राष्ट्रामध्ये व्यापार वाढावा यासाठी व्यापार सवलत आणि जकात करात कपात करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. त्यानुसार दोन हजारहून अधिक वस्तूवरील जकात करात कपात केली आहे.

साप्टाचे रूपांतर २००१ पर्यंत दक्षिण आशिया मुक्त व्यापार क्षेत्रामध्ये म्हणजेच SAFTA मध्ये करण्याचे ठरविण्यात आले आहे. परंतु साप्टाच्या अंमलबजावणीलाच विलंब लागत असल्यामुळे मुक्त व्यापार निर्मितीचे क्षेत्र निर्माण करण्याचे उद्दिष्ट हे २००५ पर्यंत पुढे ढकलण्यात आले. साप्टा कराराच्या संथ गतीने होणाऱ्या प्रगतीमुळे २००५ पर्यंत देखील मुक्त व्यापार क्षेत्राच्या निर्मितीचे उद्दिष्ट गाठण्यात आले नव्हते. त्यामुळे पुन्हा एकदा उद्दिष्टाला मुदतवाढ देण्यात आली आहे. अशा प्रकारे अखेरीस २००६ साली साप्टाचे कार्यास सुरूवात झाली आहे.

**साफ्टाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

दक्षिण आशियाई राष्ट्रांची विभागीय पातळीवर सहकार्य संघटना असायला हवी ही कल्पना बांगलादेशचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष झिया-उल-रहमान यांनी नोव्हेंबर १९८० मध्ये मांडली. दक्षिण आशिया उपखंडातील सात राष्ट्रांच्या परराष्ट्र सचिवांची एप्रिल १९८१ मध्ये कोलंबो येथे एक औपचारिक बैठक होऊन या बैठकीमध्ये परराष्ट्र मंत्री पातळीवर बैठक व्हायला हवी, यावर जोर देण्यात आला. ऑगस्ट १९८३ मध्ये नवी दिल्ली येथे सात दक्षिण आशियाई राष्ट्रांच्या परराष्ट्र मंत्र्यांची बैठक झाली आणि या बैठकीमध्ये दक्षिण आशियाई राष्ट्रांच्या विभागीय सहकार्य संघटनेच्या स्थापनेचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीमध्ये विभगीय सहकार्यासाठी एक एकात्मिक कृतिकार्यक्रम (Integrated Programme of Acion) बनविण्यात आला या कार्यक्रमांतर्गत कोणत्या क्षेत्रामध्ये प्रारंभ सहकार्य व्हायला हवे हे ठरविण्यात आले. ७-८ डिसेंबर, १९८५ ला बांगलादेश, नेपाळ, भूतान, श्रीलंका आणि मालदिवच्या राष्ट्र-प्रमुखांची बैठक होऊन सार्क संघटनेची स्थापना झाली. दक्षिण आशियाई राष्ट्रांची सामूहिक शक्ती (Collective Strength) जगापुढे यावी आणि या राष्ट्रामध्ये राजकीय आणि आर्थिक सहकार्य प्रस्थावित व्हावे, हा सार्कच्या स्थापनेमागील मुख्य उद्देश होता. जुलै १९९१ मध्ये माले येथे झालेल्या मंत्रिपातळीवरील नवव्या बैठकीमध्ये आर्थिक सहकार्य समितीच्या (Committee on Ecohomic co-operation) स्थापनेचा निर्णय घेण्यात आला. डिसेंबर १९९१ मध्ये कोलंबो येथे झालेल्या सार्क राष्ट्रप्रमुखांच्या बैठकीत व्यापार सवलती आणि जकात करासंबंधी नियमावली तयार करण्यासाठी आंतरराज्यीय संघाची (Inter Governmental Group-IGG) स्थापना करण्यात आली, या संघाने प्राधान्यक्रम व्यापार कराराचा मसुदा तयार केला. (Preferntial Trading Agreement) मसुदा तयार केला. डिसेंबर १९९५ मध्ये सार्कच्या सर्व सात सदस्य राष्ट्रांनी मंजुरी

दिल्या नंतर दक्षिण आशियाई प्राधान्यक्रम व्यापार करार (SAARC Preferntial Trading Agreement) अस्तित्वात आला. मे, १९९७ मध्ये माले येथे झालेल्या सार्क राष्ट्रप्रमुखांच्या बैठकीमध्ये दक्षिण आशियामध्ये विभागीय पातळीवर मुक्त व्यापार क्षेत्र निर्माण करण्यावर चर्चा झाली. त्यानुसार २००१ पर्यंत मुक्त व्यापार क्षेत्र निर्मितीचे उद्दिष्टय ढरविण्यात आले. परंतु साफ्टाच्या अंमलबजावणीला विलंब होत असल्यामुळे मुक्त व्यापार निर्मितीचे उद्दिष्टये २००५ पर्यंत पुढे ढकलण्यात आले होते. साफ्टाच्या संगतीमुळे पुढे २००६ पर्यंत ढकलण्यात आले व शेवटी २००६ ला साफ्टाची कार्यसूची ठरविण्यात आली.

**साफ्टा करार :**

दक्षिण आशियामध्ये मुक्त व्यापार क्षेत्र, सामुहिक बाजारपेठ, जकात संघ निर्माण करण्याची पहिली पायरी म्हणजे साप्टा करार आहे. याच कराराचे रूपांतर पुढे दक्षिण आशिया मुक्त व्यापार क्षेत्रामध्ये होईल.

**साप्टाची प्रमुख उद्दिष्टये :**

१) विभागीय पातळीवर व्यापाराचे उदारीकरण (Regional Trade Liberalisation) करणे. २) दक्षिण आशिया विभागीय पातळीवर व्यापाराला प्रोत्साहन देणे. ३) जकात करात कपात करणे. ४) परस्परांना व्यापार सवलती बहाल करणे. ५) परस्परांना प्राधान्यशील व्यापार दर्जा म्हणजेच 'Most Fauoured Nation Status.' ६) दुहेरी करपद्धतीचे निर्मूलन करणे. ७) आर्थिक गुंतवणुकीला प्राधान्य देणे. ८) विभागीय व्यापाराचे फायदे सर्व राष्ट्रांना समान पद्धतीने मिळवून देणे. ९) दक्षिण आशिया क्षेत्रामध्ये द्विपक्षीय, बहुपक्षीय तसेच उपविभागीय (Subregional) व्यापाराला प्रोत्साहन देणे. दक्षिण आशियाई राष्ट्रामध्ये आर्थिक आणि व्यापारी सहकार्य वाढीस लागून परस्पर विश्वास निर्माण व्हावा या दृष्टिने साप्टाचे (SAPTA) माध्यम महत्वपूर्ण ठरणार आहे.

**साप्टा ते साफ्टा** (SAPTA TO SAFTA) :

आंतरराष्ट्रीय पातळीवर सार्क संघटनेने सार्कमधील देशाच्या व्यापारात येणारे अडथळे दूर करण्यासाठी १८ डिसेंबर २००५ रोजी दिल्ली येथे सार्क देशाच्या विदेश मंत्र्याद्वारे SAFTA ची घोषणा करण्यात आली. साप्टाची जागा साफ्टा घेतली. SAFTA मुळे २५० मिलियन अमेरिकन डॉलर्स पर्यंत वाढ होणार आहे. साफ्टाच्या करारावर ६ जानेवारी २००४ रोजी स्वाक्षरी करण्यात आली आणि कराराची अंमलबजावणी १ जानेवारी २००६ रोजी झाली आणि व्यापार उदारीकरण कार्यक्रम १ जुलै, २००६ रोजी सुरू झाला. या करारानुसार खालील तरतूदी करण्यात आले आहेत.

१) दोन वर्षात भारत व पाकिस्तान टॅरिफ दरात २०% घट करतील इतर सार्क सदस्य देश २००९ सालापर्यंत जकात शूल्क २०% पर्यंत आणतील.

२) पाच वर्षामध्ये भारत व पाकिस्तान आयात शूल्क घटवून ५% किंवा त्यापेक्षा कमी करतील श्रीलंका ६ वर्षामध्ये व इतर सदस्य देश ८ वर्षामध्ये करतील.

३) सन २०१६ पर्यंत मुक्त व्यापारक्षेत्र निर्मितीचे उद्दिष्ट निर्धारित करण्यात येईल.

४) दक्षिण आशियाई मुक्त व्यापार SAFTA निर्माण करण्यासाठी सार्क प्रयत्न करेल. अशाप्रकारे तरतूदी केल्यानुसार त्यानुसार SAFTA स्थापन करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

**साफ्टाचे मूल्यमापन :**

साफ्टाने WTO च्या संस्था व व्यवहार ह्यांचा मोठ्या प्रमाणावर स्वीकार केला आहे. सदस्य सभासद देशामधील मतभेद मिटविणे सुरक्षा उपाय, शोधन शोधात संतुलन आणने तसेच भूतान, नेपाळ, मालदीव व बांगलादेश ह्यासारख्या किमान विकसित देशाकरिता 'अधिक संपत्ती देणे' कलम लावणे अशा प्रकारचे व्यवहार राहतील WTO प्रमाणेच कोणत्याही देशाला साफ्टाच्या स्थापनेनंतर (१ जाने. २००६) त्यातून बाहेर पडण्याचा अधिकार आहे साफ्टाचे त्याग करावयाचे झाल्यास तशी सूचना सहा महिने आधी घ्यावी लागते. WTO प्रमाणेच साफ्टामध्ये सुद्धा सदस्य देशांच्या व्यापार मंत्र्यांची मंत्रीस्तरीय परिषद असेल. करार लागू करण्याकरिता तज्ज्ञाची एक समिती असेल सार्कमधील देशांची व्यापारी समाजाने SAFTA चे स्वागत केले आहे. स्वास्थ्य पर्यटन तसेच मनोरंजन ह्यासारख्या सेवा क्षेत्रात द्विपक्षीय व्यापाराच्या मोठ्या विकासाची शक्यता वाटत आहे. ह्याच्या परिवहन लिंकची स्थापना होईल. हिस्सा देण्याबाबत पद्धतीत द्यावी लागेल. एकूणच साफ्टाच्या करारामुळे सार्क सदस्य राष्ट्रामध्ये मुक्त व्यापाराची निर्मिती होईल. त्यामुळे साफ्टस करार महत्वाचे आहे.

**शांघाय सहकार्य संघटना :**

शांघाय सहकार्य संघटना ही १९९६ साली चीन कजाकिस्तान, किर्गिस्तान, रशिया आणि तजाकिस्तान या पाच देशांना मिळून शांघाय V या नावाने शांघाई येथे स्थापन झाले. पुढे २००१ साली उज्बेकिस्तान या देशाला सामाविष्ट करून शांघाई VI असे नाव देण्यात आले आणि १५ जून २००१ रोजी शांघाय सहकार्य संघटना असे नाव बदलण्यात आले. रशिया व चीन यांच्या सिमेवरील प्रदेशामधील अमेरिका किंवा नाटो यांचा हस्तक्षेप होऊन निर्माण होणारा संघर्ष टाळण्यासाठी ही संघटना स्थापन करण्यात आली. पुढे २४ जून २०१६ रोजी भारत आणि पाकिस्तानला औपचारिक तत्वावर सभासदत्व देण्यात आले आहे. अशाप्रकारे सद्या आठ सदस्य आहेत त्याचे उद्दिष्टये पुढील प्रमाणे आहेत.

**शांघाय सहकार्य संघटनेची उद्दिष्टये :**

१) सदस्य देशामध्ये परस्परावरील विश्वास आणि सदभावना मजबूत करणे किंवा वाढविणे. २) राजकीय व्यापार आणि अर्थव्यवस्था, संशोधन, औद्योगिक, संस्कृतिक सहकार्य सदस्य राष्ट्रामध्ये निर्माण करणे. ३) सदस्य राष्ट्रांच्या शिक्षण, उर्जा, परिवहन, पर्यटन, पर्यावरणाचे संरक्षण इत्यादी क्षेत्रामध्ये संबंध प्रस्थापित करणे. ४) सदस्य राष्ट्रांच्या संबंधित क्षेत्रामध्ये शांतता, सुरक्षितता व स्थिरता प्रस्थापित करणे. ५) एक लोकशाही, निपक्षपातीपणे एक नवे आंतरराष्ट्रीय राजकीय आणि आर्थिक व्यवस्था प्रस्तापित करणे.

**शांघाय सहकार्य संघटनेची रचना : राष्ट्रप्रमुखाची परिषद :**

ही परिषद शांघाय सहकार्य संघटनेची सर्वोच्च परिषद असून राष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय संघटनेबरोबर संवाद करणे आंतरराष्ट्रीय मुद्दयावर विचार करणे हे महत्वाचे कार्य असते.

**शासनप्रमुखाची परिषद :**

शांघाय सहकार्य संघटनेचे अंतर्गत आर्थिक क्षेत्राच्या संबधित गोष्टीवर निर्णय घेणारी आणि संघटनेच्या आर्थिक संकल्प मंजूर करण्याचे कार्य करते.

**परराष्ट्र मंत्र्यांची परिषद :**

ही परिषद दैनंदिन घडामोडीचा अभ्यास करणे आणि त्यावर विचार करणे इत्यादी.

**प्रादेशिक आंतकवाद विरोधी संघटना :**

आंतकवाद, अलगतावाद, उग्रवाद इत्यादी दूर करण्यासाठी कार्य करीत असते.

**शांघाई सहकार्य संघटना सचिवालय :**

संघटनेच्या कार्यासाठी सूचना करते, संघटनात्मक सहाय्य करणे इत्यादी कार्ये करत असून सचिवालय बीजिंग येथे आहे.

**शांघाय सहकार्य संघटनेची वैशिष्टये :**

१) शांघाय सहकार्य संघटनेतील देशामध्ये जगाच्या ४०% लोकसंख्या, जागतिक जवळपास २०% आणि जगाच्या २२% भौगोलिक भूभाग समाविष्ट आहे. २) शांघाय सहकार्य संघटना ही आशियाई क्षेत्रातील राजकीयदृष्टया निर्णायक व महत्त्वाची भूमिका पार पाडते. ३) म्हणून शांघाय सहकार्य संघटना ही आशिया क्षेत्राला नियंत्रित करणे आणि अमेरिकेच्या प्रभावाला निर्बंध घालण्यास सक्षम आहे. ४) शांघाय सहकार्य संघटना ही उत्तर अटलांटिक करार संघटनेच्या समकक्ष स्वरूपाचे आहे.

**शांघाय सहकार्य संघटनेचे मूल्यमापन :**

शांघाय सहकार्य संघटना हे सदस्य राष्ट्रामध्ये व जागतिक पातळीवर शांतता स्थिरता प्रस्थापित करण्यासाठी आणि अमेरिकेच्या प्रभावाला बळी पडू नये म्हणून स्थापन करण्यात आले आहे. परंतु आज या संघटनेपुढे सदस्य राष्ट्रामधील आंतकवाद, उग्रवाद आणि अलगतावादाशी संघर्ष करण्याचे आव्हान आहे. त्याच बरोबर मादक पदार्थ आणि साधनसामग्री (स्फोटक साहित्य) इत्यादींचा तस्करी करण्यासाठी समस्या मोठ्या प्रमाणात आहे. त्याच बरोबर भौगोलिकदृष्टया जवळ असले तरी या संघटनेच्या सदस्यांचा इतिहास, पार्श्वभूमी, भाषा, राष्ट्रीय आणि शासन संपन्नता आणि संस्कृती यामध्ये विविधता मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे त्याबाबत निर्णय घेताना अडथळे निर्माण होतात.

असे असले तरी भारताला मात्र सदस्यत्व मिळाल्यामुळे भारताला एका आंतरराष्ट्रीय विचारमंच प्राप्त झाले आहे. शांघाय सहकार्य संघटनेच्या माध्यमातून भारताला आतंकवादाला दहशतवादाला आळा घालण्यासाठी चीनचे सहकार्य मिळविणे आवश्यक आहे. अशा प्रकारे शांघाय सहकार्य संघटना एक महत्वाची संघटना म्हणून उदयास आल्याचे दिसून येते.

## सारांश :

आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये आर्थिक मुद्दा महत्वाचा आहे. जागतिक अर्थकारणाचा विचार करताना त्यामध्ये प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, विश्व व्यापार संघटना इत्यादी संघटना महत्वाचे आहेत. त्याचबरोबर नव्याने उदयास आलेल्या ब्रिक्स, साफ्टा, शांघाय सहकार्य संघटना इत्यादी संघटना ही महत्वाची आहेत. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक आणि विश्व व्यापार संघटना या दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील आर्थिक संकटातून सावरण्यासाठी स्थापन झाले आहेत. या संघटना जगातील विकसनशील देशांना कर्जपुरवठा

करणे पुनर्रचना करण्याचे कार्य करत होते. परंतु जागतीकीकरणाचा स्वीकार केल्यानंतर मात्र आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक यांना महत्व प्राप्त झाले आहे. या संघटना कर्ज पुरवठा करण्याबरोबरच सल्ला देणे. तांत्रिक सहकार्य करणे इत्यादी कार्य सुद्धा पार पाडणे.

तसेच ब्रिक्स, शांघाय आणि साफ्टा या संघटना मात्र प्रादेशिक पातळीवर कार्यरत असून ही ब्रिक्स सारखी संघटना नवीन विकास बँक स्थापन करून आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बॅंकेला पर्याय देण्याचा प्रयत्न करणे तर साफ्टा ही सार्कच्या सदस्य राष्ट्रामध्ये व्यापार मुक्त करण्याची संकल्पना मांडते व त्यासाठी कार्यरत असते. शांघाय सहकार्य संघटना ही संरक्षणाच्या आणि शांततेच्या दृष्टिने तसेच दहशतवादाला आळा घालण्यासाठी निर्माण झालेली संघटना आहे. एकूणच जागतिक अर्थकारणामध्ये या संघटना महत्वाची भूमिका पार पाडताना दिसतात.

## पारिभाषिक शब्द व अर्थ :

WTO – जागतिक व्यापार संघटना

ब्रिक्स – ब्राझील, रशिया, इंडिया, चायना व साऊथ आफ्रिका या देशांचे लघुरूप.

SAFTA – दक्षिण आशियाई देशातील मुक्त व्यापार करार

शांघाय – पाच सदस्य राष्ट्रांनी एकत्रित येऊन एकमेकांना सहकार्य करण्याच्या उद्देशांनी शांघाय येथे स्थापना केलेली संघटना

## स्वाध्यायासाठी प्रश्न :

१) विश्व व्यापार संघटनेची रचना व कार्ये स्पष्ट करा.

२) आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या रचना व कार्याची चर्चा करा.

३) जागतिक बँकेची रचना उद्दिष्टये व कार्ये विशद करा.

४) ब्रिक्स संघटनेविशषयी निबंध लिहा.

५) साफ्टाच्या स्थापनेसंदर्भात चर्चा करा.

६) शांघाय सहकार्य संघटनेची चर्चा करा.

## अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :

१) देवळाणकर शैलेंद्र (२०१०) आंतरराष्ट्रीय संबंध, आंतरराष्ट्रीय संबंध, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद.

२) देवळाणकर शैलेंद्र (२०१०), भारतीय परराष्ट्र धोरण सातत्य आणि स्थित्यंतर, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

३) भामरे जी. एन. (२०१३) आंतरराष्ट्रीय व्यापार आणि वित्त, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर

४) Ghai U. R. (2004), International Politics - Theory and Practice, New Aca-demic Publishry Co. Jalandhar.

❑❑❑

## प्रकरण – ४

# आंतरराष्ट्रीय राजकारणातील मुख्य समस्या

## (Major Issues)

*************************************************************

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

- ४.२.१ मानवी हक्क, मानवी तस्करी आणि स्थलांतर
- ४.२.२ पर्यावरण आणि शाश्वत विकास
- ४.२.३ अण्वस्त्र प्रसार व दहशतवाद
- ४.२.४ जागतिक राजकारण आणि राज्याचे सार्वभौमत्व

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द

४.५ सरावासाठी स्वाध्याय

४.६ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


## ४.० उद्दिष्टे

राज्यशास्त्रामध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणाला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे सध्या आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अनेक समस्यामुळे हा विषय अधिक वादग्रस्त बनत आहे. आंतरराष्ट्रीय राजकारण व आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक मुख्य समस्या निर्माण झालेल्या आहेत. प्रस्तुत घटक लेखनामध्ये मुख्य समस्या या शीर्षकाखाली मानवी हक्क, मानवी तस्करी, स्थलांतर, पर्यावरण, शाश्वत विकास, परमाणू वृद्धी, दहशतवाद, जागतिक राजकारण आणि राज्याच्या सार्वभौमत्वाचा प्रश्न इत्यादी ज्वलंत समस्या आंतरराष्ट्रीय राजकारणात निर्माण झालेल्या आहेत या समस्यांची सविस्तर मांडणी व त्यावरील उपाय योजना चा लेखाजोखा आपण प्रस्तुत घटकांमध्ये मांडणार आहोत.

## ४.१ प्रास्ताविक

आंतरराष्ट्रीय राजकारणातील मुख्य समस्यांची मांडणी करण्यात आली आहे. यात मानवाशी संबंधित अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत त्यामध्ये मानवी हक्क, मानवी तस्करी, स्थलांतर हे प्रमुख तीन प्रश्न आहेत. पर्यावरणाशी

संबंधित अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत त्यामध्ये पर्यावरण व पर्यावरणीय समस्या आणि शाश्वत विकास यांचा समावेश होतो. परमाणू वृध्दी व दहशतवाद या प्रश्नांची चर्चा करण्यात आली आहे तसेच जागतिक राजकारणामुळे राज्यांच्या सार्वभौमत्वाची मांडणी केली आहे. विभागांमधील सर्व समस्यांची मांडणी आंतरराष्ट्रीय राजकारण समोर ठेवून केली आहे

## ४.२ विषय विवेचन

प्रस्तुत घटक लेखनामध्ये मानवी हक्क, मानवी तस्करी, स्थलांतरण, परमाणू वृध्दी, दहशतवाद, जागतिक राजकारण आणि राज्याचे सार्वभौमत्व इत्यादी आंतरराष्ट्रीय प्रमुख समस्यांचा अभ्यास करणार आहोत. वरील प्रत्येक उपघटकांचा अभ्यास व त्यांची मांडणी सविस्तरपणे पुढीलप्रमाणे

### ४.२.१ मानवी हक्क, मानवी तस्करी आणि स्थलांतरण

❖ **(अ) मानवी हक्क** (Human Rights)

मानवी हक्क चळवळीस दुसऱ्या महायुद्धानंतर जोर मिळाला तरी ही संकल्पना सर्व प्रथम धर्म, संस्कृती आणि तत्वज्ञानात आढळते. ज्ञात इतिहासात मानवी हक्कांविषयी चा सर्वात जुना संदर्भ इसवी सन पूर्व २३५० सालातील 'लगाश' मधील उरुकागिना येथील सुधारणेबाबत येतो. त्यानंतरचा त्याचा उल्लेख नव-सुमेरियन संस्कृतीतील उर नम्मूच्या संहितेमध्ये आढळतो. प्राचीन इराणी साम्राज्याने इसवी सन पूर्व ५३९ साली घोषित केलेली सायरस वृत्तचित्ती हा मानवी अधिकार विषयीचा प्रथम लिखित दस्तऐवज मानण्यात येतो. या सायरस वृत्तचितीद्वारे गुलामांची प्रथा संपुष्टात आणण्यात आली. भारतातील मौर्य साम्राज्याने घालून दिलेली तत्वे तत्कालीन काळात अभूतपूर्व होती. कलिंग युद्धामुळे सम्राट अशोकाच्या धोरणामध्ये मानवी हक्कांना प्राधान्य मिळाले. इस्लाम धर्माच्या उदयानंतर अरबस्थानात मानवी अधिकारास स्थान प्राप्त झाले. मुहम्मद पैगंबरांनी इसवी सन ६२२ मध्ये मदिनेची सनद तयार केली. हा मानवाधिकाराचा एक भाग होता

मानवी हक्काची संकल्पना नैसर्गिक कायदा ह्या संकल्पनेचे अपत्य आहे जन्मानेच माणूस काही अधिकार हक्क घेऊन येतो. त्या आधारावर मानवी हक्काची मांडणी करण्यात येते. ही संकल्पना ग्रीक व रोमन विचारवंतांच्या तसेच ख्रिस्ती तत्त्वज्ञानात आणि थॉमस ॲक्विनसच्या लिखाणातून मांडली केल्याचे दिसते. सतराव्या शतकात कायद्याचा जनक म्हणून ओळखल्या गेलेल्या ह्युगो ग्रोशिअस मिल्टनलॉक या विचारवंतांच्या लेखणीतून ही मांडली गेली.

मानवी हक्काचा उगम प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञांनी निर्माण केलेल्या नैसर्गिक हक्क सिद्धांत मध्ये आढळतो. परिणामी मानवी हक्कांना नैसर्गिक हक्कांचे आधुनिक स्वरूप मानले जाते. इंग्लंडमध्ये मॅग्नाकार्टा या नावाने ओळखला जाणारा कायदा १२१५ ला संमत झाला. तेव्हापासून राज्यसत्तेच्या अधिकारावर बंधने असावीत, ही संकल्पना रुजली. थॉमस हॉब्ज याने 'Leviathan' या ग्रंथात आणि जॉन लॉक यांनी 'Two Treaties of Government' या ग्रंथात मानवाधिकार संकल्पनेचा विकास घडवून आणला. सतराव्या शतकात हॉब्ज व लॉक हे सामाजिक कराराचे पुरस्कर्ते होते. हॉब्ज व लॉक च्या मते, 'नैसर्गिक हक्काची निर्मिती' राज्य अस्तित्वात येण्यापूर्वीच झाली आहे. नैसर्गिक अधिकारांना दैवी अधिकाराचे स्वरूपही १६ व १७ व्या शतकात देण्यात आले पुढील काळात नैसर्गिक

अधिकारांचे दैवी अधिष्ठान नष्ट झाल्यानंतर त्यांना मानवाचे अधिकार म्हणून संबोधले जाऊ लागले.

हॉब्ज, लॉक व रुसो या विचारवंतांच्या विचाराचा प्रचंड प्रभाव अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध १७७६ व फ्रेंच राज्यक्रांती १७८९ वर पडला. अमेरिकन स्वातंत्र्य युद्ध यामध्ये मानवी हक्कांचे रक्षण हाच प्रमुख येत होता. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर व्यक्तिस्वातंत्र्याचा व नागरिकांच्या जीवन, स्वातंत्र्य, समता आणि आत्मसन्माना संबंधित असतात, त्याची घटनेने हमी दिलेली असते किंवा ते आंतरराष्ट्रीय करारामध्ये अंतर्भूत असतात आणि ते न्यायालयाद्वारे न्याय प्रविष्ट असतात.

## ❖ आंतरराष्ट्रीय जागतिक स्तरावर मानवाधिकारांची उत्क्रांती व विकास

जागतिक स्तरावर जो सध्याचा मानवाधिकार आयोग कार्यरत आहे. त्यांचा आधार म्हणून पुढील देशातील वेगवेगळ्या कायद्यांना मानले जाते. इंग्लंडमध्ये राजसत्तेला नियंत्रित करण्याच्या दीर्घ कालावधी दरम्यान संमत करण्यात आलेले सन १२१५ चा मॅग्नाकार्टा करार, १६२८ चा पिटिशन ऑफ राईटस्, १६८९ चा बिल ऑफ राईटस् हे ब्रिटिशांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करणारे आणि राजेशाही च्या अधिकारावर बंधने आणणारे प्रमुख करार आहेत. १७८९ साली फ्रेंच राज्यक्रांती दरम्यान मानव व नागरिकांच्या हक्कांचा जाहिरनामा घोषित करण्यात आला. या जाहीरनाम्यामुळे संपूर्ण जगाला स्वातंत्र्य, समता व बंधुतेचा संदेश देण्यात आला. अमेरिकन स्वातंत्र्य युद्धानंतर (१७७६) सन १७९१ साली 'अमेरिकन बिल ऑफ राइट्स' घोषित करण्यात आला. १६ ते २० च्या शतकामध्ये आंतरराष्ट्रीय करारामुळे मानवाधिकारांच्या संकल्पनेला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले. या करारामध्ये धार्मिक अल्पसंख्यांकांच्या हक्कांचे संरक्षण, गुलामगिरी नष्ट करणे, कामगारांचे हितसंबंध, युद्धादरम्यान निष्पाप नागरिकावर हल्ला न करणे इत्यादी हक्कावर भर होता. १९१७ सालच्या रशियन राज्यक्रांतीनंतर रशियात साम्यवादी सरकार प्रस्थापित झाली. या क्रांती मागची प्रेरणा जनतेला सामाजिक-आर्थिक शोषणातून मुक्त करून, हक्कांचा जाहिरनामा हा एक महत्त्वाचा टप्पा होता. इंग्लंडमध्ये राजाच्या सत्तेला पूर्णपणे काबूत आणून प्रातिनिधिक संस्थेचे सार्वभौमत्व प्रस्थापित झाले. हा लोकशाहीचा विजय होता. सार्वभौमत्वाचा परिपाक म्हणजे कायद्याचे अधिराज्य स्थापन होणे हा होय. फ्रान्समधील क्रांतीत मानवी हक्कांची प्रेरणा होती. भारताच्या संविधानात अंतर्भूत झालेल्या मूलभूत अधिकारांची ही प्रेरणा मानवी हक्क होते.

## ❖ मानवाधिकार अर्थ व संकल्पना

हक्क म्हणजे आपल्या विकासासाठी आपण केलेल्या मागण्या होय. या मागण्यांना जेव्हा समाज मान्यता व राजमान्यता मिळते तेव्हा त्यांचे हक्कात रूपांतर होते. हेरॉल्ड लॉस्कीच्या मते, 'हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थिती की ज्याशिवाय कोणत्याही व्यक्तीस स्वतःची संपूर्ण प्रगती साध्य करता येत नाही.' हे हक्क नैतिक, कायदेशीर, राजकीय, आर्थिक स्वरूपाचे असतात. हे व्यक्तींना जन्मानेच प्राप्त होतात. व्यक्ती मानव म्हणून जन्माला आल्याने त्याला आपोआप प्राप्त होणाऱ्या हक्कांना मानवाधिकार मानवी हक्क असे म्हणतात. जन्माने प्राप्त झालेले हक्क समाजाने बहाल केलेले नसतात परंतु त्यांना मान्य केलेले असते. जन्माने मिळाले हक्क कोणालाही काढून घेता येत नाहीत. मानवी कुटूंबाचे सदस्य या नात्याने सर्व व्यक्तींना मानवी हक्क प्राप्त होतात. एखाद्या देशांचे प्रदान केलेल्या मानवाधिकारांना मूलभूत हक्क असे म्हणतात.

**व्याख्या :**

**१) रॅन्डमहाऊन विश्वकोष :**

''मानवाधिकार म्हणजे व्यक्तीला जन्माने प्राप्त झालेले असे अधिकार जे व्यक्तीला आत्मसन्मानाने जगण्यासाठी अत्यावश्यक असतात.''

**२) मानव अधिकार कायदा १९९३ च्या सेक्शन २ (d) नुसार :**

''मानवाधिकार हे त्यांच्या सामाजिक व आर्थिक हक्कांना संरक्षण देणे ही होती. १९४५ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेपासून मानवाधिकाराच्या तत्वज्ञानाला निश्चित स्वरूप प्राप्त झाले आणि मानवाधिकार चळवळीला खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले.''

ड्वार्किन याच्यामते,''मानवाधिकार हे मानवाला प्राप्त झालेले असे अधिकार असतात ज्यांचे सार्वजनिक हितासाठी देखील शासनाकडून उल्लंघन होऊ शकत नाही आणि राष्ट्रीय कायद्याशिवाय देखील ते उपभोक्ता येऊ शकतात.''

❖ **जागतिक मानवाधिकार :**

मानवी हक्क किंवा मानवी अधिकार हे मानवाचे मूलभूत हक्क आहेत. मानवी अधिकार हे जागतिक असून सर्वांना समान आहेत. हे हक्क उपजत असतात किंवा कायदेशीर असतात. जगातील सर्व मानवाचे एक स्वतंत्र असे व्यासपीठ असे की ज्या माध्यमातून मानवाच्या हक्कांचे सरंक्षण व्हावे या दृष्टिकोनातून आणि जगातील विविध देशांच्यामध्ये होत असलेल्या मानवाच्या वरील अन्यायाविरूद्ध न्याय मिळवण्यासाठी संयुक्त संघाने १० डिसेंबर १९४८ रोजी 'मानवी अधिकारांचा जागतिक जाहिरनामा' प्रसिद्ध केला.

जून १९४६ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या 'आर्थिक व सामाजिक परिषदेने एक कायमस्वरूपी 'मानवाधिकार आयोग स्थापन केला. संयुक्त राष्ट्रसंघाने या आयोगाला मानवाधिकाराबाबत एक आंतरराष्ट्रीय बिल ऑफ राईटस् तयार करण्याचे कार्य देण्यात आले. जानेवारी १९४७ मध्ये या आयोगाचे एका नऊ-सदस्यीय मसुदा समितीची स्थापना केली.

या समितीचे अध्यक्ष इलिनॉव रूझवेल्ट हे होते. त्यामध्ये पेंग चुग, चार्लस् हबीब मलिक, विल्यम्, रॉय हॅगसन, हरनान सोनाक्रुझ, रॅने कॉसिन, अलेक्झांडर वोगोमोलोव्ह चार्लस् ड्युक, जॉपहॅम्पे इत्यादी सदस्य होते.

या मसुदा समितीने तयार केलेला मसुदा संयुक्त राष्ट्र संघाने १० डिसेंबर १९४८ रोजी 'पलाईस डी चौलार (पॅरिस)' येथे 'मानवी अधिकाराचा जागतिक जाहिरनामा' म्हणून स्वीकृत केला आणि आमसभेने त्यास मान्यता दिली. तत्कालिन मानवाधिकार आयोगामध्ये भारताच्या प्रतिनिधी 'हंसा मेहता' या होत्या. मानवी अधिकाराच्या जाहिरनाम्यामधील 'All Men are created equal' या शब्दाप्रयोगाऐवजी 'All Humen beings are created equal' हा शब्द प्रयोग हंसा मेहता यांना सुचवला आणि तो शब्दप्रयोग या आयोगाने स्वीकारला व दुरूस्ती केली.

संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने सर्व सदस्य राष्ट्रांना आवाहन केले की, त्यांनी मानवी अधिकाराच्या जाहिरनाम्यास प्रसिद्धी दयावी आणि देशाच्या अगर प्रदेशाच्या राजकीय दर्जावरून कोणताही भेदभाव न करता,

मुख्यत्वेकरून तेथील शाळांमध्ये व इतर शैक्षणिक संस्थामध्ये या जाहिरनाम्याचा प्रसार करण्याची, तो प्रदर्शित करण्याची, वाचून दाखविण्याची व समजावून सांगण्याची व्यवस्था करावी.

**कलम १**

सर्व मानवी व्यक्ती जन्मतः स्वतंत्र आहेत व त्यांना समान प्रतिष्ठा व समान आधिकार आहेत. त्यांना विचारशक्ती व सदसद्विवेकबुद्धी लाभलेली आहे व त्यांनी एकमेकांशी बंधुत्वाच्या भावनेने आचरण करावे.

**कलम २**

या जाहीरनाम्यात नमूद केलेले सर्व अधिकार व सर्व प्रकारचे स्वातंत्र्य प्रत्येकास आहे व त्या बाबतीत वंश, वर्ण, स्त्री-पुरुषभेद, भाषा, धर्म, राजकीय किंवा इतर मतप्रणाली, राष्ट्रीय किंवा सामाजिक मूलस्थान, संपत्ती, जन्म किंवा इतर दर्जा यासारखा कोणताही भेदभाव केला जाता कामा नये. आणखी असे की, एखादी व्यक्ती ज्या देशांची किंवा प्रदेशाची रहिवासी असेल त्या देशाच्या किंवा प्रदेशाच्या, मग तो देश किंवा प्रदेश स्वतंत्र असो, स्वायत्त शासन नसलेला असो किंवा कोणत्याही प्रकारच्या सार्वभौमत्वाख़ाली असो, राजकीय, क्षेत्राधिकारात्मक किंवा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कारणास्तव कोणताही भेदभाव करता कामा नये.

**कलम ३**

प्रत्येकास जगण्याचा, स्वातंत्र्य उपभोगण्याचा, सुरक्षित असण्याचा अधिकार आहे.

**कलम ४**

कोणालाही गुलामगिरीत किंवा दास्यात ठेवता कामा नये; सर्व प्रकारच्या गुलामगिरीस व गुलामांच्या व्यापारास मनाई करण्यात आली पाहिजे

**कलम ५**

कोणाचाही छळ करता कामा नये. किंवा त्यास क्रूर, अमानुष किंवा कमीपणा आणणारी वागणूक देता कामा नये.

**कलम ६**

प्रत्येकाला सर्वत्र कायद्याच्या दृष्टीने माणूस म्हणून मान्यता मिळण्याचा अधिकार आहे.

**कलम ७**

सर्व लोक कायद्याच्या दृष्टीने समान आहेत व कोणताही भेदभाव न करता कायद्याचे समान संरक्षण मिळण्याचा त्यांना हक्क आहे. या जाहीरनाम्याचे उल्लंघन करून कोणत्याही प्रकारचा भेदभाव झाल्याच्या बाबतीत व असा भेदभाव करण्यास चिथावणी देण्यात आल्याच्या बाबतीत सर्वांना समान संरक्षण मिळण्याचा हक्क आहे.

**कलम ८**

राज्यघटनेने किंवा कायद्याने दिलेल्या मूलभूत हक्कांचा भंग करणाऱ्या कृत्यांच्या बाबतीत सक्षम राष्ट्रीय अधिकरणामार्फत उपाययोजना करण्याचा प्रत्येकास अधिकार आहे.

**कलम ९**

कोणालाही स्वच्छंदतः अटक, स्थानबद्ध किंवा हद्दपार करता कामा नये.

**कलम १०**

प्रत्येकाला समान भूमिकेवरुन त्याचे अधिकार व जबाबदाऱ्या निश्चित करण्याच्या संबंधात किंवा त्याच्यावरील कोणत्याही दंडनीय आरोपाचा न्यायनिर्णय करण्याच्या संबंधात स्वतंत्र व नि:पक्षपाती अधिकरणामार्फत न्याय्य व जाहीर सुनावणी केली जाण्याचा हक्क आहे.

**कलम ११**

१. दंडनीय अपराधाचा आरोप ज्यावर ठेवण्यात आला आहे अशा प्रत्येक इसमास जाहीर न्याय चौकशीत तो दोषी असल्याचे सिद्ध होईपर्यंत, तो निरपराध आहे असे गृहीत धरले जाण्याचा अधिकार आहे. अशा न्याय चौकशीत त्याच्या बचावासाठी आवश्यक असलेली सर्व प्रकारची हमी त्यास देण्यात आलेली असली पाहिजे.

२. जे कोणतेही कृत्य किंवा वर्तन ज्या वेळी घडले त्या वेळी ते राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय कायद्याने दंडनीय अपराध ठरत नसेल तर त्या कृत्याच्या किंवा वर्तनाच्या संबंधात कोणालाही कोणत्याही दंडनीय अपराधाचा दोषी म्हणून समजता कामा नये. त्याचप्रमाणे दंडनीय अपराध घडला असेल त्यावेळी जी शिक्षा करण्याजोगी असेल त्या शिक्षेपेक्षा अधिक कडक शिक्षा त्यास देता कामा नये.

**कलम १२**

कोणाचेही खाजगी जीवन, त्याचे कुटुंब, घर अथवा त्याचा पत्रव्यवहार यांच्या संबंधात स्वच्छंद ढवळाढवळ होता कामा नये; त्याचप्रमाणे त्याची प्रतिष्ठा किंवा नावलौकिक यावर हल्ला होता कामा नये. अशी ढवळाढवळ किंवा हल्ला झाल्यास त्याविरुद्ध प्रत्येकास कायद्याने संरक्षण मिळण्याचा अधिकार आहे.

**कलम १३**

१. प्रत्येकास प्रत्येक राष्ट्राच्या हद्दीत संचार व वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य असण्याचा अधिकार आहे.

२. प्रत्येकास स्वतःचा देश धरुन कोणताही देश सोडून जाण्याचा अथवा स्वतःच्या देशात परत येण्याचा अधिकार आहे.

**कलम १४**

१. प्रत्येकास छळापासून मुक्तता करून घेण्यासाठी इतर देशात आश्रय मिळवण्याचा व तो उपभोगण्याचा अधिकार आहे.

२. अराजकीय स्वरूपाच्या गुन्ह्यांच्या संबंधात अथवा संयुक्त राष्ट्र संघटनेच्या उद्दिष्टांशी व तत्त्वांशी विरुद्ध असलेल्या कृत्यांच्या संबंधात वस्तुतः उद्भवलेल्या खटल्यांच्या बाबतीत प्रस्तुत अधिकाराचा आश्रय घेता येणार नाही.

**कलम १५**

१. प्रत्येकांस राष्ट्रीयत्व मिळण्याचा अधिकार आहे.

२. कोणाचेही राष्ट्रीयत्व स्वच्छंदतः हिरावून घेतले जाता कामा नये, तसेच कोणासही आपले राष्ट्रीयत्व बदलण्याचा अधिकार नाकारता कामा नये.

**कलम १६**

१. वयात आलेल्या पुरुषांना व स्त्रियांना वंश, राष्ट्रीयत्व, अथवा धर्म यांचे कोणतेही बंधन न ठेवता विवाह करण्याचा व कौटुंबिक जीवन जगण्याचा अधिकार आहे. विवाहाच्या संबंधात वैवाहिक जीवन चालू असताना आणि विवाह-विच्छेदनाच्या वेळी त्यांना समान अधिकार मिळण्याचा हक्क आहे.

२. नियोजित जोडीदारांनी स्वेच्छेने व पूर्ण संमती दिली असेल तरच विवाह करावा.

३. कुटुंब हे समाजाचा एक स्वाभाविक व मूलभूत घटक आहे व त्यास समाजाकडून आणि शासनाकडून संरक्षण मिळण्याचा हक्क आहे.

**कलम १७**

१. प्रत्येकास एकट्याच्या नावावर तसेच इतरांबरोबर मालमत्ता धारण करण्याचा अधिकार आहे.

२. कोणाचीही मालमत्ता स्वच्छंदतः हिरावून घेतली जाता कामा नये.

**कलम १८**

प्रत्येकास विचारस्वातंत्र्य, आपल्या सदसद्विवेकबुद्धीनुसार वागण्याचे स्वातंत्र्य, धर्म निवडण्याचे स्वातंत्र्य असण्याचा अधिकार आहे. या अधिकारांत स्वतःचा धर्म अथवा श्रद्धा बदलण्याच्या स्वातंत्र्याचा आणि एकट्याने वा इतरांसह सामुदायिकरीत्या आपला धर्म अथवा श्रद्धा, शिकवणुकीत, व्यवहारात, उपासनेत व आचरणात जाहीर रितीने अथवा खाजगी रितीने व्यक्त करण्याच्या स्वातंत्र्याचा समावेश होतो.

**कलम १९**

प्रत्येकास मतस्वातंत्र्य व भाषणस्वातंत्र्य असण्याचा अधिकार आहे. या अधिकारात कोणतीही ढवळाढवळ न होता मत बाळगण्याच्या स्वातंत्र्याचा, तसेच कोणत्याही माध्यमातून व सीमांचा विचार न करता माहिती व विचार ग्रहण करण्याचा प्रयत्न करणे, ती मिळवणे व इतरांना ती देणे यासंबधीच्या स्वातंत्र्याचा समावेश होतो.

**कलम २०**

१. प्रत्येकास शांततापूर्ण सभास्वातंत्र्य व संघटना असण्याचा अधिकार आहे.

२. कोणावरही कोणत्याही संघटनेचा सभासद होण्याची सक्ती असता कामा नये.

**कलम २१**

१. प्रत्येकास आपण स्वतः अथवा आपल्या इच्छेनुरूप निवडलेल्या आपल्या प्रतिनिधीमार्फत आपल्या देशाच्या शासनात भाग घेण्याचा अधिकार आहे.

२. प्रत्येकास आपल्या देशाच्या शासकीय सेवेत प्रवेश मिळण्याचा समान अधिकार आहे.

३. जनतेची इच्छा ही शासकीय प्राधिकाराचा पाया असली पाहिजे. जनतेची इच्छा नियतकालिक व खऱ्याखुऱ्या

निवडणुकांद्वारे व्यक्त झाली पाहिजे व या निवडणुका गुप्त मतदानपद्धतीने अथवा त्यासारख्या निर्बंधरहित पद्धतीने घेतल्या पाहिजेत.

**कलम २२**

प्रत्येकास समाजाचा एक घटक या नात्याने सामाजिक सुरक्षितता प्राप्त करून घेण्याचा अधिकार आहे आणि राष्ट्रीय प्रयत्न व आंतरराष्ट्रीय सहकार्य यांच्या द्वारे व प्रत्येक राष्ट्राच्या व्यवस्थेनुसार व साधनसंपत्तीनुसार आपल्या प्रतिष्ठेस व आपल्या व्यक्तीमत्वाच्या मुक्त विकासासाठी अनिवार्य असलेले आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकार संपादन करण्याचा हक्क आहे.

**कलम २३**

१. प्रत्येकास काम मिळण्याचा, आपल्या इच्छेनुरूप काम निवडण्याचा, कामाच्या न्याय्य व अनुकूल शर्तींचा फायदा मिळवण्याचा व बेकारीपासून संरक्षण मिळण्याचा अधिकार आहे.

२. कोणत्याही प्रकारे भेदभाव न करता प्रत्येकास समान कामाबद्दल समान वेतन मिळण्याचा अधिकार आहे.

३. काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस स्वतःला व आपल्या कुटुंबाला मानवी प्रतिष्ठेस साजेसे जीवन जगता येईल असे न्याय्य व योग्य पारिश्रमिक व जरूर लागल्यास त्याशिवाय सामाजिक संरक्षणाची इतर साधने मिळण्याचा अधिकार आहे.

४. प्रत्येकास आपल्या हितसंबंधांच्या संरक्षणार्थ संघ स्थापण्याचा व त्याचा सदस्य होण्याचा अधिकार आहे.

**कलम २४**

वाजवी मर्यादा असलेले कामाचे तास व ठरावीक मुदतीने पगारी सुट्ट्या धरून प्रत्येकास विश्रांती व आराम मिळण्याचा अधिकार आहे.

**कलम २५**

१. प्रत्येकास स्वतःचे व आपल्या कुटुंबीयांचे आरोग्य व स्वास्थ्य यांच्या दृष्टीने समुचित राहणीमान राखण्याचा अधिकार आहे.यामध्ये अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय मदत व आवश्यक सामाजिक सोई या गोष्टींचा अंतर्भाव होतो. त्याचप्रमाणे बेकारी, आजारपण, अपंगता, वैधव्य किंवा वार्धक्य यामुळे किंवा त्याच्या आवाक्याबाहेरील परिस्थितीमुळे उदरनिर्वाहाचे दुसरे साधन उपलब्ध नसल्यास सुरक्षितता मिळण्याचा अधिकार आहे.

२. माता व मुले यांना विशेष देखरेख व मदत मिळण्याचा हक्क आहे; सर्व मुलांना, मग ती औरस असोत किंवा अनौरस, सारखेच सामाजिक संरक्षण मिळाले पाहिजे.

**कलम २६**

१. प्रत्येकास शिक्षण मिळण्याचा अधिकार आहे. निदान प्राथमिक व मूलावस्थेतील शिक्षण मोफत असले पाहिजे, माध्यमिक शिक्षण सक्तीचे असले पाहिजे. तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण सर्वसाधारणपणे उपलब्ध करून देण्यात आले पाहिजे आणि गुणवत्तेप्रमाणे, उच्चशिक्षण सर्वांना सारखेच उपलब्ध असले पाहिजे.

२. ज्यायोगे मानवी व्यक्तिमत्त्वाचा संपूर्ण विकास साधेल व मानवी अधिकार आणि मूलभूत स्वातंत्र्य याविषयीची

आदरभावना दृढ होईल अशी शिक्षणाची दिशा असली पाहिजे. तसेच शिक्षणाने सर्व राष्ट्रांमध्ये आणि वांशिक किंवा धार्मिक गटांमध्ये सलोखा, सहिष्णुता व मैत्री वृद्धिंगत झाली पाहिजे. शिवाय त्यायोगे शांतता राखण्यासंबंधीच्या संयुक्त राष्ट्रांच्या कार्यास चालना मिळाली पाहिजे.

३. आपल्या पाल्यांना कोणत्या प्रकारचे शिक्षण देण्यात यावे हे ठरविण्याचा अधिकार पालकांना आहे.

**कलम २७**

१. प्रत्येकास समाजातील सांस्कृतिक जीवनात मोकळेपणाने भाग घेण्याचा, कलांचा आनंद उपभोगण्याचा आणि वैज्ञानिक प्रगती व तिच्यापासून मिळणारे फायदे यांत सहभागी होण्याचा अधिकार आहे.

२. आपण निर्माण केलेल्या कोणत्याही वैज्ञानिक, साहित्यिक किंवा कलात्मक कृतीपासून निष्पन्न होणाऱ्या नैतिक व भौतिक हितसंबंधांना संरक्षण मिळण्याचा प्रत्येकास अधिकार आहे.

**कलम २८**

ह्या जाहीरनाम्यात ग्रथित केलेले अधिकार व स्वातंत्र्य पूर्णपणे साध्य करता येतील अशा सामाजिक व आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचा प्रत्येकास हक्क आहे.

**कलम २९**

१. समाजामध्येच आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास पूर्णपणे व निर्वेधपणे करता येत असल्यामुळे प्रत्येक व्यक्तीची समाजाप्रत काही कर्तव्ये असतात.

२. आपले अधिकार व स्वातंत्र्य यांचा उपभोग घेताना इतरांचे अधिकार व स्वातंत्र्य यास योग्य मान्यता मिळावी व त्याचा योग्य तो आदर राखला जावा आणि लोकशाही समाज-व्यवस्थेत नीतिमत्ता, सार्वजनिक सुव्यवस्था व सर्वसाधारण लोकांचे कल्याण यासंबंधातील न्याय्य अशा आवश्यक गोष्टी पूर्ण केल्या जाव्यात या आणि केवळ याच कारणासाठी कायद्याने ज्या मर्यादा घालून दिल्या असतील त्याच मर्यादांच्या आधीन प्रत्येक व्यक्तीस रहावे लागेल.

३. संयुक्त राष्ट्रांचे उद्देश व तत्त्वे यांच्याशी विरोधी ठरेल अशा रितीने ह्या अधिकारांचा व स्वातंत्र्याचा कोणत्याही स्थितीत वापर करता कामा नये.

**कलम ३०**

ह्या जाहीरनाम्यात ग्रथित केलेल्या अधिकारांपकी कोणतेही अधिकार व स्वातंत्र्ये नष्ट करण्याच्या उद्देशाने कोणतीही हालचाल किंवा कोणतेही कृत्य करण्याचा अधिकार कोणत्याही राष्ट्रास, गटास किंवा व्यक्तीस आहे असे ध्वनित होईल अशा रितीने ह्या जाहीरनाम्यातील कोणत्याही मजकुराचा अर्थ लावता कामा नये.

'मानवी अधिकाराचा जागतिक जाहिरनामा' गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डनुसार हा जगातील सर्वाधिक भाषांतरित दस्तऐवज आहे. हा जाहिरनामा दुसऱ्या महायुद्धात जगाने अनुभवलेला अत्यंत क्रूर व अत्याचारांचा परिणाम म्हणून अस्तित्वात आला. सर्व मानवाच्या जन्मसिद्ध मानवाधिकारांची पहिली जागतिक अभिव्यक्ती म्हणून या जाहिरनाम्याकडे पाहण्यात येते. यात एकूण ३० कलमे असून त्याचा सविस्तर अर्थ नंतर झालेल्या अनेक जागतिक करारामधून, राष्ट्रीय घटना आणि कायदे यातून आणि स्थानिक मानवाधिकार संघटनांकडून

लावण्यात आला आहे. या जाहिरनाम्यावर आधारित 'मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीय विधेयक' १९६६ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेत मांडण्यात आले. १९७६ मध्ये पुरेशा सदस्य राष्ट्रांच्या पाठिंब्यानंतर त्यास 'आंतरराष्ट्रीय कायद्याचे' स्वरूप प्राप्त झाले.

मानवी अधिकार हे मानवाचे मूलभूत हक्क आहेत. मानवी हक्क हे जागतिक असून सर्वांन समान असतात. ते कायदेशीर असू शकतात. जीवन जगण्याचा अधिकार, यातनापासून मुक्तता, गुलामगिरीपासून मुक्तता, भाषण स्वातंत्र्य, वैचारिक व धार्मिक स्वातंत्र्य इ. अधिकार हे मानवी हक्काचे प्रमुख हक्क मानले जातात. संयुक्त राष्ट्र संघाच्या मानवी हक्क उच्चायुक्त कार्यालय व मानवी हक्क समित या दोन संस्था जागतिक स्तरावर मानवी हक्कांच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न करतात. मानवी अधिकाराचा जागतिक जाहिरनामा हा १० डिसेंबर रोजी जारी करण्यात आला म्हणून प्रतिवर्षी हा दिवस 'जागतिक मानवी हक्क दिन' म्हणून पाळण्यात येतो. २००८ हे वर्ष या जाहिरनाम्यास ६० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त 'विशेष वर्ष' म्हणून पाळले गेले. हा जाहिरनामा प्रारंभी बधंनकारक नियम नसतानाही जगभरात स्वीकारला गेला. १९४८ सालापासून हा जाहिरनामा जगभरातील विविध राज्यघटनांवर आपला ठसा उमटवत आहे. यासोबत विविध जागतिक, राष्ट्रीय, प्रादेशिक कायदे व करार यांवरही याची छाप उमटलेली दिसते. असे असले तरी त्याच्यावर काही आक्षेपही आहेत.

**इस्लामी आक्षेप :**

मानवी हक्काच्या जागतिक जाहिरनाम्यात इस्लामी देशातील धार्मिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी लक्षात न घेतली गेल्याचा ठपका सुदान, पाकिस्तान, सौदी अरेबिया इ. इस्लामी देशांमधून ठेवण्यात येतो. हा जाहिरनामा प्रामुख्याने ज्यू व ख्रिश्चन परंपरा दर्शवितात तर शरिया या इस्लामिक कायद्याच्या चौकटीत ह्या घोषणापत्रातील कलमे बसवणे अवघड आहे हा इराणचा आक्षेप आहे.

**उदारमतवाद्यांचा आक्षेप :**

जाहिरनाम्यातील आर्थिक अधिकार बळजबरीच्या आर्थिक वसुलीतूनच (उदा. करव्यवस्था) शक्य असल्याने एकास आर्थिक अधिकार देताना दुसऱ्याच्या अधिकाराची पायमल्ली होण्याचा संभव आहे. शिक्षण सक्तीचे असण्यावर पर्यायी शिक्षणाच्या पुरस्कर्त्यांचा आक्षेप आहे कारण जाहिरनाम्यातील कलम २६ शिक्षण सक्तीचे करते. तसेच मानवी अधिकाराच्या जाहिरनाम्यातील काही कलमे लष्करी सेवांशी सुसंगत नसल्याचा आक्षेप आहे.

वरील वेगवेगळे विचार प्रवाह मानवी अधिकारावर टीका करीत असले तरी हे अधिकार मानवाच्या विकासासाठी व नैसर्गिक हक्कासाठी आवश्यक व महत्वाचे आहेत.

## ब) **मानवी तस्करी** (Human Trafficking)

दहशतवादी हल्ल्यानं दोन मोठ्या जागतिक समस्यांना वाचा फोडण्याचे कार्य केले. एक म्हणजे दहशतवाद आणि दुसरी म्हणजे मानवी व्यापार किंवा मानवी तस्करी. मानवी तस्करीला इंग्रजीत ह्युमन ट्रॅफिकिंग (Human Trafficking) असे म्हंटले जाते. दहशतवाद, अमंली पदार्थ व शस्त्रात्रांचा अवैध व्यापार या खालोखाल जागातील सर्वच देशांना भेडसावणारी तिसरी मोठी समस्या म्हणजे मानवी तस्करी होय. सध्या बदलत्या काळात गुन्हेगारीच स्वरूपही बदलू लागलं आहे. गुन्हेगारीसाठी आधुनिक साधनांचा वापर केला जात आहे. साहजिक

वाढत्या गुन्हेगारी घटनांना आळा घालंण आव्हानात्मक ठरत आहे. खरं तर मानवी तस्करी हा माणुसकीला लागलेला कलंक आहे. परिस्थितीने गांजलेल्या, अडचणीत सापडलेल्यांना पद्धतशीर आपल्या जाळ्यात ओढून कधी फसवणूक तर कधी जबरदस्ती करून त्यांची विक्री करण्याचा उदयोग केला जातो. मानवी तस्करीद्वारे एखादयाचं आयुष्य उद्ध्वस्त करण्याचा अधिकार कोणालाच असत नाही. तो एक प्रकारे पारतंत्र्य लादण्याचाच प्रकार असतो. आणि म्हणूनच मानवी तस्करी हा भयंकर मानावा असाच अपराध आहे. मानवी तस्करीद्वारे संबंधितानां विविध देशामध्ये पाठवलं जात असल्याने या प्रकाराला पुरता पायबंद घालण्याच्या दृष्टिने जागतिक पातळीवर पुरेशा गांभीर्याने प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे. देश पातळीवर हा घटक राज्यपातळीवर मानवी तस्करीच्या संदर्भात विविध कायदे व उपाययोजना करण्याचा प्रयत्न प्रत्येक देश करतो आहे. परंतु जागतिक पातळीवर अशा प्रकारचे प्रयत्न होणे आवश्यक आहे. २०१३ साली संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत सदस्य राष्ट्राकडून मानवी तस्करीच्या संदर्भात ठराव मंजूर केला. दरवर्षी ३० जुलै हा 'मानवी तस्करी विरोधात जागतिक दिवस' आयोजित करण्याचे मान्य करण्यात आले.

**मानवी तस्करी अर्थ व स्वरूप :**

ह्युमन ट्रॅफिकिंग म्हणजेच मानवी तस्करी होय. मानवी तस्करीस आजमितीस जगातील कोणताही देश पूर्णपणे थांबवू शकत नाही. जगातील बहुतांश पिडीत स्त्रियांच्या दुःखाला कारणीभूत ठरणाऱ्या मानवी तस्करी हा आजच्या काळातला सर्वात मोठा गंभीर प्रश्न आहे. मानवी तस्करीला बळी पडणाऱ्यामध्ये स्त्री-पुरूष दोन्ही आहेत. मात्र त्यातही स्त्रिया व बालिकांच प्रमाण व त्याच्यावरील आत्याचाराचं प्रमाण भयानक आहे. मानवी अवैध व्यापाराचं जाळं जगभरात पसरले आहे. आणि त्यातं सर्वात जास्त प्रमाण महिलाचं आणि तरूण मुलाचं आहे. मानवी व्यापार हा स्त्री- पुरूष दोन्हींचा केला जातो. त्यात लहान मुलंही भरडली जातात.तस्करांना कोणी निषिद्ध नाही. तस्करी म्हणजे चोरी मानवी तस्करी म्हणजे मानवाची चोरी करून त्यांना विकणे, त्याच्यावर आत्याचार करणे, लैंगिक शोषणासाठी विकणे, होय हा व्यापार राष्ट्राअंतर्गत व राष्ट्रा-राष्ट्रामध्ये तस्करांच्यामार्फत चालतो.

मानवी तस्करी खूप कारणांसाठी केली जाते. त्यातलं प्रमुख कारण आहे. गुलामगिरी, मानवाला गुलाम बनवून भारत, इंग्लंड, अमेरिका, रशिया, चीन इ. अनेक मोठ्या देशांमध्ये विकायचं हा यातला प्रमुख व्यवसाय होय.दुसरे कारण म्हणजे देहविक्री होय. तरूण मुली व प्रौढ स्त्रीयांची प्रामुख्याने देहविक्रयासाठी जबरदस्ती केली जाते. काहींना नोकर म्हणून विकलं जातं. लहान मुला-मुलींची बालकामगार म्हणून विक्री होते. तसेच मोठ्या शहरातील धनिकाच्या घरी नोकर म्हणून काम करण्यासाठी त्यांना विकलं जातं. या मुलांना हॉटेल्स, छोटे कारखाने, खाणी, वीटभट्टी अशा काम करायला लावतात. काहींना भीक मागणाऱ्या टोळ्या भिकारी बनवतात. काही बालकांच लैगिंक शोषणही केलं जाते. काहींना चाइल्ड पोर्नोग्राफीसाठी बाहेरील देशात विकलं जाते. जगातील बहुतेक देशांमध्ये अवयव विक्रीचं भीषण पण छुपं जाळं पसरलेलं पहावयास मिळते. जबरदस्तीने लग्न या प्रकाराला अनेक मुली व स्त्रीयांचा बळी जातो. पुरूषापेक्षा महिलांच प्रमाण कमी असणाऱ्या प्रांतात जबरदस्तीने लग्न लावणे. एवढच नव्हे तर एक स्त्री ३ ते ४ वेळा विकली जाते. तीचे लैगिंक शोषण केले जाते. उदा. भारतातील पंजाब, हरियाणा व राजस्थान या प्रांतात परप्रांतीय स्त्रीया वधू म्हणून विकत घेतल्या जातात. विकत घेणारा पुरूष स्त्रीशी जबरदस्तीनं लग्न करतो आणि एवढ्यावरच थांबत नाही तर त्या कुटूंबातील प्रत्येक

पुरूष या विकत घेतलेल्या स्त्रीयांच लैंगिक शोषण करतो. अशी अनेक उदाहरणे उजेडात आली आहेत. काही महिलांची व त्यांच्या कुटूंबीयांची परदेशातील नवरा मिळवून देण्याच्या नावाखाली फसवून केली जाते व परक्या देशात त्यांच्या गुलामाप्रमाणे वापर केला जातो. बहुतेक केली जाते व परक्या देशात त्यांचा गुलामाप्रमाणे वापर केला जातो. बहुतेक वेळा ग्रामिण भागातील अशिक्षित आई-बाप मुलांना पैशाखातर विकतात. काही पालकांना कर्जफेड करायची असते तर काही पालकांना फसवलं जातं. मुलांना / मुलीला चांगल शिक्षण व निवारा देऊ/ नोकरी देऊ असं अमिष दाखवून मुलांना शहरात आणून विकलं जाते. मुख्यतः अतिशय भीषण गरिबी, अज्ञान व शिक्षणाच्या सोयींचा अभाव, जातीय विषमता, लिंगभेद, अस्थिर समाजव्यवस्था व भ्रष्टाचार अशी अनेक कारणे मानवी तस्करी मागे आहेत.

**मानवी तस्करीची व्यापकता :**

मानवी तस्करी दोन स्तरावर होते. एक देशांतर्गत व दुसरा देशाबाहेर इतर देशांशी. 'एनस्लेव्हड्' या पुस्तकात साहिल गुप्ता या लेखकांने इंग्लंडमध्ये गुलामगिरीसाठी विकल्या गेलेल्या अनेक व्यक्तींच्या धक्कादायक कथा सांगितलेल्या आहेत. मुख्यत्वे अविकसित व विकसनशील देशामधून विकसित देशामध्ये मानवी तस्करीद्वारे गुलामगिरीसाठी व देहविक्रीसाठी व्यक्तीचा पुरवठा होतो. देशांतर्गतही याच प्रकारे मानवी व्यापारी घृणास्पद कृत्य करत असतात. मानवी तस्कराच्या जाळ्यात व्यक्ती सापडल्यावर त्याचे अतिशय वाईट व घृणास्पद हाल केले जातात. भारतातील पंजाब, हरियाण व राजस्थान या प्रांतात परप्रांतिय स्त्रीयांची मोठ्या प्रमाणात विक्री सतत होत असते. या विकत घेतलेल्या स्त्रियांना लैंगिक अत्याचार, घरकाम आणि शेतीकाम अशी तिहेरी कार्य जबरदस्तीने करवून घेतली जातात.

'बोको हराम' या इस्लामिक संघटनेच्या दहशतवादंयानी नायजेरियातील चिबो गावातील मुलींच्या शाळेच्या वसतिगृहात घुसून मध्यरात्री ३०० मुलींच अपहरण केलं. या मुलींना दहशतवाद्यांनी ओलिस ठेवून तेथील सरकारच्या ताब्यात असलेल्या 'बोको हराम' च्या सहकाऱ्यांना सोडलं जावं अशी मागणी केली. अन्यथा ताब्यात असलेल्या मुलींची विक्री करण्याची धमकी दिली. सर्वसाधारणपणे शारिरीक किंवा लैंगिक शोषणाच्या हेतून अवैधरित्या स्त्रीयांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाठवलं जाण्याला अवैध मानवी वाहतूक म्हणतात. यासाठी देशांतर्गत आणि परदेशात केल्या जाणाऱ्या मानवी वाहतूकीची समावेश होतो. २००३ साली भारतातील दलेर मेहंदी आणि त्याच्या भावाला मानवी तस्करी प्रकरणी अटक करण्यात आली होती. दलेर मेहंदी आणि त्याचा भाऊ शमशेर मेहंदी यांनी आपल्याला कॅनडामध्ये स्थलांतर करण्यास मदत करण्यासाठी पैसे घेतल्याची तक्रार पंजाबमधील बलबेहरा गावातील 'बक्षीस सिंग' नावाच्या व्यक्तीने पतियाला पोलिसांकडे केली होती. त्यावरून पोलिसांनी या दोन बंधुना अटक करून गुन्हा दाखल केला. या गुन्ह्यानंतर जवळ जवळ ३५ लोकांनी अमेरिकेत बेकायदा स्थलांतर करण्यास मदत करण्यासाठी या दोन बंधुनी पैसे घेतल्याच्या तक्रारी केल्या दाखल. या दोन बंधूवर ३१ खटले दाखल झाले. मेहंदी बंधुंनी १९९८ ते १९९९ साली संगीताच्या कार्यक्रमासाठी दोन संच गेले होते. त्यापैकी दहा लोकांना गटाचे सदस्य असल्याचं दाखवून बेकायदेशीररित्या तिथेच सोडण्यात आलं होतं. दलेर मेहंदीने अमेरिकेच्या दौत्यान सॅनफ्रान्सिस्को इथे गुजरातच्या तीन मुलींना सोडलं होते. १९९९ मध्ये काही अभिनेत्यासह गेलेल्या अमेरिकेच्या दौत्यात या बंधूनी न्यू जर्सी येथे तीन मुलींना सोडलं होते. अशा प्रकारे या दोन बंधुनी १९९८-१९९९ मध्ये अशाच प्रकारे आणखी १० लोकांना परदेशात सोडलं होतं. या प्रकरणामुळे

जगभरच चिंताजनक मानल्या गेलेल्या मानवी तस्करीच्या विषय पुन्हा ऐरणीवर आला.

अलिकडच्या काळात आंतरराष्ट्रीय टोळ्यांनी मानवी तस्करी करण्याचं प्रमाण बरच वाढल्याचं आंतरराष्ट्रीय स्तरावरील तपास यंत्रणाचं म्हणं आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर मानवी तस्करी हा शब्द स्थलांतरिताची तस्करी यासाठीही वापरला जातो.  स्थलांतरितांची रस्ते, सागरी किंवा हवाई मार्गाने तस्करी करण्याचा यात समावेश होतो. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे आर्थिक किंवा इतर भौतिक लाभासाठी व्यक्तींच्या ती ज्या राष्ट्रांची नागरिक नाही तिथे बेकायदेशीरपणे स्थलांतरीत करणं म्हणजे मानवी तस्करी असं म्हंटल जाते.

२०१४ च्या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या आकडेवारीनुसार मानवी तस्करांनी मानवी तस्करीतून सुमारे १५० अब्ज अमेरिकन डॉलर एवढा नफा कमावला होता अशाप्रकारची मानवी तस्करी ही बेकायदेशीर च आहे. प्रत्यक्षात तस्करी झालेल्या स्थलांतरितानाही धमक्या, छळ, गैरवापर आणि मृत्यू यांना तोंड द्यावे लागते. याची अनेक प्रकरणे असल्यामुळे मानवी तस्करीचं गांभीर्य अतिशय भयानक आहे हे स्पष्ट होते. तस्करीच्या प्रकरांमध्ये वैयक्तिकपणे काम करणाऱ्या अनेक लोकांच जाळ असतं. या गुन्ह्यांचे समाजावर दूरगामी आर्थिक आणि कायदेशीर परिणाम होत असतात. मात्र या समस्येवर कोणत्याही देशाला कायमस्वरूपी  व प्रभावी तोडगा काढता आला नाही व शोधता आलेला नाही. त्यामुळे अनेक देश आंतरराष्ट्रीय सहकार्य अधिक बळकट बनवलं जावं या मुद्यावर वेळोवेळी भर देत आहेत. २०१५ मध्ये सिरियात सातत्याने सुरू असलेल्या नागरी युद्धामुळे मानवी तस्करीला भयानक स्वरूप आलेले आहे. अशा प्रकारे सिरियातून युरोपमध्ये सुमारे १० लाख लोक स्थलांतरीत झाल्याचं संयुक्त राष्ट्रसंघाच्या आकडेवारीवरून दिसतं.

**मानवी तस्करी विरोधात संयुक्तराष्ट्र संघटनेचे प्रयत्न व उपाययोजना :**

मानवी तस्करी हा एक गुन्हा आहे ज्यामध्ये सक्तीने काम करण्यास आणि देहव्यापारासाठी स्त्रीया, लहान मुले आणि पुरूष यांचे शोषण केले जाते. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या अंदाजानुसार जागतिक स्तरावर २१ दशलक्ष लोक सक्तीने काम करीत आहेत. लाखो लोकांची तस्करी जगभरात दरवर्षी होत आहे. २०१० साली संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत मानवी तस्करीच्या समस्येचा सामना करण्यासाठी जागतिक कृती योजना अंगिकारली गेली. यामधून मानवी तस्करीला रोखण्यासाठी समन्वित आणि सुसंगत उपाय योजण्यासाठी संयुक्त राष्ट्र सदस्य राष्ट्रांच्या सरकारांना निवेदन केले आहे. या कार्यक्रमासाठी 'युएन वॉल्युंटरी ट्रस्ट फंड फॉर व्हिक्टम्स ऑफ ट्रॅफिकिंग' उभारण्यात आला आहे. २०३० शाश्वत विकास आराखड्यात मानवी तस्करीला थांबविण्याचे लक्ष्य ठेवले गेले आहे. '३० जुलै हा दिवस मानवी तस्करी विरोधात जागतिक दिवस' साजरा करण्यात येतो. अमली पदार्थ व गुन्हे यासंबंधी संयुक्त राष्ट्र संघाचे कार्यालय यांच्या नेतृत्वात या वर्षी हा दिवस ''ॲक्ट टू प्रोटेक्ट अँड असिस्ट ट्रॅफिक्ड पर्सन्स'' या संकल्पनेखाली आयोजित करण्यात आला आहे. सशस्त्र संघर्ष आणि नैसर्गिक आपत्ती परिस्थितीमुळे निर्वासित आणि स्थलांतरित लोकांचे मोठ्या प्रमाणात मिश्रित स्थलांतरण होय आहे. या मिश्रित स्थलांतरण तस्करी ओळखणे अशक्य असते.

२०१३ साली संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत सदस्य राष्ट्राकडून A/RES/68/192 ठराव मंजूर करण्यात आला आणि दरवर्षी ''३० जुलै'' रोजी मानवी तस्करी विरोधात जागतिक दिवस आयोजित करण्याचे मान्य करण्यात आले. ३० जुलै या दिवशी तस्करीमुळे पिडीत व्यक्तीच्या परिस्थितीविषयी आणि त्यांच्या अधिकारांचे

संरक्षण आणि जाहिरात करण्यासाठी जागरूकता वाढविण्याचे प्रयत्न केले जातात. संयुक्त राष्ट्र संघानं मानवी तस्करी विरोधात २५ डिसेंबर, २०१३ रोजी कायदा केला, ज्याच्या अंतर्गत मानवी तस्करीला बळी पडणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला संरक्षण व मदत करण्याचं कार्य देशांनी मान्य केले.

संयुक्त राष्ट्रसंघाने २०१७ साली १३२ देशांमध्ये सर्वेक्षण करून यासंबंधीचा अहवाल प्रसिद्ध केला. दर दोन वर्षांनी हा अहवाल प्रसिद्ध होतो. लैंगिक शोषण, गुलामगिरी, भीक मागायला लावणे, छोटे गुन्हे, अवयवविक्री आणि इतर काही कारणांसाठी मानवी तस्करी केली जात असल्यांच म्हंटलं आहे. २००७ सालानंतर संयुक्त राष्ट्रसंघाने २००७ सालानंतर मानवी तस्करीचं प्रमाण गंभीररित्या वाढलं आहे. १३६ देशांमधील माणसं तस्करीचं प्रमाण गंभीररित्या वाढलं आहे. १३६ देशांमधील माणसं मानवी व्यापाराला बळी पडून त्यांनी रवानगी जगातील इतर ११८ देशांमध्ये झाल्याचे सर्वेक्षणातून उघड झाले आहे. या मानवी तस्करीतील गुन्हेगार उघडपणे वावरत नसल्याने त्यांचे गुन्हे उघडकीस येण्यास अडचणी येत आहेत. मानवी तस्करीच्या या गुन्हेगारी क्षेत्रांच्या टक्केवारीचं प्रमाण अद्याप कोणत्याही देशाला पूर्णपणे सांगता आलेलं नाही. युनायटेड नेशन्स ऑफिस ऑन ड्रग्स अँड क्राइम म्हणजे UNO DC च्या २०१७ च्या अहवालानुसार जगभरात लहान मुलांच्या व स्त्रियांच्या प्रमाण वाढ झालेली आहे. ही जागतिक समस्या असून चिंताजनक बाब आहे. यासाठी सर्व राष्ट्रांनी एकत्र येवून मानवी तस्करी रोखण्यासाठी संयुक्त संघटनेला सहकार्य करणे आवश्यक आहे.

**क ) स्थलांतर**

विविध कारणास्तव आपले राहाते घर किंवा प्रदेश किंवा आपला देश सोडून इतर परक्या प्रदेशामध्ये वास्तवास जाणे हा प्रकार मनुष्य प्राण्यांमध्ये अगदी इतिहासपूर्ण काळापासून होत आला आहे. शास्त्रीय परिभाषेमध्ये या प्रकारास स्थलांतर होणे/ करणे असे मानण्यात येते. निर्वासितांच्या प्रश्नांवरून जगाला जाग आली. जगण्याचा हक्क प्रत्येकाला आहे. पण समाजात वावरताना गरीब आणि श्रीमंत, जातीयवाद, वंशवाद अशी दरी व त्यातून निर्माण होणारे वाद यामुळे समाजातील काही घटकांस आपलं गाव, प्रदेश, देश सोडून स्थलांतर करावं लागतं अशावेळी या वेळी दुबळ्या व्यवस्थेचा हा कमकुवत समाज नाहक बळी ठरतो. स्थलांतर व निर्वासित या प्रश्नाकडे मानवता म्हणून पहायला पाहिजे. तरच हा प्रश्न समजून येईल. निर्वासितांना नेहमी स्थलांतरीत म्हणूनच जगावं लागते. छोट्या देशामध्ये निर्वासितांचा प्रश्न अतिशय गंभीर आहे. सिरिया, दक्षिणसुदान, म्यानमार, अफगाणिस्तान या देशांचा प्रामुख्याने समावेश होतो. १९९१ नंतर जगभरातील ७० हून अधिक देशांमध्ये यादवी संघर्ष निर्माण झाला. यामध्ये प्रामुख्याने वांशिक दंगली, दहशतवाद निर्माण झाल्यामुळे स्थलांतर मोठ्या प्रमाणात झाले व यातून निर्वासितांची संख्या वाढली.

**स्थलांतरीत अर्थ व व्याख्या**

'इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर मायग्रेशन' ही संयुक्त राष्ट्रसंघाची एक संस्था आहे. या संस्थेने स्थलांतर ची व्याख्या पुढील प्रमाणे केली- ''स्थलांतर म्हणजे एखाद्या व्यक्तीने अथवा एखाद्या व्यक्तींच्या समुहाने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी केलेले स्थलांतर, मग ते देशांतर्गत असेल किंवा देशाबाहेरील असेल.'' या व्याख्येत निर्वासितपण येतात. ज्यांना आपण रेफ्युर्जाज म्हणतो. परंतु स्थलांतर आणि निर्वासित यामध्ये फरक आहे.

**स्थलांतर**

स्थलांतरीत नागरिक हे निर्वासितांपेक्षा वेगळे असतात. ते आपल्या मर्जीने स्थलांतर करत असतात. त्यांचे प्रश्न वेगळे असतात. त्यांच्यापुढे अनेक पर्याय असतात. अनेक वेळा आर्थिक समृद्धीसाठी ते स्वेच्छेने स्वतःचा देश सोडतात. गरिबी व रोजगारांच्या संधी नसल्याने अनेक नागरिक स्थलांतर करतात. याचबरोबर सुशिक्षित, सुस्थितीत असणारे अनेक नागरिक स्थलांतराचा मार्ग अवलंबतात. उदा. चांगल्या नोकरीच्या शोधात किंवा चांगल्या जीवनमानाच्या शोधात अनेक लोक विकसनशील देशातून विकसित देशांत स्थलांतर करतात आणि हे स्थलांतर करतात. आणि हे स्थलांतर अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, न्युझीलंड असा देशांत मोठ्या प्रमाणावर होत आहे. भारतासारख्या देशातून अमेरिका व युरोपमध्ये जाणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. इंग्रजीत ज्याला 'इंडियन डायास्पोरा' म्हणतो. म्हणजेच स्थलांतरीत भारतीयांची संख्या युनायटेड नॅशनलच्या इंटरनॅशनल मायग्रेशन रिपोर्ट २०१५ नुसार जगात सगळ्यात जास्त म्हणजे १ कोटी ६० लाख इतकी आहे. त्या खालोखाल मेक्सिकोचा व रशियन फेडरेशनचा क्रमांक लागतो. या स्थलांतरामागे उत्तम शिक्षण, चांगली नोकरी, चांगले पर्यावरण तसेच चांगली राजकीय व्यवस्था इ. कारणे असतात. आपल्या कुटूंबाचे पोषण चांगले व्हावे असा उद्देश असतो.

**निर्वासित :**

स्थलांतरीत म्हणजे निर्वासित नव्हे. निर्वासितांना स्थलांतरीत मानणे हा नेहमीचा संभ्रम आढळून येतो. स्वतःच्या देशात होणारा छळ, जीविताची भीती यामुळे परागंदा व्हावे लागणारे म्हणजे देश सोडण्याची वेळ येणारे नागरिक निर्वासित होय. निर्वासितांचा विचार करायचा झाल्यास निर्वासित या शब्दातच मुळात यासंकल्पनेचा अर्थ सामावलेला आहे. आसरा द्यायला किंवा आश्रय घ्यायला जागा नाही म्हणून स्थलांतर करणारे लोक म्हणजे निर्वासित होय. निर्वासित हे युद्धजन्य परिस्थिती, प्रत्यक्ष युद्ध, अत्याचार व अन्यायामुळे निर्वासित होतात. निर्वासितांना नेहमीच स्थलांतरित म्हणूनच जगावे लागते. लहान-लहान देशामध्ये निर्वासितांचा प्रश्न गंभीर आहे. मानवतेच्या दृष्टिकोनातून सर्वानाच जगण्याचा हक्क आहे. पण वंशवाद आणि धार्मिक हिंसेतून कमकुवत वर्गाला भीतीपोटी स्थलांतर करावं लागतं.

स्थलांतरीतांना काही कारणास्तव त्यांच्या देशात परत पाठवले जाऊ शकते, पण निर्वासित लोकावर असे बंधन घालता येत नाही. 'युनायटेड नेशन्शच्या' १९५१ च्या 'रेफ्युजी कन्व्हेन्शन' नुसर जर एखाद्या देशात निर्वासित आले तर कायदेशीरदृष्टया त्यांना परत पाठवता येत नाही. स्थलांतर करणाऱ्या व्यक्तींकडे अधिकृत कागदपत्रे असली तरीही त्यांना एखाद्या देशातून परत पाठवले जाऊ शकते. याउलट निर्वासिंताकडे जरी अधिकृत कागदपत्रे नसली तरी त्यांना कुठल्याही देशात वास्तव्य करता येऊ शकते.

**स्थलांतराची कारणे :**

परंपरिक संपदांवर ताण वाढला की, अर्थार्जन, निर्वाह, स्थैर्य यांसाठी स्थलांतराचे प्रमाण वाढते. सामाजिक, राजकीय अशांतता पर्यावरणात्मक अरिष्टे स्थलांतराल पूरक ठरतात. उदा. भारतात सध्या ग्रामीण -नागरी स्थलांतराचा ओघ भयानक वाढला आहे. खेडी ओस पडत आहेत तर शहरे वेडीवाकडी वाढत आहेत.

## ४.२.२ पर्यावरण आणि शाश्वत विकास :

**अ) पर्यावरण** (Environment) :

प्रस्तावना : जरी मानवाला त्याच्या उत्पतीपासून, त्याच्या जीवनात निसर्गाच्या उपयुक्ततेबद्दलची माहिती होती

तरी प्रामुख्याने ती जीवनावश्यक वस्तू उदा. अन्न, वस्त्र, औषधी वनस्पती, चारा व काही सौदर्य प्रसाधनांपुरतीच मर्यादित होती. नंतरच्या काळात पर्यावरणातील बदलाबाबतच्या जागरूकतेत वाढ झाली, परंतु ती निसर्ग आणि ऋतू यांच्यापुरतीच मर्यादित राहिली. त्यानंतर घरगुती व्यवहारात वनस्पती व प्राण्यांचा उपयोग वाढत गेला. गेल्या काही शतकामध्ये औदयोगिक विकासासाठी नवनवीन संसाधानाचा शोध लागला मात्र अजूनही सर्व समावेशक रचना असलेल्या परिस्थितीची किंवा पर्यावरणशास्त्र याबद्दल जागृती नव्हती. पण २० व्या शतकाच्या मध्यंतरात प्रदूषणाचे प्रश्न व त्यांच्याशी संबंधित असलेल्या जगभरातील घटकामुळे पर्यावरण हा जागरूकतेचा विषय बनला आहे. समाजातील पर्यावरण जनजागृती आणि माहितीची कमतरता प्रामुख्याने पर्यावरण ऱ्हासास कारणीभूत ठरत आहेत. चुकीच्या गोष्टींना प्राधान्य आणि संसाधनाचे अतिशोषण यांना प्रगत आणि नवीन प्रगतशील देशामध्ये उत्तेजन दिले जाते. त्यामुळे समाजामध्ये सामाजिक, आर्थिक तणाव, तसेच भौगोलिक राजकीय तंटे यांना सामोरे जावे लागत आहे. मानवाचे सहअस्तित्व आणि प्राणीमात्राचे जीवन हे एकमेव अशा पृथ्वी ग्रहाच्या स्थितीवर अवलंबून आहे. हे आपण विसरत चाललो आहे. यासाठी मानवाच्या प्रत्येक दिवसाच्या घटकांना पर्यावरणीय स्थितीवर होणारा स्थानिक आणि जागतिक पातळीवर होणारा बदल हा प्रत्येक व्यक्तीला माहिती करून देणे आवश्यक आहे.

पर्यावरणाच्य प्रदूषणाची समस्या आज वैश्विक बनली आहे. समकालीन आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये पर्यावरण हा एक अत्यंत महत्वाचा व प्रमुख घटक राजकीय शक्ती म्हणून आकाराला आहे. पर्यावरण संरक्षणाची जाणीव वैश्विक बनली असून प्रत्येक देशांनी पर्यावरणविषयक नीती तयार केली असून त्याची काटेकोरपणे प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यास सुरूवात केली आहे. विकसित आणि विकसनशील देशामधील संघर्षाचा पर्यावरण हा महत्वाचा मुद्दा बनला आहे. अनेक राष्ट्रांनी आपल्या अंतर्गत आणि परराष्ट्र धोरणांमध्ये लष्करी सुरक्षेपेक्षा पर्यावरणाच्या सुरक्षेला प्राधान्य दिल्याचे दिसते. पर्यावरणाचा घटक समकालीन राजकारणामध्ये महत्वाचा बनण्यामागे आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे हा घटक राष्ट्रांमध्ये परस्परावलंबित्व वाढविणारा आहे. हवा, पाणी, जंगले व पर्वती य पर्यावरणातील घटकांची आखणी सलग असून सृष्टीतील सजीवांना जोडण्याचे कार्य हे घटक करतात. म्हणून पर्यावरणाच्या घटकाला कृत्रिम राष्ट्रीय सीमा रेषामध्ये बंदिस्त करणे अवघड आहे. देशांदेशामधील वाढत्या परस्परावलंबित्वाला पर्यावरणाचा घटक जबाबदार आहे. एका राष्ट्राकडून झालेल्या पर्यावरणाच्या प्रदूषणाचे परिणाम केवल त्या देशालाच नाही तर शेजारी राष्ट्रांनाही सोसावा लागतो.

१९४५ नंतर म्हणजेच दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक पातळीवर आर्थिक आणि औद्योगिक विकासाच्या प्रक्रियेने जोर धरला. ही आर्थिक व औद्योगिक विकासाची प्रक्रिया पर्यावरणाच्या ऱ्हासावर आधारित आहे. या विकसाच्या प्रक्रियेअंतर्गत पृथ्वीवरील मर्यादित स्वरूपात उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधन संपत्तीची विकसित व विकसनशील राष्ट्रांनी बेसुमार लूट केली. याचा परिणाम म्हणजे साधन संपत्तीचा तुटवडा झाला. परिणामी पर्यावरणाचा समतोल बिघडला. त्यामुळे पर्यावरणाच्या अनेक समस्या निर्माण झाल्या. या घटकामध्ये आपण पर्यावरणाचा अर्थ, स्वरूप समजून घेणार आहेत.

**पर्यावरण अर्थ व व्याख्या :**

ज्या घटकांमुळे मानवी गरजांची पूर्तता होते. ते घटक मानवाच्या राहणीमान सुधारण्यास मदत करतात ते घटक म्हणजे निसर्गामध्ये आढळून येणारी हवा, पाणी, जंगल संपत्ती होय. कोणत्याही राष्ट्रांची प्रगती संसाधणांचा

दर्जा आणि प्रमाण यावर अवलंबून असते.

पर्यावरण ही संकल्पना शास्त्रीयदृष्ट्या बहुव्यापक, बहुसमावेशक व बरीच गुंतागुंतीची आहे. व्युत्पत्तिशास्त्राच्या दृष्टिने पर्यावरण पृथ्वीवरील विशिष्ट भागाशी निगडीत असलेली सभोवतालची परिस्थिती होय. 'Environ' (to surround) या मूळ फ्रेंच शब्दापासून इंग्रजीत 'Environment' असा शब्द प्रचलित झाला. यालाच मराठीत पर्यावरण असे म्हणतात. पर्यावरण म्हणजे सभोवतालची परिस्थिती. सभोवतालची परिस्थिती एक किंवा अनेक घटकांनी मिळून बनलेली असते. काही घटक निसर्गनिर्मित तर काही घटक मानवनिर्मित तर काही घटक निर्जिव व काही घटक सजीव असतात. या सर्व प्रकारचया घटकांची परस्परक्रिया सातत्याने सुरू असते. यातूनच पर्यावरण निर्मिती होते. पर्यावरण ही संज्ञा स्थल व कालसापेक्ष आहे. असे म्हणणे उचित ठरेल. एखाद्या छोट्याशा तळ्यातील पाणी, मृदा, हवा वनस्पती त्यातल्या सजीवांच्या दृष्टिने महत्वपूर्ण पर्यावरणनिर्मिती करतात. संपूर्ण पृथ्वी देखील एक पर्यावरणच आहे. पर्यावरण स्थल व काल याबरोबरच जीवसापेक्ष आहे. जे पर्यावरण एक सजीवास किंवा सजीवसमूहास तारक असते तेच पर्यावरण दुसऱ्या सजीवास किंवा सजीव समूहास मारकही ठरू शकते.

मानवी संस्कृतीच्या आतापर्यंतच्या वाटचालीत जे विविध टप्पे घडले त्यात १५ व्या शतकानंतरच्या औद्योगिक क्रांतीचा टप्पा अत्यंत महत्त्वाचा आहे. १५ व्या शतकानंतर आताच्या कालावधीदरम्यान म्हणजे पाचशे वर्षात नवनवीन खनिजांचे शोध, नागरिकरण, लोकसंख्यावाढ, वैज्ञानिक व वैद्यकीय प्रगती यांचा सर्वदूर वेगाने प्रसार झाला. औदयोगिक क्रांतीबरोबरच नवनवीन शोध, वाहतूक-दळणवळणातील क्रांतिकारी बदल यांना प्रचंड महत्त्व प्राप्त झाले. थोडक्यात निसर्ग व्यवस्थेतील मानवाचा हस्तक्षेप १५ व्या शतकानंतर सुरू झाला. तो हस्तक्षेप संध्या जागतिक पातळीवर प्रमुख व गंभीर विषय बनला आहे. पर्यावरण व मानव यांच्यातील संघर्ष उग्र झाल्याने अनेक गंभीर समस्या व प्रश्न निर्माण झाले आहेत.

**व्याख्या** : १) पर्यावरण म्हणजे आपल्या सभोवतालची हवा, पाणी, वनस्पती, जमीन पशूपक्षी यांनी मिळून बनलेला परिसर होय.

२) 'पर्यावरण म्हणजे आपल्या सभोवतालची परिस्थिती मग ती निसर्ग निर्मित व मानवनिर्मित असते.'

**पर्यावरणाचे स्वरुप :**

पर्यावरण म्हणजे आपल्या भोवतीची हवा, पाणी, वनस्पती, जमीन, पशुपक्षी आदिंनी मिळून बनलेला परिसर पर्यावरणातील हे घटक परस्परावलंबी आहेत. त्यांचे अस्तित्त्व एक दुसऱ्यावर अवलंबून आहे. पर्यावरणाचा अभ्यास करताना वरील सर्व घटकांचा एकत्रितपणे विचार करणे क्रमप्राप्त आहे. कारण या घटकांचे एक दुसऱ्यांशी वैशिष्ट्यपूर्ण संबंध असतात. हवा, पाणी व जमीन या घटकांच्या संयोगातून पृथ्वीवरील सजीव सृष्टी निर्माण झाली आहे. हवा, पाणी व जमीन पर्यावरणावरील प्रमुख घटकांची भूमिका महत्त्वाची असते. ५ जून हा दिवस वैश्विक पर्यावरण दिन म्हणून जगभर पाळला जातो. तर २२ एप्रिल हा दिवस पृथ्वी-वसुंधरा दिन म्हणून पाळला जातो. हवेमध्ये मानवाला जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या प्राणवायू ऑक्सीजन बरोबरच कार्बन डाय ऑक्साईड, नायट्रोजन, हायड्रोजन, हेलियम इ. वायूंचे अस्तित्व असते. वरील वायूंचे संतुलन बिघडल्यास हवा प्रदूषित होते. हवे प्रमाणेच प्रत्येक सजीवाला जगण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते. पाणी म्हणजे जीवन

आहे. द्रव, घन आणि वायू ही पाण्याची तीन रूपे आहेत. पाऊस, नदी, झरे, ओढे व समुद्र हे पृथ्वीवरील पाण्याचे मुख्य स्त्रोत आहेत. ते मानवाकडून दूषित झाले की अनेक समस्या निर्माण होतात. हवा, पाणी आणि जमीन यामध्ये काही हानिकारक पदार्थ मिसळल्यामुळे या घटकांच्या जैविक, रासायनिक आणि भौतिक गुणधर्मामध्ये बदल घडून येतात. या बदलामुळे हवा, पाणी व जमीन हे घटक निरूपयोगी बनतात. परिणामी त्यांच्या निरोपयोगी बनण्यामुळे मानवाच्या आरोग्यास धोका निर्माण होतो. यालाच प्रदूषण असे म्हणतात.

**पर्यावरण व प्रदूषण :**

मानव आपल्या अलौकिक बुद्धीमत्तेच्या सामर्थ्यावर मानवी जीवन जास्तीत जास्त सुकर करण्याचा सातत्याने प्रयत्न करतो. प्रत्येक स्थळी वा वेळी त्याचा प्रत्येक प्रयत्न यशस्वी होतोच असे नाही. पर्यावरणाचे इतर घटक देखील काही वेळा मानवी प्रयत्न ठरवितात. मानवाप्रमाणेच पर्यावरणातील काही शक्ती प्रगमनशील व गतिमान असतात. भूकंप, वादळे, महापूर, अवर्षण यासारख्या घटना बहुतांशी घातक स्वरूपाच्या असतात. एकूण परिस्थितीचा आढावा घेताना. मानवाची निर्णयशक्ती अत्यंत महत्वाची ठरते. या निर्णायक शक्तीवरच पर्यावरणातील विविध घटकांवर ताण पडतो आणि पर्यावरणामधील समतोल बिघडतो. वाढती लोकसंख्या, आर्थिक आणि औद्योगिक विकासाची नियंत्रण प्रक्रिया यातून पर्यावरणाचे प्रदूषण वाढले.

आज जगाला वायू प्रदूषण, जलप्रदूषण, भूप्रदूषण, ध्वनिप्रदूषण, सागरी प्रदूषण व औष्णिक प्रदूषण यांचे प्रामुख्याने दुष्परिणाम भोगावे लागत आहेत. अमेरिकेतील औद्यागिकरणापातून वाढत्या प्रदूषणाचे दुष्परिणाम शेजारच्या कॅनडा सारख्या देशाला आम्ल पर्जन्याच्या रूपाने भोगावे लागत आहेत. ह्याच प्रकारे जलप्रदूषणाच्या बाबतीत दिसून येते. एखादी नदी एका देशातून दुसऱ्या देशात वाहत जाते तेव्हा एका देशाची चूक दुसऱ्या इतर अनेक राष्ट्रांना भोगावी लागते. १९८६ साली तत्कालीन सोव्हिएत रशियाच्या युक्रेन राज्यातील चोर्नो बिल अणुभट्टीत स्फोट झाला आणि हवेत किरणोर्त्सन झाले याचे दुष्परिणाम केवळ युक्रेनला नाही तर इटलीपासून- स्विडनपर्यंतच्या अनेक युरोपियन देशांना दीर्घकाळापर्यंत भोगावे लागले. तसेच एखादया देशांचे जमिनीखाली केलेल्या अणूचाचणीतून जे किरणोत्सर्जन होते त्याचे परिणाम दीर्घकाळापर्यंत त्याच्या शोजारी देशांना भोगावे लागतात. वरील विश्लेषणावरून असे म्हणता येईल की पर्यावरण प्रदूषणाचे परिणाम हे विभागीय व जागतीक स्वरूपाचे झाल्याचे स्पष्ट होते.

पर्यावरणाचे प्रदूषण थांबवण्यासाठी जगातील विकसित व विकसनशील राष्ट्रांनी विभागीय व जागतिक पातळीवर अनेक कराराच्या माध्यमातून उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला आहे.

पर्यावरणात निर्माण होणाऱ्या किंवा जाणाऱ्या अपायकारक पदार्थांना दुषितके (Polluants) असे म्हणतात. प्रदूषण ही आजची जागतिक समस्या आहे. जगाच्या विविध भागात जल, स्थल, हवा व ध्वनी यांच्या प्रदूषणाचे प्रश्न भीषण झाले आहेत. मानवाने प्रदूषणाची दखल व्यवस्थितपणे न घेतली गेल्यास पृथ्वी हा एक निर्जिव ग्रह होणे अशक्य नाही.

प्रदूषण ज्या माध्यमातून घडते त्यावरून त्याचे मुख्यत्वे तीन प्रकार पडतात.

१) हवा - प्रदूषण (Air Pollution)

२) जल - प्रदूषण (Water Pollution)

३) भू – प्रदूषण (Soil/ Land Pollution)

याशिवाय प्रदूषण प्रामुख्याने नैसर्गिक, सांस्कृतिक, स्थानिक, प्रादेशिक व जागतिक प्रदूषण असे प्रकार पडतात. ज्वालामुखीमुळे होणारे प्रदूषण नैसर्गिक प्रदूषण असते तर ध्वनीप्रदूषण हे सांस्कृतिक प्रदूषण असते. एखाद्या कारखान्यातून होणारे प्रदूषण ठराविक क्षेत्रापुणे मर्यादित असते त्यास स्थानिक प्रदूषण असे म्हणतात. एखाद्याने प्रदूषणाने मोठे क्षेत्र व्यापल्यास प्रादेशिक प्रदूषण असे म्हणतात. उदा. भोपाळ दुर्घटना (१९८४), चर्नोबिल प्रदूषण घटना (रशिया) इ. वातावरणात सोडले जाणारे क्लोरोफ्ल्युरो कार्बन, $NO_2$, CO, $So_2$ हे जागतिक स्तरावरील वातावरणाचे प्रदूषण आहे. वरील वायूचे प्रमाण जास्त असल्यास वातावरणातल्या इतर वायूंचे निर्धारित प्रमाण बिघडवतात.

## पर्यावरण प्रदूषणाचे परिणाम :

पर्यावरण प्रदूषणाचे परिणाम मानवाला फार मोठ्या प्रमाणात भोगावे लागतात ते पुढील प्रमाणे

### १) जागतिक तापमान वाढ :

जागतिक तापमान वाढ हा भयानक मोठा पर्यावरण प्रदूषणाचा परिणाम म्हणून बिघतले जाते. १८ व्या शतकात युरोपमधील औद्योगिक क्रांतिनंतर आर्थिक आणि औद्योगिक विकासाची जी प्रक्रिया सुरू झाली ती पामुख्याने पर्यावरणाच्या ऱ्हासावरच आधारित आहे. गेल्या शतकापासून पृथ्वीचे तापमान हळूहळू वाढत असल्याचे शास्त्रज्ञांच्या नजरेस आले आहे. १९८० नंतर हे तापमान फारच वेगाने वाढत आहे. पाश्चिमात्य राष्ट्रांनी औद्योगिक आणि आर्थिक विकास करताना पर्यावरण संरक्षणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. औद्योगिकरणाच्या प्रक्रियेअंतर्गत पृथ्वीचे तापमान वाढविणारे वायू हवेत मिसळले गेले. तसेच शेतीचे उत्पन्न वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणात रासायनिक खताचा वापर करण्यात आला. या खतापासून नायट्रस व मिथेन सारखे वायू हवेत मिसळले गेले. हवेमध्ये या वायूंचे प्रमाण जास्त झाल्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढीचे संकट उभे राहिले. डॉ. मायकेल ओपन हेमर या तज्ञाने $CO_2$ ची वाढ येत्या ४० वर्षात शंभर टक्क्यांनी वाढेल अशी भिती व्यक्त केली आहे. म्हणून प्रदूषणाची दखल नीट न घेतली गेल्यास पृथ्वी हा एक निर्जीव ग्रह होणे अशक्य नाही. चालू शतकामध्ये पृथ्वीचे तापमान अधिक वाढण्याचा अंदाज पर्यावरण तज्ञांनी व्यक्त केला आहे. तज्ञांच्यामते २०५० सालापर्यंत पृथ्वीच्या तापमानात २ ते ११ अंश सेल्शिअस मध्ये वाढण्याची शक्यता वर्तवली आहे.

### २) ओझोन थराचे विरळ होणे :

मानवी जीवनासाठी ओझोन थराचे महत्त्व फार आहे. कारण ओझोनचा थर हा ढालीप्रमाणे मानवाचे व पृथ्वीचे संरक्षण करतो. सूर्यापासून परावर्तित होणारे अतिनिल किरण ओझोन थरामुळे अडले जातात. अतिनिल किरणाच्या घातक परिणामापासून मानवाचे संरक्षण ओझोनचा थर करतो. हायड्रोफ्लोरोकार्बन (HFCs), परफ्लुरोकर्बन्स (PFCs), व सल्फर हेक्साफ्लोराईड हे औद्योगिक वायू ओझोनचा थर विरळ करण्यास जबाबदार आहेत. अतिनिल किरण ही कर्करोगासाठी कारणीभूत आहेत. वरील वायू हे रेफ्रिजरेटर, इन्सूलेटर्स, उष्मावाहक इ. मधून उत्सर्जित होतात. ओझोन वायूचा थर विरळ झाल्यामुळे सूर्यापासून येणारी हानिकारक क्ष-किरणे पृथ्वीच्या पृष्ठभागावर येतात. ओझोनचा थर विरळ करण्यासाठी जबाबदार औद्योगिक वायूंचे सर्वाधिक उत्सर्जन चीन या देशातून होते. या वायूंचे सर्वाधिक उत्सर्जन करणाऱ्या आघाडीच्या १० राष्ट्रामध्ये भारताचाही समावेश

आहे. ओझोनचा थर अंटार्क्टिका खंडावर सर्वात विरळ असून त्यामध्ये छिद्र पडण्याचे शास्त्रज्ञाच्या निदर्शनास आले आहे.

### ३) आम्लपर्जन्य समस्या :

वातावरणात मिसळणाऱ्या सल्फर, नायट्रोजन व कार्बन यांच्या संयुगांचा बाष्प व ऑक्सिजनशी संयोग होऊन निरनिराळी आम्ले तयार होतात. कार्बन मोनॉक्साईड व कार्बनडाय ऑक्साईडचा पाण्याशी संयोग होऊन सौम्य कार्बनिक आम्ल तयार होते. सल्फर-ट्राय ऑक्साईड, सल्फ्युरिक आम्ल, नायट्रोजन ट्रायॉक्साईड, नायट्रिक आम्ल व कार्बनिक आम्ल यापैकी कोणतेही आम्ल पावसाच्या पाण्यात निर्माण झाल्यास त्याला आम्लपर्जन्य असे म्हणतात. जगाच्या बऱ्याच भागात आम्लपर्जन्याचे वनस्पती, प्राणी व वास्तूशिल्पावर परिणाम जाणवत आहेत. आम्ल पर्जन्यांची समस्या ही प्रामुख्याने विभागीय स्वरूपाची असली तरी अनेक राष्ट्रे या समस्येला बळी पडली आहेत. 'गंधक आणि नायट्रोजनचे ऑक्साईड वाहनांमधील धूर, इंधनाचे ज्वलन, पॉवर प्लेटस् यामुळे हवेत मिसळले जातात. हे ऑक्साईड दीर्घकाळ हवेमध्ये राहून त्याचे सल्फ्युरिक आणि नैट्रिक ॲसिडमध्ये रूपांतर होते. ही दोन्ही आम्ले पाण्याशी संयोग पावून पावसाद्वारे पृथ्वीवर पडतात. या आम्लमिश्रीत पावसाला आम्ल पर्जन्य असे म्हणतात. जगाच्या बऱ्याच भागात आम्ल पर्जन्याचे वनस्पती, प्राणी, व वास्तूशिल्पांवर परिणाम जाणवत असतात. जगात सर्वप्रथम स्कॉटलंड येथे १९७४ साली तीव्र आम्लपर्जन्यांची नोंद झाली. आम्ल पर्जन्यामुळे देशोदेशामध्ये संघर्षाचे संबंध निर्माण होत आहेत. उदा. अमेरिकेतील गंधकयुक्त धुरापासून कॅनडात पडणाऱ्या आम्लपर्जन्यामुळे गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या आम्लपर्जन्याला कॅनडाने अमेरिकेला जबाबधार धरले आहे. कॅनडातील जंगले व नदयामध्ये मोठ्या प्रमाणात आम्ल पर्जन्य होते. आम्लयुक्त पावसामुळे या शतकामध्ये कॅनडातील ४८००० जलाशये सजीवांना लायक राहणार नाहीत असे शास्त्रज्ञांना वाटते. स्विडनमध्ये २०,००० जलाशये आम्लपर्जन्यामुळे सध्या प्रदुषित बनली आहेत. नॉर्वेमध्ये सुमारे २०० तळी व सरोवरे आम्लयुक्त बनली आहेत. जर्मनी, नॉर्वेमध्ये, बेल्जियम येथील विविध औद्योगिक उत्सर्जनामध्ये सल्फर व नायट्रोजनचे प्रमाण इतरत्र वितरित झाल्याचा हा परिणाम आहे. जर्मनीमध्ये आम्लपर्जन्यामुळे जंगलांचे व शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. आशिया, युरोप व अमेरिका खंडात वाढत्या औद्योगिकीकरणामुळे इंधन ज्वलनातून निर्माण होणाऱ्या $So_2$, No, $No_2$, CO, $Co_2$ मुळे आम्लपर्जन्याचा प्रश्न भीषण होत आहे. भारतासारख्या विकसनशील देशात अद्याप त्याकडे कोणाचे फारसे लक्ष नाही. ही खेदाची बाब आहे. मध्य चीनमध्ये याकच्या शेणाचा उपयोग इंधनासाठी केलेल्या भागात १९८१ मध्ये जलप्रवाहांची आम्लता 2pH पेक्षा कमी आढळली याचा अर्थ लाकूड शेण, तेल, कोळसा या सेंद्रिय व जीवाश्म इंधनाचा वापर आम्लपर्जन्याचे मूळ कारण आहे. जसजशी लोकसंख्या वाढेल तसतसे नियंत्रण न झाल्यास आम्ल पर्जन्याचा प्रश्न मानवाला अधिकच भेडसावित राहिल.

### ४) हरितगृह परिणाम :

हरितगृह परिणाम ही एक वैश्विक समस्या असून भविष्यात या समस्येचे भयंकर दुष्परिणाम जगाला भोगावे लागणार आहेत. पृथ्वीवरील तापमान वाढत्याबरोबरच ध्रुवावरील बर्फ वितळून समुद्रातील पाण्याची पातळी वाढणार आहे. त्यामुळे समुद्रकिनारी असणारे देश, शहरे, समुद्रात बुडण्याची शक्यता आहे. उष्णतेच्या उत्सर्जनावर होणारा वातावरणाचा परिणाम हा एखाद्या काचेच्या पेटीतील उष्णतेवर होणाऱ्या परिणामासारखा आहे. भूपृष्ठावरून

उत्सर्जित होणारी उष्णता वातावरणामुळे एकदम उत्सर्जित होत नाही. पृथ्वीवरील वातावरण हे पृथ्वीभोवती हरितगृहाचे कार्य करते. अन्यथा उत्सर्जनाने पृथ्वीवरील सर्व उष्णता निघून जाऊन पृथ्वीचे तापमान खाली गेले असते. वातावरणाच्या या संरक्षक कवचाच्या परिणामास हरितगृह परिणाम असे म्हणतात. वाढत्या तापमानाचा शेतीक्षेत्रावर फार मोठा परिणाम होणार आहे. शेतीची उत्पादकता कमी होण्याची शक्यता वर्तवण्यात येते. अमेरिका व भारत तसेच आफ्रिका खंडातील राष्ट्रांच्या जमिनीची उत्पादक क्षमता अधिक कमी होईल. हरितगृह परिणामामुळे समुद्रवादळाचे प्रमाण वाढून समुद्रकिनाऱ्या लगतच्या शहरांना मोठा फटका बसणार यात शंका नाही.

**पर्यावरण संरक्षणासाठी प्रयत्न :**

पर्यावरण संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरून खूप मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्यात येत आहेत ते पुढीलप्रमाणे –

**१) अंटार्क्टिका संरक्षण करार :**

१९५९ साली अंटार्क्टिका खंडावरील पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी बहुपक्षीय असा महत्त्वपूर्ण करार करण्यात आला. या करारामध्ये या खंडाचा वापर फक्त शास्त्रीय संशोधनासाठीच करायचा. लष्करी कवायती, अणूपरिक्षण यासाठी या खंडाचा वापर करायचा आहे असे ठरले. सामुहिक सहकार्याच्या माध्यमातून या खंडाचे संरक्षण करण्याची जबाबदारी सर्वच राष्ट्रांनी उचलून धरली कारण हा खंड कोणत्याही एका राष्ट्राच्या अधिपत्याखाली येत नाही. 'ग्रीन पीस' ही आंतरराष्ट्रीय पातळीवरील पर्यावरण सरंक्षण करणारी संख्या आहे. या संस्थेने १९८० च्या शतकात अंटार्क्टिका खंडावर पर्यावरण संरक्षणासाठी आणि संशोधन कार्यासाठी एक कायमस्वरूपी तळ उघडला आहे. मैत्री व गंगोत्री ही भारताची दोन ठिकाणे संशोधनासाठी अंटार्क्टिका खंडावर आहेत.

**२) स्टॉकहोम पर्यावरण परिषद :**

पर्यावरण संरक्षणाची जाणीव जागतिक बनविण्यात स्टॉकहोम पर्यावरण परिषदेचे योगदान महत्वपूर्ण आहे. १९७२ साली पर्यावरण संरक्षणाच्या क्षेत्रामध्ये पहिला आंतरराष्ट्रीय पातळीवरचा सामूहिक प्रयत्न म्हणजे स्टॉकहोम पर्यावरण परिषद होय. या परिषदेच्या माध्यमातून पर्यावरण ही एक जागतिक समस्या आहे. त्यासाठी सर्वांनी मिळून सामूहिकरित्या पर्यावरण संरक्षणासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे असा संदेश स्टॉकहोम पर्यावरण परिषदेने दिला. या परिषदेमध्ये पर्यावरण संरक्षणाचा जाहिरनामा २६ तत्वांचा करण्यात आला त्यातील काही तत्त्वे पुढीलप्रमाणे पर्यावरण संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य, पर्यावरण संरक्षणासाठी विज्ञान-तंत्रज्ञानातील प्रगतीचा वापर, पर्यावरणाची सुरक्षा आणि सुधारणेवर आधारित आर्थिक विकास, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि प्रदूषण टाळण्यासाठी मानवी बुद्धी आणि शक्तीच विवेकी वापर, विकसित आणि विकसनशील देशांमधील आर्थिक दरी कमी करणे, नैसर्गिक साधन संपत्तीचा काटकसरीने वापर आणि व्यवस्थापन, वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण, व राष्ट्रीय पातळीवर नीती ठरवून त्याची कडक अंमलबजावणी करणे इ. महत्वपूर्ण ठराव करण्यात आले. पर्यावरण संरक्षणच्या जाहिरनाम्यामध्ये अंतर्भूत तत्वाचे पालन होते किंवा नाही हे तपासण्यासाठी ५४ सदस्यांची एक कार्यकारी समिती स्थापन करण्यात आली. या परिषदेमध्ये '५ जून हा जागतिक पर्यावरण दिन' म्हणून साजरा करण्याचे ठरविले. स्टॉकहोम परिषदेमध्ये ठराव करण्यात आले त्याच्या धरतीवरच संयुक्त राष्ट्र

संघाने आमसभेमध्ये १९७२ साली एक ठराव करून पर्यावरण संरक्षण कार्यक्रमासाठी ''संयुक्त राष्ट्र संघटना पर्यावरण संरक्षण कार्यक्रम'' या नावाने कार्यक्रम सुरू केला.

**३) नैरोबी पर्यावरण परिषद – १९८२**

स्टॉकहोम परिषदेमध्ये घेण्यात आलेल्या २६ वेगवेगळ्या पर्यावरण तत्त्वांचा आढावा घेण्यासाठी १९८२ साली नैरोबी पर्यावरण परिषद घेण्यात आली. या परिषदेत आर्थिक विकासामधून घडून येणाऱ्या पर्यावरणाच्या प्रदूषणावर चर्चा करण्यात आली. आर्थिक विकास व पर्यावरण संरक्षण या दोन्ही परस्परपूरक बाबी असून त्या एकाचवेळी साध्य होऊ शकतात असा या परिषदेमध्ये विचार मांडण्यात आला.

**४) १९८७ सालचा मॉन्ट्रेल ठराव –**

ओझोन वायूंची संरक्षक ढाल विरळ करणाऱ्या घातक औद्योगिक वायूंच्या उत्सर्जनाचे प्रमाण कमी करण्यासाठी १९८७ साली मॉन्ट्रेल ठराव करण्यात आला. या ठरावानुसार २२ राष्ट्रांनी घातक औद्योगिक वायूंच्या उत्सर्जनाचे प्रमाण ५०% पर्यंत कमी करण्याचे मान्य केले.

**५) आम्लपर्जन्या विषयांचा १९८८ चा करार –**

आम्ल पर्जन्यांच्या समस्यावर उपाय काढण्यासाठी १९८८ साली युरोपियन २४ राष्ट्रांनी एक करार केला. १९९५ पर्यंत नायट्रोजनडाय ऑक्साईड वायूच्या उत्सर्जनाच्या प्रमाणात ५०% पर्याय घट करण्याचे मान्य केले. या करारामध्ये आम्ल पर्जन्याच्या प्रश्नाला बळी पडलेल्या कॅनडा व अमेरिका या राष्ट्रांचाही समावेश होता.

**६) रिओची वसुंधरा परिषद –**

१९९२ साली ब्राझिलची राजधानी रिओ दि जानिरो येथे संयुक्त राष्ट्र संघटनेची पर्यावरण आणि विकास या विषयावर ऐतिहासिक परिषद पार पडली. या परिषदेमध्ये १०० हून अधिक राष्ट्रांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. या परिषदेमध्ये विकसनशील देशांमध्ये आर्थिक विकासाच्या प्रक्रियेअंतर्गत पर्यावरणाच्या होणाऱ्या नुकसानीवर या परिषदेत चर्चा झाली. पर्यावरणाचे संरक्षण आणि आर्थिक विकास या घटकांमध्ये सुसंवाद साधता यावा यासाठी एका जाहिरनाम्याची घोषणा रिओ वसुंधरा परिषदेमध्ये करण्यात आली. या परिषदेचा मुख्य विषय हा शाश्वत विकास होता. या परिषदेत 'Sustainable Development Commision' ची स्थापना करण्यात आली. तसेच वन संरक्षणाची तत्त्वे ठरविली. मानव अधिकारांमधील घनिष्ठ संबंध आणि पर्यावरणाचे संरक्षण यावर चर्चा झाली.

**७) क्योटो करार :**

जपानमधील क्योटो शहरात १९९७ साली वाढत्या जागतिक तापमान वाढीच्या संदर्भात सखोल चर्चा झाली. २० व्या शतकात पृथ्वीचे तापमान २ अंश ते ११ अंश सेल्सिअसने वाढण्याची शक्यता आहे. पृथ्वीचे तापमान वाढण्यासाठी जबाबदार ग्रीन हाऊस गॅसेसचे प्रमाण कमी करण्यासाठी क्योटो परिषदेत ठरविण्यात आले. ग्रीन हाऊस गॅसेसचे प्रमाण कमी करण्यासाठी क्योटो परिषदेत महत्वपूर्ण करार करण्यात आला. परंतु या कराराला अमेरिकेने विरोध केला. परिणामी २००५ पर्यंत या करारची अंमलबजावणी होऊ शकली नाही. २००५ साली १४१ देशांनी या कराराला मान्यता दिली. या कराराला अमेरिकेने मान्यता दिली नाही.

## ब) शाश्वत विकास (Sustainable Development)

पर्यावरणाचे संरक्षण ही जाणीव जागतिक बनण्याबरोबरच १९८० च्या दशकात शाश्वत विकासाची संकल्पना उदयास आली. दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक पातळीवर सुरू झालेल्या आर्थिक आणि औद्योगिक विकासाच्या प्रक्रियेमुळे पर्यावरणाचे प्रदूषण वाढत आहे. यावर सर्वप्रथम १९७२ च्या स्टॉकहोम पर्यावरण परिषदेमध्ये प्रकाश टाकण्यात आला. राष्ट्रीय विकास म्हणजे आर्थिक समृद्धी हे समीकरण बनल्यामुळे देशांनी आर्थिक समृद्धीचे उद्दिष्ट गाठण्यासाठी पर्यावरणाचा बळी दिला. जगातील विकसित व विकसनशील देशांनी पृथ्वीवरील नैसर्गिक साधनसंपत्तीची मोठ्या प्रमाणात लूट केली. परिणामी पर्यावरणाचे प्रदूषण वाढून मानवाला नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागले. विकासाची ही प्रक्रिया आत्मघातकी आहे. वरील सर्व पार्श्वभूमीवर पर्यावरणाच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी सर्वसमावेशक अशी विकासाची एक कल्पना १९८० च्या दशकात उदयास आली त्यास शाश्वत विकास (Sustainable Development) या नावाने ओळखले जाते.

**शाश्वत विकास अर्थ आणि स्वरुप –**

शाश्वत विकास ही संकल्पना सर्वसमावेशक व बहुअंगी असल्यामुळे त्याचा अर्थ अनेक प्रकारे केला जातो. १९८७ साली पर्यावरण आणि विकास यांच्यातील परस्पर संबंधाचा अभ्यास करण्यासाठी ब्रॅडलँड आयोगाने ही संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. ब्रँडलँड आयोगाच्या मते, 'भावी पिढीच्या गरजांचा विचार करून वर्तमान पिढीच्या गरजांची पूर्तता करणारा विकास म्हणजे शाश्वत विकास होय. ब्रँडलॅड हे नॉर्वेचे माजी पंतप्रधान होते. त्यांच्या नावानेच हा आयोग निर्माण करण्यात आला. आपल्या बुद्धीच्या जोरावर नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर करताना माणूस हा निसर्ग चक्राचा एक घटक आहे. याची जाणीव शाश्वत विकास या संकल्पनेत आहे. पृथ्वीवरील इतर कोणाच्या सजीव आपल्या गरजेपेक्षा जास्त संसाधनांचा वापर करत नाही. 'जीवो जीवस्य जीवनम्।' हे निसर्गचक्र आहे. माणसाच्या सतत अधिक काही मिळवण्याच्या इच्छेमुळे सतत अधिक अधिक संसाधनांचा वापर करत असतो.

शाश्वत विकासाची संकल्पना ही नैसर्गिक साधन संपत्तीच्या विवेक बुद्धीने आणि दूरदृष्टिने वापर करण्यावर आधारित आहे. थोडक्यात वर्तमान काळातील पिढीच्या गरजा भागविण्यासाठी भविष्यातील पिढीचा बळी दिला जाणार नाही. हा विचार शाश्वत विकासामध्ये अभिप्रेत आहे. भविष्यकालीन पिढीचा बळी दिला जाऊ नये यासाठी सध्य काळातील पिढीने पृथ्वीवरील नैसर्गिक साधन संपत्तीचे विवेकपूर्ण व्यवस्थापन करायला हवे. म्हणूनच नैसर्गिक साधन संपत्तीचा अतिरेकी वापर टाळायला हवा. ''शाश्वत विकास म्हणजे आपल्या वर्तमानातील गरजा पूर्ण करताना आपल्या पुढील पिढ्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेला बाधक न येऊ देता साम्य केलेला विकास होय.''

**शाश्वत विकासाची आवश्यकता :**

शाश्वत विकासाच्या संकल्पनेची आवश्यकता खालील विविध मुद्यांच्या आधारे आपणास करता येईल.

**१) नैसर्गिक साधन संपत्तीचा अति वापर –**

मनुष्याने तंत्रज्ञानातील प्रगतीच्या जोरावर पर्यावरणामध्ये अमुलाग्र बदल घडवून आणले. औदयोगिक व आर्थिक विकासाच्या माध्यमातून नागरिकांच्या गरजांची पुर्तता करण्याचा, नागरिकांचे जीवनमान उंचावण्याचा

प्रत्येक जगातील प्रत्येक राष्ट्रांकडून होत असतो किंवा हे प्रत्येक देशांचे आध्यकर्तव्यच आहे. हा आर्थिक व औदयोगिक साधनाना देशांनी उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर अतिरेकी मार्गाने केला.

**२) औदयोगिक व आर्थिक विकासाची संकुचित प्रक्रिया –**

औद्योगिक व आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचे स्वरूप संकुचित आहे. कारण यामध्ये केवळ वर्तमान पिढीच्या गरजा भागविण्याचा स्वार्थी हेतू होता. परिणामी नैसर्गिक साधन संपत्तीची लूट मोठ्या प्रमाणात केली गेली. या सर्वांचा परिणाम म्हणजे पाणी, हवा यांचे प्रदूषण वाढले. त्यामुळे प्राणी, पक्षी व वनस्पती यांच्या अस्तित्वात मोठा धोका निर्माण झाला आणि पर्यावरणाचा समतोल ढासळला.

**३) लोकसंख्या वाढीचा परिणाम –**

लोकसंख्या वाढीचा पर्यावरणावर विपरीत परिणाम झाला. वाढत्या लोकसंख्येबरोबरच नैसर्गिक साधन संपत्तीची लूटही वाढतच गेली. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण या प्राथमिक गरजा पूर्ण करण्यासाठी राष्ट्राराष्ट्रात स्पर्धा निर्माण झाली. लोकसंख्या जसजशी वाढली तसतसे मोठ्या प्रमाणात आर्थिक व औद्योगिक विकास करणे संबंधित राष्ट्राला गरजेचे झाले परिणामी पर्यावरणाचे प्रदूषण मोठ्या प्रमाणात झाले.

**४) विकसनशील राष्ट्रांच्या समस्येत वाढ –**

औद्योगिक व आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये विकसित व विकसनशील राष्ट्रे यांच्यामधील आर्थिक विकासाची दरी कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. विकसनशील देशामध्ये वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्राथमिक गरजा पूर्ण करण्याचा प्राधान्य दिले गेले. पर्यावरण सरंक्षणाविषयीचे अज्ञान, त्यासाठी आवश्यक निधी आणि तंत्रज्ञानाचा अभाव या विकसनशील राष्ट्रांच्या प्रमुख समस्या आहेत.

**शाश्वत विकासाची उद्दिष्टये –**

सप्टेंबर २०१५ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत एकूण १७ उद्दिष्टये असणारा २०३० साठीचा शाश्वत विकास अजेंडा स्वीकारला ही उद्दिष्टये सदस्य राष्ट्रांनी २०१६ ते २०३० या कालावधीत साध्य करावयाची आहेत. ही उद्दिष्टये संयुक्त राष्ट्र संघाने बनविली असून त्याची शाश्वत विकासाठीची जागतिक उद्दिष्टये अशी बदली करण्यात आलेली आहे.

राष्ट्र संघाच्या १९३ सदस्य राष्ट्रांनी पुढील १७ उद्दिष्टांना व ध्येयांना एकमुखी स्वीकार केला.

१) दारिद्र्य निर्मूलन

२) भूक निर्मूलन

३) चांगले आरोग्य

४) दर्जेदार शिक्षण

५) लैंगिक समानता

६) शुद्ध पाणी आणि आरोग्यदायक स्वच्छता

७) नूतनीकरण्याजोगी आणि स्वस्त ऊर्जा

८) चांगल्या नोकऱ्या आणि अर्थशास्त्र

९) नवीन उपक्रम आणि पायाभूत सुविधा

१०) असमानता कमी करणे.

११) शाश्वत शहरे आणि समाज

१२) उपलब्ध साधनांचा जबाबदारीपूर्वक वापर

१३) हवामानाचा परिणाम

१४) शाश्वत महासागर

१५) जमिनीचा शाश्वत उपयोग

१६) शांतता आणि न्याय

१७) शाश्वत विकासासाठी भागीदारी

वरील वेगवेगळ्या प्रकारची १७ उद्दिष्टये साध्य करण्यासाठी २०१५ ते २०३० सालापर्यंतच्या कालावधी निश्चित केला आहे.

**शाश्वत विकासाचे घटक –**

शाश्वत विकास म्हणजे पृथ्वीवरील संसाधनांचा उपयोग करून आपला विकास करताना पुढील पिढ्यांच्या विकासासाठी संसाधनांचा काळजीपूर्वक वापर करणे होय. शाश्वत विकास या शब्दात नैसर्गि आणि मानवनिर्मित संसाधनांचा जपून आणि योग्य तितका वापर करणे अपेक्षित आहे. जागतिकीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे नैसर्गिक संसाधने आज मोठ्या प्रमाणात आणि अनियंत्रितपणे वापरली जात आहेत. आपल्या येणाऱ्या पिढ्यांचा विचार जी मर्यादित संसाधने आहेत त्यांचा नियंत्रित वापर शाश्वत विकासात अपेक्षित आहे. सौर ऊर्जा, पवन ऊर्जा यासारख्या नवीनकरणक्षम ऊर्जास्त्रोतांचा जास्तीत जास्त वापर शाश्वत विकासाचा पाया आहे. अनियंत्रित इंधन उपसा, जंगल जोड, अनिर्बंध जलउपसा आणि वापर, औद्योगिकीकरण आणि लोकसंख्यावाढ, प्रदूषण या सर्वांमुळे शाश्वत विकासाला बाधा निर्माण होते. शाश्वत विकासात माणसाबरोबरच पृथ्वीवरील इतर जीवसृष्टीचाही विचार केला जातो. माणूस हा पृथ्वीवरील एका साखळीचा भाग आहे. त्या साखळीच्या मर्यादा लक्षात घेऊनच त्याची वागणूक असली पाहिजे हा याचा मुख्य उद्देश आहे. त्या अनुषंगाने शाश्वत विकासाचे घटक पुढीलप्रमाणे

**१) सुरक्षित पर्यावरण :**

शाश्वत विकासाची संकल्पना ही वर्तमान आणि पुढील पिढ्ंयासाठी सुरक्षित आणि सुधारलेले पर्यावरण उपलब्ध करून देण्यावर आधारित आहे. या प्रक्रियेमध्ये नैसर्गिक साधने, हवा, पाणी, जमीन व वनस्पती यांचा विचारपूर्वक दूरदृष्टी ठेवून वापर करणे ही अपेक्षा आहे.

**२) भविष्यकालीन कल्याणाचा विचार –**

शाश्वत विकासाची संकल्पना ही केवळ वर्तमानच नाही पिढीच्या कल्याणावरदेखील लक्ष केंद्रीत करणारी

प्रक्रिया आहे. भावी पिढीच्या कल्याणाची जबाबदारी सध्याच्या पिढीवर आहे. त्या दृष्टिने उपलब्ध साधन संपत्तीचा संतुलित वापर होणे अपेक्षित आहे.

**३) साधनसंपत्तीचा काटकसरीने वापर –**

नैसर्गिक साधनसंपत्तीचे अस्तित्व कायमस्वरूपी नाही. या संपत्तीचा सातत्याने ऱ्हास होत आहे. ह्या संपत्तीचे जतन करणे व सांभाळून ठेवणे अत्यावश्यक आहे. पुनर्निर्मिती करू शकणारी साधनसंपत्तीची जपणूक करायला हवी तसेच तीचा काटकसरीने वापर करायला हवा. नैसर्गिक साधन संपत्ती पूर्णपणे नष्ट होणार नाही. याची काळजी घ्यायला हवी. सर्वात महत्वाचे म्हणजे नैसर्गिक साधन संपत्तीचा लाभ समाजातील सर्व घटकांना घेता यावा यासाठी उपायोजना करायला हव्यात.

**४) पर्यारणाचा समतोल राखणे –**

शाश्वत विकासाच्या प्रक्रियेत पर्यावरणाचा समतोल टिकवून धरण्यास प्राधान्य आहे. विकासाचा हा समतोल व्यक्ती, समाज, बिगर शासकीय संस्था संघटना आणि शासनाच्या सामुदायिक प्रयत्नांतून साधला जाईल. पर्यावरणाचा समतोल साधला साधण्यातून पर्यावरण प्रदूषणांशी संबंधीत अनेक समस्या टाळता येतील.

**५) प्रदूषण रोखण्यासाठी प्रयत्न –**

पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी जगातील सर्व राष्ट्रांनी सामुदायिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. हवा, पाणी व जमीन यांचे वाढते प्रदूषण रोखण्यासाठी जाणीवपूर्वक सामुहिक प्रयत्न आवश्यक आहेत. प्रत्येक देशांनी पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आपली परराष्ट्रनीती योजने आवश्यक आहे. आपल्या देशाचा विकास करीत असताना पर्यावरणाचे प्रदूषण होणार नाही यांची काळजी प्रत्येक देशांने घेणे आवश्यक आहे.

**६) विवेकपूर्ण व्यवस्थापन –**

शाश्वत विकासाचा संबंध नैसर्गिक साधन संपत्तीच्या विवेकपूर्ण व्यवस्थापनाशी आहे. चांगले व्यवस्थापन केल्यामुळे जी नैसर्गिक साधनसंपत्ती नष्ट होणारी आहे त्या संपत्तीचा विवेकपूर्ण व काटकसरीने वापर होणे आवश्यक आहे. विवेकपूर्ण व्यवस्थापनातून सध्याच्या पिढीच्या गरजा पूर्ण होण्याबरोबरच भविष्यकालीन पिढीच्या कल्याणासाठीही तरतूदी होऊ शकतील.

## ४.२.३ दहशतवाद (Terrorism) व अण्वस्त्र प्रसार

दहशतवाद हा शब्द सर्वसामान्यपणे बळाचा/ शक्तीचा/ दहशतीचा वापर करून दहशत किंवा भीती निर्माण करणे किंवा एखादे राजकीय साध्य निश्चित करून घेणे. या अर्थाने वापरला जातो. दहशतवाद केवळ एका राज्यापुरता, एखाद्या भागापुरता मर्यादित राहिलेला नाही. तर त्याने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय राजकारणालाच आता पुरते अस्थिर करून टाकले आहे. कधी आणि कुठे दहशतवादी कारवायामुळे संकट उभे राहिल याचा अंदाज बांधता येत नाही. कितीही सतर्ककता बाळगली तरी त्यावर मात करणारी अशी ही दहशतवादाची समस्या आहे. विकसित देशांना या दहशतवादाचे जेवढे भय आहे तेवढेच विकसनशील देशानांही आहे. दहशतवादामध्ये 'हिंसा' हा प्रमुख घटक असतो. दहशतवाद हा धाक-दडपशाहीचा एक संघटित प्रकार आहे. भारतासारखा देश गेली ६० वर्षे विविध प्रकारच्या दशहतवादाला विविध पातळ्यावर तोंड देत आहे. दशहतवाद म्हणजे काय आणि

दहशतवादी कोणाला म्हणायचे या प्रश्नाचे उत्तर देणे अवघड आहे. काही उदाहरणे –ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी सत्तेविरूद्ध सशस्त्र लढा देणारे क्रांतिकारक हे भारतीयांच्या दृष्टिने स्वातंत्र्यसैनिक होते. परंतु ब्रिटिश सरकारच्या लेखी त्यांची वर्गवारी दहशतवादी अशी होती. काश्मिरमधील अतिरेकी हे भारताच्या दृष्टिने दहशतवादी, तर पाकिस्तानच्या दृष्टिने दहशतवादी, तर पाकिस्तानच्या दृष्टिने स्वातंत्र्य सैनिक, पॅलेस्टिन ऑगर्ननायझेशन ही इस्त्राईलमधील पॅलेस्टिनीच्या दृष्टिने मुक्तीवादी संघटना आहे, तर इस्त्राईल सरकारसाठी दहशतवादी आहेत. चेचेन बंडखोरांना रशियन सरकार दहशतवादी म्हणते, मात्र चेचन्यातील अनेकांसाठी ते मुक्तीवादी आहेत. याच मतभिन्नतेमुळे दहशतवादी एक सर्वमान्य होऊ शकेल अशी व्याख्या करणे अवघड आहे.

**व्याख्या –**

१) बोआझ गॅनर – ''राजकीय उद्दिष्टये साध्य करण्यासाठी नागरी लक्ष्ये अथवा सामान्य नागरिक यांच्या विरोधात हिंसेचा प्रत्यक्ष वापर करणे किंवा तशी धमकी देणे यास दहशतवाद असे म्हणतात.''

२) अमेरिक सेट्रंल इंटेलिजन्स (१९८०) – ''एखाद्या बाजूने अथवा विरोधात एखाद्या व्यक्तीने अथवा समुहाने राजकीय स्वार्थापोटी दिलेली धमकी अथवा हिंसात्मक मार्गाचा अवलंब म्हणजे दहशतवाद होय.''

३) ''दहशतवाद म्हणजे अशी राजकीय हिंसा जी जाणीवपूर्वक तेथील नागरिकांना लक्ष्य करते आणि एकाला मारा व दहा हजारांना भीती घाला.''

४) ''दहशतवाद म्हणजे समुदायात भिती निर्माण करण्यासाठी अनुसरलेले एक प्रकारचे हिंसात्मक वर्णन असते. किंवा राजकीय हेतूने प्रेरित होऊन छेडलेले ते पर्याप्त स्वरूपाचे अस्त्र असते.''

५) ''दहशतवाद म्हणजे प्रामुख्याने पद्धतशीर अशा हिंसात्मक मार्गाने ईप्सित ध्येय प्राप्त करण्यासाठी एखाद्या समुहाने अवलंबिलेली एक एक पद्धती असते.''

वरील व्याख्याचा आशय विचार घेतला असता असे म्हणता येईल की, आपल्या उद्दिष्ट पूर्तीसाठी बळाचा, हिंसेचा वापर करून दहशत पसरविणे वैध असते मानणारी आणि संघटित व नियोजनबद्ध हिंसेचा पुरस्कार करणारी व्यक्ती किंवा समूह दहशतवादी असते. तसेच दहशतवादी व्यक्ती किंवा संघटनेसाठी दहशत, हिंसा ही साध्ये नसून उद्दिष्टपूर्तीसाठी वापरलेली साधने असतात. सर्व प्रकारचा हिंसाचार हा दहशतवाद या गटात मोडत नाही. उदा. युद्धामधील हिंसेला दहशतवाद असे म्हणता येत नाही.

**स्वरूप :**

दहशवाद हा अनेक वर्षापासून अस्तित्वात आहे. भारतासारखा विकसनशील देश गेले ७० वर्षे दहशतवादाला तोंड देत आहे. जगभरामध्ये २१ व्या शतकात दहशतवादाच्या हल्ल्यामध्ये वाढ झालेली पहावयास मिळते. थोडक्यात दहशतवादाला आंतरराष्ट्रीय स्वरुप प्राप्त झालेले आहे. कोणत्याही दहशतवादी व्यक्ती अथवा संघटनेसाठी दहशत, हिंसा ही साध्ये नसून, उद्दिष्टपूर्तीसाठी वापरलेली साधने असतात. सर्व प्रकारच्या हिंसाचार दहशतवादी गटात मोडत नाही. दशहतवादाचा उद्रेक होण्यामागे दीर्घकाळ रेंगाळलेली कारणे असतात. दहशतवादी कृत्य हे अतिशय सुबद्ध, सुनियोजित आणि संघटित हिंसाचार असतो. दहशतवादी संघटनांची वर्गवारी आपणास सर्वसाधारणपणे चार प्रकारांमध्ये करता येऊ शकते. डाव्या विचारसरणीच्या दहशतवादी संघटना ह्या मार्क्सवादी विचारांपासून प्रेरणा घेणाऱ्या असतात. भांडवली बुर्झा व्यवस्था उलटवून टाकण्याच्या उद्दिष्टाने प्रेरित होऊन अशा

संघटना दहशतवादाचा आश्रय घेतात. उदा. नेपाळ मधील माओवादी गट व भारतातील नक्षलवादी गट इ. उजव्या विचारसरणीच्या दहशतवादी संघटना फॅसिस्ट विचारसरणीने प्रभावित असतात. निर्वसाहतीकरणाच्या प्रक्रियेतून निर्माण झालेल्या अनेक दहशतवादी संघटना आहेत. त्यांना वांशिक राष्ट्रवादी आणि फुटिरतावादी दहशतवादी संघटना असेही संबोधले जाते. उदा. एलटीटीई संघटना (श्रीलंका), पॅलेस्टिन मुक्ती संघटना, काश्मिरमधील काही दहशतवादी गट, चेचन्यातील बंडखोर इ. उदाहरणे सांगता येतील. अलिकडच्या काळात विशेषतः धार्मिक मूलतत्ववादातून निर्माण झालेल्या संघटना ह्या दहशतवादी, संघटना म्हणून संबोधल्या जातात. त्या बहुतेक इस्लामी मूलतत्वादातून निर्माण झालेल्या संघटना आहेत. उदा. अल्-कैदा, तालिबान, मुजाहिद्दीन अशा संघटना प्रमाणे अनेकदा प्रत्यक्ष राज्यसंस्थाच दहशतवादी कारवाया किंवा दहशतवादाचा पाठपुरावा करत असतात. याला राज्य पुरस्कृत दहशतवाद असे म्हणतात. तसेच दहशतवादी संघटना या शासन, राज्य आणि राष्ट्र यांपैकी एक अथवा अनेक घटकांच्या अधिमान्यतेला आव्हान देत असतात. निःशस्त्र सामान्य जनता हेच बहुधा दहशतवाद्यांच्या कारवाईचे लक्ष्य असते. भरबाजारात गोळीबार करणे, वर्दळीच जागी शक्तीशाली बॉम्ब स्फोट करणे, रेल्वे गाड्यांना घातपात करणे, विमानाचे अपहरण करणे, मोठमोठ्या आर्थिक शहरावर व ठिकाणावर हल्ला करणे असे सर्व मार्ग वापरून दहशतवादी संघटना सामान्य जनतेत घबराट पसरवतात.

**दहशतवादाची वैशिष्टये :**

१) दहशतवाद हा राज्य, सत्ता व समुदायाच्या विरोधी असतो.

२) दहशतवादामागे राजकीय, आर्थिक स्वार्थ असतो.

३) दहशतवाद हा अवैध व बेकायदेशीर असतो.

४) बुद्धि प्रामाण्यवादाला दहशतवादात स्थान नसते किंवा त्यामध्ये व्यवहार्यता अजिबात नसते.

५) दहशतवादाचे पर्यवसान संघर्षात होते.

६) दहशतवादात हत्या, हिंसा, विध्वंस व नुकसान हेच अभिप्रेत असते.

७) लोकांना व समुदायाला वेठीस धरण्याचा एक प्रकार म्हणजे दहतशवाद होय.

८) निःशस्त्र सामान्य जनता हेच बहुधा दहशतवाद्यांच्या कारवाईचे लक्ष्य असते.

९) दहशतवादी कारवायामध्ये अनपेक्षितता असते.

१०) दहशतवादी कारवाया बहुधा कमी खर्चिक असतात. म्हणजे सुरक्षा यंत्रणेवर होणाऱ्या खर्चापेक्षा कितीतरी कमी खर्चात दशहतवाद्यांना हिंसाचार घडवून घबराट पसरविता येते आणि सामान्य जनतेचा सुरक्षा यंत्रणेवरील विश्वास नष्ट करता येतो.

## दहशतवादाची कारणे

### १) महासत्तांची जागतिक स्पर्धा आणि वर्चस्ववाद :

अमेरिकेने सोव्हिएत रशियाला शह देण्यासाठी अफगाणिस्तानातील इस्लामी मूलतत्ववाद्यांना हाताशी धरले. पाकिस्तानकरवी त्यांना अमेरिकेने त्यांना पैसा, प्रशिक्षण, शस्त्रे पुरविली. अमेरिका आणि सोव्हिएत रशिया

यांच्या संघर्षातून या भागात तालिबान, मुजाहिद्दीन या सारख्या दहशतवादी संघटना निर्माण झाल्या. आफगाणिस्तानातील संघर्ष संपल्यानंतर या संघटना भारताकडे वळल्या व त्यांना काश्मीरमध्ये कारवाया करण्यास पाकिस्तानने भरीव मदत केली.

**२) पाश्चिमात्य सभ्यता आणि संस्कृती–**

अलीकडच्या काळात पाश्चिमात्य सभ्यता आणि संस्कृतीला होत असलेला विरोध हे दहशतवादाला कारणीभूत ठरत आहे. पाश्चिमीकरण आणि आधुनिकीकरण हे प्रगतीचे मार्ग मानून चालणाऱ्या अनेक देशामध्ये आज उलटी परिस्थिती दिसत आहे. पाश्चिमात्य संस्कृतीच्या आक्रमणाच्या आणि वर्चस्वाच्या भीतीतून दहशतवाद उभा राहत आहे. विशेषतः इस्लामी मूलतत्ववादाने प्रेरित झालेल्या दहशतवादामागे पाश्चात्य सांस्कृतिक वर्चस्वविरोधातील संतापाचा प्रचंड उद्रेक दिसून येत आहे.

**३) राजकीय प्रक्रियाचे अपयश :**

निर्णय प्रक्रियेत हिस्सा न मिळणे, विषमतेची किंवा असमानतेची वागणूक मिळणे, मुख्य समाजसुधारणेपासून वंचित व अन्यायाला बळी पडलेले, मागण्या मान्य करून घेण्यात किंवा हितसंबधाचे रक्षण करण्यात सतत अपयशी ठरलेले समाज गट दहशतवादाकडे वळतात. याला राजकीय प्रक्रिया जबाबदार असते. राजकीय सत्ते विरोधात जो हिंसाचार केला जातो त्यामागे विध्वंस हे उद्दिष्ट नव्हते तर प्रस्थापित सत्ते विरूद्धच्या परिवर्तनाचा तो एक भाग असतो. विल्किनसन यांच्या मते, राजकारणातील दहशतवाद म्हणजे बहुमताच्या निर्णयाविरोधात अल्प मतवाल्यांनी बदनामी, दडपशाही आणि वर्चस्व प्रस्थापनेसाठी उपसलेले एक हत्यारच असते.

**४) प्रगतिशील वंचितता –**

जेव्हा मूल्य अपेक्षितता वाढत असते आणि मूल्य समर्थनेची घसरण होत असते तेव्हा प्रगतीशील वंचितता निर्माण होते. खलिस्तान पुरस्कृत दहशतवाद हा या प्रकारात मोडतो. आधुनिकीकरणाची प्रक्रिया आणि वांशिकतेचा विस्फोट यामुळे सापेक्ष वंचिततेची जाणीव सर्वत्र पसरत असते.

टेड रॉबर्ट गर यांनी सापेक्ष वंचिततेच्या सिद्धांताच्या आधारे दहशतवादाच्या कारणांचे स्पष्टीकरण करता येईल. त्यांच्या मते, एखाद्या समुहातील लोकांकडून अपेक्षित असणारी मूल्ये आणि त्या समुहाची मूल्य समर्थता अथवा क्षमता यातील वाढत जाणारे अंतर म्हणजे एक असा परिणाम असतो की, यातून राजकीय सामूहिक हिंसाचाराचे वर्णन करता येते.

## दहशतवादाचे परिणाम

एखाद्या शत्रुराष्ट्राप्रमाणेच दहशतवादामुळेही राष्ट्रीय सुरक्षेला धोका पोहचतो. परंतु शत्रु राष्ट्राकडून होणारा धोका हा मुख्यतः भौगोलिक सीमांना असतो. तर दहशतवादाच्या हिंसाचाराचा धोका देशभरात कुठेही उसळतो. शत्रु राष्ट्राने हल्ला केल्यास सीमेला आव्हान दिले जाते. तर दहशतवादाचे आव्हान प्रामुख्याने देशातील राजवटीला, राज्यसंस्थेच्या अधिमान्यतेला असते. अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेतील फरक दहशतवादी हिंसाचारामुळे धुसर झाला. सुरक्षा नियोजनातील श्रमविभागणी कालबाह्य झाली. भारतात काश्मिरमध्ये किंवा ईशान्य भागातील दहशतवाद्यांशी प्रामुख्याने सैन्यदले लढा देत आहेत. हे आपण अनेक दशके पाहात आहोत. अंतर्गत आणि

बाह्यसुरक्षेच्या यंत्रणांचे परस्पर सहकार्य आज आवश्यक बनले आहे. तसेच सीमापार दहशतवादाचा सामना करण्याकरिता विविध देशांच्या सुरक्षा यंत्रणांमधील सहकार्य आणि देवाणघेवाण याचीही गरज निर्माण झाली आहे.

**अण्वस्त्र प्रसार**

अण्वस्त्र प्रसार म्हणजे अण्वस्त्रांच्या संख्येत आणि त्याच्या गुणवत्तेत वाढ करणे, अण्वस्त्रांचा राष्ट्रा-राष्ट्रात प्रचार होणे म्हणजे अण्वस्त्र प्रसार होय, अण्वस्त्र तयार करणे, त्याचे तंत्रज्ञान विकसित करणे होय.

अण्वस्त्रप्रसार दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने अणुबॉम्ब निर्माण केले. ऑगस्ट १९४५ मध्ये हिरोशिमा व नागासाकी या जपानमधील दोन शहरांवर अमेरिकेने अणूबॉम्ब टाकून ती उद्‌धस्त केली. यात हिरोशिमा शहरात ६६ हजार लोक मारले गेले, तर ६९,००० लोक जखमी झाले नागासाकी शहरात ३९ हजार लोक मारले गेले आणि पंचवीस हजार लोक जखमी झाले. या हल्ल्यात झालेल्या किरणोत्सर्गाचा परिणाम आजही दिसत आहे. दुसऱ्या महायुद्धात यामुळे जपानला शरणागती पत्करावी लागली. तर अणूबॉम्बच्या वापरामुळे जागतिक पातळीवर चिंता निर्माण झाली. कारण ही अण्वस्त्रांच्या वापराची सुरुवात होती. अण्वस्त्रांनी युद्धाच्या संकल्पनेत बदल घडवून आणला होता. तर दुसरीकडे अण्वस्त्राच्या निर्मितीने दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळातील आंतरराष्ट्रीय संबंधाच्या स्वरूपावर मोठा परिणाम केला. जागतिक पातळीवर अनेक राष्ट्रांनी अण्वस्त्रे विकसित करण्यास लगेच सुरुवात केली. कारण त्यामुळे राष्ट्रीय सामर्थ्यात वाढ होण्यास त्याची मदत झाली. प्ररोधन म्हणूनही त्याचा उपयोग झाला. अमेरिके पाठोपाठ सोव्हियेत रशियानेदेखील अण्वस्त्र निर्मितीला सुरुवात केली. पुढे शीतयुद्धाच्या काळात अनेक वेळा अणू वापर होईल अशी परिस्थिती निर्माण झाली होती. परंतु अण्वस्त्र वापर झाला नाही. थोडक्यात अण्वस्त्र वापरापेक्षा ते जवळ असणे हेसुद्धा महत्त्वाचे बनत चालले. अण्वस्त्राच्या जोरावर राष्ट्रे आपले हीच संबंध जोपासून लागली. परिणामी अण्वस्त्र प्रसार वेगाने होत गेला.

१९४५ नंतर अनेक राष्ट्रांनी आपली अण्वस्त्र निर्माण करण्याची क्षमता वाढविली आहे. त्यालाच अण्वस्त्रांचा आडवा प्रसार असे म्हणतात. दुसऱ्या महायुद्धानंतर शीत युद्धावेळी अमेरिके पाठोपाठ सोव्हिएत रशियानेही अण्वस्त्र निर्मिती केल्याने. जागतिक पातळीवर सत्ता समतोल निर्माण झाला. अमेरिका व सोव्हिएत रशिया या दोन महासत्तांमध्ये १९४५ ते १९९० या काळात झालेल्या शीत युद्धातून अनेक लष्करी गट स्थापन झाले. अमेरिकेने युरोपमधील भांडवलशाही राष्ट्रांबरोबर हात मिळवणी करत उत्तर अटलांटिक करार संघटना (NATO) निर्माण केली. तर सोव्हिएत रशिया आणि अन्य साम्यवादी राष्ट्रांशी हातमिळवणी करून वार्सा करार संघटना स्थापन केली. त्यानंतर इंग्लंड, फ्रान्स व चीनने अण्वस्त्रे निर्माण केली. पुढे या पाच अण्वस्त्रधारी राष्ट्रांनी अण्वस्त्र विस्तारास प्रतिबंध घालण्यास सुरुवात केली. अण्वस्त्र प्रसारबंदी करार आणि सर्वसमावेशक अणूचाचणी बंदी करार म्हणजे नव्या देशांचा अण्वस्त्र प्रसार रोखण्याचा एक प्रयत्न होय. परंतु वरील दोन्ही करार सदोष व विषमता जनक होते. कारण या करारांनी अमेरिका, सोव्हिएत रशिया, इंग्लंड, फ्रान्स, चीन या पाच राष्ट्रांचा अण्वस्त्रधारी राष्ट्रे म्हणून असणारा दर्जा व त्यांचे प्रभुत्व अबाधित ठेवण्याचा प्रयत्न केला.

शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर अण्वस्त्र नसणाऱ्या राष्ट्रांकडे स्वसंरक्षणासाठी काहीच राहिले नसल्याने त्यांच्यात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली. ही सुरक्षिततेची भावना अण्वस्त्रांच्या संख्येत वाढ होण्यास कारणीभूत

ठरली. कारण अन्य राष्ट्रे अण्वस्त्र मिळविण्याचा प्रयत्न करू लागली. इस्त्रायल व दक्षिण आफ्रिकेने अण्वस्त्र क्षमता विकसित केल्या. त्यापाठोपाठ भारतानेही मे १९९८ मध्ये पोखरण येथे भूमी अंतर्गत अणू चाचण्या घेऊन अण्वस्त्र क्षमता विकसित केली. पुढे पाकिस्ताननेही अण्वस्त्र क्षमता विकसित केली. थोडक्यात शीत महायुद्धानंतर अण्वस्त्र प्रसारास असुरक्षिततेची भावना कारणीभूत ठरली असे म्हणता येते.

आज जागतिक पातळीवर विविध राष्ट्रा राष्ट्रात निशस्त्रीकरण संबंधित अनेक तह करार होऊनही अण्वस्त्र क्षमतांचा प्रसार व निर्मिती थांबली नाही. अण्वस्त्रांचा विचार करता १९९४ मध्ये अमेरिकेकडे ७९००, रशियाकडे ९०००, फ्रान्सकडे ४७१, ब्रिटन कडे १६९ व चीनकडे ३०० अण्वस्त्र होती. दक्षिण आफ्रिकेने बेकायदेशीरपणे इस्रायलचे सहाय्य घेऊन १९७० मध्ये अण्वस्त्र निर्मितीचा प्रयत्न केला. त्यांनी १९७९ मध्ये अटलांटिक समुद्रात अण्वस्त्र चाचण्या घडवून आणल्या. परंतु इस्रायलने १९९१ मध्ये अण्वस्त्र निर्मितीचा कार्यक्रम रद्द केला. सर्व अण्वस्त्रे नष्ट करून अण्वस्त्र प्रसारबंदी करारावर स्वाक्षरी केली. १९९८ मध्ये भारत व पाकिस्तानचा अण्वस्त्रधारी देशांच्या यादीत समावेश झाला. भारताने अण्वस्त्रांचा लष्करी वापर टाळून अणूऊर्जेच्या नागरी वापरावर आधी लक्ष केंद्रित केले. शेजारी चीनने १९६४ ते २००० पर्यंत जवळजवळ चाळीस अणू चाचण्या घेतल्या. थोडक्यात जागतिक पातळी बरोबरच आशिया खंडातही विविध राष्ट्रांनी आपली अण्वस्त्र क्षमता विकसित केली.

१० जानेवारी २००५ रोजी उत्तर कोरियानेही आपल्याकडे अण्वस्त्रे असल्याचा खुलासा दिला. पुढे ९ आक्टोंबर, २००६ मध्ये त्यांनी अणूचाचणी घेतली. इराण गुप्तपणे अण्वस्त्र विकासाचा कार्यक्रम राबवित असल्याचा आरोप अमेरिका व काही युरोपिय राष्ट्रे  करत आहेत. ऑक्टोंबर २००३ मध्ये लिबियाने अण्वस्त्र प्रसार बंदी करारावर स्वाक्षरी केली. परंतु या कराराचा भंग करून त्यांनी अणूबॉम्ब निर्मिती केली. थोडक्यात १९४५ नंतर अण्वस्त्र प्रसारास सुरूवात होऊन आज बहुतांश राष्ट्रात त्याचा प्रसार झाल्याचे दिसते.

आज अण्वस्त्र सज्जतेमुळे माणसे एका अनिश्चित व धोकादायक परिस्थितीत राहत आहेत. युद्धांत अण्वस्त्रांचा वापर झाला तर ही अण्वस्त्रे कितीतरी अधिक पटीने पृथ्वीवरील जीवन पूर्णतः नष्ट करतील. निशस्त्रीकरण आणि अण्वस्त्र प्रसार थांबविण्याचे अनेक प्रयत्न होऊन सुद्धा अमेरिका, रशिया, इंग्लंड, फ्रान्स आणि चीन या राष्ट्रांमध्ये अण्वस्त्रांचे अजूनही प्रचंड मोठे साठे आहेत. दुसरीकडे इस्त्रायल, दक्षिण अफ्रिका, भारत, पाकिस्तान, लिबिया, उत्तर कोरिया व इराण सारख्या नवीन सत्तांमध्ये अण्वस्त्रांचा प्रसार झाला आहे. या घडामोडीने अण्वस्त्रांचा धोका जगाच्या अस्तित्वासाठी आणखीनच तीव्र होत आहे. जर स्थानिक युद्धांमध्ये अण्वस्त्रे वापरल्यास किंवा दहशतवाद्यांच्या हाती ती पडून त्याचा वापर झाल्यास जग संपुष्टात येण्यास वेळ लागणार नाही. आण्विक युद्ध न होतासुद्धा पृथ्वीवरील मानवजातीच्या आणि अन्या जातीच्या अस्तित्वाला धोका आहेच. कारण अपघाताने किंवा निष्काळजीपणाने अण्वस्त्रे हाताळल्यास त्यांचा स्फोट होऊ शकतो. सुदैवाने अण्वस्त्रांचा मोठा अपघात आजवर जगात झाला नाही.

### ४.२.४ जागतिक राजकारण आणि राज्याचे सार्वभौमत्व

शीतयुद्धोत्तर काळात नवीन विश्वरचनेत राष्ट्रीय सार्वभौमत्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. जागतिकीकरणामुळे दैनंदिन जीवनापासून जागतिक राजकारण्यापर्यंत बदल घडून आले आहेत. त्यातून कोणतेही राष्ट्र सुटले नाही. तर

राजकीय दृष्टिकोनातून काही अभ्यासकांनी आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रांचे पारंपरिक महत्त्व कमी करून बहुराष्ट्रीय कंपन्या, आंतरराष्ट्रीय संस्था, राज्याचे महत्त्व वाढविणारी प्रक्रिया म्हणून जागतिकीकरणाचा उल्लेख केला आहे. या प्रक्रियेमुळे राष्ट्रांच्या आर्थिक आणि राजकीय सार्वभौमत्वाची संकल्पना मागे पडली असून त्याची जागा आंतरराष्ट्रीय आर्थिक व राजकीय सार्वभौमत्वाने घेतली आहे.

**१) सार्वभौमत्वाचे विभाजन :**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने निर्माण केलेल्या नवीन पर्यावरणाशी जुळवून घेताना राष्ट्रांना अनेक अडथळ्यांचा सामना करावा लागत आहे. राष्ट्रांच्या पारंपरिक भूमिकेत बदल होऊन नवीन होऊन नवीन भूमिका ही राष्ट्रांचे कार्यक्षेत्र मर्यादित करणारी आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा सर्वात मोठा परिणाम हा राष्ट्रीय सार्वभौमत्वावर झाला आहे. राष्ट्रांचा सर्वोच्च गुणविशेष म्हणून सार्वभौमत्वाचा उल्लेख केला जायचा. सार्वभौमत्वाचा उल्लेख केला जायचा. सार्वभौमत्वाची संकल्पना ही अविभाज्य होती तथापि जागतिकीकरणामूळे निर्माण झालेल्या नवीन पर्यावरणात राष्ट्रांना अनेक क्षेत्रांमध्ये आपल्या पारंपरिक अधिकारांचे प्रत्यायोजन करावे लागल्यामुळे सार्वभौमत्वाच्या अविभाज्यतेपुढे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**२) सार्वभौमत्वाची स्वायत्तता व प्राधिकार धोक्यात –**

सार्व भौमत्वाच्या संकल्पनेचे प्राधिकार व स्वायतत्ता हे दोन प्रमुख आधार आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने परस्परावलंबित्वात वाढ झाली आहे. प्रत्येक अर्थव्यवस्थेशी जोडणे ही एक अपरिहार्य प्रक्रिया बनली आहे. प्रत्येक राष्ट्रांनी आपली अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडणे ही एक अपरिहार्य प्रक्रिया बनली आहे. अशा वेळी कोणत्याही राष्ट्रास अलिप्त राहून राष्ट्रीय अर्थव्यवस्थेची स्वायत्तता टिकविणे कोणत्याही राष्ट्राला शक्य नाही. प्रत्येक राष्ट्राला आपली अर्थव्यवस्था इतरांसाठी खुली करावी लागणार आहे. वाढत्या परस्परावलंबित्वामुळे सार्वभौमत्वाच्या स्वायत्ततेच्या घटकांचा प्रभाव कमी झाला आहे.

पारंपरिक सार्वभौमत्वाच्या संकल्पने प्राधिकराचा घटक अविभाज्य होता. तथापि जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या नवीन परिस्थितीमध्ये राज्यांना प्रत्येक क्षेत्रात प्राधिकरणाची अविभाज्यता टिकविणे अवघड बनले आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या जागतिक व्यापार संघ, बिगर शासकीय संघटना यांच्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील वाढत्या प्रभावामुळे आणि भूमिकेमुळे प्राधिकरणाच्या घटकास आव्हान मिळाले आहे.

आज आर्थिक व व्यापारी क्षेत्रात प्राधिकाराचे प्रत्यायोजन (Delegation of Authority) झाल्याचे स्पष्टपणे दिसते. आज विभागीय व्यापार संघ राष्ट्राच्या आर्थिक व व्यापारी हितसंबंधाचे प्रतिनिधीत्व करताना दिसतात. आपल्या देशातील शेतकऱ्यांना किती अनुदान द्यावे, आर्थिक विकासाचा दर किती असायला पाहिजे वित्तीय तुटीचे प्रमाण किती असायला हवे हे ठरविण्याचा प्राधिकार आता जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व व्यापारसंघ अशा व्यापार राजवटींना असेल.

**३) व्यापार राजवटीमुळे राष्ट्रांच्या आर्थिक अधिकारांवर मर्यादा –**

जागतिकीकरणाच्या पूर्वी आयातीवरील जकात राष्ट्राने किती ठेवावी? या विषयीचा प्राधिकार पूर्णपणे राष्ट्राचा होता, पण आता याविषयी व्यापार राजवटींचे नियम पाळावे लागतात. याचाच अर्थ आर्थिक व व्यापारी क्षेत्रात राष्ट्रे आणि व्यापार राजवटी यांच्यात प्राधिकाराची विभागणी झाली आहे. आर्थिक धोरण निर्मितीची

प्रक्रिया देखील आता केवळ राष्ट्रापूरती मर्यादित राहिली नाही. आर्थिक धोरण निर्मितीच्या प्रक्रियेवर व्यापार राजवटी, विभागीय व्यापार संघ, बिगर शासकीय संघटना, बहुराष्ट्रीय कंपन्या यांचा प्रभाव वाढला आहे. उदाहरणार्थ भारत हा जागतिक व्यापार संघटनेचा सदस्य आहे. भारताचे पाकिस्तानबरोबर राजकीय प्रश्नांवरून मतभेद असले तरी आर्थिक व व्यापारी क्षेत्रता भारताला पाकिस्तानला Most Favored Nation चा विशेष दर्जा द्यावाच लागतो. हीच बाब पाकिस्तानला देखील लागू पडेल. कारण हे जागतिक व्यापार संघटनेच्या घटनेतील बंधनकारक कलम आहे. थोडक्यात व्यापारी राजवटींमुळे राष्ट्रांच्या आर्थिक अधिकारांवर मर्यादा आल्या आहेत.

**४) राजकीय सार्वभौमत्वावर परिणाम –**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने राष्ट्रांच्या राजकीय सार्वभौमत्वाला प्रभावित केले आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विकसीत झालेल्या आणि प्रभावी बनलेल्या राजवटींनी मानवी सुरक्षा, मानवी हक्कांचे संरक्षण, पर्यावरणाचे संरक्षण, बालकामगारांची प्रथा, निःशस्त्रीकरण याविषयी विशेष नियम बनविले आहेत. जे प्रत्येक राष्ट्रांवर बंधनकारक आहेत. प्रत्येक राष्ट्राचा दरवर्षी मानवी हक्क उल्लंघनाचा पर्यावरण प्रदूषणाचा अभिलेख तयार केला जातो. त्याचे सकारात्मक अथवा नकरात्मक परिणाम राष्ट्रांना भोगावे लागतात. हा राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप असून राजकीय सार्वभौमत्वाचे उल्लंघन असल्याचे मत अनेक अभ्यासकांनी मांडले आहे. सन १९९० च्या दशकात मानवी सुरक्षेच्या प्रश्नावरून संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शांतिसैनिकांची काही राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारामध्ये स्वेच्छानुसारी हस्तक्षेप केला आहे. अण्वस्त्र प्रसारबंदी प्रश्नावरून अनेक राष्ट्रांना आर्थिक बहिष्काराचे चटके सहन करावे लागले. १९९८ साली भारत व पाकिस्तानने केलेल्या अणूपरीक्षणांमुळे त्यांच्यावरील आर्थिक बहिष्कार टाकण्यात आला होता.

**५) राज्यांपेक्षा राज्यकांची भूमिका महत्त्वांची**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा सार्वभौमत्वावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करताना राज्यकांमुळे (Non-State Actors) सार्वभौमत्वाच्या तत्वाचे उल्लंघन होत आहे. याचा विचार आपण केला. पण या ठिकाणी एक महत्वाची बाब म्हणजे ही राज्यके राष्ट्रांमधील बहुपक्ष पातळीवरील औपचारिक करारांमधून निर्माण झाली आहे. त्यांच्या निर्मितीत राष्ट्रांची अधिमान्यता आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर राष्ट्रांमधील सहकार्य वाढविण्यात तसेच आंतरराष्ट्रीय एकीकरणाच्या प्रक्रियेत ही राज्यके महत्वाची भूमिका पार पाडत आहोत. थोडक्यात राज्यके ही राष्ट्रांनी आपल्या फायद्यासाठी निर्माण केली असून ती राष्ट्रीय सार्वभौमत्वाला आव्हान देणारे घटक नाहीत. अशा परिस्थितीत सार्वभौमत्वाच्या पारंपरिक संकल्पनेमध्ये बदल घडवून नवीन परिस्थीतीला अनुकूल अशी सार्वभौमत्वाची संकल्पना मांडली गेली. तर राज्यके आणि राज्य यांचे सह अस्तित्व शक्य आहे. हा नवीन विचार राज्यशास्त्रामध्ये अधिक प्रसिद्ध होत आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे आज राष्ट्रांसमोर विविध आव्हाने निर्माण होवून राष्ट्रीय सार्वभौमत्वाचे उल्लंघन होत आहे. तर वाढत्या परावलंबित्वामुळे राष्ट्रांचे प्रधिकार व स्वायत्तता मर्यादित होत आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या आणि व्यापार राजवटींनी राष्ट्रांच्या अनेक क्षेत्रांमधील अधिकारावर अतिक्रमण केले आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे राष्ट्रांचे आंतरराष्ट्रीय राजकारणातील महत्व कमी होत असून राज्यकांचे महत्त्व वाढत आहे.

## ४.३ सारांश

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये सध्याच्या काळात मुख्य समस्या म्हणून मानवी हक्कांचे उल्लंघन, मानवी तस्करी, मानवी स्थलांतर, पर्यावरणाचा ऱ्हास, शाश्वत विकास, परमाणू वृद्धी, दहशतवाद, जागतिक राजकारणामुळे अनेक राज्यांच्या सार्वभौमत्वाचा मुद्दा उपस्थित झालेला आहे. वरील सर्व मुद्यावरून आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक राष्ट्रामध्ये संघर्षाची स्थिती निर्माण झाली आहे. विकसित राष्ट्रे, विकसनशील राष्ट्रे आणि मागास राष्ट्रे यांच्यामध्ये वरील मुद्यावरून संघर्ष होताना दिसतो. जगातील अनेक देशामध्ये मानवी हक्काचे उल्लंघन होताना दिसते. त्यामध्ये मानवाची मोठ्या प्रमाणात तस्करी होत आहे. ही बाब अतिशय गांभीर्याने घेण्याची गरज निर्माण झाली आहे. तसेच जागतिकीकरणामुळे पारंपरिक राजकीय व्यवस्था मोडकळीस आलेल्या आहेत. त्यामुळे मानवी स्थलांतर मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे अनेक विकसित देशामध्ये लोकांचे लोंढेच्या लोंढे जात आहेत.

पर्यावरणामुळे मानवाला जेवढ्या सोई सुविधा प्राप्त होत आहेत. त्याच्या दुप्पटीने मानव पर्यावरणाची हानी करत आहे. पर्यावरण हा सध्य काळामध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणात कळीचा मुद्दा बनला आहे. त्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या माध्यमातून अनेक करार केले जात आहेत. पर्यावरणाची लूट करून मानव पुढील पिढ्यांना पुरेल एवढी अनेक घटकांची साठवणूक करत आहे परिणामी ज्याच्याजवळ काही नाही तो उपाशीच राहत आहे आणि दुसरीकडे ज्याच्याजवळ एवढी संपत्ती आहे की त्याला किमान पुढच्या दोन पिढ्या काम करण्याची गरज नाही यातून शाश्वत विकास ही संकल्पना उदयास आली.

जागतिक पातळीवर तिसरी मोठी समस्या म्हणजे राष्ट्रा राष्ट्रात होत असलेली आण्विक स्पर्धा आणि त्यामुळे होत असणारी भयानक वाढ. जगातील अनेक देश सध्या अण्वस्त्रधारी आहेत. विकसित राष्ट्र, अविकसित राष्ट व मागास राष्ट्र अशी वर्गवारी न राहता लहान सहान मागास राष्ट्र सुद्धा अण्वस्त्र संपन्न झाली आहेत. उदा. इराक, इराण, पाकिस्तान, उ. कोरिया इ. यामुळे जगाला या अण्वस्त्र स्पर्धेचा धोका निर्माण झाला आहे. त्यासाठी प्रयत्न व उपाययोजना करणे गरजेचे आहे.

१९८० नंतर जगातील अनेक राष्ट्रामध्ये जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले. २१ व्या शतकात जागतिकीकरण सर्व जगाने स्वीकारले जो देश जागतिकीकरण स्वीकारणार नाही तो या व्यवस्थेच्या बाहेर पडला. त्या देशाला अनेक आर्थिक समस्यांना ग्रासले. परिणामी त्याही राष्ट्राला जागतिकीकरणात सहभागी व्हावे लागले. असे असले तरी जागतिकीकरणामुळे राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाचा प्रश्न प्रचंड प्रमाणात उफाळून आलेला आहे. जागतिक स्तरावरून सर्व बाबी निश्चित होत आहेत. यामध्ये विकसित देश व प्रत्येक राष्ट्राच्या सार्वभौमत्वावर गदा येऊ लागली आहे. परिणामी राष्ट्राच्या सार्वभौमत्वाचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

## ४.४ पारिभाषिक शब्द

१) मानवी हक्क – व्यक्तीचे नैसर्गिक हक्क

२) तस्करी – चोरटी विक्री

३) स्थलांतर – एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे.

४) पर्यावरण – मानवा सभोवतालचे नैसर्गिक वातावरण

५) परमाणू वृद्धी – अण्वस्त्राची वाढ / प्रसार

६) सार्वभौम – अंतर्गत व बाह्य दृष्ट्या परकीय नियंत्रण नसणे.

## ४.५ सरावासाठी स्वाध्याय

**प्रश्न १ संकल्पना स्पष्ट करा.**

| | |
|---|---|
| अ) मानवी हक्क | ब)ह्नमानवी तस्करी |
| ब) स्थलांतर | ड) पर्यावरण |
| इ) शाश्वत विकास | ई) परमाणू वृद्धी |
| ड) दहशतवाद | ऊ) जागतिकीकरण |

**प्रश्न २ टीपा लिहा.**

१) मानवी हक्क अर्थ व संकल्पना

२) मानवी तस्करी अर्थ व स्वरुप

३) स्थलांतर अर्थ व स्वरूप

४) पर्यावरण अर्थ व स्वरूप

५) शाश्वत विकास अर्थ व स्वरूप

६) दहशतवाद अर्थ व स्वरूप

**प्रश्न दिर्घोत्तरी प्रश्न**

१) मानव अधिकाराचा अर्थ सांगून त्यांची उत्क्रांती व विकासाची चर्चा करा.

२) मानवाधिकाराचा जागतिक जाहिरनामा चर्चा करा.

३) मानवी तस्करी म्हणजे काय ते सांगून संयुक्त राष्ट्रसंघाच्या प्रयत्नांची व उपायांची चर्चा करा.

४) पर्यावरण म्हणजे काय ते सांगून पर्यावरण प्रदूषणाचे परिणामाची चर्चा करा.

५) पर्यावरण म्हणजे काय ते सांगून आंतरराष्ट्रीय पातळीवरून पर्यावरण संरक्षणासाठीच्या प्रयत्नाची चर्चा करा.

६) शाश्वत विकास म्हणजे काय? शाश्वत विकासाच्या घटकांची चर्चा करा.

७) दहशतवाद म्हणजे काय? दहशतवादाची कारणे व परिणामांची चर्चा करा.

❑❑❑